
श्रीमत् भगवद् पूज्यपाद आद्य शंकराचार्य कृत

# अपरोक्षानुभूति

(अर्थ व विवरणा सहित)




- स्वामी नित्यबोधानंदतीर्थ

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# श्रीमत् भगवद् पूज्यपाद आद्य शंकराचार्य कृत

# अपरोक्षानुभूति

## (अर्थ व विवरणा सहित)

स्वामी नित्यबोधानंदतीर्थ

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

एनए ४००४-१

**श्रीमत् भगवद् पूज्यपाद आद्य शंकराचार्य कृत**
**अपरोक्षानुभूति**
**(अर्थ व विवरणा सहित)**

**प्रथमावृत्ती : २०१६**

**प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

© प्रकाशकाधीन

**मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.

किंमत : रु. २८९.००

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

## अध्यक्षांचे निवेदन

भारतीय संस्कृतीच्या अनेक वैशिष्ट्यांमध्ये भारताला लाभलेला प्राचीन वाङ्मयाचा समृद्ध वारसा हे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. आज संपूर्ण जगाला भारताच्या या समृद्ध वारशाने आकर्षित केले आहे. भारतीय संस्कृतीच्या आकर्षणापायी अनेक परदेशी विद्वान आज भारतीय प्राचीन वाङ्मयाचा अभ्यास करण्यासाठी भारतात येत असून प्रसंगी भारतीय भाषा शिकून या संशोधनकार्यात झोकून देत आहेत. असे हे प्राचीन भारतीय वाङ्मय व त्यातील तत्त्वज्ञान याबद्दल सद्यःस्थितीत समाजास काही शंका असल्या तरी ते स्वागतार्ह आहे कारण शंकानिरसनाचा एकमेव मार्ग म्हणजे या ग्रंथांचा सखोल अभ्यास करणे हाच आहे. याच विचाराने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून आपल्या प्राचीन वाङ्मयातील काही महत्त्वपूर्ण ग्रंथाचे सहज सोप्या भाषेत अर्थ व विवरण सादर करून रसिक वाचकांना सदर वाङ्मय उपलब्ध करून देणे हा मंडळाचा मानस आहे.

या पार्श्वभूमीवर श्री आद्य शंकराचार्यांनी त्यांच्या फक्त ३२ वर्षांच्या अल्प आयुष्यात आसेतुहिमाचल केलेले कार्य हजारो वर्षांच्या लक्षावधी पिढ्यांना सतत प्रेरणा व स्फूर्ती देणारे आहे. आजच्या या जागतिकीकरणाच्या कालखंडात राष्ट्राराष्ट्रांमध्ये सुरू असलेले कलह, दहशतवाद, छुपी युद्धे अशा भयंकर अस्थिर वातावरणात एका व्यापक मानव्याकडे नेणारे तत्त्वज्ञान श्री आद्य शंकराचार्यांनी मांडले. सदर 'श्री आद्य शंकराचार्य कृत अपरोक्षानुभूति (अर्थ व विवरणा सहित)' या ग्रंथातून विश्वात्मक ऐक्याला महत्त्व देणारे विचार सहज सोप्या भाषेत वाचकांना सादर करताना मंडळाला आनंद होत आहे.

**बाबा भांड,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

दिनांक : ८ नोव्हेंबर २०१६.

एनए ४००४-१अ

# अनुक्रमणिका


| क्रम | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| I | थोडे प्रास्ताविक | एक |
| II | श्री आद्य शंकराचार्य - संक्षिप्त चरित्र | तीन |
| १ | मंगला चरण | १ |
| २ | ग्रंथाचे नाव | २ |
| ३ | साधनेचे वर्णन | ५ |
| ४ | वैराग्याचे स्वरुप | ८ |
| ५ | विवेकाचे महत्त्व | १० |
| ६ | शमदमाचे स्वरुप | १२ |
| ७ | उपरति आणि तितिक्षेचे स्वरुप | १५ |
| ८ | श्रद्धा आणि समाधानाचे स्वरुप | १७ |
| ९ | मुमुक्षुतेचे स्वरुप | २० |
| १० | बहिरंग साधन कथन समाप्त | २३ |
| ११ | ज्ञान सिद्धीसाठी विचारांचे महत्त्व | २५ |
| १२ | विचारांचे स्वरुप | २७ |
| १३ | कोऽहम् संबंधी विचार अज्ञानाचे कार्य | २९ |
| १४ | अज्ञानाचे कार्य | ३२ |
| १५ | अज्ञान कुठे असते ? | ३४ |
| १६ | मीच निस्संदेह ब्रह्म कसा आहे ! | ३६ |
| १७ | अज्ञानाचे वर्णन | ३९ |
| १८ | अज्ञानाचे स्वरुप | ४१ |
| १९ | अज्ञानाचे स्वरुप | ४३ |
| २० | अज्ञानाचे स्वरुप | ४५ |
| २१ | अज्ञानाचे स्वरुप | ४७ |
| २२ | आत्म्याचे प्रकाशकत्व | ४८ |

| क्रम | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २३ | नाहं देहो - मी देह नाही | ५० |
| २४ | ज्ञानाचे स्वरुप | ५२ |
| २५ | ज्ञानाचे स्वरुप | ५४ |
| २६ | ज्ञानाचे लक्षण | ५७ |
| २७ | ज्ञानाचे लक्षण वा स्वरुप ( विषय पुढे चालू ) | ६० |
| २८ | ज्ञानाचे स्वरुप | ६३ |
| २९ | देहातीताला कसे शोधणार | ६६ |
| ३० | आत्मा सुदुर्दर्श का ? | ६८ |
| ३१ | विचार कसा करावा | ७० |
| ३२ | आत्मा द्रष्टा - देह - दृश्य - मग आत्मा देह कसा ? | ७२ |
| ३३ | देह आत्मा होऊ शकत नाही. | ७४ |
| ३४ | आत्म्यासंबंधी श्रुतीचे कथन | ७६ |
| ३५ | श्रुतीचे कथन ( विषय पुढे चालू ) | ७९ |
| ३६ | श्रुतीचे कथन ( विषय पुढे चालू ) | ८१ |
| ३७ | श्रुतीचे कथन ( विषय पुढे चालू ) | ८४ |
| ३८ | कर्मकाण्डानेही देह - आत्मा यांचे भिन्नत्व कसे - | ८६ |
| ३९ | लिंग देहाची अनात्मता | ८८ |
| ४० | प्रकरण समाप्त | ८९ |
| ४१ | देह आणि आत्मा यांना वेगळे मानण्याने काय साधले ? | ९० |
| ४२ | सत् - असत् - भेद | ९२ |
| ४३ | देह भेदाचे असत्त्व - निरुपण | ९४ |
| ४४ | शुद्ध चितत्त्वाची विश्वाकारता | ९६ |
| ४५ | प्रपंचाचे उपादान ब्रह्मच | ९७ |
| ४६ | भेदाची असत्यता | १०० |
| ४७ | नानात्वाचा (अनेकत्वाचा) निषेध | १०२ |

| क्रम | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४८ | नानात्व दर्शनात दोष | १०४ |
| ४९ | ब्रह्मातून जगाची उत्पत्ति | १०६ |
| ५० | ब्रह्माचे विभुत्व - विशालत्व | १०९ |
| ५१ | विश्व आणि ब्रह्म यांचे एकत्व | १११ |
| ५२ | भेद पाहाण्यांत भीति आहे. | ११३ |
| ५३ | अज्ञानाने द्वैत भासते | ११५ |
| ५४ | अद्वैत भावात सुख | ११७ |
| ५५ | श्रुतींचे प्रमाण | ११८ |
| ५६ | प्रपंच मिथ्या कसा | ११९ |
| ५७ | स्वप्न- जागृति - निद्रा यांचे स्वरुप | १२१ |
| ५८ | तिन्हीही अवस्था मिथ्या | १२३ |
| ५९ | ब्रह्मात जीवत्वाचा भ्रम | १२५ |
| ६० | आत्मस्वरुपात जीवत्व नाही | १२७ |
| ६१ | परब्रह्मात विश्व भ्रममूलक आहे | १२८ |
| ६२ | परब्रह्मात विश्व भ्रम ( विषय पुढे चालू ) | १२९ |
| ६३ | परब्रह्मात विश्व वा जग भ्रमस्वरुप आहे ( विषय पुढे चालू ) | १३० |
| ६४ | परब्रह्मात हे विश्व भ्रमरुप आहे ( विषय पुढे चालू ) | १३१ |
| ६५ | सर्व व्यवहारही ब्रह्ममयच आहे | १३३ |
| ६६ | ब्रह्मात कार्य-कारणत्व | १३५ |
| ६७ | ब्रह्मात कार्य कारणत्व ( विषय पुढे चालू ) | १३७ |
| ६८ | आत्मा दोन प्रकारचा भासतो | १३९ |
| ६९ | आत्मा व अनात्मा भेद मिथ्या | १४१ |
| ७० | देहालाच आत्मा मानणे भ्रांति | १४३ |
| ७१ | देहालाच आत्मा मानणे भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १४४ |
| ७२ | देहालाच आत्मा मानणे भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १४५ |

| क्रम | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ७३ | देहालाच आत्मा मानणे भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १४६ |
| ७४ | देहालाच आत्मा मानणे भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १४८ |
| ७५ | आत्म्यात देह भ्रांति | १४९ |
| ७६ | आत्म्यात देह भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १५१ |
| ७७ | आत्म्यात देहत्व भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १५३ |
| ७८ | आत्म्यात देह भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १५४ |
| ७९ | आत्म्यात देह भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १५५ |
| ८० | आत्म्यात देहत्व भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १५६ |
| ८१ | आत्म्यात देहत्वाची भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १५७ |
| ८२ | आत्म्यात देहत्वाची भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १५८ |
| ८३ | आत्म्यात देहत्वाची भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १५९ |
| ८४ | आत्म्यात देहत्वाची भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १६० |
| ८५ | आत्म्यात देहत्वाची भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १६१ |
| ८६ | आत्म्यात देहत्वाची भ्रांति ( विषय पुढे चालू ) | १६२ |
| ८७ | ज्ञानानेच देहभ्रांति - देहाध्यास जातो | १६४ |
| ८८ | ज्ञानानेच देहाध्यास जातो ( विषय पुढे चालू ) | १६५ |
| ८९ | आत्मचिंतन करीत जगणे | १६७ |
| ९० | आत्मज्ञानी महात्म्याच्या प्रारब्धाचे निराकरण | १७१ |
| ९१ | आत्मज्ञानी महात्म्यास प्रारब्ध नसते ( विषय पुढे चालू ) | १७३ |
| ९२ | प्रारब्ध मिथ्या कसे ( विषय पुढे चालू ) | १७५ |
| ९३ | हा देहही स्वप्नातील देहासारखा अध्यस्त आहे | १७७ |
| ९४ | आत्मज्ञानाने प्रपंचाची निवृत्ति | १७९ |
| ९५ | आत्मज्ञानाने प्रपंचाची निवृत्ति ( विषय पुढे चालू ) | १८१ |
| ९६ | आत्मज्ञानाने प्रपंचाची निवृत्ति ( विषय पुढे चालू ) | १८३ |
| ९७ | शरीराला प्रारब्ध भोग नाही | १८५ |

| क्रम | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ९८ | प्रारब्ध नाहीच | १८७ |
| ९९ | प्रारब्ध मानण्याने होणारी हानि | १८९ |
| १०० | साधन मार्गाचे वर्णन | १९१ |
| १०१ | निदिध्यासनाची आवश्यकता | १९३ |
| १०२ | निदिध्यासनाची अंगे } | १९४ |
| १०३ | निदिध्यासनाची अंगे } | १९४ |
| १०४ | यमाचे स्वरुप | १९५ |
| १०५ | नियमांचे महत्त्व | १९९ |
| १०६ | त्यागाचे निरुपण | २०१ |
| १०७ | मौना संबंधी कथन | २०३ |
| १०८ | मौनाचे स्वरुप | २०६ |
| १०९ | सहज मौनाचे लक्षण | २०७ |
| ११० | देश - एकान्ताची आवश्यकता | २१० |
| १११ | कालाचे महत्त्व | २१२ |
| ११२ | आसनाचे स्वरुप | २१४ |
| ११३ | आसनाचा अर्थ | २१६ |
| ११४ | मूलबन्धाचे स्वरुप | २१८ |
| ११५ | देहसाम्य स्थिति | २२० |
| ११६ | दृक्स्थिति - कशी असावी | २२२ |
| ११७ | दृक्स्थिति - कशी असावी ( विषय पुढे चालू ) | २२४ |
| ११८ | वेदान्तातील प्राणायाम | २२६ |
| ११९ | वेदान्तातील प्राणायाम } ( विषय पुढे चालू ) | २२८ |
| १२० | वेदान्तातील प्राणायाम } | २२८ |
| १२१ | वेदान्ताचा प्रत्याहार | २३० |
| १२२ | धारणा स्थिति | २३२ |

| क्रम | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२३ | ध्यानाचे स्वरुप | २३४ |
| १२४ | समाधि वर्णन | २३६ |
| १२५ | निदिध्यासन प्रकरण समाप्त | २३८ |
| १२६ | प्रकरण समाप्तीचा विषय - ( विषय पुढे चालू ) | २४० |
| १२७ | साधनेत येणारी विघ्ने | २४२ |
| १२८ | साधनेत येणारी विघ्ने | २४२ |
| १२९ | ब्रह्मवृत्तीत पूर्णत्व | २४६ |
| १३० | ब्राह्मीवृत्तीची उपेक्षा | २४८ |
| १३१ | ब्रह्माकार वृत्ति प्राप्त पुरुष प्रशंसा | २५० |
| १३२ | ब्रह्मज्ञानी व शब्दज्ञानी यातील फरक | २५२ |
| १३३ | शाब्दिक ज्ञानाची निन्दा | २५४ |
| १३४ | ब्रह्ममयी वृत्तीत स्थित महात्मा | २५६ |
| १३५ | कार्य - कारण - संबंध | २५८ |
| १३६ | शुद्ध वस्तु - आत्म्याचे स्वरुप | २६१ |
| १३७ | तत्त्वज्ञानाचा उदय | २६२ |
| १३८ | विचार करण्याची पद्धति ( विषय पुढे चालू ) | २६४ |
| १३९ | विचार करण्याची पद्धति | २६६ |
| १४० | ब्रह्मभावनेने ब्रह्मत्व प्राप्ति | २६८ |
| १४१ | सर्वं खलु इदं ब्रह्म । | २७० |
| १४२ | प्रपंचही ब्रह्मरुप आहे. | २७२ |
| १४३ | प्रसंग समाप्त | २७४ |
| १४४ | राजयोगाचे अधिकारी | २७६ |
| १४५ | समर्पण | २८० |
| १४६ | ऋण निर्देश | २८२ |
| १४७ | संदर्भ ग्रंथ सूची | २८३ |

# थोडे प्रास्ताविक

## "अपरोक्षानुभूति"

हा श्रीमत् भगवद् पूज्यपाद आद्य शंकराचार्यांचा एक वेदान्त शास्त्रावर आधारलेला, 'ज्ञान-साधन' मार्गावरील अत्यंत महत्त्वाचा व उपयुक्त ग्रंथ आहे. या ग्रंथाचे नावच वाचकांना, अभ्यासकांना वा साधकांना सांगत आहे की, आपल्या प्रत्येकाच्या देहात असणाऱ्या आत्मदेवाची, ब्रह्मस्वरुपाची अनुभूति ही - 'अ' म्हणजे नाही पर म्हणजे दुसरा, अक्ष - म्हणजे डोळे, अनुभूति - म्हणजे अनुभव. अर्थात् जो अनुभव आम्हाला घ्यावयाचा आहे, तो आमच्याच डोळयांनी, म्हणजे स्वतःच, स्वतःने घ्यावयाचा आहे. आमच्या देहातील आत्मतत्त्वाचा अनुभव, परका म्हणजे दुसरा कोणीही देऊ शकत नाही. जो ज्याचा त्यानेच घ्यावयाचा असतो. अशी ही आत्मानुभूति, ही स्वानुभूति म्हणजेच 'अपरोक्षानुभूति' आहे. स्वतः मधील आत्मत्त्वाचा स्वतःलाच आलेला प्रत्यक्ष अनुभव 'होय.'

हा वेदान्तातील सिध्दान्ताचे वा तत्त्वज्ञानाचे विवरण करणारा शास्त्र ग्रंथ नाही. विवेचनात्मक पध्दति पेक्षा सहज सुलभ अशी उपदेशात्मक विवरण पध्दति असल्याने वाचकाला वा साधकाला, साधने संबंधी अचूक मार्गदर्शन आचार्यांनी या ग्रंथातून घडविले आहे. आत्मतत्त्वाची प्रत्यक्ष अनुभूति घेणे हा विषय इतका सोपा नाही. त्या साठी साधकाची पूर्व तयारी असणे अत्यंत आवश्यक आहे. साधन चतुष्टय संपन्न साधकाला यातून सांगितलेल्या साधनेच्या अंगाची चटकन ओळख होऊन प्रचीति येते.

आचार्य हे महान् योगी, वेदान्ताचे महान् अनुभूति संपन्न, संन्यासी महात्मे होते. सनातन वैदिक धर्माचे वेदान्तरुपी राजद्वार त्यानी सगळयांसाठी उघडे केले होते, म्हणूनच ते वंदनीय जगद्गुरु आहेत. अशा सद्गुरुंचे दर्शन, त्यांच्या ग्रंथातून साधकाला प्राप्त होताच साधकही सद्गुरु होऊ लागतो. 'अपरोक्षानुभूति' हा ग्रंथ या दृष्टीने महान् प्रत्ययकारी आहे. ग्रंथ सस्कृत

भाषेत असूनही, त्यातील श्लोकरचना, अत्यंत सुलभ व सहज कळणारी आहे. श्लोकातून आलेली उदाहरणे वा दृष्टान्त, सामान्य माणसाच्या परिचयाची आहेत. तीच तीच उदाहरणे जरी आली, तरी त्यातून सूक्ष्म अर्थ-भेद प्रगट करण्याचे कौशल्य सहज लक्षात येते. काव्य, तत्त्वज्ञान, सुमधुर व आकर्षक शब्दावली यामुळे वाचक मंत्रमुग्धच होऊन जातो यात शंकाच नाही.

आचार्यांनी आपल्या सर्व शिष्यांना शेवटी जो संदेश दिला तो आपणा सर्वांनांही लाभदायकच आहे. ते म्हणाले होते - "ज्या विराट शक्तीच्या इच्छेनुसार या देहाने जन्म घेतला आणि कार्य केले, तिचीच इच्छा तुम्हा सर्वांना प्रेरणा देईल. संप्रदायाशिवाय कोणत्याही विद्येला अथवा साधनेला स्थायी रुप प्राप्त होत नाही. वेदान्त साधनेचा आदर्श सगळया जगाचे संपूर्ण कल्याण करणारा आदर्श आहे !"

॥ हरि ॐ तत् सत् ॥

# श्रीमत् भगवद् पूज्यपाद आद्य शंकराचार्य

## संक्षिप्त चरित्र

दक्षिण भारताच्या निसर्ग सौंदर्याने नटलेल्या केरळ राज्यात, पूर्णा नदीच्या काठी वसलेल्या **'कालडी'** नावाच्या लहान गावात शिवगुरु नावाचे नंबुद्री ब्राह्मण गृहस्थ रहात होते. त्याच्या पत्नीचे नाव आर्यंबा होते. दोघेही अत्यंत सुशील, सात्त्विक, सदाचार संपन्न होते. दोघेही धर्मकार्यात, भगवान शंकराच्या आराधनेत जीवन व्यतीत करीत होते. सुखी व समाधानी होते. बरेच दिवस अपत्य नसल्याने, घरात तीच कमतरता भासत होती. शिवोपासना नित्याप्रमाणे सुरु होती. एके दिवशी भगवान शंकरानीच स्वप्नात येऊन दृष्टांत दिला की, 'चिंता करु नका, मीच पुत्र रुपाने तुमच्या घरी येत आहे.' आणि काय आश्चर्य, माता आर्यंबा गरोदर राहील्या. नऊ मासा नंतर वैशाख शुध्द पंचमी, इ.स. ७८८ मध्ये, भगवान शंकराचा प्रसादरुप, तेजस्वी बाळाचा जन्म झाला. शिवगुरुंनी त्याचे नाव **'शंकर'** - 'शम् करोति इति शंकरः' । कल्याण करणारा तो शंकर, असे ठेवले.

बाल्यावस्थेत शंकर एक अलौकिक, प्रतिभासंपन्न, दिव्य स्मरणशक्ति असलेले बालक असल्याचे दिसून आले. वयाच्या पहिल्या वर्षापासूनच तो आईबरोबर मल्याळम् भाषा शिकून, थोडे थोडे बोलू लागला. दुसऱ्या वर्षापासून अक्षर ज्ञान होऊन तो लिहू वाचू लागला. तिसऱ्या वर्षी त्याने संस्कृत भाषा आत्मसात केली. अशा असामान्य पुत्राचे कौतुक पाहणे, शिवगुरुंच्या नशिबी नव्हते. शंकराच्या वयाच्या चौथ्या वर्षीच त्यांचे निधन झाले. पित्याच्या मृत्यु नंतर पुत्र शंकराची सारी जबाबदारी आईवर पडली. आर्यांबानी ती समर्थपणे पेलली.

वयाच्या ५ व्या वर्षी शंकराचा उपनयन - व्रत संस्कार करुन बाल शंकराना अध्ययनासाठी गुरुगृही ठेवले. ८ व्या वर्षी वेदाध्ययन पूर्ण केले. १२ व्या वर्षी चार वेदांच्या संहिता, आरण्यकें, ब्राह्मणें, उपनिषदें, षड्दर्शनें, शिक्षा

इत्यादी शास्त्राचा अभ्यास पूर्ण केला. माता आर्यांबाना बोलावून गुरुजी म्हणाले, "या आपल्या पुत्राला मज जवळ जे जे होते, ते ते मी सर्व याला दिले आहे. आता याला देण्यासारखे माझ्या ज़वळ काहीही नाही. आता यापुढील जो अभ्यास आहे, तो शंकराला संन्याशाकडून, विरक्त अवस्थेत, गुरु - शिष्य परंपरेनेच प्राप्त होईल." श्रीगुरुंकडून कालडीत असतानाच, नर्मदातीरी राहाणाऱ्या भगवान पूज्यपाद श्री गोविंदाचार्यांचे नाव ऐकले होते. ते वेदान्ताचे गाढे अभ्यासक व योग विद्येचे महान् जाणकार होते.

नर्मदाकाठी असणाऱ्या सद्‌गुरुंचे नाव ऐकल्यापासून, संन्यास घेण्याची व त्यांच्याजवळ जाऊन शिकण्याची तीव्र जिज्ञासा निर्माण झाली. बाल शंकर आईजवळ संन्यास घेण्याची इच्छा सांगू लागला. एकुलता एक मुलगा, संन्यास घेऊन निघून गेल्यावर पुढील आयुष्य कसे घालवावे, या विचाराने आई त्याला संन्यास घेण्यासाठी मनाई करीत होती. बाल शंकर सतत संन्यास-जीवनाचे स्वप्न पहात होता.

एके दिवशी अचानक असा प्रसंग घडून आला. आई सोबत नदीत स्नानाला गेला असताना एका मगरीने शंकराला घट्ट पकडले 'आई धाव धाव !' ही मगर मिठी सुटायची असेल तर तू मला संन्यास घेण्याची परवानगी दे ! नाहीतर माझा मृत्यु अटळ आहे ! बिचारी आई आर्यांबा घाबरुन गेली. "ती म्हणाली संन्यास घे, पण जिवंत बाहेर ये !!!" आणि काय आश्चर्य मगरमिठी सुटली व बाल शंकर पाण्यातून बाहेर आला.

'देवाच्या सख्यत्वासाठी, पडव्या जीवलगांशी तुटी' या समर्थ रामदासाच्या उक्तिप्रमाणे, पुढे शंकरानी, माता, आप्तेष्ट, गृह, ग्राम, या सर्वांचा त्याग करुन आईला साष्टांग वंदन करुन आश्वासन दिले की, "तू माझे स्मरण करताच तुझ्या समोर मी हजर होईन" माझी चिंता करु नकोस!" पुढे भ्रमण करत करत बाल शंकर नर्मदा काठी, ओंकारेश्वरास आले. लोकांनी श्री गोविन्दपादाचार्य यतिंची गुहा दाखविली. गुहेचा मार्ग भीतिप्रद होता, तथापि देहाची पर्वा न करता गुहेत प्रवेश केला व गुरुदेवांचे

दर्शन घेतले. श्री सद्गुरुंना साष्टांग प्रणाम करुन संन्यास दीक्षेची प्रार्थना केली. त्या तेज:पुंज बालकाचे हातून पुढे होणारे अलौकिक कार्य अंतर्ज्ञानाने जाणून, त्याला आपल्या जवळ ठेवून घेतले व पुढे विधिवत् संन्यास दीक्षा देऊन त्याचे 'शंकराचार्य' असे नामकरण केले.

श्री भगवान वेदव्यास याचे दिव्य, विरागी सुपुत्र श्री शुकदेव, त्यांचे शिष्य श्री गौडपादाचार्य, त्यांचे शिष्य श्री गोविन्दपादाचार्य व आता त्यांचे शिष्य श्री शंकराचार्य ! मूळ गुरु परंपरा अशी - आदि गुरु - आदिनारायण म्हणजेच श्री भगवान विष्णु - त्यांचे शिष्य चतुरानन म्हणजे ब्रह्मदेव - त्यांचे शिष्य श्री नारद महामुनि, नारदांचे शिष्य व्यास होत. अशा या महान् तेजस्वी परंपरेत श्री भगवान आद्य शंकराचार्य एक तेजस्वी रत्न होते. श्री सद्गुरुंच्या सहवासात दोन वर्षे राहून निर्विकल्प समाधीचा अनुभव घेतला. पूर्णानंद अवस्था प्राप्त झाली व नंतर श्री सद्गुरुंचा शुभाशीर्वाद घेऊन व नर्मदामातेला वंदन करुन भ्रमण यात्रेला प्रारंभ झाला.

संन्याशाच्या वेशात, पायी भ्रमण सुरु झाले. समाज जीवनाचे निरीक्षण करीत धार्मिक स्थानांचे, तीर्थस्थानांचे दर्शन घेतले. तत्कालीन भारत वर्षात वैदिक, हिंदु धर्माला ग्लानि, अवकळा आली होती. अनेक धर्म मताचा गलबला निर्माण झाला होता. चार्वाकाच्या 'खा, प्या, मजा करा' या तत्त्वज्ञानाने जनता मोहीत झालेली होती. भोगवादी, जड़वादी, वृत्तींनी थैमान घालून, निरीश्वरवाद, नास्तिकता फोफावत चाललेली होती. धर्मावरील विश्वास, श्रद्धा ढासळत चाललेल्या होत्या - संघर्ष, कलह, द्वेष, हिंसाचार, व्यभिचार व भ्रष्टाचार स्पर्धा यांची वाढ झालेली होती. समाजात अनेक जाति, उपजाति, पंथ, उपपंथ, अनेकानेक देव देवतांच्या पूजा व त्यात प्राण्यांचे बलिदान, अशा अनेकानेक कुप्रथा निर्माण झालेल्या होत्या. मूळ वैदिक धर्माचे स्वच्छ, अहिंसक, आदर्श स्वरुप जणू काय लुप्त होत चालले होते. अशा वेळी श्री भगवान शंकरानीच, श्री आद्य शंकराचार्यांचा अवतार धारण करुन धर्म, संस्कृति, आत्मज्ञान, व सदाचरणाच्या आदर्श तत्त्वांना उजाळा दिला - वैदिक धर्माला आलेली

अवकळा नष्ट करुन उच्च आदर्श मूल्यांचा पाठपुरावा करावयाचा होता. मानवाच्या अंत:करणातील उच्चतम भाव - भावनांना आवाहन करुन मानवी जीवनाचा दर्जा उंचावणे हाच आचार्यांच्या कार्याचा मुख्य उद्देश होता. मी नवीन काहीही सांगत नाही. फक्त जुन्याची साफ सफाई करुन तुमच्या पुढे ठेवीत आहे. निषेधापेक्षा समन्वयाचा दृष्टिकोन धारण करुन त्या काळातील जन समुदायाला व धर्म मार्तंडांना आचार्य सांगत असत. द्वैता कडून अद्वैताकडे वाटचाल करुन, वैदिक धर्माचे श्रेष्ठत्व ते पटवून देत होते. त्यासाठी, त्या कालातील अनेक द्वैतवादी, नास्तिक, कालबाह्य रुढी, प्रथांना चिकटलेले धर्म पंडितांचे प्राबल्य आचार्यांना मोडून काढावयाचे होते. त्यासाठी त्यानी प्रथम काशीला जाण्याचा निश्चय केला.

काशीत आल्यानंतर, तेथील गंगा मातेच्या पावन प्रवचनांना प्रारंभ झाला. आचार्यांची गोड, अमृतासमान वाणी, गौर वर्ण, तेजस्वी डोळे, सरळ नासिका, सतेज सडपातळ शरीर यष्टी, संन्याशाचा काषाय वस्त्राचा पेहराव, दंड - कमंडलु आणि गोंडस अल्पवयीन दिव्य मूर्ती या सर्व गोष्टींचा ऐकणाऱ्या श्रोत्यांच्या मनावर, बुध्दीवर निश्चितच सुपरिणाम होताना दिसत असे. काशी हे पुरातन संस्कृतीचें केंद्र व धार्मिक तीर्थक्षेत्रही होते. तेथे अनेक मठ, आश्रम, मंदिरे होती. अनेक विद्वान, तत्त्वज्ञानी, धर्म पंडित होते. अशा या भगवान विश्वेश्वर, शंकराच्या महानगरात आचार्य शंकरानी अद्वैत तत्त्वज्ञानाचा जयघोष करताना सांगितले की,

**" ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या, जीवो ब्रह्मैवनापरा।"**

ब्रह्मच सत्य आहे, जग मिथ्या म्हणजे परिवर्तनशील आहे व जीवही ब्रह्माहून वेगळा नाही. ब्रह्म आणि जग यात द्वैत नसून, अद्वैतच आहे. ब्रह्म सत्य, तर जग मिथ्या म्हणजे खोटे नसून, जगाचे दर्शन मिथ्या, भ्रमस्वरुप आहे. जग हे ब्रह्मावरच भासणारे भ्रमस्वरुप, अज्ञानस्वरुप, नाना रुपे, नामे व आकारांनी बनलेले आणि बदलणारे स्वरुप आहे. म्हणूनच जगाला मिथ्या म्हटले आहे. जे जे सर्व आहे, ते ते सर्व ब्रह्मच आहे. जीवही ब्रह्माहून वेगळा

नाही. जग हे जर ब्रह्मच आहे, तर लोक विचारतात, मग जगाच्या ठिकाणी आम्हाला ब्रह्म का दिसत नाही ? यावर आचार्य म्हणतात की, पाहणाराच्या चित्तात काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादी विकार आहेत. आसक्ति, वासना, कामना, नाना प्रकारचे कर्म संस्कार असल्याने, चित्त मलीन व चंचल आहे. त्यामुळे जगाच्या ठिकाणी ब्रह्म दिसत नाही. तसेच जीवही ब्रह्मच आहे. मग जीवाला ब्रह्म का म्हणत नाहीत ? कारण जीव हा देहभाव आहे. जीव स्वत:ला लहान, विकारी राग-द्वेषयुक्त समजू लागतो. देहाचा अहंकार, ममता यामुळे तो देहाशी बद्ध होतो. व जीव बनतो. ज्या वेळी चित्ताचे हे सर्व दोष दूर होतील, त्या वेळी आत्म्याचे वा ब्रह्माचे स्वरुप प्रकट होईल.

**"तस्मात् सर्व प्रपंचोऽयं ब्रह्मैवास्ति, न चेतरत् ।"**

म्हणून हा सारा प्रपंच, जग, ब्रह्मच आहे. दुसरे काही नाही - ब्रह्म, जीव, जगत् ही एकाच ब्रह्माची स्वरुपे आहेत, एकच आहेत. ही अद्वैत तत्त्वज्ञानाची दृष्टि देणारे आचार्य हे महान् तत्त्वज्ञ होते, तसेच ते महान् प्रतिभा संपन्न कविही होते. तसेच ते संत, विरागी, धार्मिक सुधारक, तीक्ष्ण मेधावी बुद्धि असलेले, वाद-विवाद कुशल ज्ञानी पंडीतही होते. ते महान् योगी व सिद्ध महात्मे होते. तुलना व निषेधात्मक विचार सरणीपेक्षा समन्वयाची भूमिका ते घेत असत. त्यांनी 'पंचायतन' पूजेत शिव, शक्ति, गणेश, विष्णु व सूर्य या पाच देवतांचा समावेश केला.

काशीत आल्यानंतर, आचार्यांनी तेथील अनेक विद्वान, धर्म पंडितांशी चर्चा व वादविवाद करुन, त्यांना अद्वैत मताचे सत्यत्व पटवून दिले. त्याची चुकीची द्वैत मते खंडित करुन, वैदिक धर्माचे खरे स्वरुप सप्रमाण पटवून दिले. त्यांच्या अमोघ वक्तृत्वाने, आकर्षक भाषा शैलीने, सुमधुर विचार मंथनाने, अनेक पंडित त्यांचे शिष्य बनले. काहीना त्यांनी संन्यास दीक्षा ही दिल्या. त्या कालातील मोठा विद्वान समजला जाणारा याज्ञिक व धर्म पंडित, मंडन मिश्र यांच्या बरोबर पंधरा दिवस वादविवाद केला. तो वेदातील पूर्व मीमांसा भागाचा पुरस्कर्ता होता. उत्तर भागांतील उपनिषदें ही अर्थवादात्मक

आहेत असे त्यांचे मत होते. मंडन मिश्राची सुविद्य पत्नि या वादातील परीक्षक होती. आचार्यांनी मंडनमिश्राच्या मतांचे खंडन करुन त्याच्या मतांचा पराभव केला. तेव्हा त्याच्या पत्नीने सांगितले की मी मिश्राची अर्धांगिनी आहे. माझ्या प्रश्नांची अचूक उत्तरे दिल्यास, मी तुम्हांस विजयी घोषित करीन. तेव्हा तिने आचार्यांना कामशास्त्रातील काही प्रश्न विचारले. या विषयात आचार्य अनभिज्ञ होते. त्यामुळे त्यांनी त्या प्रश्नांच्या उत्तरासाठी काही काळ मागून घेतला. आचार्यांना अनेक सिद्धीही प्राप्त झालेल्या होत्या. त्यांनी योग सामर्थ्याने एका मृत राजाच्या शरीरात, परकाया प्रवेश करुन काम शास्त्रातील ज्ञान प्राप्त करुन मंडन मिश्राच्या पत्नीस, तिच्या प्रश्नाची अचूक उत्तरे देऊन तिलाही पराभूत केले. पुढे **मंडन मिश्र** आचार्यांकडून संन्यास घेऊन शिष्य बनला. त्याचे **'सुरेश्वराचार्य'** असे नाव ठेवले. मंडन मिश्रासारख्या महान् पंडिताचा पराभव केल्यामुळे आचार्यांचा प्रभाव आणखीच वाढला. त्यात **पद्मपाद, हस्तामलक, त्रोटकाचार्य** या संन्याशांची भरच पडली. त्यानंतरही अनेक विद्वान पंडित आचार्यांचे शिष्य बनले. या सर्व शिष्य भक्तांना घेऊन आचार्यांनी आसेतु हिमाचल, सर्व भारतभर पायी प्रवास करुन जनजागृति, लोकसंग्रह, धर्म नि आचार यांच्यात सुधारणा करुन महान् कार्य केले. वैदिक धर्माला आलेली अवकळा त्यांनी दूर करुन हिंदुधर्माची पताका उंच करुन, फडकाविली - सारा भारत देश त्यांच्या प्रभावाखाली आला.

वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन, अद्वैत मताचा प्रचार व प्रसार, पंचायतन पूजेने करावयाची ईश्वर आराधना, सत्संग, योगाभ्यास, धर्मसंस्कारासाठी करावयाची धार्मिक व तात्त्विक सभा-संमेलने, यासाठी आचार्यांनी आपल्या प्रमुख चार संन्यासी शिष्यांना भारताच्या चार दिशांना चार मठांची स्थापना करुन, त्यांना मठाधिपति म्हणून नियुक्त केले. (१) भारताच्या दक्षिणेला **शृंगेरी मठ** व त्यात **यजुर्वेदाचे** प्रमुख अध्ययन करण्यास उत्तेजन दिले. (२) उत्तरेला **ज्योतिर्मठ** स्थापून तेथे **अथर्ववेद** अध्ययन त्याच्याच पुढे हिमालयात **बद्रिकाश्रम** नेर्माण केला. (३) भारताच्या पश्चिमेला **द्वारकामठ** स्थापन करुन तेथे **सामवेदाच्या**

अध्ययनास प्रारंभ झाला. (४) व पूर्वेला जगन्नाथपुरीला - **गोवर्धन मठ** वा त्याला **शारदा मठ** म्हणून तेथे **ऋग्वेद** अभ्यासासाठी सांगितला. या व भारतातील इतरही क्षेत्रात संन्यास परंपरेत अनेक आचार्य - शंकराचार्य म्हणून उदयास आले. कार्याचा व्याप फारच वाढला होता. तरीही पायी भ्रमण करीत राहून, वेळात वेळ काढूनं, विपुल ग्रंथ लेखन व काव्य निर्मिती केली. ती खालील प्रमाणे :- ही सर्व ग्रंथ निर्मिती व स्तोत्रें संस्कृत भाषेत आहेत.

(१) अपरोक्षानुभूति (२) विवेकचुडामणि (३) योग तारावली (४) सौंदर्य लहरी (५) प्रस्थानत्रयी भाष्य - यात (१) उपनिषदें दहा आहेत. (२) ब्रह्मसूत्रें (३) श्रीमद्‌भगवद् गीता (६) उपदेश सहस्त्री (७) विष्णु सहस्त्र नाम भाष्य. (८) आत्मानात्म विवेक (९) श्रीमंत्ररहस्य

विभिन्न देवतांच्या उपासकांसाठी, विविध उपासना स्तोत्रें लिहीली.

(१) देवी उपासकांसाठी - अन्नपूर्णा स्तोत्र, भवानी अष्टकम्, ललीता पंचरत्न, सौंदर्य लहरी इ.

(२) श्रीकृष्ण भक्तांसाठी - श्रीकृष्णास्टकम्, गोविंदाष्टकम्, अच्युताष्टकम्, पाडुरंगाष्टकम् इ.

(३) श्रीराम भक्तांसाठी - श्रीराम स्तोत्रम्, हनुमंत पंचरत्नम्

(४) स्फुट स्तोत्रें - काशी पंचकम्, वैराग्य पंचकम्, गुर्वाष्टकम्, आत्मषटकम्, जीवन-मुक्तानंद, लहरी, हस्तामलक स्तोत्र, कनकधारा स्तोत्र, श्री दक्षिणामूर्ति स्तोत्रम्.

(५) पवित्र नद्यांवरील स्तोत्रें - श्री गंगाष्टकम्, नर्मदाष्टकम्, श्री विश्वनाथाष्टकम्, हरि मीडेस्तोत्रम्, चर्पट पंजरी स्तोत्र - इत्यादी. आचार्यांच्या या विशाल साहित्यात त्यांच्या जीवनाचे, उत्तुंग विचारांचे, समाजाच्या सूक्ष्म निरीक्षणाचे व शुद्ध आणि पवित्र भावनांचे प्रतिबिंब उमटलेले आहे. वेद व उपनिषदें यांचे चांगले परिशीलन करुन, वैदिक धर्माची पुन: प्रतिष्ठापना करुन एक संघ भारत निर्मितीचे महान् कार्य केले.

आचार्य हे महान् वेदज्ञ, आत्मज्ञानी, ब्रह्मज्ञ तर होतेच, तसेच ते

महान् योगी सिद्ध सद्गुरु व शक्तिसंपन्न महात्मा होते. समर्थ सद्गुरुंची कृपा ही साधक - शिष्याला सिद्ध बनवू शकते, हे त्रोटकाच्या बाबतीत प्रत्यक्ष घडले. त्रोटक सामान्य बुद्धीचा पण अत्यंत सेवाभावी होता. बाकीचे तिघे, पद्मपाद, हस्तामलक व सुरेश्वराचार्य हे अत्यंत बुद्धिमान, विद्वान व कुशाग्र बुद्धीचे होते. एकदा आचार्यांनी सर्वांना नेहमी प्रमाणे बोलावून पाठ सुरु केला. त्रोटकाला सेवा कार्यात अडकल्यामुळे उशीर झाला. बाकीचे तिघे आचार्यांना सांगू लागले की, महाराज, आपण पाठ सुरु करावा. या त्रोटकासाठीं थांबण्यात काहीच अर्थ नाही. त्याला धड उच्चारण सुद्धा येत नाहीं. तिघांची त्रोटकाबद्दलची हीनत्वाची भावना दूर करण्यासाठी, आचार्यांनी त्रोटकाला पुन्हा हाक मारीली. बिचारा त्रोटक भांडी घासत बसला होता. तो तसाच धावत आला. कपडयांना हात पुसून गुरुंना साष्टांग नमस्कार घातला व पाठासाठी बसला. गुरुंनी त्याचे आसन आपल्या जवळ घेतले व तिघांना सांगितले की, आता हा त्रोटकच पाठ सुरु करील. त्याच्या पाठीवरुन गुरुंनी हात फिरविला. बाकीचे हासले तथापि सद्गुरुंच्या स्पर्शाने व कृपा दृष्टीने, सामान्य त्रोटकाचा त्रोटकाचार्य बनला आणि खडखडीत स्पष्ट व शुद्ध उच्चारण करीत, गुरुंच्या ऐवजी त्यांनेच पाठ शिकविला. संत ज्ञानेश्वरांनी तर रेड्यालाच वेद पठन करण्यास सांगितले, तसेच संत एकनाथांनी गावबा सारख्या गावंढळ अज्ञानी शिष्याला अध्यात्म रामायणाचे निरुपण व लेखन करावयास सांगितले. ही सद्गुरुंची कृपादृष्टि आणि शक्ति संचारण करण्याचे अतर्क्य सामर्थ्य होय.

एकदा माता आर्यंबानी आजारी असताना आचार्यांचे स्मरण केले. तिकडे आचार्यांना जाणवले की माता भेटीसाठी वाट पहात आहे. वचन दिल्याप्रमाणे, आचार्य आई पुढे उपस्थित झाले माता अत्यवस्थ होत्या. तथापि डोळे उघडून पुत्राला पहाताच आनंदाने गहींवरुन जवळ घेतले. त्याही अवस्थेत आईला आचार्यांनी भगवंताचे सगुण दर्शन घडविले. आई अनंतात विलीन झाल्या. शास्त्रानुसार संन्याशाला और्ध्वदेहीक विधी करता येत नाही. परंतु मातेच्या इच्छेनुसार शास्त्राची ही आज्ञा न मानता, तत्कालीन समाजाचा

विरोध व रोष पत्करुन आचार्यांनी मातेचे अंत्यविधी पार पाडले. मातृदेवतेची या पेक्षा कोणती मोठी सेवा आता करता येईल ? म्हणून त्यांनी हे सर्व सहन केले.

केरळ सारख्या भारताच्या एका कोपऱ्यातील प्रांतात, कालडी सारख्या एका लहान खेडयात जन्मलेला हा बाल ब्रह्मचारी - संन्यासी, लहानपणीच अध्यात्मज्ञान संपादन करुन वयाच्या आठव्या वर्षापासून अविश्रांत देशभर भ्रमण करतो, लोक संग्रह करतो, लोकांना प्रेरणा व स्फूर्ति देऊन, त्यांनाही अध्यात्माची गोडी लावतो. विद्वानांना, मोठ मोठया पंडितांना वादविवादात पराभूत करुन त्यांना शिष्य बनवितो. अद्वैत सिद्धान्ताची प्रतिष्ठापना करण्यासाठी, प्रचार व प्रसार करण्यासाठी आसेतु - हिमालय, सर्व भारताचे पद भ्रमण करतो, अत्यंत सद्वर्तनी, वैराग्य संपन्न संन्याशाची संघटना बांधतो. धर्म प्रसाराचे, संस्कृति रक्षणाचे, नैतिक मूल्यांचे व अद्वैत तत्त्वज्ञानाचे कार्य पुढेही सतत चालू रहावे, यासाठी मठ, आश्रम, मंदिरे, स्थापन करतो. अनेक सद्ग्रंथांची व सुमधुर आध्यात्माचा बोध देणारी काव्यसंपदा अगदी थोड्याच काळात, बत्तीस वर्षांच्या अल्पायुष्यात निर्माण करुन, हिमालयातील पवित्र तीर्थक्षेत्रात, केदारनाथ येथे समाधी घेतो, हे सर्व पाहिले म्हणजे, ही सामान्य गोष्ट नाही. हे भगवान शंकराचेच दुसरे अवतार कार्य आहे, याची खात्री पटते. भारतीय संस्कृतीचा हा आत्मा, अजरामरच आहे. यात शंकाच नाही.

श्री आद्य शंकराचार्यांचे कार्य, अत्यंत अल्प आयुष्यात म्हणजे ३२ वर्षात त्यांनी हजारो वर्षांच्या, लक्षावधी पिढ्यांना सतत प्रेरणा व स्फूर्ति देणारे आहे. केवळ भारतातील मानव समाजासाठीच नव्हे तर, विश्वातील अखिल मानव जातीला ते उपकारक आणि हितकारक आहे. आजच्या या २० व्या शतकात जगाची, प्रत्येक देशातील मानवाची स्थिति, भयानक संहार करणाऱ्या अणुबॉम्ब, हैड्रोजन बॉम्ब, जैविक मारक अस्त्रें, अति वेगवान् मारा करणारी भयानक अस्त्रें -. शस्त्रें यांनी भीषण, भयानक व भीतिदायक बनली आहे. त्यातच देशा देशाचे वैमनस्य, शत्रुत्व, संघर्ष यामुळे मनुष्य जीवन अशांत,

अस्थिर बनले आहे. कलह, द्वेष, हिंसाचार, व्यभिचार, भ्रष्टाचार फारच बोकाळला आहे. जडवादी, भोगवादी, अन्यायी, अनैतिक विचार व भावनांनी, आजच्या जगाची परिस्थिति किती उद्वेगजनक व भयानक बनली आहे. अशा विनाशाच्या अवस्थेंत जर एखादे तारक आश्रयस्थान असेल, तर ते म्हणजे आचार्यांचे तत्त्वज्ञान ! हेच होय.

इतिशम् ।

॥ हरि ॐ तत् सत् ॥

# श्रीमत् भगवद् पूज्यपाद शंकराचार्य कृत - "अपरोक्षानुभूति"

## (१) 'मंगलाचरण'

श्लोक :- **श्री हरिं परमानन्दमुपदेष्टारमीश्वरम्।**
**व्यापकं सर्वलोकानां कारणं तं नमाम्यहम् ।।१।।**

**अर्थ :-** परमानंदमय उपदेश करणाऱ्या, सर्व लोकांना व्यापून असणाऱ्या, सर्व विश्वाचे कारण असणाऱ्या, त्या श्रीहरिला मी नमस्कार करतो.

**विवरण :-** ग्रंथारंभी ग्रंथ लेखनाचे कार्य निर्विघ्न पार पडावे म्हणून भगवंताला प्रार्थना करण्याचा प्रघात आहे. कुणी मंगलाचरणांत प्रारंभी श्री गणेशाची आराधना करतो, तर कुणी शक्तिदेवतेची प्रार्थना करतो. श्री भगवान शंकराचार्यांनी श्रीहरि व उपदेश करणाऱ्या आपल्या श्री सद्‌गुरुंची प्रार्थना केलेली आहे. श्री हरि, भगवान व श्री सद्‌गुरु भिन्न नाहीत. **'गुरुः साक्षात् परब्रह्म'**। असे श्री भगवान शंकर श्रीगुरुगीतेतही सांगतात. भगवंताच्या परमानंदस्वरुप स्थितीचे वर्णन श्रीगुरुंना लागू पडते. गुरु - ईश्वर यांत भेद नसल्याने, तेच सर्व विश्वांत व्यापून प्रकाशित झालेले आहेत. या अखिल विश्वाचे निर्माते दोन असू शकत नाहीत, म्हणून उपदेश करणाऱ्या सद्‌गुरुंचे स्थान त्या श्रीहरीत सामावलेले आहे.

मंगलाचरणांत नमस्कार करण्याने अहंकाराचे विसर्जन होते. विनय, नम्रता, समपर्ण या सद्‌गुणांना धारण केल्याशिवाय ग्रंथातील प्रमेयाचे सुबोध विवरण, स्पष्टीकरण होऊच शकत नाही. त्या श्री हरिंच्या कृपा प्रसादाने काव्याची स्फूर्ति येऊन, परमानंदाची प्राप्ति करुन देणारे अक्षर वाङ्मय निर्माण होते. आचार्यांच्या अपरोक्षानुभूति या ग्रंथातून आलेल्या सुंदर विचारांनी व भावनांनी वाचकांचे उद्‌बोधन निश्चितच होणार आहे. प्रत्येकाच्या अंतःकरणांत असणाऱ्या परमात्म्याचा आनंद हाच परमानंद आहे. त्याच्या अनुभूतीलाच **'अपरोक्षानुभूति'** म्हणावे.

## (२) ग्रंथाचे नांव -

**श्लोक :-** **अपरोक्षानुभूतिर्वै प्रोच्यते मोक्षसिद्धये ।**
**सिद्भिरेषा प्रयत्नेन वीक्षणीया मुहुर्मुहुः ॥२॥**

**अर्थ :-** आत्मस्थिति प्राप्त करणाऱ्या महात्म्यांच्याद्वारे प्रमाणित केलेली ही अपरोक्षानुभूति मोक्षप्राप्तीसाठी येथे सांगितली जात आहे. संत सज्जनांनी ती प्रयत्नपूर्वक पुनः पुनः वाचन, श्रवण, मनन करण्याजोगी आहे.

**विवरण :-** या श्लोकांत श्री आचार्यजी ग्रंथाचा उद्देश व ग्रंथाचे नांव सांगत आहेत. ग्रंथाचा विषय, त्याचा अधिकारी, विषयाचा संबंध व विषयाचे प्रयोजन या चार गोष्टींना 'अनुबंध -चतुष्टय' म्हटले जाते. या ग्रंथाचा विषय आहे 'अपरोक्षानुभूति'! या शब्दाचा अर्थ - अ+पर+अक्ष+अनुभूति, अ म्हणजे नाही, पर - म्हणजे दुसरा, अक्ष - म्हणजे डोळा किंवा इंद्रिय, व अनुभूति म्हणजे अनुभव. अर्थात् दुसऱ्याच्या डोळ्याने अथवा इंद्रियाने होणारा अनुभव नाही. म्हणजेच आपणांस, आपणाकडूनच होणारा अनुभव म्हणजे 'अपरोक्षानुभूति'

अनुभव दोन प्रकारचा असतो. (१) प्रत्यक्ष (२) परोक्ष - समोर टेबल आहे, टेबलावर पुस्तक आहे, पेन आहे. घड्याळ आहे. या दिसणाऱ्या वस्तुंचा अनुभव प्रत्यक्ष आहे. लांब डोंगरावर धूर दिसत आहे म्हणजे तेथे अग्नि असलाच पाहिजे - या अनुभवास परोक्ष किंवा अनुमानजन्य अनुभव म्हणता येईल. जगात प्रत्यक्ष व अनुमान या दोन प्रमाणांनी आपणांस ज्ञान होत असते. परोक्ष म्हणजे अनुमानाने अथवा दुसऱ्याकडून आलेलें - प्रत्यक्ष म्हणजे स्वतःला प्रत्यक्ष होणारे ज्ञान - सामान्यपणे स्थूल पदार्थांचे ज्ञान इंद्रियगम्य व सूक्ष्म पदार्थांचे ज्ञान अनुमान गम्य म्हटले जाते. तथापि वायु, उष्णता, सुगंध, इ. सूक्ष्म पदार्थांचे ज्ञान इंद्रियगम्य असू शकते.

जेथे तर्क, विचार, यांचा उपयोग होत नाही. जे इंद्रियांच्या पलिकडे असते उदाहरणार्थ आत्मा-परमात्मा-आत्मशक्ति, यांचे ज्ञान इंद्रियगम्य नाही. यांचा अनुभव म्हणजे अपरोक्षानुभूति होय. अपरोक्षानुभूति मध्ये साक्षात् आत्म

स्वरुपाचा अनुभव असतो. अर्थात् असा अनुभव घेण्यासाठी, शिष्य - साधकाचा पूर्वाभ्यास, अधिकार उन्नत असावयास हवा. अशा अधिकारी शिष्यालाच मोक्षप्राप्तीची तळमळ हवी असते. संसाराच्या बंधनातून विरक्त होत होत, त्याला परमार्थातील अनेक अवस्थांचा परिचय, ज्ञान करुन घेण्याची तीव्र इच्छा हवी. आज काल ज्यांना मोक्षाची आवश्यकता वाटत नाही, त्यांना जर परमार्थाचा उपदेश करु लागलो तर काहीही उपयोग नाही. अष्टावक्रगीतेत म्हटल्या प्रमाणे- **आश्चर्य मोक्षकामस्य मोक्षादेव बिभीषिका ।**(३/८)
आश्चर्याची गोष्ट आहे की, आजकाल मोक्ष इच्छिणाऱ्यासच मोक्षाची भीति वाटते. मोक्षाची भीति वाटणाऱ्या साधकाला, मोक्षाचा उपदेश करणे व्यर्थ आहे -मुक्त होऊ इच्छिणाऱ्या साधकास प्रथम संसारातील मोहपाश, भावनात्मक तादात्म्य, विषयांची आसक्ति, इंद्रियांची धावाधाव, यातून मुक्त व्हावे लागेल. बौद्धिक पातळीवर, अनेक विकार अहंकार, ममत्व, बौद्धिक कल्पना, विचार यांच्यापासून परावृत्त होणे आवश्यक आहे, नाही तर मोक्षाचा अधिकारी कसे होता येईल ? प्रपंचातून परमार्थाकडे जाणारा हा मार्ग अनेक खाच - खळग्यांनी भरलेला असतो. मार्गात येणाऱ्या अनेक अडचणी, प्रतिबंध, धैर्याने निश्चयाने पार करणे अत्यावश्यक आहे. यासाठी काही सद्‌गुणांची, सत् संगाची प्राप्ति होणे नितांत आवश्यक आहे - उदात्त मूल्यांचे व शुद्ध ध्येयाचे जीवन जगण्याच्या महत्त्वाकांक्षेने पेटलेले लोक, भगवान शंकराचार्यांना येथे अपेक्षित आहेत. विषयासक्त व्यक्तींना यांत कुठेही स्थान नाही - अध्यात्माच्या क्षेत्रातील सर्वात मोठे व शेवटचे प्राप्तव्य आत्मस्वरुप आहे. आत्म्याचा अनुभव म्हणजेच अपरोक्षानुभूति आहे. या अनुभूतीनेच मोक्षाचे फल प्राप्त होते - म्हणून श्रुति सांगते - **"आत्मा वा अरे द्रष्टव्य: श्रोतव्य: मन्तव्य : निदिध्यासितव्य:"**
आत्म्याचेच दर्शन करावयास हवे. श्रवण, मनन, निदिध्यासन करावयास हवे. 'दर्शन' करणे लक्ष्य आहे व श्रवण, मनन, निदिध्यासन करणे साधन आहे. ते लक्ष्य प्राप्त करण्यासाठी श्रुति म्हणते -

**"तद् विजिज्ञासस्व, तद् ब्रह्म।" - तैतरीय उपनिषद -(३-१)**

त्याचीच जिज्ञासा म्हणजे जाणण्याची इच्छा करावी, तेच ब्रह्म आहे.

**'स आत्मा स विज्ञेय:।'**

तो आत्मा आहे, तोच जाणण्यास योग्य आहे. त्याची अनुभूतिच अपरोक्षानुभूति आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (३) साधनेचे वर्णन -

**श्लोक :-** **स्ववर्णाश्रम धर्मेण तपसा हरितोषणात् ।**
**साधनं च भवेत्पुंसां वैराग्यादि चतुष्टयम् ॥३॥**

**अर्थ :-** आपल्या वर्णाश्रम धर्माप्रमाणे, तपश्चर्येने व भक्तीने भगवंताला संतुष्ट करुन, वैराग्यादि चार साधनांची प्राप्ति होते. ॥३॥

**विवरण :-** प्रत्येक मनुष्याला त्याच्यामध्ये आवश्यक असणाऱ्या सद्गुणांची योग्यता असल्याखेरीज त्याला प्रपंचात वा परमार्थात उन्नति करता येत नाही. या परमार्थातील उन्नतीसाठीच येथे विशेषत्वाने विचार करण्यात येत आहे. परमार्थ हा भगवंताच्या प्राप्तीचा मार्ग आहे. हा भगवंत, प्रत्येकाच्या अंत:करणात वास्तव्य करीत आहे. तो हरीच या देहाचा स्वामी आहे. या स्वामीला संतुष्ट केल्याशिवाय जीवनात शांति, समाधान, सुख प्राप्त होत नाहीत. यासाठी शास्त्रात जे जे उपाय सूचविलेले आहेत ते ते अवश्य करावयास हवेत.

आध्यात्मिक दृष्ट्या साधकाचे यश त्याचा वर्ण, आश्रम, धर्म, तप व हरिभक्ति यावर अवलंबून आहे. वर्ण चार आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र. हे वर्ण म्हणजे जाती नव्हेत. आज वर्णांना जातीचे स्वरुप देऊन समाजात अनेक भेदांचे जाळे निर्माण झालेले दिसत आहे. वास्तविक व्यक्तीचे गुण व कर्म यांच्यामुळे वर्ण निर्माण होतात. हे वर्ण कसे झाले ते श्री भगवान भगवद्गीतेत सांगत आहेत.-

**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुण कर्म विभागश: ।**
**तस्य कर्तारमपि मां विद्धय कर्तारमव्ययम् ॥१३॥** अ. ४

भगवान म्हणतात - ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णांचा समूह गुण व कर्म यांच्याद्वारे निर्माण झालेला आहे. मी सृष्टि रचनेचा कर्ता असूनही वास्तविक अकर्ता आहे.

वर्णांचा संबंध, सत्त्व, रज व तम या तीन गुणांशी आल्याने कर्मही त्रिगुणात्मक झाले. एखाद्या व्यक्तीचा 'वर्ण' त्याच्या जन्मावरुन, आई -

वडीलांवरुन ठरत नसून त्याच्या सूक्ष्म वासना, कामना, अहंकार नि आसक्ति वरुन ठरविला जातो. आश्रमही चार आहेत. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम. प्रत्येक आश्रमांतील कर्म, व्यवहार, धर्म, मनोवृत्ति, अंतर्भावना, स्वभाव प्रवृत्ति व विचार संपत्ति वेगवेगळी आहेत. समाज जीवनांतून विकसित, उन्नत होत होत आत्मस्वरुपाशी समरस होण्यासाठी ही आश्रम व्यवस्था आपल्या पूर्व सूरींनी निर्माण केलेली आहे.

तपश्चर्या म्हणजे मनाचे एखाद्या उच्च ध्येयाकडे एकाग्रत्व, नियंत्रण व नियमन होय. आत्मसंयमाने इंद्रियांचे नियमन करुन ध्येयसिद्धी प्राप्त करावी लागते. परमेश्वराच्या अखंड स्मरणाने व ध्यानाने इंद्रियांचे विषयभोग नियंत्रित करुन वासनाक्षय होणे हे 'तप' आहे. त्यासाठी विवेक, वैराग्य, शम-दमादी षट्क, व मुमुक्षा हे साधन चतुष्ट्य आहे, म्हणजे चार प्रकारची साधने आहेत- शम, दम, उपरति, श्रद्धा व समाधान हे शमदमादी षट्क आहे.

धर्म म्हणजे मनाला नियंत्रणात ठेवणारी शक्ति ! विषयांकडे आकृष्ट होणाऱ्या मनाला रोखण्याची जी शक्ति तिलाच धर्म, धर्मवृत्ति, धर्म प्रवृत्ति इत्यादी नावांनी संबोधण्यात येते. ज्या व्यक्तीत ही शक्ति जितकी अधिक, तितका तो अधिक खराखुरा धर्मात्मा होय. धर्म अंत:करणाच्या शुद्धीसाठी व पवित्रतेसाठी अत्यावश्यक आहे. विशेषत: मनाला स्थिर व सुस्थितीत ठेवण्यासाठी धर्माची नितांत गरज आहे. मनात येईल ते करीन, मनात येईल ते बोलेन, मनात येईल तसे वागेन, अशा प्रकारे वागणाऱ्या मनाला मर्यादा घालण्याचे कार्य धर्म करतो. अधर्माने वागणारी माणसे मनोमुखी असतात. त्यांच्यामुळेच समाजात अनेक उत्पात, दु:खे निर्माण होतात. धर्माचे आचरण करणारी व्यक्ति आपल्या पूर्वजांचा उदात्त वारसा पुढे चालविते, आपल्या जीवनांतील सांस्कृतिक मूल्यें सुरक्षित ठेवते. समाजापुढे आदर्श ठेवणारी व्यक्ति धर्मात्मा, संतप्रवृत्तीची व सदाचारी असते. पशुतुल्य जीवनांतून मानवी जीवन घडविण्यासाठी 'धर्म' च सहाय्यभूत होतो. अधर्माने वागणाऱ्या समाजामुळे देशाची महान

हानि होते. देशाला अवनतीकडे नेणारी ही अधर्मी समाज कंटक मंडळी निर्माण होऊ नये म्हणून धर्म जागृति अति आवश्यक आहे.

हरीला संतुष्ट करण्यासाठी ही सर्व साधने साधकाने निर्मळ अंत:करणाने आचरणात आणावयास हवीत.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (४) वैराग्याचे स्वरुप -

श्लोक :- ब्रह्मादिस्थावरान्तेषु वैराग्यं विषयेष्वनु ।
यथैव काकविष्ठायां तद्धि निर्मलम् ॥४॥

**अर्थ :-** ब्रह्मापासून एका गवताच्या काडीपर्यंत सर्व विषयामध्ये वैराग्य असावयास हवे. कावळ्याच्या विष्टेबद्दल आपली बुद्धि जशी हेय, म्हणजे टाकावू (निरिच्छ) असते, त्या प्रमाणे सर्व विषयांबद्दल तशी बुद्धि होणे म्हणजे निर्मल वैराग्य होय. ॥४॥

**विवरण :-** प्रथम वैराग्य म्हणजे काय, हे समजून घेतले पाहिजे. लोक म्हणतात वैराग्याची आवश्यकताच काय ? वैराग्या शिवाय आम्ही भगवंताची भक्ति, पूजापाठ, प्रवचन, पारायण, वाचन, सत्संग करु शकत नाही का ? असे प्रश्न जेव्हा उपस्थित होतात, तेव्हा वैराग्य म्हणजे नेमके काय याबद्दल मनात गोंधळ असतो. वैराग्य म्हणजे द्वेष, घृणा, मत्सर करणे नव्हे. हे विकार आहेत. वैराग्यात विकार नसतात. मन अनासक्त होणे, मन - बुद्धीने विषय लालसा, भोगासक्ति, कामलालसा न ठेवता शुद्ध, निर्मळ राहून चिंतन, मनन, निदिध्यासन, ध्यान, धारणा करता आली पाहिजे. शुद्ध व सात्त्विक अंत:करणानेच भगवंताची भक्ति, साधना करण्यात समाधान व आनंद आहे. आत्मस्वरुपाची प्राप्ति, आत्मज्ञानाची उपलब्धि, होण्यासाठी सद्‌गुरुंची कृपादृष्टि असणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी सद्‌गुरु लाभणे, त्यांच्या सहवासात राहणे, त्यांची सेवा करणे त्यांचे प्रेम संपादन करणे आवश्यक आहे. अशावेळी एखादी व्यक्ति जी मन-बुद्धि-चित्त आणि अहं, या अंत:करणातील इंद्रियांनी मलीन झालेली आहे, जी विषयभोगांच्याच चिंतनांत रमणारी आहे. काम वासनेने सदैव पछाडलेली आहे, ती भगवंताच्या प्राप्तीसाठी कोणती साधना व कशा तऱ्हेने करु शकेल ? अर्थात् अशा व्यक्तीला ते कसे जमणे शक्य आहे ? म्हणून अंत:करणात अनासक्ति, वैराग्य असणे किती आवश्यक आहे, हे चटकन कळते. स्वच्छ जागी वृक्षाखाली बसले असतांना फांदीवरुन कावळ्याने

आपल्या हातावर विष्ठा टाकली, तर ती जशी आम्ही झटकून टाकतो, हात धुवून स्वच्छ करतो. त्याप्रमाणे निर्मळ वैराग्याने जीवनात शुद्धि, सात्त्विकता, सद्‌गुणांची आवड निर्माण होते.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (५) विवेकाचे महत्त्व -

श्लोक :- नित्यमात्मस्वरुपं हि दृश्यं तद्विपरीतगम् ।
एवं यो निश्चयः सम्यग्विवेको वस्तुनः स वै ॥५॥

**अर्थ :-** आत्मा हा आपल्या देहात अखंड व एकटाच आहे. याच्या उलट जग अनित्य (बदलणारे) व नाना गोष्टींनी भरलेले आहे. अशा तऱ्हेची निश्चयात्मक निष्ठा असणे, यालाच खऱ्या अर्थाने 'विवेक' असे समजले जाते ॥५॥

**विवरण :-** विवेचनं इति विवेकः। विवेचन म्हणजे वेचणे - वेचून अलग करणे. दोन पदार्थांचे मिश्रण झालेले असताना, ते वेग-वेगळे करणे. जड वस्तूंचे मिश्रण असले तर ते डोळ्यांना दिसते. तथापि जड व चेतनाचे मिश्रण डोळ्यांना दिसत नाही. उदाहरणार्थ आपले शरीरच पहा. यात मांस, हाडें, रक्त, मल, मूत्र इत्यादी अनेक जड पदार्थ भरलेले आहे. अशा जड देहांत आत्मा, आत्मशक्ति, आत्मचेतनाही आहे. या नित्य, अखंड आहेत पण जड वस्तु अनित्य, बदलणाऱ्या आहेत. अशा वेळी कुणी विचारले की, तू कोण ? देह की आत्मा ? या ठिकाणी विवेकाची, विचाराची गरज आहे. सर्व सामान्य अविचारी माणूस स्वतःला देहच समजतो. देह अनित्य, मर्त्य, सडणारा, परिवर्तनशील आहे हे कळते, तरीही मी मनुष्याकृति, विशिष्ट नामधारक देहच समजणे हा अविचार, अविवेक आहे.

'विवेक' ही बुद्धीतील जाणण्याची शक्ति आहे. बुद्धीला ही जाणीव, शक्ति, हे ज्ञान त्या चेतन आत्म्यानेच होते. शरीरात ती आत्मचेतना नसेल तर बुद्धिही काही जाणू शकत नाही. आपल्या देहातील सर्व इंद्रियांना ही आत्मचेतनाच कार्यशील बनविते. आत्म्याशिवाय देह म्हणजे प्रेत. प्रेताची स्थिति एखाद्या जड वस्तूप्रमाणे आहे.

विवेकाचा उपयोग प्रपंचात व परमार्थातही होतो. प्रपंचात जर विवेक नसेल तर चांगले - वाईट, खरे-खोटे, ग्राहय-त्याज्य, सुंदर-असुंदर कळणारच नाही. हीच गोष्ट परमार्थातही आहे. देव-गुरु - शिष्य, साधन - साध्य,

कळण्यासाठी विवेकाची अत्यंत आवश्यकता आहे.

माझ्यातील आत्मतत्त्व हे शाश्वत, निरंतर, न बदलणारे आहे आणि याच्या उलट वस्तूमात्रांचे, भावनांचे स्वरुप, विचारांचे जग सतत बदलणारे आहे असे जाणणे म्हणजे विवेक.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (६) शम-दमाचे स्वरुप -

**श्लोक :-** **सदैव वासना त्यागः शमोऽयमिति शब्दितः ।**
**निग्रहो बाह्यवृत्तीनां दम इत्यभिधीयते ॥६॥**

**अर्थ :-** वासनांच्या सदैव त्यागाला **'शम'** असे म्हणतात व इंद्रियांच्या बाह्यक्रिया वा वृत्तींना दमन म्हणजे निग्रह करुन आवरणे म्हणजे **'दम'** होय ॥६॥

**विवरण :-** आपल्या मनामध्ये अनेक वासना, कामना, इच्छा निर्माण होत असतात, त्यामुळे आपले मन चंचल, विक्षिप्त होत असते. मनुष्याला अशा मनाने कोणतेही कार्य अचूक, यथायोग्य करता येत नाही. मनात तर अनेक भाव-भावना उत्पन्न होतच असतात. अशा वेळी सावध होणे आवश्यक आहे. क्रोधाची भावना उठली तरी तोंडाने शिवी-गाळी देता कामा नये. संतापाने स्वतः तप्त न होता दुसऱ्यास तापवू नये. मनात निर्माण झालेल्या क्रोध भावनेला क्रियान्वित होऊ देऊ नये.

'सर्व दर्शन संग्रह' या ग्रंथात भगवान श्री शंकराचार्यांनी फार उपयुक्त माहिती दिलेली आहे. ते म्हणतात - वात प्रकृतीच्या व्यक्तीला काम, पित्त प्रकृतीच्या व्यक्तीला क्रोध व कफ प्रकृतीच्या व्यक्तीला लोभ अधिक असतो. अशा प्रकारे ज्याचे मन या विकारांनी रोगी आहे तो बिचारा 'योगी' कसा होऊ शकेल ? म्हणून वासना त्याग आवश्यक आहे.

क्रोध या एकाच विकाराने केवढी हानि होते, ते शास्त्र सांगते -

**क्रोधात् भवति संमोहः । संमोहात् स्मृति विभ्रमः ।**
**स्मृति भ्रंशात् बुद्धिनाशः । बुद्धिनाशात् प्रणश्यति ॥**

एखादी व्यक्ति क्रुद्ध, संतप्त झाली म्हणजे तिच्या बुद्धीत भ्रम, मोह निर्माण होतो. भ्रमिष्ट बुद्धिमुळे, स्मरण रहात नाही, स्मरण भ्रष्ट झाल्यानंतर तिच्या ठिकाणी बुद्धीच रहात नाही, म्हणजे तिच्या बुद्धीचा नाश होतो. आणि बुद्धी नष्ट झालेली व्यक्ति प्रणश्यति म्हणजे तिचा संपूर्ण नाश होतो. त्या व्यक्तिला मनुष्यत्व रहात नाही.

आत्मस्वरुपाच्या बाबतीत तीन गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. त्या प्रत्येकाने लक्षात ठेवण्यास हव्यात -

(१) आत्मस्वरुप प्राप्त झालेल्या स्थितीत, तो महात्मा कुणाचेही अनिष्ट म्हणजे वाईट चिंतीत नाही. तो त्या आत्मानंदात रमलेला असतो. तो त्या रसमय, आनंद व मधुर स्वानंदात दुसऱ्याचे वाईट चिंतन कधीच करु शकत नाही.

(२) तो असा ज्ञान प्रकाश असतो की, त्यात अंधाराचे नावच नसते. तो कुणालाही फसवीत नाही व तोही कुणाकडून फसविला जात नाही. फसणे - फसविणे हे अज्ञानाचे कार्य आहे. तो सदैव ज्ञानस्वरुप असल्याने त्याच्या ठिकाणी अज्ञान नसते.

(३) आत्मज्ञानी अमृतस्वरुप असतो. त्यामुळे तोही मरत नाही व दुसऱ्यालाही मारत नाही. तो स्वयं अमृतमय असतो.

अपरोक्षानुभूति प्राप्त महात्मा असा रस आहे जो कधी विटत नाही व फिकाही होत नाही. त्याच्या इंद्रियांचे विषय, रुप, रस, गंध, स्पर्श व शब्द त्याला कधीही छळत नाहीत. त्याचा सूर कधीच बेसूर होत नाही. वासनाच नसल्याने तिच्या पूर्तिसाठी धाव-पळ करण्याची त्याला आवश्यकताच नसते. मातीची घागर लहान, मोठी, रंगीत व रंगहीन कशीही असो, आत बाहेर ती मातीच असते. त्याप्रमाणे हे शरीर नश्वरच आहे पण त्यात असलेला प्रकाशमान आत्मा नित्य आहे. आपण दुसऱ्यांचे सुख, सौंदर्य पाहतो पण आपल्या अंतरातही तेच भरुन राहिलेले आहे, असे आत डोकावून पहात नाही. आपल्या हृदयात जशा चांगल्या गोष्टी आहेत, तशा छळणाऱ्या वासना, कामनाही आहेत. वासनेत दुःख निर्माण होते. म्हणून वासनांना, कामनांना आवर घालणे म्हणजे मनाचे नियंत्रण करणे. यासच शम असे म्हणतात.

**निग्रहो बाह्य वृत्तीनां 'दम' इत्यभिधीयते ।**

'दम' म्हणजे दाबणे, नियंत्रण करणे. इंद्रियांचे नियंत्रण, त्यांच्या वृत्तींना आवरणे म्हणजे 'दम' होय. आज कालच्या युगात बरेचसे लोक

आपल्या पुत्रासाठी धन कमावून ठेवतात. याचा अर्थ पुत्र धन कमाविण्यास अपात्र, अयोग्य झाला. त्याला धन कमाविण्याची योग्यता कशी येणार ? त्याला भाग्य कसे म्हणता येईल ? त्याच्यावर ईश्वर कृपा कशी होईल ? तो धनाचा सदुपयोग वा दुरुपयोग करील त्यावेळी तुम्ही कुठे असणार ? म्हणून आशा ही दुराशा होईल म्हणून बाह्य वृत्तींना नियंत्रित करणे अत्यावश्यकच आहे. यासच 'दम' असे म्हणतात.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (७) उपरति आणि तितिक्षेचे स्वरुप -

**श्लोक :-** **विषयेभ्य: परावृत्ति परमोपरतिर्हि सा ।**
**सहनं सर्व दु:खानां तितिक्षा सा शुभा मता ॥७॥**

**अर्थ :-** सर्व विषयांतून वृत्तींचे पराङ्‌मुख होणे-परावृत्त होणे म्हणजे श्रेष्ठ उपरति होय. सर्व दु:खांना सहन करणे म्हणजे शुभ तितिक्षा होय ॥७॥

**विवरण :-** इंद्रि [illegible]षय म्हणजे - डोळ्यांचा विषय रुप, कानांचा विषय-शब्द, नाकाचा विषय - गंध, वास, जिभेचा विषय - रस, हात - पाय - त्वचा यांचा विषय स्पर्श. इंद्रिये आपआपल्या विषयांकडे धाव घेतात. सर्व इंद्रियें मनाच्या आधीन असतात. मनामुळेच इंद्रियांना त्यांचे विषयभोग भोगता येतात. अशा प्रकारे इंद्रियें सतत विषयभोगांमध्ये गुंतून बसली, तर ती मनासहित भगवंताकडे कधी जातील ? अशा प्रकारे मनाच्या आणि इंद्रियांच्या वृत्ति विषयांतून परावृत्त म्हणजे बाहेर काढल्याशिवाय आत्मबोध, आत्मस्वरुप कधीही प्राप्त होणार नाही. इंद्रियांचा गुलाम बनून राहिलेला भक्त, भगवंताची भक्ति कसा करु शकेल ? योग साधनेला तर वावच मिळणार नाही. म्हणून विषयांत गुंतलेल्या मनाला आत्म्याकडे लावावयास हवे. मनोवृत्ति विषयोन्मुख होण्याऐवजी ती आत्माभिमुख व्हावयास हवी. तरच परमार्थाची वाटचाल सुरु होईल. अध्यात्मातील उन्नत अवस्था प्रवृत्तींना विषयांतून आवरल्याशिवाय कशा प्राप्त करता येतील ? वृत्तींना विषयांमध्ये जाऊ न देता मनाला स्थिर करणे, शांत करणे म्हणजे उपरति आहे.

एक महात्मा म्हणत असत, "आराम पाहिजे असेल तर रामावर प्रेम करा. राम आल्याशिवाय आराम कसा मिळेल. आणि राम तर तेव्हाच येतील जेव्हा तुम्ही उपराम व्हाल." म्हणून सांसारिक विषयांतून मनाला उपराम करा.

संसारात येणाऱ्या कष्टांना, दु:खांना, आघातांना सहन करणे म्हणजे तितिक्षा होय. तितिक्षा म्हणजे सहनशक्ति. प्रपंच आणि परमार्थ दोघांत सहनशक्तीची म्हणजे तितिक्षेची आवश्यकता आहे. येणारी सुख-दु:खे आपल्याच

पूर्व कर्मांची फळे आहेत. हे प्रारब्धाचे भोग ज्याचे त्यालाच भोगावे लागतात. ते आनंदाने भोगण्यातच शुभ तितिक्षा आहे. हाय हाय, आरडा-ओरड करुन इतरांनाही त्याचा त्रास देणे वाईट आहे.

**।। हरि ॐ तत् सत् ।।**

## (८) श्रद्धा आणि समाधानाचे स्वरुप -

**श्लोक :-** **निगमाचार्य वाक्येषु भक्तिः श्रद्धेति विश्रुता ।**
**चित्तैकाग्रयं तु सल्लक्ष्ये समाधानमिति स्मृतम् ॥८॥**

**अर्थ :-** वेद - शास्त्र आणि आचार्यांच्या वचनावर भक्ति म्हणजेच श्रद्धा म्हणून प्रसिद्ध आहे. त्या दृष्टीने त्या सत्-तत्त्वावरील मनाची एकाग्रता म्हणजेच समाधान असे म्हटले जाते. ॥८॥

**विवरण :-** श्रद्धा म्हणजे वेद आणि गुरु यांच्यावरील भक्ति होय. श्रद्धा म्हणजे विश्वास ठेवणे. जीवनात आपणास अनेक गोष्टींचे ज्ञान, माहिती नसते. अशा वेळी कुणाचे तरी मार्गदर्शन घ्यावेच लागते. मार्गदर्शक मग लहान असो वा मोठा असो. **"जो जो जयाचा घेतला गुण, तो तो म्यां गुरु केला जाण. गुरुंसी आलें अपार पण, जग संपूर्ण गुरु दिसे"** बालात् अपि सुभाषितम् ग्राह्यम् । आपल्या वयाहून लहान असणारे एखादे बालक सुद्धा आपल्याला एखादा सत् विचार देऊन जाते. त्या वेळी तो सुविचार सांगणारा लहान की मोठा हा विचार आपण करीत नाही. एखाद्या मार्गाने प्रवास करीत असताना, चौफुली आली आणि नामदर्शक फलक नसेल तर कुणाला तरी विचारावेच लागते, अन्यथा चूकीच्या मार्गाने जाणे अयोग्य होय. ज्याला आपण मार्गाबद्दल विचारतो, ती व्यक्ति जे सांगेल त्यावर विश्वास, श्रद्धा ठेवावीच लागते.

विद्यार्थ्यांना गुरु जे जे शिकवितो, सांगतो, त्यावर श्रद्धा ठेवल्याशिवाय प्रगति, उन्नति होतच नाही. पुस्तकात, ग्रंथात छापलेल्या माहितीवर श्रद्धा, विश्वास ठेवावाच लागतो. त्यावेळी ग्रंथ हेच आपले गुरु असतात. आपले वेदशास्त्र हे अगदी प्राचीन कालापासून जीवनाचे, धर्माचे, अध्यात्मशास्त्राचे, व ईश्वराचे मार्गदर्शन करीत आलेले आहे. त्या ज्ञानसंपत्तीवरील भक्तीलाच श्रद्धा असे म्हटले जाते. प्रपंच आणि परमार्थ या दोन्ही क्षेत्रात श्रद्धेचे फार महत्त्व आहे. आजारी असताना, डॉक्टरांचे औषध घेताना डॉक्टरांवर श्रद्धा ठेवावीच लागते. वाहनात बसल्यानंतर वाहन चालकावर, ड्रायव्हरवर विश्वास

ठेवावाच लागतो. **श्रद्धया सत्यमाप्यते ।** श्रद्धेने सत्यापर्यंत जाता येते. श्रद्धा नसेल तर सत्य हाती कसे लागेल ?

चित्ताची प्रसन्नता चित्तात शांति आली, चित्त शांत झाले की, चिंता, काळजी, भय, दु:ख इत्यादी अशांतीचे विषय दूर जातात. अशांत चित्त, अस्वस्थ होऊन भरकटत फिरते. त्याला कुठे तरी विश्रांतीचे स्थान हवे असते. सुखकारक संवेदना जेव्हा त्याला प्राप्त होतील, तेव्हाच ते शांत होत जाते. यासाठी भगवंताची आराधना जेथे चाललेली आहे. आनंदाने जेथे जमलेली भक्त मंडळी, भक्तिभावाने हसत, नाचत-गात आहेत. त्यांना पाहून आपणास त्या सुखद संवेदनांची जाणीव होते. व आपले अस्वस्थ, व्याकुळ झालेले मन हळूहळू स्थिर होऊन शांत होत जाते.

शांत चित्तातच समाधान प्राप्त होते. चित्ताची समता - शांतिशिवाय कशी निर्माण होईल ? अर्थात् चित्ताला, मनाला शांत करण्याचा उपाय शोधलाच पाहिजे. संत महात्म्यांच्या जीवनात अवतरलेले समाधान कशामुळे आले, ते पाहिले पाहिजे. ऐहिक गोष्टींनी समाधान प्राप्त झाले, तरी ते टिकावू नसते. नश्वर गोष्टींनी प्राप्त झालेले समाधानही नश्वरच असते. म्हणून शाश्वत, चिरंतन तत्त्वाकडे वळले पाहिजे आणि ते म्हणजे आत्मतत्त्व, आत्मस्वरुप, आत्म-सुख हेच होय.

आत्म-सुखासाठी ते ज्याला प्राप्त झाले आहे. त्याच्याकडेच जावे लागेल. 'सद्‌गुरु' हेच त्या सुखाचे स्थान आहे. आत्मबोध, आत्मज्ञान हीच सुखाची व समाधानाची गुरुकिल्ली आहे. सद्‌गुरुंच्या प्राप्तीशिवाय ती हाती लागणे शक्य नाही. श्रीगुरुगीता सांगते -

**गुरु वक्त्र स्थितं ब्रह्म, प्राप्यते तत्प्रसादत: ।**
**गुरोर्ध्यानं सदा कुर्यात्, कुलस्त्री स्वपतेर्यथा ।।१९।।**

गुरुदेवांच्या मुखातील वाणीत असलेले ब्रह्म, त्यांच्याच प्रसन्नतेने प्राप्त होत असते. म्हणून कुलवती (पतिव्रता) स्त्री ज्या प्रमाणे आपल्या पतीचेच ध्यान करते, त्या प्रमाणे गुरुदेवांचे सदैव ध्यान करावयास हवे.

**गुरो: कृपा प्रसादेन, आत्मारामं निरीक्षयेत् ।**
**अनेन गुरुमार्गेण, स्वात्मज्ञानं प्रवर्तते ॥११०॥**

श्रीगुरु कृपा प्रसादाने आत्मारामाचे निरीक्षण करावे. याच गुरुमार्गाने आत्मज्ञानात प्रवेश होतो. हाच खरा सुख, शांति, समाधानाचा सर्वोत्तम मार्ग आहे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (९) मुमुक्षुतेचे स्वरुप -

**श्लोक :- संसारबन्ध निर्मुक्तिः कथं मे स्यात्कदा विधे । (कथं स्यान्मे दयानिधे)**
**इति या सुदृढा बुद्धिर्वक्तव्या सा मुमुक्षुता ॥९॥**

**अर्थ :-** संसाराच्या बंधनातून माझी मुक्ति कशी आणि केव्हा होईल ? हे दयानिधे ! अशी दृढ बुद्धीने केलेली प्रार्थना, इच्छा म्हणजेच मुमुक्षुता, मुक्ति होय ! ॥९॥

**विवरण :-** संसार हा संसार करणाऱ्याला संपवून टाकतो पण तो संपत नाही. वास्तविक संसार काही जीवंत प्राणी नाही. मग तो संसारी माणसाला कसा बांधेल ? संसारात अनेक बंधने आहेत हे खरे. पण ती बंधने आम्ही ओढून घेतलेली असतात. आम्हीच संसाराच्या बंधनांनी बंदिवान होतो. अशा या बंदिशाळेतून करो सुटावे ? बंदीखान्यातील बंधनांची सवय झाली की, मग ती बंधने आहेत असेही वाटत नाही. अशा बंधनांनी जखडलेला मनुष्य पुन्हा पुन्हा त्या संसारात रमतो. अशा वेळी त्याला त्याच्या मुक्ततेची गरज भासत नाही. मोक्ष, मुक्तिही त्याला सूचतच नाही. म्हणून आचार्य भगवान म्हणतात, "हे दयानिधे ! अशा व्यक्तीला त्याचे स्वरुप कळावे. त्याला संसाराच्या बंधनातून सुटण्याची तीव्र इच्छा व्हावी, हीच मुमुक्षुता आहे." आणि प्रभु कृपेने ती जर त्याला लाभली, तर त्याच्या जन्माचे सार्थक होते. बंधनांतून सुटण्याची अशी बुद्धि होणे हीच ईश्वराची, सद्गुरुंची कृपा होय.

संसार हा मायेचा पसारा आहे. मायेने मोह निर्माण होतो. मोहाचा सोबती लोभ आहे. काम, क्रोध, मद, मत्सर हे सर्व विकार एकत्र जमून, संसारी माणसाला बांधून टाकतात. विकारवश झालेला संसारी मनुष्य, बुद्धीनेही अपंग होतो. अशा वेळी तो ती बंधने कशी तोडणार ? कमीत कमी ती बंधने तोडण्याची बुद्धिच नसली तर जीवन व्यर्थ जाते. मग त्याला देव, धर्म, गुरु, साधना इ. परमार्थाच्या गोष्टी कशा लाभणार ? विधे ! ब्रह्मदेवालाच हाक मारावी लागेल. तो दयानिधी आहे. त्यालाच जर दया आली तर सत् संगती

लाभेल. सत् संगतीने त्याला बंधनाची जाणीव होईल आणि मग संत सत्पुरुषांच्या मार्गदर्शनाने बंधनाच्या पाशातून मुक्त होण्याची जिज्ञासा निर्माण होईल. अशा प्रकारे संसाराच्या बंधनातून मुक्त झाल्याशिवाय, त्या परमेश्वराची प्राप्ति होणारच नाही. धर्म, अर्थ, काम, व मोक्ष या चार पुरुषार्थांनी मनुष्य जीवन समृद्ध होत होत शेवटी मोक्ष प्राप्त होऊन जन्म-मरणाची वारी संपते.

मोक्ष - मुक्ति या नावाची गोष्ट स्वर्गात, पाताळात वा भूलोकात पहावयास गेले तर कुठेच सापडणार नाही. तो आपल्याच मन, बुद्धि, चित्तात भरलेला आहे. बाहेरचे जग आपल्या मनात भरलेले असते.

**द्वेपदे बंध - मोक्षाय । ममेति न ममेति च ।**
**ममेति बद्धते जंतु । न ममेति विमुच्यते ॥**

**मम** व **न मम** या दोन शब्दांत मोक्ष आणि बंध भरलेले आहेत. न मम इति - म्हणजे हे माझे नाही म्हटले की मुक्ति होते. मम म्हणताना ममत्व येते. ममत्वात आसक्ति असते आणि ही आसक्तिच मनाचा बंध आहे. न मम म्हणताना.अनासक्ति येते. अनासक्ति ही बंधनातून सोडविते. जगातील पदार्थ, विषय मनुष्याला बोलवत नाहीत. ते असेही म्हणत नाहीत की आम्ही तुझे आहोत. त्यांना मम व न मम ठाऊक नाही. मग ते मनुष्याला कसे बांधतील ? अर्थात जड पदार्थ बांधू शकत नाहीत. सारी बंधने आमच्या मनामुळेच येतात. म्हणून बंधनातून सुटण्यासाठी आपल्या मनाकडेच धाव घ्यावी लागेल. त्या मनाला समजवावे लागेल.

**मना वासना चूकवी येरझारा ।**
**मना कामना सांडि रे द्रव्य दारा ॥** मनाचे श्लोक - २१

समर्थ रामदास स्वामींनी मनाला सज्जन म्हणून त्यालाच वासना, कामना सोडावयास सांगितले आहे. या वासना, कामना मनाला अनेक कर्मांच्या, संगतीत नेतात, त्यामुळे वाईट माणसांचा संग होतो.

**जयाचेनि संगे समाधान भंगे ।**
**अहंता अकस्मात येऊनि लागे ॥**

**तये संगतीची जनीं कोण गोडी ।**
**जिये संगतीने मति राम सोडी ।।४५।।** म.श्लोक

आपला अहंकार अनेक बंधने निर्माण करणारा आहे. त्यामुळे आपले मन शांति-समाधानाने राहू शकत नाही. प्रभु नामाने, या अहंकाराला, ममतेला, आसक्तीला तोडले पाहिजे. ही सारी बंधने तोडल्याशिवाय मोक्ष कसा प्राप्त होईल ? अर्थात् नाही.

।। हरि ॐ तत् सत् ।।

## (१०) बहिरंग साधन कथन समाप्त -

**श्लोक :-** **उक्त साधनयुक्तेन विचार: पुरुषेण हि ।**
**कर्तव्यो ज्ञान सिद्ध्यर्थं आत्मन: शुभमिच्छता ॥१०॥**

**अर्थ :-** आपल्या कल्याणाची इच्छा असणाऱ्या साधकाने, वर सांगितलेल्या साधनांनी संपन्न होऊन, ज्ञान प्राप्त व्हावे, म्हणून निश्चय करावा. ॥१०॥

**विवरण :-** ज्ञान म्हणजे आत्मज्ञान, आणि ते प्राप्त होण्यासाठी पूर्व तयारी म्हणून साधकाने आतापर्यंत सांगितलेली साधने - विवेक, वैराग्य, शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रद्धा, समाधान, व मुमुक्षुत्व पूर्णपणे अंगी बाणवली पाहिजेत; ती आत्मसात करावयास हवीत. तरच पुढील आत्मस्वरुप प्राप्तीसाठी तो पात्र होतो. अशा अधिकारी शिष्याला सद्‌गुरु आत्मस्वरुप प्राप्तीची जी साधना देतील, ती साधना यथा योग्य पद्धतीने त्याला करता येते. अर्थात् वर सांगितलेल्या बाह्य साधना एकाच वेळी प्राप्त होणे शक्य नाही. आपल्या ठिकाणी या सर्व गुणवत्ता विकसित करण्यासाठी त्याने कठोर परिश्रम करणे अत्यावश्यक आहे. या सर्व गुणवत्ता प्राप्त झाल्यानंतर अशा अधिकारी शिष्याच्या मनांत सद्‌गुरुंनी दिलेली आत्मप्राप्तीची साधना करण्याने भ्रांति; अज्ञान रहात नाही. सत्त्व, रज, तम या तीन गुणांतील रज व तम यांना वगळून पूर्णपणे सत्त्वगुणाची संगती धरावयास हवी. त्याचे खान-पान, त्याचे आचरण, त्याचे वाचन, अभ्यास, आवडी-निवडी संगती इ.इ. पूर्णपणे सात्त्विक हव्यात. परमार्थात सत्त्वगुणामुळे प्रगति होते.

आत्मस्थितिकडे जाताना आपल्या सद्‌गुरुंच्या वचनांवर व सूचनांवर साधकाने सतत लक्ष ठेवावे, श्रध्दा ठेवावी. साधकाच्या साधनेत येणारे विक्षेप, प्रतिबंध, शंका, संशय, प्रमाद व दोष यांचे निराकरण व्हावयास हवे. त्यासाठी सद्‌गुरुंचा सहवास आवश्यक असतो. तसे जमत नसेल तर, त्यांनी लिहीलेल्या ग्रंथांचा अभ्यास करावयास हवा. जीवनात वेळेचेही भान ठेवणे आवश्यकच आहे. कोणत्या गोष्टीला किती वेळ द्यावयाचा याचा यथायोग्य विचार केलाच

पाहिजे. अनावश्यक गोष्टीत वेळ जाणे हितावह नाही. म्हणून वेळेचे महत्त्व ओळखावे. जीवनात शुचिर्भूतता आल्याशिवाय प्रसन्नता येणार नाही. प्रसन्नता, शांति, समाधान या सद्‌गुणांनी आनंद निर्माण होतो.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (११) ज्ञान सिद्धीसाठी विचाराचे महत्त्व -

**श्लोक :-** **नोत्पद्यते विना ज्ञानं विचारेणान्य साधनैः ।**
**यथा पदार्थभानं हि प्रकाशेन विना क्वचित् ॥११॥**

**अर्थ :-** विचाराशिवाय अन्य दुसऱ्या कोणत्याही साधनेने ज्ञान उत्पन्न होत नाही. ज्या प्रमाणे प्रकाशाशिवाय पदार्थाचे भान (दर्शन) कधीही होऊ शकत नाही. ॥११॥

**विवरण :-** ज्या प्रमाणे प्रकाशाशिवाय अंधारातील वस्तु दिसत नाही. त्याप्रमाणे अज्ञानाने गृहीत वस्तूचे ज्ञान विचाराशिवाय होऊ शकत नाही. विचार म्हणजे वि + चार = विचार, वि म्हणजे विपरीत - उलट, चार म्हणजे चालणे. उलट्या क्रमाने जाणे म्हणजे विचार . उदाहरणार्थ - एखाद्या झाडावरील फुलाला पाहाताना वृत्ति अंतःकरणातून डोळ्यांत येते व डोळ्यांतून ती फुलाकडे जाते केवळ एवढ्याने फुलाचे ज्ञान होणार नाही. ती वृत्ति परत फुलावरुन डोळ्यांत, अंतःकरणात - बुद्धीत येते तेव्हा फुलाचे ज्ञान होते. वृत्तीची ही उलट चाल - चार म्हणजे विचार होय. मग फुलाचे ज्ञान झाले ती कोणती वस्तु आहे, जिने फुलाला ओळखले ? काय ती वस्तु डोळ्यांत आहे ? नाही. बुद्धीत आहे ? बुद्धीत कोठून आली ? आत्म्याशिवाय बुद्धीही जाणू शकत नाही. आत्म्यातील एकाकार - ब्रह्मवृत्तीने हे सर्व जाणले जाते. अशी ब्रह्मवृत्ति प्रथम विचारानेच जाणावी लागेल.

जीवनांत आम्ही अनेक वेळा सुखी - दुःखी होत असतो. हे सुख - दुःख येते कोठून, हे शोधले पाहिजे. दुःखाचे कारण बाहेरील वाघ, सर्प, विंच्चू नाहीत. उष्णता - थंडी नाहीत. बालपण, तारुण्य, वार्धक्य या अवस्था नाहीत. कारण तो नैसर्गिक क्रम आहे. तो कुणालाही थांबविता येणार नाही. दुःखी होणे हा प्रज्ञापराध अर्थात् बुद्धीचा दोष आहे. हे अज्ञानजन्य आहे.

**शोकं स्थान सहस्त्राणि भय स्थान शतानिच ।**
**दिवसे दिवसे मूढमा विशन्ति न पण्डितम् ॥**

प्रतिदिन हजारो शोकांची व शेकडो भयांची स्थाने - निमित्त - मूर्खालाच प्राप्त होतात. पण्डिताला, विचारवंताला नव्हे. विचारात दु:ख निवारण करण्याची मोठी शक्ति आहे. विचाराने दु:खाचे बीज सापडते व ते दूर करता येते. विचाराचे सहाय्य घेतल्याखेरीज दु:खाची निवृत्ति होत नाही. संस्कार, दुर्वासना, अनेक अयोग्य चालीरीती, परंपरा यामुळे **'गतानुगतिकलोक:।'** यातून विचारानीच सुटता येईल. ज्ञान प्राप्तिसाठी व अज्ञान दूर करण्यासाठी विचार करणेच आवश्यक आहे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (१२) विचाराचे स्वरुप -

श्लोक :- कोऽहं कथमिदं जातं को वै कर्ताऽस्य विद्यते ।
उपादानं किमस्तीह विचार: सोऽयमीहश: ॥१२॥

**अर्थ :-** मी कोण आहे ? हे जग कसे निर्माण केले गेले आहे ? याचा निर्माणकर्ता कोण आहे ? या करिता उपादान कारण काय आहे ? अशा प्रकारची ही विचार पद्धति-अन्वेषण पद्धति आहे. ॥१२॥

**विवरण :-** मोक्षाची प्राप्ति करु इच्छिणाऱ्या साधकाला अन्वेषण म्हणजे शोध घेता आला पाहिजे. हा शोध कसा घ्यावयाचा याचा विचार करता आला पाहिजे. या साठी श्री सद्गुरुच त्या साधकाला अचूक व उत्तम मार्गदर्शन करु शकतात. श्री गुरुगीता सांगते -

**मोक्ष हेतुर्जपमन्नित्यं मोक्षश्रियमवाप्नुयात् ।**
**भोग कामो जपेद्यो वै, तस्य काम फल प्रदम् ॥१५०॥**

मोक्षासाठी गुरुगीतेचा अखंड जप करणाऱ्यास मोक्षश्री म्हणजे मोक्षलक्ष्मी प्राप्त होते. जर कुणी भोग प्राप्त व्हावेत म्हणून जप करील तर त्याला भोग-कामना फलद्रूप होईल. आद्यगुरु श्री भगवान शंकर माता पार्वतीला मार्गदर्शन करीत आहेत. वास्तविक मोक्ष प्राप्त करणाऱ्या साधकाला भोगांची इच्छा नसते. भोग बांधणारे असतात तर मोक्ष, मुक्ति त्यातून सुटका करतात. अशा प्रकारे मोक्षाची इच्छा करणाऱ्या साधकाला आधी मी मोक्ष इच्छिणारा कोण आहे ? मी कोण ? मी देह, मी जीव की, मी शिव यातला प्रकार कळला पाहिजे. सामान्यता साधारण बुद्धि असणाऱ्या माणसाला मी देहच आहे असा भ्रामक विचार असतो. हाडे, मांस, रक्त, मज्जा, कातडी इत्यादी पदार्थांनी बनलेला हा देह मी आहे असे म्हणतो. देह व त्यातील ही घटक द्रव्ये जड आहेत. मग मी जड आहे का ? असा विचार केल्यास नक्कीच मी देह नव्हे, मी तर जीवंत आहे. चेतन आहे. मग मी जीव म्हणजे चेतन व जडाचे मिश्रण आहे का ? देह भावात असणारी चेतना म्हणजे मी नाही हा विचार कळू

लागतो. मग मी कोण ? या प्रश्नाचे सरळ सोपे मार्गदर्शन भगवान पूज्यपाद आद्य शंकराचार्यच आत्मषटकांत करीत आहेत.

**अहं निर्विकल्पो निराकार रुपो । विभुर्व्याप्य सर्वत्र सर्वेन्द्रियाणि ।**
**सदा मे समत्वं न मुक्तिर्न बंध: । चिदानंद रुप: शिवोऽहं शिवोऽहं ॥६॥**

मी निर्विकल्प, निर्गुण, निराकार स्वरुप, सर्वत्र, सर्व इंद्रियांमध्ये व्याप्त, सर्वांत सम असणारा, बंध आणि मोक्षाच्या पलिकडे असणारा, सत्-चित्-आनंदरुप शिवच आहे. आत्माच आहे. मी ब्रह्म, परब्रह्मस्वरुप आहे. साधकाला या ठिकाणी यावेच लागेल. त्यानंतर पुढे -

कथमिदं जातम् - अज्ञानाने ज्या शरीराला मी - मी म्हणत होतो, ते शरीर म्हणजे या जगाचे- संसाराचे एक छोटेसे अंग आहे. मग हा संसार, हे जगत् कुठून निर्माण झाले ? जगताचा हा सर्व पसारा झोपेत पूर्ण लीन होतो, मावळून जातो व जाग आली की झोपेतून बाहेर येतो. झोप म्हणजे अज्ञान व जागृति म्हणजे ज्ञान. या ज्ञान-अज्ञानाच्या पाठीशी जो चेतन बसलेला आहे, ज्यातून उदय आणि विलय होतो. तो सर्वांचा साक्षीभूत भगवान् शिवच आहेत.

**को वा कर्ताऽस्य -** या जगत्रुप संसाराचा कर्ता वा संचालक कोण आहे ? जी वस्तु अज्ञानाने भासते, ती मुळातच नसते आणि जी केवळ भासते, प्रतीत होते, तिचा कर्ताही कल्पना मात्र आहे.

उपादान किमस्तीह - या सृष्टीचे उपादान काय आहे. कशापासून ही सृष्टि बनलेली आहे ? सूता पासून वस्त्र बनते, माती पासून मडके बनते. म्हणून सूत, माती हे उपादान आहे. उपादान म्हणजे-

**उपादाय कार्यं निर्मियते तदुपादानम् ।** मग आता विचार करावयास हवा की या जगताचे, संसाराचे उपादान काय आहे ? तर अज्ञानच या सृष्टीचे उपादान आहे. भासणारे जगताचे स्वरुप मिथ्या म्हणजे कल्पित आहे. त्या प्रमाणे देश - काल - वस्तु अखंड चेतना ब्रह्मांत कल्पित आहे. या प्रकारच्या, चिंतनास 'विचार' म्हटले जाते.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (१३) कोऽहम् संबंधी विचार -

**श्लोक :-** **नाहं भूतगणो देहो नाहं चाक्षगणस्तथा ।**
**एतद्विलक्षण: कश्चिद्विचार: सोऽयमीदृश: ॥१३॥**

**अर्थ :-** पंचमहाभूतांचे गाठोडे असलेला हा देह म्हणजे मी नाही. तसेच पंच ज्ञानेंद्रिये म्हणजे मी नाही. मी याहून वेगळा-विलक्षण आहे. अशी ही विचाराची-अन्वेषणाची पद्धति आहे. ॥१३॥

**विवरण :-** श्री भगवान शंकराचार्य, मागील श्लोकातील विषय अधिक स्पष्ट करण्यासाठी या श्लोकात देहाचे स्वरुप सांगत आहेत. मी स्वत: कोण आहे ? हा देह पंचमहाभूतांचा बनलेला आहे. यात पृथ्वी-माती, आप-पाणी, तेज-उष्णता, वायु-हवा व आकाश-पोकळी हीं पाच तत्त्वे एकत्र आलेली आहेत. पंचीकरणाने त्यांचे मिश्रण होऊन हा देह बनलेला आहे. काय मी या पंच तत्त्वांचे मिश्रण आहे ? नाही. कारण ती जड आहेत. मग काय मी या देहाचे पांच घटक, पंच ज्ञानेंद्रियें मी आहे ? नाही. कारण ते ही या देहाचेच भाग आहेत. ते सुद्धा देहाप्रमाणे स्थूल, जड आहेत. त्यांना संचलित करणारी चेतनसत्ता कुणी वेगळी आहे. ज्या चेतनशक्तीने ही सर्व इंद्रिये क्रियाशील होतात, ती चेतन शक्ति कुणाची ? तर आत्मा, ब्रह्म यांची ती शक्ति आहे. म्हणून ब्रह्म - परब्रह्म स्वरुपात देश - काल - वस्तु हे कुणीही नाहीत. 'मी नाही.' असा अनुभव कुणालाही होत नाही. मीच या सर्व ब्रह्माण्डाचे, बाह्य जगाचे अधिष्ठान आहे. आचार्य म्हणतात - नाहं भूतगण: - मी भूत - भूतगण - पंचमहाभूते नाही. ते आपल्या आत्मषटकांत म्हणतात -

**मनो बुद्धि अहंकार चित्तानि नाहं । नच श्रोत्र जिव्हे, नच प्राण, नेत्रे ॥**
**नच व्योम भूमिर्न तेजो न वायु । श्चिदानंद रुप: शिवोऽहं शिवोऽहं ॥१॥**

मी या देहांतील पंचमहाभूतें व पंच ज्ञानेंद्रियेंही नाही. मी केवळ शिव - आत्मा ब्रह्मच आहे. भगवद्गीतेत भगवंतांनी अर्जुनाला विश्वरुप दाखवून त्याची खात्री पटविली. तेव्हा अर्जुनच म्हणतो,

**त्वमादि देव: पुरुष: पुराण - स्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।**
**वेत्तासि वेद्यं च परंच धाम, त्वया ततं विश्वमनन्तरुप ॥३८॥ अ -११**

हे प्रभो ! तुम्ही आदिदेव व सनातन पुरुष आहात. आपण या जगाचे परम आश्रयस्थान व जाणकार तथा जाणण्यास योग्य असे परमधाम आहात. हे अनंता ! तुम्हीच सर्व जगतात व्याप्त व परिपूर्ण आहात. नाहमक्ष :- मी या देहाचे अवयव - इंद्रियेही नाही. मी डोळे, कान, नाक, जीभ वा त्वचा या पैकी काही नाही. या इंद्रिय समूहांशी माझा तसा संबंध नाही. तो तुम्ही मानलेला संबंध आहे. मी तर एक आणि ही तर पांच दहा आहेत. ही या शरीराची कार्य करणारी यंत्रे आहेत. ही जड आहेत, मी चेतन आहे. माझ्या सत्तेने ती चालतात, मी यांचा द्रष्टा आहे.

आता प्रश्न असा निर्माण होतो की अशा प्रकारे आम्ही देह आणि इंद्रियांहून वेगळे आहोत - विलक्षण आहोत असे समजण्याचे कारण काय ? त्यामुळे काय लाभ होतो ? वास्तविक, जी वस्तु मी व माझी नाही, तिला मी - माझी मानल्यानेच खूप दु:खी व्हावे लागते. यासाठी खऱ्या 'मी' ला शोधावेच लागेल. सर्व दु:खे मनामुळेच निर्माण होतात. मनामुळेच बंधने निर्माण होतात.

**मन एव मनुष्याणां कारणं बंध - मोक्षयो : ।**

मनामुळेच घेणे - टाकणे होते. मनच अनेक इच्छा निर्माण करणारे आहे. अशा मनाला ठीक करणे अत्यावश्यक आहे. मनाहून जाणणारी बुद्धि मोठी आहे. जाणणाऱ्या बुद्धीहून येणारा अनुभव मोठा आहे. अनुभवाने येणारे शहाणपण अधिक मोठे लाभदायक असते.

मी देह नाही, मी इंद्रियांचा समुह - समुदाय नाही. मी त्यापेक्षा वेगळा आहे. याच विचाराने खरा जो 'मी' त्याचा उलगडा होतो. खोटा 'अहं' - 'मी' गेल्याशिवाय, खऱ्या 'मी' चा शोध घेताच येत नाही. खरा 'मी' कुठे आहे व कसा आहे तेच श्री भगवान गीतेत अर्जुनाला सांगत आहेत -

**अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशय स्थित: ।**

**अहमादिश्च मध्यंच भूतानामन्त एव च ॥२०॥ अ - १०**

हे गुडाकेश - अर्जुना ! मीच सर्व प्राणिमात्रांच्या हृदयांत स्थित असलेला 'आत्मा' आहे. तसेच सर्व प्राणीमात्रांच्या आदि - आरंभी, मध्य - मध्यभागी व अन्ति - शेवटी 'मी' च आहे.

**एतद् विलक्षण:कश्चित् -** 'मी' देह नाही - देहांत निर्माण झालेले संस्कार - विकार माझे नाहीत, ज्या गोष्टी बाहेरुन आल्या, झोपेत विसरुन गेल्या, मृत्युनंतर सुटून गेल्या त्या 'माझ्याशी' जोडणे म्हणजे शुद्ध अज्ञान आहे. 'मी' या सर्वांचा साक्षी आहे. याहून विलक्षण आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१४) अज्ञानाचे कार्य -

**श्लोक :- अज्ञान प्रभवं सर्वं ज्ञानेन प्रविलीयते ।**
**संकल्पो विविध: कर्ता विचार: सोऽयमीदृश: ।।१४।।**

**अर्थ :-** अज्ञानापासून निर्माण झालेले हे सर्व, ज्ञान झाले की, विसरुन जाते. निरनिराळया कामना-संकल्प कर्ता निर्माण करतात. ही अशी विचाराची - अन्वेषणाची पद्धति आहे. ।।१४।।

**विवरण :-** हा सृष्टीचा विविधतापूर्ण जो देखावा आहे, तो कसा जन्माला आला ? या दृश्य जगाचा बोध मला कसा होतो ? या प्रश्नांची उत्तरे या श्लोकात सापडतात. आश्चर्याची गोष्ट आहे की आपण आपल्या लहान मुलां-मुलींची नावे ठेवतो. मुलाचे नाव धनवन्त, विद्यापति - लक्ष्मीधर इ.इ. मुलींचीही तसेच रत्नावली, सुवर्णा, धनश्री इ.इ. आता कुणी या मुलाला व मुलीला शिवी दिली. अरे भिकारी ! अग ! दीड दमडीची - वास्तविक नावे ठेवताना, ती त्या अर्थाप्रमाणे समजून - उमजून ठेवलीत. काय ? नाही. मग शिवीचा राग का यावा ? तर शिवी देणारा व नाव ठेवणारा दोन्हीही अज्ञानीच - मग शिवीमुळे होणारे दु:ख केवळ अज्ञानजन्य आहे. आपले आचार विचार, आपल्या कल्पना, मान्यता सर्व अज्ञानाने कल्पित आहेत. एका माणसाला नदीत दोन अति चमकदार खडे सापडले. त्याला वाटले की हे हिरेच आहेत. मग तो खूप आनंदी होतो. सोनाराकडे घेऊन जातो, सोनार म्हणतो, हे तर काचेचे खडे आहेत - मग तो एकदम दु:खी -नाराज होतो. आता हे जे दु:ख आले ते काय खड्यांनी दिले ? नाही. त्या खड्यांच्या अज्ञानाने दु:ख आले. जगातील बरीचशी दु:खे अशी आपल्या अज्ञानामुळे, मुर्खपणामुळे येतात.

मी - माझे हे सृष्टीत नाही. हे अज्ञानाचे कार्य आहे. यामुळेच आपण दु:खी होतो. अंधारात पडलेली दोरी आपणांस साप भासते. लगेच भयभित होतो. प्रकाश टाकला तर साप नसून ती दोरी आहे. मग भिती गेली. दोरीने भय निर्माण झालेले नाही. दोरी संबंधीचा आमचा समज, आमच्या अज्ञान

भयाचे कारण आहे.

**संकल्पो विविधः कर्ता -** जगाचा, या सृष्टीचा कर्ता कोण आहे ? त्याला कधी प्रत्यक्ष हे जग बनविताना पाहिले आहे का ? त्याचा सृष्टी बनविण्याचा कारखाना कुठे आहे ? कुणी त्याच्या कारखान्यांत जाऊन पाहिले काय ? तर नाही. मग याचा कर्ता कोण ? तर भगवान शंकराचार्य उत्तर देतात की, "अरे ! 'तू' च आहेस, 'तू' आणि फक्त 'तू' च !" मन आणि कल्पना यांच्याशी एकरुप होऊन हे जग निर्माण केले. तुझ्या मनाच्या विक्षेपांनी हे विक्षेपित जग निर्माण केले. हे सर्व मनाचे कार्य आहे. मनामुळेच सारी सुख-दुःखे निर्माण होतात. हे मन झोपेत मावळले की, त्याचे कार्यही मावळून जाते. मनच जेव्हा कर्ता बनते तेव्हा पाप-पुण्येही तेच निर्मिते. अशा या मनाचा खरा जो 'मी' आत्मा, त्याच्याशी काही संबंध नाही. मनाचे धर्म आम्ही आत्म्यावर आरोपित करुन आत्म्याला कर्ता मानतो. हेच मुख्य अज्ञान आहे. आत्म्याचे खरे ज्ञान, स्वरुप कळले की अज्ञान नष्ट होते. आपल्या प्राचीन उपनिषद्कारांनी आचार्यांच्या म्हणण्यास पुष्टी दिलेली आहे. श्री ज़ाबाल दर्शनोपनिषद सांगते-

**नाहं देहो न च प्राणो नेन्द्रियाणि मनो नहि ।**

**सदा साक्षि स्वरुपत्वात् शिव एवास्मि केवलः ।। १०-४-१०**

'मी' देह नाही, प्राण नाही, इंद्रिये व मनही नाही. 'मी' साक्षिस्वरुप केवल 'शिवच' आहे. हीच स्थिति अष्टावक्राचा उपदेश ऐकल्यानंतर राजा जनकाची झालेली आहे. राजा म्हणतो-

**नाहं देहो न मे देहो, जीवो नाहमहं हि चित् ।**

**अयमेव हि मे बंध आसीद्या जीविते स्पृहा ।। सूत्र - २२**

न मी शरीर, न शरीर माझे आहे, मी जीवसुद्धा नाही. मी निश्चितच चैतन्य आहे. जगण्याची इच्छा हेच माझे बंधन होते. शरीर आत्मा नाही व आत्म्याचे कोणतेही शरीर नसते. आत्मा अशरीर आहे. मी जीवसुद्धा नाही. जन्म व मृत्यु होणारा, अहंकार व लोभात सापडणारा अवगुणांचा जीव असतो. मी तसा जीव नाही. मी तर केवळ आत्मा आहे - ब्रह्म आहे.

।। हरि ॐ तत् सत् ।।

## (१५) अज्ञान कुठे असते ?

**श्लोक :-** **एतयोर्यदुपादानमेकं सूक्ष्मं सद्अव्ययम् ।**
**यथैव मृद्घटादीनां विचार: सोऽयमीदृश: ॥१५॥**

**अर्थ :-** जसे मातीच्या घटाचे (घागरीचे) उपादान माती आहे. त्या प्रमाणे अज्ञान आणि कामना या दोघांचे उपादान सूक्ष्म सत्-त्व (सत्यस्वरुप) आहे. अशी विचाराची (अन्वेषणाची) पद्धति आहे. ॥१५॥

**विवरण :-** अज्ञान आणि संकल्प - (कामना) - यांचे उपादान - ते एक, सूक्ष्म, सत् आणि अव्यय असे आहे. मनुष्याला जेवढे दु:ख होते, ते सर्व त्याच्या अज्ञानाने, न समजण्याने होते. निर्मात्याने कुठल्या उपादान कारणापासून हे विश्व निर्माण केले आहे ? अज्ञान (आवरण), ज्यामुळे नानाविध, अनेकत्वाचे जग निर्मित केले जाते. या अज्ञानालाच उपादान कारण मानले पाहिजे, न बदलणारे, अव्यय असे काहीतरी सत्त्व असले पाहिजे, जे एकमेवाद्वितीय आहे, गूढ आहे, त्याला मन व बुद्धि समजू शकत नाही. हे संकल्प आणि अज्ञान ज्या एकाला, ज्या एकामुळे कळतात, ते एक सूक्ष्म व अविनाशी सत्तेत आहे. अंधारात पडलेल्या दोरीचे, दोरीवर सर्पाचे भासणे, आणि दोरीचे अज्ञान या तीनही गोष्टीचे उपादानकारण एकच एक आहे आणि ते म्हणजे दोरीचे अज्ञान ! त्याच प्रमाणे, जगताचे ठीक-ठीक -यथार्थ-भासणे, विपरीत भासणे, आणि न भासणे या तिन्ही अवस्था त्या एकातच असतात. ज्या प्रमाणे मडक्याचे बनणे, फुटणे, व न राहणे या सर्व अवस्था जशा मातीतच असतात. त्याच प्रमाणे जगाचे अस्तित्व जागृतीत असणे, स्वप्नात विपरीत भासणे, आणि झोपेत न भासणे, हे सर्व त्या सूक्ष्म, अविनाशी सत्तेतच असतात. ती सूक्ष्म अविनाशी सत्ता 'मी' आत्माच-असते.

आपण आपल्या स्वत:ला अद्वितीय ब्रह्म-आत्मा न जाणणे म्हणजे अज्ञान आहे. या अज्ञानाची पूर्णपणे निवृत्ति, नाहिसे करणारे ज्ञान हे साक्षात् साधन आहे. 'विवेक - चुडामणी' या आचार्यांच्या ग्रंथात म्हटले आहे की,

अज्ञान म्हणजे मनाव्यतिरिक्त दुसरे काहीही नाही. मनाचे विक्षेप हे चित् - तत्त्वाचे निराळे आविष्कार आहेत. माठ, घागर, परळ, ताटली ही मातीची निरनिराळी रुपें असून ती केवळ मातीशिवाय दुसरे काहीही नाहीत.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (१६) 'मी' च निस्संदेह ब्रह्म कसा आहे ! -

**श्लोक :-** **अहं एकोऽपि सूक्ष्मश्च ज्ञाता साक्षी सदव्ययः ।**
**तदहं नात्र सन्देहो विचारः सोऽयमीदृशः ॥१६॥**

**अर्थ :-** 'मी' खरोखरी एकमेव, सूक्ष्म, ज्ञाता, साक्षी, अव्यय आहे. म्हणून मी निःसंदेह ते (ब्रह्म) आहे. अशी विचाराची (अन्वेषणाची) पद्धति आहे. ॥१६॥

**विवरण :-** या बाह्य सृष्टीत विविधता, अनेकता आहे. या अनेकतेमध्ये एकतेचा शोध म्हणजे त्या चैतन्याचा, सत् - तत्त्वाचा शोध घ्यावा लागतो. मर्त्यात अमर्त्य काय आहे ? विनाशशील गोष्टींमध्ये अविनाशी काय आहे ? जड वस्तूतही चेतना कशी आहे ? अशा प्रकारे सर्वत्र व्याप्त ते एक ब्रह्मच आहे. ते एकमेवाद्वितीय ब्रह्म, सूक्ष्म, ज्ञाता, साक्षी व अव्यय असे सत्-त्व आत्मरुपाने 'मी' आत्मा आहे. आत्मरुपाने, आत्म-चैतन्याने, मला माझ्या मनाची, बुद्धीची जाणीव होते. त्यांचे विक्षेप मला कळतात. माझ्या सभोवती पसरलेल्या या वस्तुमात्रांची, या विविधतेने नटलेल्या जगाची मला जाणीव होते. जर त्या सर्वांची मला जाण आहे. तर मी त्या सर्वांचा ज्ञाता आहे.

आत्मा व ज्ञान वेगवेगळे नाहीत. तसे वेगवेगळे मानले तर ज्ञान हे आत्म्याचा गुण होईल. आत्म्याचे तसे कोणतेही गुण नाहीत. म्हणून आत्म्याला ज्ञानस्वरुप मानले पाहिजे. आत्म्यातूनच ज्ञानप्रकाश पसरतो व त्यामुळे घट, पटादि विषय प्रकाशित होतात. देह, इंद्रिये, इंद्रियांचे विषय यांचे प्रकाशनही त्या आत्मप्रकाशानेच होते. या वरुन 'मी' या सर्वांचा द्रष्टा, साक्षी आहे. द्रष्टा आणि दृश्य, दर्शन यांची त्रिपुटी मात्र त्यात नाही. साक्षी म्हटल्या नंतर तो साक्षी ब्रह्मस्वरुप, आत्मस्वरुप म्हटल्यानंतर ज्यांचा तो साक्षी आहे तो देश, काल, वस्तु बाधित होऊन जातात. साक्षीमध्ये लांबी - रुंदी अर्थात देश नाही. त्या ब्रह्मरुप साक्षीत काल, आयुष्य हेही नाहीत. ही साक्षीची अद्वितीयत्व प्रतिपादन वेदान्ताची विशेषता आहे. यात माझ्या स्वतः बद्दलच्या निष्कर्षाबद्दल ही लवमात्र संदेह नाही. 'मी' आत्माच सर्वांचा ज्ञाता आहे.

**'तमेव भान्तं अनुभाति सर्वं भासा सर्वमिदं विभाति।'** श्रुतिवचन त्या आत्म्याच्या प्रकाशित होण्यावरच सर्व प्रकाशित होते. हाच त्याचा स्वयंप्रकाश आहे. आत्मा स्वयंप्रकाश व अविषयही आहे. श्रुति पुढे सांगते -

**'न चक्षुषा गृह्यते नापि वाचा'**

**'न तत्र मनो गच्छति, न वाक् गच्छति, न विद्मो, न विजानीम:।'**

तो आत्मा डोळ्यांनी दिसत नाही, ना वाणीने पकडला जातो, तेथे मनाची गती किंवा वाणीची गती नाही. त्याला अशा कोणत्याही इंद्रियाने जाणता येत नाही. कारण सर्व इंद्रियांना जाणण्याची शक्ति तोच आहे मग, इंद्रियें त्याला कसे जाणू शकतील अर्थात् जाणू शकत नाहीत. यावरुन आत्म्याचे अविषयत्व सूचित होते.

आपल्या सभोवती असणाऱ्या वस्तु, पदार्थ, दृश्य, क्षणाक्षणाने बदलत आहेत, कणाकणाने झीजत आहेत, पावलोपावली बदलत आहेत, परंतु त्यांचा साक्षी आत्मा जशाचा तसाच असतो. विषय, देह, इंद्रिये, मन, बुद्धि हे सर्व कालाच्या प्रवाहात वाहत आहेत, तो काळ स्वयं प्रवाहाच्या स्वरुपात नित्य नवीन प्रकारे प्रगट होत आहे. परंतु त्या काळाचा द्रष्टा, तो चैतन्यघन आत्मा सर्वांचा साक्षी एकरस, आपल्या महिमेत जशाचा तसाच स्थित आहे. अशी ही अन्वेषणाची पद्धति आहे. याच अन्वेषण पद्धतीने आत्म्याचे सूक्ष्मत्व कसे विलक्षण आहे हेही समजून येते. हवा, वायु, गंध, आकाश हे इतरांपेक्षा सूक्ष्म आहेत. या सूक्ष्म पदार्थांची जाणीव आत्म्याच्या चेतनप्रकाशानेच होते. सूक्ष्माला जाणणारा अति सूक्ष्मच असला पाहिजे.

सृष्टीतील सर्व पदार्थ, देह, झिजणारे आहेत. आपला देहही झिजणारा, क्षयी, व्ययस्वरुप आहे. हे झिजणे जो जाणतो तो निश्चित अव्यय असला पाहिजे. आत्मा अव्यय, न झिजणारा, सदानकदा जशाच्या तसाच असतो. त्याचा आरंभ, मध्य व शेवट कुठेही नाही. तो आरंभ कालापासून जसाच्या तसाच आहे. म्हणून तो अव्यय आहे, हे विचाराच्या पद्धतीने जाणले पाहीजे. इंद्रियांना त्यांचे विषय आहेत. डोळा - रुप, कान - शब्द, नाक - गंध,

जीभ - रस, त्वचा - स्पर्श. असा हा इंद्रिये आणि त्यांचे विषय यांचा संबंध आहे. आत्मा कोणत्याही विषयात येत नाही. तो कोणत्याही इंद्रियांचा विषय नाही म्हणून तो अविषय आहे. ही विचार पद्धति आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१७) अज्ञानाचे वर्णन -

**श्लोक :-** **आत्मा विनिष्कलो ह्येको देहो बहुभिरावृतः ।**
**तयोरैक्यं प्रपश्यन्ति किमज्ञान मतः परम् ।।१७।।**

**अर्थ :-** आत्मा हा खरोखर कलारहित, निरवयव असा आहे. तरी शरीर अनेक अवयवांनी युक्त आहे. तरी सुद्धा लोक या दोघांना एकच समजतात. यापेक्षा मोठे अज्ञान आणखी काय असू शकेल. ।।१७।।

**विवरण :-** देहाला आत्मा समजणे हे मोठे अज्ञान आहे. हे मोठे अज्ञान कसे ? तर देह हा अनेक अवयवांनी, इंद्रियांनी एकत्र जमून घडविलेला आहे. देहाला आकार, रंग, रुप, वर्ण आले. असा आत्मा नाही. आत्मा निराकार, अरुप, निरावयव आहे, तर देह जड, स्थूल आहे. आत्मा सूक्ष्माति-सूक्ष्म, चेतन आहे. किंबहुना आत्म्याच्या चेतनेनेच शरीरही चेतनवत झालेले आहे.

आत्म्याला 'मी' 'मी' ने संबोधिले जाते. देहाला हा - तो या सर्व नामांनी ओळखले जाते. देह हा या सभोवार पसरलेल्या जड सृष्टीचेच एक अंग आहे. जगाचे अंग आहे. म्हणून 'अहं' व 'इंद' या दोन पदांनी त्यांचा फरक ओळखता येतो.

जो पाहतो, ऐकतो, वास घेतो, बोलतो व स्पर्श करतो - अर्थात् रुप, शब्द, चव, (रस) गंध, स्पर्श इत्यादी विषयांचा जो अनुभव घेतो - तो आत्मा आहे. सामान्य माणसे अज्ञानी असल्याने इंद्रियेच विषयांचा अनुभव घेतात असे समजतात - वास्तविक देह आणि इंद्रिये जर जड आहेत तर ते विषयांचा अनुभव कसे घेऊ शकतील ? अर्थात् नाही. आत्मचेतनाच अनुभव घेणारी आहे. तीच ज्ञानवती आहे. तिलाच अनुभव घेता येतो.

जागृति -निद्रा, स्वप्न या तिन्हीही अवस्थांचा द्रष्टा, साक्षी आत्माच आहे. या तिन्हीही अवस्थांमध्ये जो 'एक' च असतो, जो या तिन्ही अवस्थांचा अनुभव घेणारा आहे. तो 'मी' च, आत्मा आहे.

आत्मा निष्कल-कलारहित आहे. काल-कला ही देहाच्या आयुष्य स्वरुपात, पृथ्वी कला- मातीच्या स्वरुपात, जल - कला - रक्ताच्या स्वरुपात, अग्नि-कला - उष्णतेच्या स्वरुपात, आकाश - कला - अवकाशाच्या (पोकळीच्या) स्वरुपात - देहांतच असतात. आत्म्यात कोणतीही कला नाही. हा देह अनेक पदार्थांच्या मिश्रणाने, बनलेला असल्यामुळे, त्यात भिन्न भिन्न रस आहेत. खाद्य पदार्थांतून कडू, गोड, आंबट, तिखट, खारट इत्यादी चवींचे पदार्थ देहांत गेल्यानंतर, त्यांचे निरनिराळे रस निर्माण होतात. आत्म्यात तसा कुठलाच रस नाही. तो निरस आहे.

देह जड असल्यामुळे त्याला जन्म-मरण आहे, परंतु आत्मा एक चेतनतत्त्व असल्यामुळे तो जन्मतही नाही व मरतही नाही. तो अमर, शाश्वत, चिरंतन, नित्य आहे. तो सर्व कालात सारखाच असतो.

देहाला अनेक आवरणें, पुठें आहेत. कांद्याप्रमाणे त्याची टरफले काढत जा, तसे आत्म्यावर काहीही नाही. तो केवल एकच - एक असा स्वच्छ, निष्कल असा आहे. देहांत अनेक पदार्थांनी गर्दी केलेली आहे. हाडे, मांस, मेद, मज्जा, स्नायु, चामडी, रक्त, कफ, मल, मूत्र इत्यादी पदार्थ आहेत. अशा या देहाला आत्मा समजणे म्हणजे मोठे अज्ञान नाही का ? देह मळकट, सडका, दुर्गंधी, युक्त असा असताना शुद्ध, स्वच्छ, निर्मळ, पवित्र, मंगल अशा आत्म्याला देहाची उपमा साजेल का ? तर नाही. मी देह नसून मी अवयव नसलेले आत्मतत्त्व आहे. ते सर्वत्र सारखेच उपस्थित असलेले एकमेव आत्मतत्त्व चित् प्रकाश आहे. त्या एकमेव सत्यस्वरुपात भेद नाहीत. अशा या आत्मतत्त्वाला न जाणता, त्याच्याहून भिन्न स्वरुपात असलेल्या देहाला 'मी' आत्मा आहे असे समजणे केवढे अज्ञान आहे ! जड देहाला सूक्ष्माति-सूक्ष्म आत्मा समजणे हा कसा वेडेपणा आहे !

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (१८) अज्ञानाचे स्वरुप -

**श्लोक :-** **आत्मा नियामकश्चान्तर्देहो बाह्यो नियामक: ।**
**तयोरैक्यं प्रपश्यन्ति किमज्ञानमत: परम् ॥१८॥**

**अर्थ :-** आत्मतत्त्व हे आत आहे आणि ते नियामक आहे. शरीर बाहेर आहे आणि ते नियंत्रित केले जाते. तरी सुद्धा लोक या दोघांना एकच समजतात. यापेक्षा मोठे अज्ञान कोणते असेल ? ॥१८॥

**विवरण : -** प्रत्येकाला आपल्या देहाचे, त्याच्या इंद्रियांचे थोडे फार ज्ञान असतेच परंतु या देहांत असणारा आत्मा सूक्ष्माति-सूक्ष्म, निरावयव, रंग, रुप, आकाररहित असल्याने त्याचे ज्ञान नसते. अशा वेळी जे तत्त्व मन - बुद्धीत सापडत नाही, ते दिसत नाही, ऐकू येत नाही, त्याचा गंध येत नाही व त्याचा स्पर्शही जाणवत नाही. मग लोक त्याला असून नसल्यासारखेच समजतात. हेच आत्म्यासंबंधी मोठे अज्ञान आहे. त्याहीपेक्षा सर्वांत मोठे अज्ञान म्हणजे हा देहच आत्मा आहे असे समजतात. आता या आत्म्यासंबंधीचा व देहाचा थोडा विचार करा. आत्मा कुठे आहे ? देहाच्या आत ! देह ही बाह्य आकृति आहे. या देहाची इंद्रिये देहाला विषयांचा भोग देऊन त्याला पोसतात, भक्कम करतात. इंद्रिये, देह आणि विषय यांची ही प्रक्रिया सतत सुरु आहे. पण या सर्व क्रियांचे अधिष्ठान कुठे आहे ? देह, इंद्रिये आणि त्यांचे विषय तर जड, स्थूल आहेत. जडाला सक्रिय कोण बनविते ? स्वत: जड पदार्थ क्रिया करु शकत नाहीत, त्यांना चेतविणारा, चेतना देणारा, त्यांचे नियमन, नियंत्रण करणारा कोण आहे ? तर या देहांत असणारा चैतन्यघन आत्माच या सर्वांचे नियमन व नियंत्रण करतो. कारण तो ज्ञानघन आहे. ज्ञानस्वरुप आहे. आत्माच देहातील मन, बुद्धिला चेतना देऊन क्रियाशील करतो. आत्म्याशिवाय शरीर आणि शरीरातील कोणतेही यंत्र काम करु शकत नाही.

मन, बुद्धि, चित्त आणि अहं या सूक्ष्म इंद्रियांचा जाणकार कोण आहे ? या सूक्ष्म इंद्रियांमध्ये निर्माण होणाऱ्या इच्छा, कामना, वासना कोणत्या

शक्तिने निर्माण होतात ? श्वासोच्छवास, रक्ताभिसरण, अन्नपचन, यातून निर्माण होणारी उष्णता, वायु-त्यांचे प्रसरण हे सर्व क्रियांचे अधिष्ठान कोण आहे ? कुठे आहे ? ते अधिष्ठानच जर देहांत नसेल, तर हा देह चालेल काय ? अर्थात् नाही. तो आत्मा आणि त्यातून उद्भुत होणारी त्याची चेतना शक्तिच हे सर्व घडविते. मग तो आत्मा अंतरात राहून या देहाचे नियमन व नियंत्रण करतो. कारखान्यात विजेवर चालणारी यंत्रे जर विज खंडित झाली, वीज गेली तर चालतात काय ? त्याच प्रमाणे हुबेहूब या देहाची आंतर-बाह्य यंत्रणा त्या आत्म्यावर व त्याच्या चेतन शक्तीवर कार्यरत असते.

या देहावर आंतरत्वचा, बाह्यत्वचा, अशी आवरणें, झाकणें आहेत. त्याच प्रमाणे आत्म्या सभोवती पंच कोशांचे आवरण आहे. अर्थात् या पंचकोशांनी सूक्ष्माति-सूक्ष्म आत्म्याला झाकता येत नाही. तथापि लोक तसे मानतात. हे पंचकोश म्हणजे (१) अन्नमय कोश (२) प्राणमय कोश (३) मनोमय कोश (४) बुद्धिचा-विज्ञानमय कोश, (५) आनंदमय कोश. या सर्व कोशांचा नियंता, त्या कोशांत असलेला आत्माच आहे. या देहाला व त्यातील कोशांना आत्मा मानणे हे मोठेच अज्ञान आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१९) अज्ञानाचे स्वरुप - (विषय पुढे चालू)

श्लोक :- आत्मा ज्ञानमय: पुण्यो देहो मांसमयोऽशुचि: ।
तयोरैक्यं प्रपश्यन्ति किमज्ञानमत: परम् ॥१९॥

**अर्थ :-** आत्मा ज्ञानस्वरुप व पवित्र आहे. देह मांसमय व अपवित्र आहे. तरी सुद्धा लोक या दोघांत एकत्व पाहातात. यापेक्षा मोठे अज्ञान कोणते असेल ? ॥१९॥

**विवरण :-** आत्मा स्वभात:च ज्ञान स्वरुप व पवित्र आहे. त्याला या सृष्टीतील कोणतीही वस्तु, पदार्थ, विषय चिकटत नाही. देहाला धूळ, माती, वस्त्राचा मळ लागून, आतून घाम आल्याने घाण वास येतो. म्हणून देहाला दररोज आंघोळ घालावी लागते. देहाच्या संगतीने राहाणाऱ्या वस्तूंना देह घाण करुन टाकतो. अंगात घातलेले कपडे स्वच्छ धुवावे लागतात. ते दररोज बदलावे लागतात, कारण त्यांनाही देहाचा वास, घाण लागते. आत्म्याला कुठलेही वस्त्र नाही. आत्मा हा आपल्या देहांत राहूनही तो देहापासून असंग, अलग असतो. देहाची घाण त्याला लागत नाही. जसा लोखंडाला गंज लागतो. पण सोन्याला गंज वा माती लागत नाही. त्या सोन्यापेक्षाही आत्मा स्वच्छ, निर्मळ, पवित्र आहे.

देहांत असणारी मन, बुद्धि, चित्त व अहं ही सूक्ष्म इंद्रिये आहेत. आत्माही सूक्ष्म आहे. पण तो नेहमी पवित्र व शुद्ध, स्वच्छ राहतो. मन अनेक वाईट, पाप कर्मांनी मलीन होते. मनामुळे अनेक पाप कर्मे होतात. त्या कर्मांचे संस्कार मनाला मलीन करुन टाकतात. बुद्धि अनेक वाईट, दुष्ट विचारांच्या जाळ्यात अडकते. वाईट विचारांच्या संसर्गाने बुद्धीही मलीन होते. चित्त तर एखाद्या तलावासारखे आहे. त्यात अनेक बऱ्या वाईट सकाम कर्मांचे संस्कार जमा होतात. त्यामुळे चित्तही मलीन होते. गर्व, अहंकार, दंभ, ताठा या विकारांनी आपला शुद्ध अहंही मलीन होऊन जातो. जर ही सूक्ष्म इंद्रियेंही मलीन होतात. नाक तर शेंबडाचे घर, तोंड तर लाळेचे ठिकाण, दात

किडतात, कानात मळ साचतो, डोळ्यांना घाण येते, पडळ येतात, आपले हात-पाय तर दररोज आपल्याच देहाचे मल-मूत्राने घाण होतात. त्यांना वारंवार पाण्याने धुवावे, कपड्यांनी पुसावे लागतात. थोडक्यात देहाला आंतर बाह्य घाण आहे. परंतु आत्मा सदैव स्वच्छ, पवित्र व ज्ञानस्वरुप आहे.

हा देह जगातील विविध देशात फिरतो, राहतो. त्या त्या देशाचे तापमान, हवामान, खानपान वेगवेगळे असते. त्यामुळे या देहाचे रंगही वेगवेगळे दिसतात. काही गोरे, काही काळे, काही तांबूस, काही पिवळसर तर काही अनेक रंगाच्या मिश्रणांनी वेगवेगळे दिसतात. तसा आत्म्याला कोणताही रंग नाही, वर्ण नाही. तो रंगहीन, वर्णहीन, स्वच्छ व शुद्ध आहे.

आकाराच्या बाबतीत सर्व देह सारख्या आकाराचे नाहीत. कुणाचा देह बुटका, ठेंगणा, कुणाचा उंच, सडपातळ, कुणाचा हाडकुळा, वाळलेला, तर कुणाचा लट्ठ- फुगलेला असे हे देहाचे विविध आकार पाहिले म्हणजे किती आश्चर्य वाटते. पण सगळ्यात मोठे आश्चर्य असे आहे की, आत्म्याला देहच नाही मग त्याला आकार कुठला ? तो आकाररहित आहे. अशा आत्म्याला देह समजणे म्हणजे मोठे अज्ञान आहे.

देहाला डोक्यावर व अंगावर केस असतात, कुणी म्हणतात केसांनी देह सुंदर दिसतो, तर कुणाच्या मते केस शरीराला मलीन, दुर्गंधयुक्त बनवितात. अशा या देहावरील केसांची लोक फार काळजी घेतात, त्यावर बराच खर्चही करतात. आत्म्याला देहच नसल्याचे केसांची भानगड नाही. मग असा आत्मा व देह यांचे ऐक्य पाहणे म्हणजे मोठे अज्ञानच नाही का ?

आत्मा चेतन, ज्ञानमय, प्रकाशस्वरुप आहे. तर देह जड, अज्ञानमय, व अंधाराचे प्रतिक आहे. त्यांचे ऐक्य मानणे हे मोठे अज्ञान आहे. पुढील श्लोकात याचे अधिक स्पष्टीकरण होत आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (२०) अज्ञानाचे स्वरुप - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **आत्मा प्रकाशकः स्वच्छो देहस्तामस उच्यते।**
**तयोरैक्यं प्रपश्यन्ति किमज्ञानमतः परम् ॥२०॥**

**अर्थ :-** आत्मा प्रकाशक व स्वच्छ आहे. परंतु देहाला तामस म्हटले गेले आहे. या दोघांना जे एक समजतात, त्याचे यापेक्षा मोठे अज्ञान कोणते असेल. ॥२०॥

**विवरण :-** आत्मा प्रकाशक म्हणजे प्रकाश देणारा आहे. पण आत्म्याचा प्रकाश सूर्य, चंद्र, तारे, दिवे, मेणबत्त्या यांच्या प्रकाशासारखा जड प्रकाश नाही.. आत्म्याचा प्रकाश ज्ञानप्रकाश, चेतनप्रकाश आहे. प्रकाश देणाऱ्या, इतर वस्तूंना किती, केव्हां, कसा प्रकाश द्यावा ते समजत नाही. आवश्यकता नसेल तर प्रकाश बंद करावा हे कळत नाही. ते आत्म्याला कळते. प्रयोजनानुकूल समज देण्याची प्रक्रिया आत्मप्रकाशात आहे. कोणास, कोणत्या हेतूसाठी, किती प्रकाश द्यावा, ही समज, हे ज्ञान आत्मप्रकाशात आहे. आत्मप्रकाश, सर्व ज्ञानकिरणांचे उगम स्थान आहे.

डोळा पदार्थाचे रुप दाखवितो, परंतु नेत्रांत, डोळ्यांत, हे प्रकाश दाखविणे, रुप दर्शन घडविणे कुठून आले ? सूर्यानेही त्या पदार्थावर प्रकाश टाकला आहे म्हणून तो पदार्थ, त्याचे रुप दिसले. सूर्यप्रकाश अधिदैव आहे. नेत्र-प्रकाश अध्यात्म आहे व पदार्थ-प्रकाश, अधिभूत आहे. या तीनही प्रकाशांनी जो पदार्थ दाखविला, त्याचा उपयोग, हेतु, प्रयोजन कळले नाही. ते आत्मप्रकाशाने कळले. आत्मप्रकाश डोळ्यांच्या माध्यमातून पदार्थावर जाऊन त्याचे ज्ञान, समज, जाणीव देतो. म्हणून आत्मप्रकाशच ज्ञानाचे प्रमुख साधन आहे. आत्मज्ञानाने प्रकाशित होणारा पदार्थ विष आहे की अमृत, हे घ्यावे की टाकावे, ही समज आत्मप्रकाशने येते.

आत्मतत्त्वाच्या प्रकाशातच मी माझे अनुभव घेतो. आत्मप्रकाशा शिवाय माझ्या भावना, विचार यांचेही ज्ञान होणार नाही. माझे मन, बुद्धि, चित्त व अहं त्या आत्मप्रकाशानेच उजळतात. ज्ञानेंद्रियांचे कार्यही आत्मप्रकाशा शिवाय

चालूच होत नाही. त्याच्या अनुपस्थितीत देहच जड झाला, तर ती ज्ञानेंद्रिये तरी चेतन कशी राहतील ? आत्मा नित्य, शुद्ध, स्वच्छ आहे. उलट शरीर जड व मलीन आहे. तामसी आहे. त्याला स्वतःचा प्रकाश नाही. ते मातीच्या घड्याप्रमाणे जड व अचेतन आहे. आत्मप्रकाशानेच, त्याला चेतन व क्रियाशील बनविले आहे. तेव्हा आत्मा आणि देह सारखे समजणे हे अज्ञानाचे लक्षण नाही का ? खडूचा पांढरा तुकडा व कोळशाचा काळा तुकडा सारखे कसे होतील ?

देह तामस, अंधःकार स्वरुप आहे. आत्मप्रकाशानेच ते चेतन व प्रकाशित झालेले आहे. अशा जड, तामस देहाला आत्मा समजणे हा मोठाच प्रमाद आहे.

**प्रमादं वै मृत्युमहं ब्रवीमि ।**

आपल्या आत्मस्वरुपाला न जाणता, प्रमादाने स्वतःला देहरुप समजणे हाच मृत्यु आहे. जड व तामस देहाला 'मी'-आत्मा समजणे यापेक्षा मोठे अज्ञान काय असू शकेल ?

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (२१) अज्ञानाचे स्वरुप - (विषय पुढे चालू)

श्लोक :- आत्मा नित्यो हि सद्रुपो देहोऽनित्यो ह्यसन्मय: ।
तयोरैक्यं प्रपश्यन्ति किमज्ञानमत: परम् ॥२१॥

**अर्थ :-** आत्मा नित्य व सद्रूप आहे. देह हा अ-नित्य व असद्रूप आहे. तरीही लोक या दोघांमध्ये एकत्व पहातात. यापेक्षा मोठ अज्ञान कोणते असेल ? ॥२१॥

**विवरण :-** आत्मा म्हणजे अखंड, जशाचा तसाच आहे. त्याला जन्म नि मृत्यु नाही. त्याला आदि नि अन्तही नाही. तो अमर, शाश्वत, चिरंतन, अविनाशी असा आहे. त्याला देश, काल, आयुष्य यांचे बंधन नाही. तो सदैव सर्व ठिकाणी, कणाकणात, अंतर-बाह्य व्यापून राहिलेला आहे. तो कालाचाही नियंता आहे. त्याला काल झिजवू शकत नाही. तो कालातीत आहे. अव्यय म्हणजे तो आहे तसाच असतो. व्यय म्हणजे खर्च, झीज, कमी-जास्त होणे हे त्यात नाही. आत्मा सूक्ष्माहून अति सूक्ष्म आहे. तो चेतन व ज्ञानमय आहे. तो कोणत्याही इंद्रियाचा विषय होत नाही. किंबहुना सारे विषय, त्या त्या इंद्रियाला आत्म्यामुळेच कळतात. आत्मा अविषय आहे. आत्मतत्त्व सत् रुप आहे. म्हणजे भूत, भविष्य आणि वर्तमान कालात शुद्ध सत् स्वरुपात राहणारे आहे. याच्या उलट देहाचे स्वरुप आहे. देह हा अनित्य व असत् रुप आहे. कालाच्या ओघात जन्म नि मृत्यु पावणारा, बालपण, तारुण्य, वार्धक्य अशा अवस्थांनी बदलत जाणारा आहे. देहाला आयुष्य म्हणजे कालाची मर्यादा आहे. काल प्रवाहात वाहात असताना देहांत अनेक रोग, व्याधि जडतात. कधी धष्टपुष्ट तर कधी खंगलेला, वाळलेला, हाडकुळा झालेला दिसतो. देहाला नाम, रुप, रंग, आकार आहे. त्याला जाति, कुळ, गोत्र आहे. या गोष्टींनी तो व्यवहारात परिचित होतो. देह अनेक पेशींनी बनलेला आहे. दररोज शेकडो पेशी मरतात व नवीन तयार होतात. म्हणून तो सदैव परिवर्तनशील आहे. अनित्य व असत् रुप असलेल्या देहाला आत्मा समजणे किंवा दोघांत एकत्व पाहणे या सारखे मोठे अज्ञान कोणते असेल ?

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (२२) आत्म्याचे प्रकाशत्व -

**श्लोक :-** **आत्मनस्तत्प्रकाशत्वं यत्पदार्थावभासनम् ।**
**नाग्न्यादि दीप्तिर्भवत्यान्ध्यं यतो निशि ॥२२॥**

**अर्थ :-** आत्मतत्त्वाच्या प्रकाशामुळे प्रत्येक वस्तू प्रकाशित होत असते. परंतू त्याचा प्रकाश अग्नी इत्यादी प्रकाशाप्रमाणे नाही. कारण त्याचा प्रकाश असला तरी रात्री अंधार होतो. ॥२२॥

**विवरण :-** पदार्थाचे ज्ञान (अवभासन), हे केवळ मनुष्याच्या आत्मतत्त्वामुळे, चित् तत्त्वाच्या प्रकाशामुळे शक्य होते. आत्म्याचा प्रकाश दिव्याच्या वा अग्नीच्या प्रकाशाप्रमाणे चमकणारा नसतो. ज्या डोळ्यांनी प्रकाशाचे ज्ञान होते, त्याच डोळ्यांनी प्रकाश नसल्याचेही ज्ञान होते. जागे असताना जगाचे, संसाराचे असण्याचे ज्ञान होते. स्वप्नात हे स्वप्न आहे असे कळते. निद्रेत जागृति व स्वप्न न होण्याचे कळते. या तिन्ही अवस्था ज्यामुळे कळतात, तो आत्मा आहे.

. वस्तु आपल्या पुढे ठेवलेल्या दिसतात, तथापि त्या कशाच्या, कशासाठी व केव्हा उपयोगात आणावयाच्या, हे डोळे सांगू शकत नाहीत. डोळ्यांत आलेली आत्मप्रकाश चेतनाच त्या त्या पदार्थांचे विशिष्ट ज्ञान करुन देते. मृत माणसाला डोळे तर असतात पण तो, त्याच्या डोळ्यांत आत्मप्रकाशाची चेतना नसल्याने, ते पाहू शकत नाही. डोळ्यांच्या मागे मन, मनाच्या मागे चित्-तत्त्वाचा प्रकाश हवा. तो नसेल तर बोध, समज, जाणीव होणार नाही.

वस्तु, भावना, विचार यांना उजळणारे, सर्व सभोवार असणाऱ्या परिस्थिति अवस्थांचे ज्ञान, आत्मप्रकाशातच आहे. अग्नि, दिवा, सूर्य, चंद्र, तारे यांच्या प्रकाशाचे स्वरुप अचेतन आहे. तो प्रकाश एकाद्या वस्तूवर पडला तर ती वस्तु प्रकाशित होईल. पण ती वस्तु काय आहे ? कशासाठी उपयुक्त आहे ? याचे ज्ञान आत्मप्रकाशाकडून येते. आत्म्याचा प्रकाश जड नाही, तो चेतन आहे. त्यात समज आहे. खोलीत दिवा जळत आहे. खोलीत कोणीही नाही, दिव्याची आवश्यकता नाही, तरीही दिव्याला ते समजत नाही. कारण

तो प्रकाश जड आहे. आत्मप्रकाश चेतन असल्यामुळे ते कळते, समजते. अंधाराचेही ज्ञान आत्म्याला चेतन प्रकाशामुळेच होते. अंधार व प्रकाश यातील फरक आत्मप्रकाशानेच कळतो.

आपल्याला होणारे सुख-दुःख दिव्याच्या प्रकाशामुळे कळत नाही. मनाच्या विचारांच्या वृत्तींचे ज्ञान जड प्रकाशाने होऊच शकत नाही. मन-बुद्धि-चित्त या सूक्ष्म इंद्रियांची जाण बाहेरील सूर्य-चंद्र-तारे-दिवे यांच्या प्रकाशाने येत नाही. सूक्ष्माची ओळख सूक्ष्म प्रकाशच करु शकतो. ग्रंथाचे ज्ञान बाह्य प्रकाश करु शकत नाही. त्यासाठी आत्मप्रकाशाचीच आवश्यकता असते. आपल्या मन-बुद्धि यातील अज्ञान बाह्य प्रकाशाने नष्ट होत नाही. आत्म्याच्या ज्ञान प्रकाशाशिवाय अज्ञान कधीच नाहिसे होत नाही. सूर्य, चंद्र, तारे, दिवे यांचा प्रकाश कधी असतो तर कधी नसतो, आत्म्याचा प्रकाश शाश्वत, अखंड, नित्य आहे. निद्रेत पूर्ण अज्ञान, अंधार असतो. त्यावेळी निद्रेत असणाऱ्याला कसलेही भान नसते. तथापि निद्रेत सुख, आराम वाटला, हे कशामुळे कळते तर आत्म्याचा प्रकाश झोपेतही जाणीव करुन देतो.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (२३) नाहं देहो - मी देह नाही -

श्लोक :- देहोऽहमित्ययं मूढो धृत्वा तिष्ठत्यहो जन: ।
ममायमित्यपि ज्ञात्वा घट द्रष्टेव सर्वदा ॥२३॥

**अर्थ :-** 'हा देह माझा आहे,' जसा घट माझा आहे, असे जाणत असूनही मूढ-मूर्ख, मनुष्य, 'देह म्हणजेच मी' अशा कल्पनेत भ्रांत असतो ॥२३॥

**विवरण :-** आश्चर्याची गोष्ट आहे की मनुष्य 'मी देह आहे' असा दुराग्रह धारण करुन बसला आहे. भगवान आद्य शंकराचार्य या श्लोकात दृष्टान्त देऊन समजावून देत आहेत की, जसा आपल्या घरातील मातीचा घट, माठ पाहून आपण म्हणतो की हा घट माझा आहे. मी घट आहे असे म्हणत नाही. कारण मी आणि घट वेगवेगळे आहोत. तसा हा "माझा" देह आहे, असे म्हणताना देह आणि मी वेगवेगळे आहोत ना. देह म्हणजे मी नव्हे, असे आपण बोलताना सतत सांगतो. हात, पाय, डोके, डोळे, नाक, कान इत्यादी इंद्रियेही माझी म्हणतो. मी हात आहे, मी पाय, डोके, डोळे, नाक, कान आहे असे म्हणत नाही. अर्थात् 'मी' व 'माझे' यात वेगळेपण आहे. असे असूनही मनुष्य शरीराला 'मी', 'मी' म्हणत असताना आपण ऐकतो. हा जो 'मी' आहे, तो कोण ? माझे शरीर म्हणताना, कुणाचे ? या प्रश्नाचे उत्तर शोधले पाहिजे. मी या शरीराचा चालक, मालक आहे. हे शरीर माझे वाहन आहे. या जड शरीराला क्रियाशील बनविणारा चेतन आहे. तो चेतन आत्मा या शरीराहून वेगळा आहे. श्री भगवान गीतेत सांगतात -

**इदं शरीरं कौन्तेय, क्षेत्रमित्यभिधीयते ।**
**एतद्यो वेत्ति तं प्राहु: क्षेत्रज्ञ इति तद्विद: ॥**

श्री भगवान म्हणतात - हे कुंतीपुत्रा, अर्जुना ! या शरीराला क्षेत्र असे म्हटले जाते. या क्षेत्रात जो जाणकार आहे, त्याला क्षेत्रज्ञ असे म्हणतात. देह हे क्षेत्र व या देहांत असणारा आत्मा हा क्षेत्रज्ञ, म्हणजे क्षेत्राला - देहाला जाणणारा आहे.

माझे घर, माझे शेत, माझे धन इत्यादी जे जे माझे आहे, ते ते मी नव्हे. या सर्वांचा द्रष्टा, जाणकार 'मी' म्हणजे आत्मा आहे. आत्म्यामध्ये अनेकत्व नाही. तो एकच-एक आहे. त्याला एक म्हणणेही जमते कारण तो सूक्ष्माति सूक्ष्म आहे.

परंतु या देहाला अनेक नामे व प्रकार आहेत. त्या त्या नावांनी तो तो देह ओळखला जातो. देहाचे अनेक प्रकार पडतात. स्त्री-पुरुष-नपुंसक, गृहस्थ, संन्यासी, ब्रह्मचारी-हिंदु-मुसलमान, मनुष्य-पशु-पक्षी-कीटक इत्यादी. हे सर्व भेद देहाच्या स्थितीवर, आकारावर व प्रकारावर दिसून येतात. आत्म्यात असे कोणतेही भेद नाहीत. तरीही लोकांना 'मी देह आहे' ही चुकीची समजूत आहे. हे मोठे अज्ञान आहे.

सत् व असत् ही दोन सनातन तत्त्वे आहेत. सत् म्हणजे सत्य - सत्य हे सर्व कालात समान असणारे तत्त्व आहे. भगवान श्री शंकराचार्य म्हणतात - 'ब्रह्म सत्यं' - ब्रह्म, आत्मा, ब्रह्मचैतन्यच सत्य आहे. 'जगत मिथ्या' हे सारे जगत मिथ्या म्हणजे असत आहे. देह हे जगाचे अंग असल्यामळे ते असत-मिथ्या आहे. म्हणून आम्ही स्वतःला सद्रुप समजलो तर मृत्यु पासून वाचू शकतो. आत्म्याला मृत्युची भीति नाही. स्वतःला चिद्स्वरुप मानले तर अज्ञानापासून दूर राहू शकतो आणि आनंद रुप मानले तर दुःखापासून वाचू शकतो. तसेच अद्वितीय समजलो, तर संघर्षा पासून वाचू शकतो. जर 'मी' च सर्वत्र आहे तर कुणाशी झगडा, लढाई होईल ? म्हणून स्वतःला देह न समजता आत्मा समजणे अत्यावश्यक आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (२४) ज्ञानाचे स्वरुप -

**श्लोक :-** ब्रह्मैवाहं समः शान्तः सच्चिदानन्द लक्षणः ।
नाहं देहो ह्यसद्रूपो ज्ञानमित्युच्यते बुधैः ॥२४॥

**अर्थ :-** मी सम, शांत, सच्चिदानन्द स्वरुप ब्रह्म आहे. मी हा असत् रुप देह नाही. ह्यालाच बुद्धिमान लोक खरे ज्ञान म्हणतात. ॥२४॥

**विवरण :-** आतापर्यंत अज्ञान व अज्ञानाचे स्वरुप यांचा विचार केला.आता या श्लोकापासून ज्ञान व त्या खऱ्या ज्ञानाचे स्वरुप काय आहे, ते भगवान शंकराचार्य सांगत आहेत. सामान्य अज्ञानी लोक ज्याला ज्ञान-ज्ञान म्हणतात ते ज्ञान नाही. देहातील ममत्वाचा त्याग करुन, अखंड, अद्वितीय, देश-काल-वस्तूने अलग-अलग न होता, म्हणजेच अपरिच्छिन्न चैतन्याला आत्मस्वरुपाने जाणणे, यांस वास्तविक ज्ञान असे म्हणावे. बुद्धिमान लोकांना जेव्हा असीम, कालातील, देशातीत व द्रव्यातीत तत्त्वाचे ज्ञान होते, तेव्हा त्याला ज्ञान असे म्हणतात. तेथे ज्ञानाशिवाय भिन्न दुसऱ्या.वस्तुची सत्ता नसते. ज्ञेय आणि ज्ञान यात भिन्नता नसते. ज्ञेय म्हणजे, जे जाणावयाचे तो आत्मा व ज्ञान म्हणजे आत्मज्ञान. आत्मा व त्याचे ज्ञान दोन भिन्न गोष्टी नाहीत. आत्माच ज्ञान-स्वरुप, एकरुप आहे. अशा आत्म्याला, ब्रह्माला जाणण्यासाठी, ब्रह्मज्ञानी, आत्मज्ञानी सद्गुरुंची कृपाच आवश्यक आहे. श्री गुरुगीतेत श्री भगवान शंकर माता पार्वतीला सांगत आहेत -

**दुर्लभं त्रिषु लोकेषु तत् श्रृणुष्व वदाम्यहम् ।**
**गुरुं विना ब्रह्म नान्यत्, सत्यं सत्यं वरानने ॥५॥**

जे रहस्य तिन्हीही लोकांत दुर्लभ आहे, ते मी तुला सांगतो, ऐक ! हे वरानने (सुमुखी) ! गुरुंशिवाय, वेगळे दुसरे ब्रह्म नाही. हे सत्य आहे, हेच सत्य आहे. सद्गुरुच ब्रह्मस्वरुप असतात, हे सांगताना भगवंताला गुरुतत्त्व हे आत्मतत्त्व, ब्रह्म, असते, शरीर नव्हे. शरीर तर असत् रुप आहे. असे भगवान शंकरांना म्हणायचे आहे. त्या ब्रह्माला-परब्रह्माला जाणण्यासाठी, ब्रह्मज्ञानी,

आत्मज्ञानी सद्‌गुरुंची कृपाच आवश्यक आहे.

श्री भगवान् शंकराचार्य या श्लोकातून, ब्रह्मस्वरुप प्राप्त झालेला महात्मा, मी ब्रह्म आहे व ते ब्रह्म सम, शांत व सत्-चित्-आनंद स्वरुप अशा लक्षणांनी जाणता येते. असा स्वानुभव सांगत आहेत. बुद्धिमान ज्ञानी लोक यासच ज्ञान असे म्हणतात. देह, आत्मा व ब्रह्म यातील फरक, अशा ज्ञानानेच कळतो. मनुष्य देह असत् रुप आहे. असत् म्हणजे अचित्‌रुप, परिवर्तनशील, अशांतरुप व असमरुपही आहे. देह सत्ताहीन आहे. असा देह मी नाही. मी तर सच्चिदानन्द रुप, ब्रह्मच आहे.

**ब्रह्मैवाहम् -** 'मी' ब्रह्मच आहे. यात जो 'मी' आहे, तोच ब्रह्मस्वरुप आहे. 'आत्म्याला' देहांतरगत, अंतरदेहस्थ, चैतन्यस्थित 'आत्मा' म्हणून समजण्यात येते. बृहद्-विशाल-सर्व व्याप्त चैतन्यस्थिती 'ब्रह्म' म्हणून संबोधण्यात येते. तेव्हा आत्मा व ब्रह्म एकच आहेत. असे जे सर्व व्याप्त चैतन्य, ते सर्वत्र सम आहे. कुठे कमी वा कुठे अधिक असे नाही. **शान्तः -** समस्थितिमध्ये शांति असते, विषमतेत-वैषम्यात-अशांति असते. जेथे अहंकार, असूया, तिरस्कार, ईर्ष्या, द्वेष इत्यादी विकार असतील तेथे शांति कुठली ? परंतु विकार, संस्कार मनात येतात-जातात, आत्म्यात ते नसतात, म्हणून आत्मस्वरुपात, ब्रह्मस्वरुपात सदैव शांति आहे.

**सच्चिदानन्द लक्षणः -** आत्मा सदैव - अखंड आहे म्हणून तो सत्‌स्वरुप आहे. तो चित्-चेतन स्वरुप आहे. तो आनंदस्वरुप आहे. आत्मानंद आत्मस्वरुप असल्यामुळे तो नित्य आहे. तसा विषयानंद नसतो. विषयानंद अनित्य असतो. 'मी' सदैव शांत, प्रसन्न ब्रह्म, शुद्ध चित्-तत्त्व आहे. माझे (आत्म्याचे) स्वरुप सत्-चित्-आनंद आहे. यासच **शुद्धज्ञान** म्हणतात.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (२५) ज्ञानाचे स्वरुप - (विषय पुढे चालू)

श्लोक :- निर्विकारो निराकारो निरवद्योऽहमव्ययः ।
नाहं देहो ह्यसदरुपो ज्ञानमित्युच्यते बुधैः ॥२५॥

**अर्थ :-** 'मी' निर्विकार -(विकार रहित), निराकार - (आकार रहित), निरवद्य (पाप-कलंक रहित) आणि अव्यय - (व्ययरहित-न बदलणारा) आहे. ह्यालाच सूज्ञ लोक ज्ञान म्हणतात. ॥२५॥

**विवरण :-** जेव्हा मी स्वतःला, आत्मा - ब्रह्म समजतो, तेव्हा 'मी' निर्विकार आहे. परंतु जेव्हा 'मी' स्वतःला देह समजतो, त्यावेळी मी मन, बुद्धि, चित्त व अहं या सूक्ष्म इंद्रियांनी युक्त आहे. काम-क्रोध-मोह-लोभ-मद-मत्सर, द्वेष, अहंकार, इत्यादी विकार आहेत. हे परिस्थितिजन्य विकार मन, बुद्धीला विकृत करुन टाकणारे आहेत. माणसाच्या स्वभावावर, आचरणावर व त्याच्या हातून होणाऱ्या अनेक कर्मांवर परिणाम घडवून आणणारे आहेत. देहाचे बाल, तरुण, वृद्ध हेही विकारच आहेत. विकार म्हटला की तो विकृत करणारा, सडविणारा असतो. हे विकार आत्म्यात नाहीत. म्हणून 'मी' आत्मा आहे. अशा धारणेने मी सदैव निर्विकारी आहे. आत्म्यात कोणत्याही कामना, वासना नाहीत. त्यामुळे आत्म्यात कोणतेही संस्कार येत नाहीत. म्हणून आत्मा संस्काररहित आहे. देह मात्र मन, बुद्धि-चित्त यात संस्कारांचे मोठे गाठोडे घेऊन बसला आहे. त्या संस्कार-विकाराच्या आधारावरच त्याची कर्मे होत असतात.

**'मी' निराकार आहे-** देह स्थूल, जड असल्याने, त्याला आकाराची विकृति जडली आहे. देहाचा आकार ही सुद्धा एक विकृति आहे. आकारानेही विकार जडतात. आत्मा सूक्ष्माति-सूक्ष्म असल्याने त्याला कोणताही आकार नाही. आकार नाही तर विकारही नाहीत., आकाराने मर्यादा येते. आत्मा अमर्याद आहे. तो सर्वत्र, सर्व ठिकाणी व्याप्त आहे. देह मात्र आकाराने मर्यादित झालेला आहे. त्याच्या भोवती अवकाश आहे, पोकळी आहे. या

अवकाशात अनेक देह येतात व जातात. परंतु आत्मा सदैव जशाचा तसाच सर्व व्याप्त आहे.

**मी निरवद्य आहे** - अवद्य म्हणजे पाप, कलक. **'अवद्यति - खण्डयति इति अवद्यम् ।'** जे आत शिरुन बोचते, काटते, त्याला अवद्य असे म्हटले जाते. पाप केल्यानंतर मनुष्य आपल्या मनात व्यथित, दु:खी होतो. बाहेरुन जरी तो दाखवत नसला, तरी पाप त्याच्या कर्त्याला आतून बोचत असते. ईश्वर कुणाला पापी व पुण्यात्मा समजत नाही. तो प्रत्येकाचे अंत:करण जाणणारा आहे. आमच्या हृदयात त्या-आत्मचेतनेचे असे एक यंत्र बसविलेले आहे की, ते आमच्या सर्व कर्मांच्या नोंदी ठेवते. त्यापासून काहीही लपवून ठेवता येत नाही. मनुष्य दुसऱ्याच्या दोषांना पाहून स्वत:ला निष्कलंकित समजतो. परंतु त्याच्या हृदययंत्रा पासून कसे लपविणार ? ते यंत्र आपल्यासाठीं वेगळ्या प्रकारे काम करील व दुसऱ्यासाठी वेगळ्या प्रकारे काम करील असे होऊ शकत नाही. आत्म्याला असे काहीही नाही. तो नेहमी अनवद्य म्हणजे निष्पाप, निष्कलंक असतो.

**आत्मा वैवस्वतो नाम सर्वेषां हृदि तिष्ठति ।**
**देह देव इवादत्ते मां गंगा मां कुरुं गमः ॥**

आमच्या हृदयामध्ये, वैवस्वत (सूर्यपुत्र) प्रकाश देणारा आत्मा बसलेलाच आहे. तो चैतन्यघन आत्मदेव आमच्या हृदयात राहून आमच्या सर्व कर्मांचा, पाप पुण्याचा निर्णय देतो. त्या आत्म्याच्या दृष्टीने जर आम्ही स्वत:च पवित्र बनलो तर मग शुद्ध होण्यासाठी कुठेही गंगा स्नानाला व कुरुक्षेत्रासारख्या पवित्र क्षेत्राला जाण्याची आवश्यकताच नाही.

**अव्यय:** - ज्यात कधीच बदल होत नाही. जो आत्मा आपल्या स्वरुपात कधीच व्यय होऊ देत नाही. असा अव्यय 'मी' आहे. 'मी' देह नाही. देहांत अनेक इंद्रिये, अनेक अवयव, देह आहेत. देह शब्द 'दिह् उपचये' धातुपासून बनलेला आहे. त्याचा अर्थ रास, ढीग असा आहे. ढीग म्हटला की तो कमी जास्त होणारच. असा बदलणारा देह मी नाही. 'मी' अव्यय आहे.

'मी' असद्रुप देहही नाही. जो देह सत् म्हणजे सत्य नाही. तो मी नाही. मी तर सत्स्वरुप आत्मा आहे. त्यात कोणत्याही काळी, कोणताही बदल होत नाही. असे समजणे म्हणजेच ज्ञान आहे. विद्वज्जन यास ज्ञान असे म्हणतात.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (२६) ज्ञानाचे लक्षण - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **निरामयो निराभासो निर्विकल्पोऽहमातत: ।**
**नाहं देहो ह्यसद्रूपो ज्ञानमित्युच्यते बुधै: ॥२६॥**

**अर्थ :-** मी निरामय, निराभास, निर्विकल्प आणि सर्वव्यापक आहे. हा असत् रुप देह म्हणजे मी नाही. ह्यासच सूज्ञ - बुद्धिमान् लोक ज्ञान म्हणतात. ॥२६॥

**विवरण :-** मी निरामय म्हणजे निर् + आमय = निरामय. निर् म्हणजे नाही आमय म्हणजे रोग आणि निरामय म्हणजे रोगरहित आहे. रोगांचे असंख्य प्रकार आहेत. मुख्यत: त्याचे दोन प्रकार सांगता येतील. शारीरिक रोग व मानसिक रोग. शरीरात होणारे बहुतेक रोग अन्न, पाणी, हवा यामुळे होतात. दूषित अन्न, पाणी व हवेमुळे शरीरात अनेक रोग होतात. मनाचे रोग-मनातील वासना, कामना, इच्छा, राग-द्वेष, विकार, संस्कार इत्यादी मुळे निर्माण होतात. मनाचे संकल्प पक्के नसल्याने मनाचे रोग, विचार शुद्ध व स्वच्छ नसल्याने बुद्धि रोगी होते. अति व अयोग्य अन्नाने शरीर रोगी होते. म्हणच आहे - **'अति खाणे नि स्मशानात जाणे'** म्हणून **'अति सर्वत्र वर्जयेत'** किंवा **'अति तेथे माती'** या वाक्प्रचारातून आपणास निरोगी सूचनाच मिळतात. परंतु आत्म्याच्या बाबतीत, आत्मा शरीरात राहूनही शरीरापासून दूर असतो. तो असंग आहे. त्यामुळे त्यात कोणतेही रोग नाहीत. तो निरामय म्हणजे पूर्ण निरोगी आहे.

**निराभास :-** निराभास म्हणजे निर् + आभास = निराभास. आत्म्यात काहीही भासणे, भासमान होणे नाही. तो अतिसूक्ष्म असल्याने त्यात कोणता भास होईल ? अर्थात् नाही. भास होणे दृष्टीचा दोष आहे. दोरीवर साप भासणे हा दृष्टिभ्रम आहे. वाळवंटात मृगजळ दिसणे, हा दृष्टीचाच भ्रम आहे. मनात निरनिराळे संकल्प - विकल्प उठणे, मन प्रसन्न अप्रसन्न होणे, मनोराज्य करणे, मनात निरनिराळ्या प्रकारची व्यर्थ भीति वाटणे, ज्या वस्तूत सुख नसताना सुखाचा आभास होणे. या आभासाच्या गोष्टी आत्मस्वरुपात नाहीत

म्हणून 'मी' आत्मा निराभास स्वरुप आहे.

**निर्विकल्प :-** निरं + विकल्प = निर्विकल्प = विकल्परहित आत्मा आहे. आत्म्यात कोणत्याही कल्पना, काल्पनिक गोष्टी नाहीत. मनात मात्र निरनिराळ्या प्रकारचे विकल्प निर्माण होतात. या संसारात अशी अनेक प्रकारची दुःखे आहेत, ज्यांची कल्पनाही करवत नाही. काही दुःखे आम्ही कल्पनेनेच ओढून घेऊन दुःखी, कष्टी होत असतो. कुणी तरी सांगतो, असे होणार आहे. भविष्यात जे होणार असेल ते होईलही पण आता त्याची भीती, दुःख कशासाठी ? ही मनाची कल्पना करुन दुःख देण्याची वाईट खोड आहे. पुढे महामारी येणार आहे, राहु-केतु वक्र होणार आहेत, भूकंप, ज्वालामुखी उष्णतेच्या लाटा, हिमवर्षाव, थंडीच्या लाटा, अतिवर्षा या भावी घटनांनी आताच दुःखी होण्याचे काय कारण आहे ? ही कल्पनेने ओढून घेतलेली दुःखे आहेत. काल्पनिक गोष्टींनी सुखी-दुःखी होणे हे मनाचे खेळ आहेत. आत्मा निर्विकल्प आहे. त्यात कोणतीही कल्पना नाही व त्या कल्पनेचे दुःखही नाही.

विकल्पाची फार सुंदर व्याख्या, भगवान पतंजलीनी त्यांच्या 'योग दर्शनात' दिलेली आहे. **'शब्दज्ञानानुपाती वस्तुशून्यो विकल्पः'** ||९|| समाधिपाद. या सूत्राचा अर्थ असा की, शब्दापासून उत्पन्न झालेले जे ज्ञान ते शब्दज्ञान, शब्दज्ञानाच्या मागोमाग उत्पन्न होण्याचा ज्याचा स्वभाव आहे, पण तो वस्तु शून्य आहे, म्हणजे ज्याला आधाराला तशा प्रकारची वस्तुच नसते, अशा स्वरुपाचा जो बोध, तो विकल्प होय.

विकल्पात शब्दज्ञान तर आहे पण त्या शब्दज्ञानाला अनुसरणारी वस्तु नाही. मग मनात जी वृत्ति उठते तिला विकल्प असे म्हणतात. उदाहरणार्थ- खपुष्प, सशाचे शिंग, वांझेचा मुलगा इत्यादी विकल्पाची उदाहरणे आहे.

**अहमाततः :-** आततः म्हणजे व्यापक, आत्मा सर्व व्यापक आहे. सूक्ष्माति-सूक्ष्म आत्मचैतन्य जसे देहांत व्यापक आहे, तसे ते सर्व ब्रह्माण्डांत व्याप्त आहे. ते कणाकणात, जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी सर्वत्र भरुन राहिलेले आहे. ते देहासारखे जड नसल्याने दिसत नाही. असे असत् रुप जड

शरीर मी नाही. 'मी' तर निरामय, निराभास, निर्विकल्प व सर्व व्यापक ब्रह्म आहे. यासच बुद्धिमान मनुष्य ज्ञान असे म्हणतो.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (२७) ज्ञानाचे लक्षण वा स्वरुप - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **निर्गुणो निष्क्रियो नित्यो नित्यमुक्तोऽहमच्युतः ।**
**नाहं देहो ह्यसद्रूपो ज्ञानमित्यच्युते बुधैः ॥२७॥**

**अर्थ :-** मी निर्गुण (गुणरहित), निष्क्रिय (क्रियारहित), नित्यमुक्त (बंधन रहित) नित्य(अखंड)अच्युत असा आहे. यालाच बुद्धिमान लोक ज्ञान असे म्हणतात. ॥२७॥

**विवरण :-** या विश्वात ब्रह्मदेवा पासून लहानशा कीड्यापर्यंत, कोणीही दुःखाची इच्छा करीत नाहीत. दुःखाबद्दल सर्वांना नावड आहे आणि ती स्वाभाविक वाटते. सुख मात्र हवे आहे. मग सुख कोठून येते व दुःख कोठून येते याचा विचार कधी केला का ? जर आपल्याला देह आहे तर दुःखही येणारच. दुःखाचा स्त्रोत, शरीर, इंद्रिये, कर्मे, अधिभूत, अधिदैव व अध्यात्म म्हणजे त्रिताप यात आहे. हा देह 'अहं व मम', मी व माझा झाला की, त्यातील सर्व दुःखेही माझीच झाली. आता या सर्व दुःखापासून सुटायचे कसे ? हा मुख्य प्रश्न आहे.

प्रथम असे पहा की, हा मनुष्य देह कसा आला ? तो आपल्या पूर्व पाप-पुण्याने, धर्माधर्माने आला. पाप-पुण्य सम झाले की, मनुष्य देह मिळतो. मग आता तो मिळाल्यानंतर काय करायचे ? पुण्य वाढवायचे व पाप कमी कमी करावयाचे. पापाचे फळ दुःख व पुण्याचे फळ सुख आहे. हे सुख कसे मिळवायचे व वाढवायचे हाच मुख्य प्रश्न होऊन बसला आहे. राग-द्वेष हे, या द्वैतातून उत्पन्न झाले. त्याचे कारण अज्ञान. अज्ञानाची निवृत्ति ज्ञानाशिवाय होत नाही. ते ज्ञान म्हणजे मी-आत्मा-वा ब्रह्म आहे. मी देह नसून ब्रह्मच आहे, यासच ज्ञान असे म्हणतात.

श्री.श्री. प.पू.आद्य शंकराचार्य या श्लोकांतून त्या ज्ञानाचे स्वरुप सांगत आहेत. मी आत्मा-ब्रह्म कसे आहे ? ते निर्गुण आहे. गुणांनी वस्तु-वस्तुमधील भेद कळतो. उदाहरणार्थ-पृथ्वीचा गुण-गंध, पाण्याचा गुण-रस,

पृथ्वी म्हणजे माती व पाणी हे वेगवेगळे आहेत. त्यांच्या गुणांनी त्यांना पृथक, म्हणजे वेगळे केलेले आहे. आत्म्यात असे गुण नाहीत. त्यामुळे तो अखंड एक म्हणजे एकच आहे. वास्तविक त्याच्या अति सूक्ष्मतेने त्याला एक म्हणणे सुद्धा जमत नाही म्हणून तो निर्गुणस्वरुप आहे.

गुणात सत्त्व, रज व तम असे प्रकार आहेत. या देहांत त्यांचे कार्य सुरु असते. दया, दान-पुण्य, सेवा, भजन-साधन, यात सत्त्वगुण क्रियाशील असतो. सदैव क्रियाशील असणे, कर्मांतच रुचि घेणे, स्थिरता, निष्कंप, शांत नसणे हा रजोगुणाचा स्वभाव आहे. राग-द्वेष, घृणा-तिरस्कार, निंदा, अर्वाच्य बोलणे, घाणेरडे वर्तन, पापाचरण हे तमो गुणामुळे घडतात. आत्म्यात यातील कोणताही गुण नाही. म्हणून तो निर्गुण आहे.

**निष्क्रिय :-** क्रिया-कर्म यांच्यामुळे पाप-पुण्य होते. अहंकार, अभिमान, गर्व, ताठा वाढतो. श्रीमंतांना धनाचा अहंकार, पुढाऱ्यांना मानाचा- पदाचा अभिमान, कामगारांना आपल्या कर्मांचा अभिमान, विद्वान यांना आपल्या विद्येचा गर्व, कलावंताना आपल्या कलेचा अहंकार असतो. आत्म्यात सर्व संपन्नता असूनही तो अहंकाररहित आहे. तो निष्क्रिय असल्याने त्यात पूर्ण शुद्धता, स्वच्छता आहे. असा आत्मा मी आहे. हे **शुद्धज्ञान** आहे.

**नित्यमुक्त :-** मनुष्य आपल्या जीवनात नेहमी विचार करीत असतो. मी - माझा देह, माझे कुटूंब-परिवार, जाति - संप्रदाय, धन - दौलत, माझी संपत्ति, माझी इभ्रत, मान-पान, इ.इ.गोष्टींनी बद्ध होतो, बंधनात पडतो. बंधन माणसाला त्याच्या मनाप्रमाणे, विचाराप्रमाणे कृति करु देत नाही. तुरुंगातील कैदी ज्या प्रमाणे आपल्या मताप्रमाणे बोलू शकत नाही. वागू शकत नाही. जे जसे असेल त्याचा स्वीकार त्याला करावाच लागतो. तसे आत्म्याचे नाही. आत्म्याला कुठलेही बंधन नाही. किंबहुना तो सर्वांची बंधने तोडून सर्वांना आपल्याकडे वळविणारा आहे. तो सदैव नित्यमुक्त आहे. असा नित्यमुक्त आत्मा मी आहे, हे बंधनांनी जखडलेले शरीर मी नाही. हेच **शुद्धज्ञान** आहे.

**अच्युत :-** जो आपल्या स्थितीतून कधीही च्युत, म्हणजे भ्रष्ट होत

नाही. मनुष्याचे मन अति चंचल आहे. त्याला त्याच्या उच्च अवस्थेतून अधोगतीला नेणारे त्याचे चंचल मनच आहे. जीवनाचा प्रवास व्यवस्थित चाललेला असताना कुठे तरी पाय घसरतो व माणूस तोंडघशी पडतो. याला कारण म्हणजे मोह, माया, लोभ, काम, क्रोध इत्यादी विकार असतात. आत्म्यामध्ये असे विकार नाहीत. त्यामुळे तो अखंड आहे व त्याच स्थितीत असतो. म्हणून त्यास अच्युत असे म्हणतात. असा आत्मा मी आहे. हे खरे शुद्ध ज्ञान आहे. मी भ्रष्ट होणारा देह नाही. देह असत् रुप आहे. आत्माच सत्-सत्य आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (२८) ज्ञानाचे स्वरुप - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** निर्मलो निश्चलोऽनन्तः शुद्धोहमजरोऽमरः ।
**नाहं देहो ह्यसद्रूपो ज्ञानमित्युच्यते बुधैः ॥२८॥**

**अर्थ :-** मी निर्मल, निश्चल, अनंत, शुद्ध, अजर आणि अमर आहे. हा असत् रुप देह मी नाही. सूज्ञ लोक यासच खरे ज्ञान म्हणतात. ॥२८॥

**विवरण :-** मी आत्मा असून, निर्मल आहे. आत्म्यात कोणताही मल नाही. हे वारंवार का सांगावे लागत आहे ? कारण प्रत्येक मनुष्य प्रथम स्वतःला देहच समजत असतो. ही देह भावना इतकी दृढ बनलेली असते की, भगवान शंकराचार्यासारखे महात्मे, संत, सज्जन, त्यांनी लिहीलेले ग्रंथ, शास्त्रें, पुराणें, कथा, यातून वारंवार 'मी देह नसून आत्मा आहे !' असा उपदेश केलेला वाचतो, ऐकतो. तरी पण आपल्या समजण्यात, वागण्यात, बोलण्यात काहीच फरक पडत नाही. मी देहच आहे. हाच भाव दृढ झालेला दिसून येतो. तरी देह आणि आत्मा यातील फरक तर ओळखा.

**निर्मल :-** आत्मा निर्मल म्हणजे मलरहित आहे. देह हा आंतर-बाह्य मलीन आहे. बाहेरुन तर धुळीचा, मातीचा थर दररोज जमतच असतो. नाक, कान, डोळे, केस, त्वचा यांना दररोज पाण्याने, साबणाने धुवावेच लागते. तोंड धुवूनच पिणे, खाणे करावे लागते. शरीराला लागणारे मल, घाण दिसते व वासही येतो, पण शरीराच्या आतील मळ व घाण दिसत नाही, कळत नाही. शरीर आतून तर अतिशय घाण व मलीन आहे. देहद्वारांमधुन येणारे मल, मूत्र, घाम, तोंडातून येणारे ढेकर, उचकी, वाफ-वायु इत्यादी शरीरात असलेल्या घाणींचे स्वरुप प्रकट करतात. शरीराच्या आंतर-बाह्य होणारे निरनिराळे रोग, तर घाणीचे साम्राज्यच निर्माण करतात. शरीराच्या आतील व बाहेरील व्रण, जखमा सडतात शरीरातील रक्तही दूषित होते. सडलेल्या भागातून येणारे पूं, फोड, फून्सी हे सर्व शरीराचे मल आहेत. या उलट आत्म्यात हे मल, घाण नाही. तो शुद्ध, निर्मल आहे.

**निश्चल :-** आत्मा स्थिर आहे. त्याला हालचाल नाहीं. चंचलता नाही. कुठे जाणे येणे नाही. देह मात्र याच्या उलट नेहमी हालचाल करणारा, क्रियाशील आहे. श्वास, रक्ताभिसरण, वायु - पंच प्राणांचे प्रसरण, हात-पाय-बोटे, मान, यांचे हालणे, नेहमीच चालू असते असा हा देह स्थिर, निश्चल नाही. देहाने अनेक कर्मे - क्रिया होत असल्याने तो निश्चल राहूच शकत नाही.

**अनंत :-** आत्मा-ब्रह्म-अनंत असा आहे. ज्याला अंत म्हणजे शेवटच नाही व त्याचा प्रारंभही कळत नाही. तो अत्यंत सूक्ष्म असल्याने सर्व ब्रह्माण्डामध्ये व्यापून राहिलेला आहे. त्याचा आदि-अंत कळत नाही. तसे देहाचे नाही. त्याची लांबी, रुंदी, जाडी कळते. तो मर्यादित आहे. आत्मा मात्र अमर्यादित, अनंत असा आहे.

**शुद्ध :-** आत्मा परिपूर्ण शुद्धस्थितीत असतो. सर्व अवस्था, स्थिति-देशात असतात सर्व भावना-कालात असतात, आणि सर्व संबंध वस्तुंमध्ये असतात. यामुळे शरीर शुद्ध राहूच शकत नाही. आत्माच देश, काल, वस्तु यांच्याशी संबंधरहित असल्याने तो अति शुद्ध आहे. आत्मा आणि ज्ञान-यात भिन्नता, वेगळेपणा नाही. आत्मा ज्ञानस्वरुपच आहे. तो शुद्ध म्हणजे अद्वितीय आहे. त्यात द्वैत नाही.

**अजर - अमर :-** अजर म्हणजे अ = नाही, जरा - वार्धक्य, आत्मा म्हातारा होत नाही. ज्याला देहच नाही तर वार्धक्य येणार कोठून ? म्हातारपण ही देहाची एक अवस्था आहे. शिशुपण-बालपण-तारुण्य-वार्धक्य- मृत्यु - या शरीराच्या बदलणाऱ्या अवस्था आहेत. वार्धक्यानंतर देहाला येणारी शेवटची अवस्था म्हणजे मृत्यु. आत्म्याला म्हातारपण व मृत्युही नाही. म्हणून त्याला 'अजरामर' असे म्हणतात.

**नाहं देहो असत् रुपो :-** मी देह नाही. कारण हा देह असत्‌रुप आहे. आत्माच सत्-सत्य स्वरुप आहे. देह परिवर्तनशील, बदलणारा, येणारा-जाणारा असा मिथ्या आहे. देह हे जगाचेच एक अंग आहे. पंचीकृत पंचमहाभूतांचे

ते एक भेंडोळे आहे. त्यात पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, पंचप्राण, पंच उपप्राण, पंचवृत्तिं अशा अनेकानेक गोष्टींचा समुदाय आहे. आत्म्यात असे काहीही नाही. असा शुद्ध आत्मा मी आहे, असद्रुप देह मी नाही. सूज्ञ लोक यासच **ज्ञान** असे म्हणतात.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (२९) देहातीताला कसे शोधणार ?

**श्लोक :-** **स्वदेहे शोभनं सन्त पुरुषाख्यं च सम्मतम् ।**
**किं मूर्ख शून्यमात्मानं देहातीतं करोषि भोः ॥२९॥**

**अर्थ :-** हा शोभन (शुभ) पुरुष आपल्या देहातच आहे. ही गोष्ट श्रुतीला मान्य आहे. मग अरे मुर्खा ! त्या आत्म्याला देहातीत व शून्य का समजतोस ? ॥२९॥

**विवरण :-** या श्लोकात श्रीमद् पूज्यपाद आद्य शंकराचार्यांनी त्या आत्मदेवाला शोभन पुरुष म्हटले आहे. शोभन म्हणजे शुभ, पवित्र, पुरुष म्हणजे पुर-पुरी म्हणजे नगरी, षयति म्हणजे झोपणारा नव्हे तर राहणारा, या देहरुपी नगरात राहणारा तो पुरुष **आत्मा** होय. मग त्या आत्म्याचा शोध घ्यायचाच असेल तर तो कुठे घ्यावा? अर्थात् देहातच घ्यावा लागेल ? देहाच्या बाहेर तो कसा शोधणार ? तो देहाच्या बाहेरही सर्वत्र सर्व व्याप्त आहे, पण त्याला कसे बघणार, शोधणार ? तो निराकार, निर्विकार, सूक्ष्म, असंग, निर्गुण, सम, शांत असा आहे. मग तो कुठल्या इंद्रियाचा विषय होईल ? अर्थात् तो सर्व इंद्रियांना अविषय आहे. आत्मा अनंत असून या शरीराच्या मृत्युचा त्याच्यावर कोणताही परिणाम होत नाही. आत्मा एक असे वर्तुळ आहे की, ज्याला परिघ -कडा-नाही, पण त्याचा मध्य बिंदु शरीरात आहे. शरीर मृत झाले की या बिंदूचे केवळ स्थान बदलते. तो बिंदु नष्ट होत नाही. कठोपनिषदाचे ऋषि सांगत आहेत -

**अग्निर्यथैको भुवने प्रविष्टो, रुपं रुपं प्रतिरुपो बभूव ।**
**एकस्तथा सर्व भूतान्तरात्मा, रुपं रुपं प्रतिरुपो बहिश्च ॥६६॥**-कठोपनिषद्

ज्या प्रमाणे प्रत्येक घरात पेटलेला अग्नि, त्या त्या पेटत्या वस्तूच्या आकारा प्रमाणे पेट घेत असतो. (एकच अग्नि प्रत्येक रुपवान वस्तूच्या अनुरुप होतो,) त्या प्रमाणे या सर्व प्राणीमात्रांमध्ये प्रविष्ट झालेला अंतरात्मा त्यांच्या त्यांच्या आकारानुरुप होत असतो. तसे पाहिले तर आत्म्याला कुठलाच आकार नाही. तो जसा देहात आहे तसा देहा बाहेरही आहे.

**स्वदेहे :-** हे माणसा ! हे सत्यस्वरुप आत्मतत्त्व, तुझ्या स्वतःच्या शरीरातच उपस्थित आहे. दूर कोठे ढगावर जाण्याची आवश्यकता नाही. ते नित्य तेजस्वी आणि शुभ्र (शोभनम्) आहे. ज्या प्रकाशात तू स्वतःचे शरीर, स्वतःचे विचार, भावना जाणतोस, त्याचे ते उगमस्थान आहे. तो आत्मप्रकाश अखंड प्रकाशमान आहे. (सन्तम) त्याला पुरुष असे म्हटलेले आहे. (पुरुषाख्यम) सर्व उपनिषदांच्या ऋषींनी त्याला मान्यता दिलेली आहे. (संमतम्) श्रुतीलाही तो मान्य आहे. ज्या आत्मप्रकाशात केवळ सर्व गोष्टींचे ज्ञान होते, बोध होतो, अशा प्रकाशतत्त्वाचा आपण सर्व आपल्या देहात अनुभव घेत असतो. श्रुति ग्रंथ 'पुरुष' व 'प्रकृति' यांच्या विषयी खूप चांगल्या प्रकारे विवेचन करतात. 'प्रकृति' म्हणजे मूलद्रव्य, ती प्रकृति, पुरुषाचे-सत्‌तत्त्वाचे वाहन आहे. आत्मा, पुरुष या देहातच जरी असला तरी तो चेतन, सूक्ष्माति-सूक्ष्म असल्याने देहा बाहेरही आहे. देहाच्या मर्यादेने तो मर्यादित होत नाही. म्हणून तो देहातीतही आहे. शरीर, मन, बुद्धीमध्ये, अंतर्भूत असलेली जाणीव ही आत्म्यातून उद्‌भवलेली असल्याने ती सर्वकाळ टिकून राहते. अशा प्रकारे स्वयं स्पष्ट असलेले हे आत्मतत्त्व जाणण्याचे जे नाकारतात अशांच्या बाबतीत भगवान श्रीशंकराचार्य म्हणतात - '**पश्यन्तपि न पश्यति मुढः ।**' दृष्टि दिलेली असून तुम्ही त्याला का बघत नाही ? आत्मतत्त्वाला बघता येत नाही. त्याचे स्वरुप कोणत्याही इंद्रियाला जाणता येत नाही. ते सर्व इंद्रियांना विषय होत नसल्याने त्याचे वर्णन करताना श्रुतिही 'नेति नेति' "असे नाही, असे नाही" अशा नकारात्मक पद्धतीनेच करते. म्हणून काही शास्त्रकार त्याला शून्य म्हणून संबोधितात. आत्म्याला - शून्याकार समजणे ही मूढ बुद्धि आहे. कारण जो आत्मा अस्तित्वात असून, सर्व जगताचे मूलतत्त्व आहे. कारण, शून्यातून काहीच निर्माण होत नसल्याने मग जगाचे उपादान कारण काय समजावे ? अर्थात् 'ब्रह्म' च पूर्ण सत्य आहे. ते नाकारणाऱ्या, नास्ति तत्त्वाचेही निश्चित, अस्तित्व जाणणारे ज्ञानतत्त्व आहे. म्हणून स्वयंसिद्ध असलेल्या या सत्यतत्त्वाला तू शून्य कसे समजतोस ? आत्मतत्त्वाला शून्य समजणारी बुद्धि मूढ-मूर्खच म्हटली पाहिजे.

॥ हरि ॐ तत सत् ॥

## (३०) आत्मा सुदुर्दर्श का ?

**श्लोक :-** **स्वात्मानं श्रुणु मूर्ख त्वं श्रुत्या युक्त्या च पूरुषम् ।**
**देहातीतं सदाकारं सुदुर्दर्शं भवादृशैः ॥३०॥**

**अर्थ :-** हे मूर्खा ! तू आपल्या आत्म्याचे वर्णन श्रुतिद्वारा व युक्तिपूर्वक ऐक ! कारण हा पुरुष (आत्मा) देहातीत, सत् आकाराचा आहे. तो तुझ्यासारख्याला अत्यंत दुर्दर्श आहे. (ओळखणे, पहाणे कठीण आहे.) ॥३०॥

**विवरण :-** एकाद्याला कुणी हाक मारुन थांबविले व सांगितले की तू चांगला मनुष्य आहेस, हे ऐकल्याबरोबर त्याला आनंद होतो व त्याचा अहंकार अधिक वाढतो. पण त्याला जर सांगितले की तू वाईट मनुष्य आहेस, तर त्याला क्रोध चढतो व तो संतप्त होतो. त्याचा अहंकार दुखावला जातो. स्तुति गोड लागते व निंदा कडू लागते. वास्तविक वाईट व चांगला, निंदा व स्तुति - हे शब्दच आहेत. आपली बरीचशी दु:खे शब्दांनीच निर्माण झालेली आहेत. वास्तविक आत्मा हा शब्दाचा, वाणीचा विषय नाही. देह तर जड, अचेतन आहे. देहाला म्हणजे त्याच्या बुद्धीला शब्दाचे ज्ञान होते व त्यामुळे सुख व दु:ख येते.

बुद्धीला प्राप्त होणारी चेतना, आत्म्याकडून येते. आत्म्या शिवाय बुद्धीही जाणू शकत नाही. सर्वच शरीराला व इंद्रियांना चेतना देणारा एक आत्माच आहे. पण नेमके त्याचेच अज्ञान आहे आणि हे मूळ अज्ञानच आमच्या सुख-दु:खाचे कारण असते. अशा आत्म्याचे ज्ञान झाले की अज्ञान नष्ट होते. अज्ञान नष्ट झाले की सुख-दु:ख गेले. आपल्याच देहात असणाऱ्या आत्म्याचे ज्ञान कसे करुन घ्यावे, तेच वरील श्लोकातून भगवान शंकराचार्य सांगत आहेत. श्रुति म्हणजे वेदान्त - उपनिषदें व युक्ति म्हणजे तर्कशास्त्र या दोन साधनांनी त्या आत्मराजाचे वर्णन ऐकावे. तो आत्मराज - पुरुष या देहांत व देहा बाहेरही आहे. तो देहातीत व सत् आकाराचा आहे. त्याला दुर्बुद्धि वा मंद बुद्धीचा मनुष्य जाणू शकत नाही. देहालाच आत्मा समजणाऱ्या मूर्खाला, त्याचा मूर्खपणा प्रथम पटवून दिला पाहिजे. त्याची खात्री करुन द्यावयास हवी

की देह आणि आत्मा वेगवेगळे आहेत. श्रुति ग्रंथाच्या अधिकारावर जर विश्वास नसेल तर स्वत:च्या सारासार बुद्धीवर, तर्कशास्त्रावर आणि उपपत्तीवर अवलंबून असावे. तर्काने शरीरात असलेल्या आत्म्याचे अस्तित्व कळून येते.

आत्म्याचे अस्तित्व केवळ शरीरात नाही. ते शरीरा बाहेरही आहे. अस्तित्व हेच त्याचे स्वरुप आहे. सर्व ठिकाणी, सर्व वस्तूंत, सर्वकाळ, उपस्थित असलेले सत्‌तत्त्व, हे त्याचे विशेषत्व आहे. स्वत: मध्ये असलेले सत्-तत्त्व शून्यवादीही नाकारु शकत नाहीत आत्मतत्त्वाला पुरुष असेही म्हणतात. कारण देहरुप पुरात-नगरात त्याचे वास्तव्य असते. आत्मा अरुप म्हणजे रुपरहित, निराकार-आकार रहित, नि:संग - संगरहित असल्यामुळे त्याला पाहणे व जाणणे कठीण आहे. म्हणून त्याला आचार्य सुदुर्दर्श असे संबोधितात. तो शून्य तर मूळीच नाही. तर तो शून्याचाही साक्षी आहे. अशा आत्म्याला जाणणे व पाहणे (भवादृश:) मूर्ख मानवाला सोपे नाही.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (३१) विचार कसा करावा -

श्लोक :- अहं शब्देन विख्यात एक एव स्थित: पर: ।
स्थूलत्वान्नैकतां प्राप्त: कथं स्याद्देहक: पुमान् ॥३१॥

**अर्थ :-** 'अहं' शब्दाच्या रुपाने प्रसिद्ध एकच परमतत्त्व स्थित आहे. असा तो पुरुष, अनेक रुपे धारण करणारे स्थूल शरीर कसे होऊ शकेल ॥३१॥

**विवरण :-** झोपेतून जागे झाल्यानंतर आपल्या डोळ्यांना प्रथम आपल्या सभोवती पसरलेल्या अनेक वस्तूंचे दर्शन होते. ही दर्शन प्रक्रिया इथेच थांबत नाही. खोलीतून बाहेर आल्यानंतर या जगतातील असंख्य पदार्थ, वस्तु, प्राणी, पशु, पक्षी दिसतात. जगताचे हे नानात्वाचे दर्शन पाहिल्यानंतर मन, बुद्धि त्यांच्याच विचारात फिरु लागते. हाच मायेचा चमत्कार आहे.

**इह पश्यति नानात्वं, मामया वञ्चितोनर: ।**

मायेने प्रभावित झालेला मनुष्य, त्याच माया मोहात व्यवहार करु लागतो. अशा वेळी त्याला आपल्या स्वरुपाचा विचार येणे कदापि शक्य नसते. स्वत:बद्दलचा विचार आलाच तर तो देहाबद्दल, शरीराच्या इंद्रियांबद्दल येतो. डोळे पहातात, कान ऐकतात, नाक वास घेते, तोंड बोलते, खाते-पिते, हाता-पायांची हालचाल होते. या सर्व इंद्रियांच्या क्रिया कोण करतो ? असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर 'मी' करतो. कुणालाही असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर 'मी' असेच येते. पण हा 'मी' कोण ? **कोऽहं ?** याचा विचार करावा. भगवान श्रीशंकराचार्य या श्लोकातून सांगत आहेत की -

**अहं शब्देन विख्यात एक एव -** 'मी' या एकाच शब्दाने विख्यात असलेला 'पुरुष' या शरीरात व शरीरा बाहेरही तो नित्य आहे. जगात कुठेही हा 'पुरुष' 'मी' ने विख्यात असलेल्या रुपाने प्रकाशित होत आहे. हेच तत्त्व महान् सद्गुरु अष्टावक्र राजा जनकाला सांगत आहेत -

**यथा प्रकाशयाम्येको देहमेनं तथा जगत् ।**
**अतो मम जगत्सर्वमथवा न च किंचन ॥** सूत्र - २ प्र.२

जसा या देहाला 'मी' एकटाच प्रकाशित करतो, त्याच प्रमाणे या विश्वालासुद्धा मीच प्रकाशित करतो. म्हणून संपूर्ण जग माझे आहे किंवा माझे काहीच नाही. मी शरीर नसून आत्मा आहे. **'अशरीरं शरीरेषु'** सगळया शरीरांमध्ये मी अशरीर - आत्मा आहे. बदलणाऱ्या शरीरांमध्ये मी न बदलणारा, लहानामध्ये राहूनही मी महान आहे. सर्वांत सर्व ठिकाणी मी व्याप्त आहे. मी चेतन आत्मा, सर्वांना ती चेतना देणारा असून माझ्यामुळे कुणालाही दुःख होत नाही. देह अनेक आहेत पण त्या सर्व देहांमध्ये असणारा मी आत्मा अनेक होत नाही. अनेकात राहूनही मी एकच एक आहे. मी सूक्ष्माति-सूक्ष्म असल्यामळे, तसा मी एकही नाही. एक ही संख्या आहे. 'मी' तर संख्यातीत, संखेच्या पलिकडे असणारा आहे. म्हणून मी एकही नाही व अनेकही नाही. 'मी' देह नाही. देहाची अनेक रुपें व आकार आहेत. देह स्थूल-जड आहे. मग 'मी' आत्मा असा स्थूल देह कसा बरे असू शकेन ? अर्थात्-नाही.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (३२) आत्मा द्रष्टा - देह दृश्य - मग आत्मा देह कसा ?

**श्लोक :-** **अहं द्रष्ट्तया सिद्धो देहो दृश्यतया स्थित: ।**
**ममायमिति निर्देशात्कथं स्यादेहक: पुमान् ॥३२॥**

**अर्थ:-** हे सिद्ध आहे को, 'मी' द्रष्टा आहे आणि देह दृश्य रुपाने स्थित आहे. हा देह माझा म्हणून म्हटला जातो, तेव्हा पुरुष (आत्मा) देह कसा होऊ शकेल ? ॥३२॥

**विवरण :-** हे तर स्पष्टच आहे की, आत्मा चेतन व देह जड आहे. जो जाणतो तो चेतन, व जे जाणले जाते ते जड. आत्मा सर्वांना जाणणारा आहे. शरीर हे जाणली जाणारी वस्तु आहे. हे माझे शरीर आहे, असे जेव्हां मी म्हणतो, त्यावेळीं 'मी' हा द्रष्टा-पाहाणारा, व शरीर हे दृश्य-पाहिले जाणारे असते. शरीराचा अनुभव मी घेतो. जाणणारा आत्मा आहे. मी केवळ या देहांत राहून इंद्रियांच्या माध्यमातूनच जाणणारा नाही तर सर्व इंद्रियांनाही जाणणारा आहे. मी या देहांत असल्यानेच या देहाकडून धर्म-कर्म, वेद-वेदान्तज्ञान- ईश्वराची आराधना, पूजा भक्ति होते. तात्पर्य प्रथम 'मी' या देहांत असतो आणि नंतर माझा देव, माझा धर्म, माझे शास्त्र, माझा संसार हे सारे क्रमाक्रमाने येऊ लागतात. मनुष्याची चूक येथेच होते की, ज्याच्यामुळे हे सर्व निर्माण होते, त्यालाच विसरुन, देहाने हे सर्व घडले असे म्हणतो. या देहांत असणाऱ्या चैतन्याचा स्वामी आत्मराज याला विसरुन जातो. वास्तविक या सर्वांचा द्रष्टा, साक्षी तोच आहे. हे शरीर व त्याचे कर्म-धर्म हे दृश्य आहे.

जगात माणसे संसारातील भोग विषयांसाठी अनेक प्रयत्न करीत असतात. जगातील विषय वास्तविक जड असतात. हे माझे, हे माझे असा ध्यास धरतात. माझे म्हणजे कुणाचे ? तर देहाचे. देह तर आधीच जड आहे व हे विषयही जडच आहेत. जडाची वास्तविक काही सत्ता असते काय ? ज्याच्या सत्तेने मनुष्य हे माझे-माझे म्हणतो तो आत्मा तर कळत नाही. त्याचा तर विसरच पडला आहे. मग ह्या जड, दृश्य स्वरुप देहाची सत्ता मानतो.

अशा वेळी तो पुरुष (आत्मा) देह कसा होईल ? अर्थात् नाही. **'देहो दृश्यतया स्थित:'** - देह दृश्य आहे. देहांत-स्थूल, सूक्ष्म, कारण असे भेद आहेत, परंतु आत्मा एक आहे. त्यात असे भेद नाहीत. तो या सर्वांचा द्रष्टा आहे.

मनुष्याच्या बुद्धींत असलेले अंशात्मक ज्ञान, हे त्या आत्म्याच्या सर्वज्ञतेचा विलास आहे. मनुष्याच्या ठिकाणी असणारे रचना कौशल्य हा त्या आत्मचेतनेचा प्रकाश आहे. मनुष्यात असलेली प्रेम भावनाही त्या आत्म्याच्या आनंदाचे प्रगटीकरण आहे. आत्मा या देहापासून असंग आहे, अलिप्त आहे. त्याचा हा अलिप्तपणाच मनुष्याच्या जीवनातील निवृत्ति आहे. म्हणून आत्म्याने या देहाला, मनुष्यांच्या जीवनाला अनेकानेक सुंदर देणग्या दिलेल्या असताना, त्या आत्मराजाला विसरणे म्हणजे कृतघ्नपणाच नाही कां ? आत्मा एक महान समुद्र आहे. या सिंधु जलातील एक लहानसा बिंदु नक्कीच मनुष्य जीवनात पडलेला आहे. त्याशिवाय या मनुष्याच्या देहाला व त्याच्या जीवनाला अन्य प्राणी जीवनापेक्षा श्रेष्ठत्व लाभलेले आहे. असा हा श्रेष्ठत्वाचा लाभ देणारा आत्मा व लाभ घेणारा देह हे वेगवेगळे असलेच पाहिजेत. मग देहच आत्मा कसा होईल ?

मनुष्याने देह आणि आत्मा यांचे स्वरुप आपल्या बुद्धिज्ञानाने तरी ओळखावे. अर्थात् केवळ बुद्धीच्या आधारावर अवलंबून न राहता श्रुति, संत, सद्‌गुरु यांचा आश्रय घ्यावयास हवा. त्या शिवाय जड देह व चेतन आत्म्यातील फरक कळणार नाही. चेतन आत्मा देह कसा होऊ शकेल ?

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (३३) देह आत्मा होऊं शकत नाहीं

श्लोक :- अहं विकारहीनस्तु देहो नित्यं विकारवान् ।
इति प्रतीयते साक्षात्कथं स्याद्देहक: पुमान् ॥३३॥

**अर्थ :-** 'मी' विकारहीन आहे व देह सदा विकारी आहे. ही गोष्ट प्रत्यक्ष प्रतीत होत आहे. (याचा साक्षात्-प्रत्यय-अनुभव येतो) तेव्हा 'मी' (आत्मा) देह कसा होऊ शकेन ? ॥३३॥

**विवरण :-** 'अपरोक्षानुभूति' या ग्रंथातील २५ व्या श्लोकांत, आत्म्याला निर्विकार. सांगण्यात आलेले आहे. आता, याही श्लोकात त्याला 'विकारहीन' म्हणून संबोधण्यात आले आहे. चित्तावर एखादी गोष्ट चांगली ठसविण्यासाठी तीच तीच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगावी लागते. तेव्हा येथे पुनरावृत्ति हा दोष नसून एक गुणच आहे. लहानपणापासून 'मी देह आहे' 'मी देह आहे.' हीच धारणा, समजूत दृढ-पक्की झालेली असल्याने तिला चुकीची ठरवून बाजूला हटविण्यासाठी वारंवार सांगावेच लागणार ना ?

**अहं विकारहीन: -** 'मी' विकारहीन म्हणजे विकाररहित आहे. पण देह मात्र विकारवान म्हणजे विकारी आहे. विकार म्हणजे विकृत होणे. बदल होणे, बिघडणे, रुपांतरित होणे म्हणजे विकारयुक्त होणे. उदाहरणार्थ दूधाचे दही होणे, दह्यापासून ताक, ताकापासून लोणी व लोण्यापासून तूप होणे. ऊसापासून साखर. कापसापासून वस्त्र, ही रुपांतरे आहेत. अशी रुपांतरे देहांत होतात. आत्म्यांत नाहीत. उदा.- जन्मकाळी आपला देह जसा जेवढा होता, तसा तो बालपणी, तरुणपणी, म्हातारपणी राहात नाही. वयाच्या वाढीबरोबर शरीराची, इंद्रियांचीही वाढ होत जाते. अर्ध्या आयुष्यापर्यंत शरीराची वाढ होत होत मग थांबते. वृद्धपणाकडे जाताना शरीर थकत जाते. मृत्यु समयी असणारा देह व जन्मकाळी असणारा देह यात किती विलक्षण बदल झालेला दिसतो. तथापि या बदलणाऱ्या देहांतील 'मी' आत्मा, तोच व तसाच आहे.त्यात कोणताही बदल, फरक, बिघाड, विकार होत नाही. हे सारे विकार

देहांतच होतात, आत्म्यात नाहीत. म्हणून 'मी' आत्मा विकारहीन आहे.

स्थूल व जड देहांत होणारे बदल हळूहळू कळू लागतात. पण मन, बुद्धि, चित्त व अहं या अंतःकरणातील सूक्ष्म इंद्रियांतही विकार-बदल होतात. राग-द्वेष, क्रोध-संताप, यावेळी मनाची असलेली अवस्था व झोपेच्या वेळी, ध्यान-धारणेच्या वेळी मनाची अवस्था सारखी नसते. सत्त्वगुणातील बुद्धि व रजोगुणातील-तमोगुणातील बुद्धि सारखी नसते. शांत चित्त व भ्रमित चित्त सारखे नसते. तीच 'अहं'चीही स्थिति नम्रपणात व गर्विष्ठपणात सारखी असत नाही. तात्पर्य देह व त्याची इंद्रिये ही विकारी होतात. तसा आत्मा सदा सर्वदा बिकाररहित असतो. असा विकारहीन आत्मा मी आहे. मी विकारी देह नाही.

देहाच्या अवस्थाही सतत बदलत असतात. भूतकाळातील जो देह दिसत होता, तो तसा वर्तमानात्त नाही व वर्तमानातील देह भविष्य काळात असणार नाही. तसेच जागृति, निद्रा, स्वप्न या देहाच्या बदलणाऱ्या अवस्था आहेत. म्हणून देह विकारी आहे हे युक्तीने व अनुभवाने सिद्ध करता येते. पण मी देहांत असणारा आत्मा कोणत्याही युक्तीने वा अनुभवाने विकारी आहे हे सिद्ध करता येत नाही, म्हणून 'मी' आत्मा विकारहीन आहे. हा 'पुरुष'-आत्मा, देहांतील सर्वच विकारांचा प्रकाशक आहे. त्याच्या आत्मप्रकाशानेच देहाच्या या सर्व बदलणाऱ्या अवस्थांचा अनुभव येतो. देहाची सारी रुपांतरे, बदल, आत्म्याच्या साक्षीनेच होतात. या शरीराच्या विकारांचा द्रष्टाही तोच आहे. म्हणून आत्मा कधीही देह होऊ शकत नाही. हेच खरे ज्ञानाचे स्वरुप आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (३४) आत्म्या संबंधी श्रुतीचे कथन -

**श्लोक :-** **यस्मात्परमिति श्रुत्या तया पुरुष लक्षणम् ।**
**विनिर्णीतं विमूढेन कथं स्यादेहक: पुमान् ।।३४।।**

**अर्थ :-** पुरुषापेक्षा काहीही श्रेष्ठ (परम्,उच्च) नाही, अशा श्रुतीनेच पुरुषा संबंधीचा निर्णय दिलेला आहे. मग विमूढ माणसाच्या समजूतीप्रमाणे, तो आत्मा (पुरुष), देह कसा असू शकेल ?

**विवरण :-** देह आणि आत्मा यात कोणतेही साम्य नसताना, अज्ञानी माणसे देहालाच आत्मा का समजतात, या संबंधी दुसऱ्या श्रुतीचा आधार घेऊन विवेचन केले जात आहे.

**यस्मात् परं नापरमस्ति किंचित् ।** श्वेताश्वेतरोपनिषद.

ही प्रसिद्ध श्रुति आहे. ज्यापासून काही पर म्हणजे श्रेष्ठ वा अपर म्हणजे कनिष्ठ असे काही नाही. ज्याचे न काही कारण आहे वा न कार्य आहे. त्या शुद्ध आत्मतत्त्वाच्या पलीकडे काहीही श्रेष्ठ असू शकत नाही. केवळ एकत्व अस्तित्वात असते, द्वैत नाही. प्रकृतीचा त्याच्यामध्ये अंशही नसतो. जागृतीत स्वप्नाचा अंशही नसतो. त्या प्रमाणे शुद्ध आत्मचैतन्यात प्रकृतीचा अंशही नसतो. मातीचा घडा-घागर फुटल्या नंतर जे तुकडे होतात, त्यात मातीशिवाय काहीही नसते. बुद्धीचा ज्ञाता, संचालक आत्माच आहे. आत्म्याशिवाय आत्म्यात दुसरे काहीही नाही. सर्व स्थूल-सूक्ष्म, कारण-कार्य, आदि-अंत, वृत्तीत असतात. आत्मा तर त्या वृत्तींचा साक्षी आहे.

**यस्मान्नाणीयो न ज्यायोऽस्ति किंचित् ।**

या आत्म्यापेक्षा कुणीही मोठा वा लहान नाही. लहान-मोठे होणे हे देश परिच्छेद आहे. अगोदर-नंतर होणे हे काल परिच्छेद आहे, तर कारण-कार्य होणे हे वस्तुपरिच्छेद आहे. आत्म्यात हे तिन्हीही नाहीत. आत्मा अखंड, अद्वय वस्तु आहे.

**वृक्ष इव स्तब्धो दिवि तिष्ठत्येकस्तेनेदं पूर्णं पुरुषेण सर्वम् ।**

हा आत्मा एखाद्या वृक्षाप्रमाणे स्तब्ध अर्थात् अपरिवर्तनशील, परिणामहीन एकरस अशा दिव्य अवस्थेत राहात असतो.

**स्वे महिम्नि प्रतिष्ठित: ।**

तो आत्मा आपल्या महिमेत म्हणजे महानतेत प्रतिष्ठित आहे. अशा या पुरुष आत्म्याने सर्व सृष्टि परिपूर्ण भरलेली आहे. अशा या सृष्टीत खरोखर कोणी न शत्रू-न मित्र, न जड-ना चेतन, ना पशु-पक्षी, सर्व परमात्माच परमात्मा भरलेला आहे. ना दु:ख ना सुख, सर्व परमात्माच आहे. इंद्रियांनी घेतल्या जाणाऱ्या भोग भ्रांतिमुळेच अनेकत्वाची प्रचीती अनुभवास येतात. आत्मा तर एक रस आहे. त्यात सुख-दु:खाचा अनुभव नाही. आत्म्याच्या पूर्णत्वाचे एकदा तरी श्रवण केल्याशिवाय केवळ इंद्रियांच्या अनुभवांवर, विचारांच्या आधारांवर, त्याला जाणणे संभवनीय नाही. कारण कोणतेही इंद्रिय, मन वा बुद्धि, या आत्म्याच्या पूर्णत्वाचे ग्रहण करण्यास समर्थ नाही.

श्रुतिच पुरुषाचे (आत्म्याचे) लक्षण सांगत आहे की, तो पुरुष पर आहे, ष्ठ आहे, एक आहे आणि आपल्या महिमेत स्थित आहे. त्याच्या पेक्षा कुणी मोठा वा लहान नाही. त्याचे न कारण आहे ना कार्य आहे. त्याच्या आधी व नंतर कुणी नाही. तोच सर्वांच्या आदि-अन्ति आहे.

याचाच अर्थ असा की, पुरुषात देश, काल, जाति, व्यक्ति, वस्तु-वस्तुचा विभाग, परिणाम इत्यादी काहीही नाही. जर श्रुतीनेच पुरुषाचे (आत्म्याचे) असे लक्षण दाखविलेले आहे तर मूढ, अज्ञानी माणसाकडून जो निर्णय घेतला गेला की, 'पुरुष' हाच देह आहे. हे म्हणणे कसे सत्य असू शकेल ? जगातील सर्व भांडणे, युद्धे, वैमनस्ये, राग-द्वेष हे सर्व अज्ञानामुळेच होत आहेत. ते अज्ञान त्या आत्म्याच्या ज्ञानानेच नष्ट होणारे आहे.

**विमूढेन** :- या शब्दाचे दोन अर्थ - विशेष मूढ म्हणजे फारच मूर्ख-अज्ञानी. व विगत: मूढत्व म्हणजे मूढपणा निघून गेला म्हणजे सूज्ञ. या श्लोकात श्रुतीने सूज्ञ असा अर्थ घेऊन, सूज्ञ लोकांनी असा निष्कर्ष काढला आहे की, चैतन्य, पुरुष वा आत्मतत्त्व याच्या पलीकडे काहीही नाही. ह्या

पुरुषामध्ये प्रकृती सारखे काहीही असत नाही. केवळ पुरुष एवढेच एक सत्य स्वरुप असते. तुम्ही असे कसे समजता की, हे शरीर म्हणजे पुरुष आहे ?

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (३५) श्रुतीचे कथन (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **सर्वं पुरुष एवेति सूक्ते पुरुषसंज्ञिते ।**
**अप्युच्यते यतः श्रुत्या कथं स्याद् देहकः पुमान् ॥३५॥**

**अर्थ :-** पुरुष सूक्तात 'सर्वं पुरुष एवेदं' (या विश्वांतील सर्व पुरुषच आहे) असे श्रुतीनेही म्हटले आहे, तर मग तो पुरुष (आत्मा) शरीर कसा होऊ शकतो ? ॥३५॥

**विवरण :-** या विश्वात परब्रह्मा अतिरिक्त दुसरी कोणतीही वस्तु नाही, मग आम्हीच स्वतःला देह का समजतो ? या संबंधी दुसऱ्या श्रुति द्वारे समजावीत आहेत.

**पुरुष एवेदं सर्वं यद्भूत यच्च भाव्यम् ।**
**उतामृतत्त्वस्येशानो यदन्तेनाति रोहति ॥**

या पुरुष सूक्तात परमात्म्याच्या वैश्विक रुपाचे काव्यात्मक रितीने वर्णन केलेले आहे. हे सूक्त ऋग्वेदात आहे. हे पुरुष सूक्त घोषित करते की, हे जे तू सर्व पहात आहेस, ते केवळ पुरुष आहे. **'सर्वं पुरुष एवं.' - 'पुरुष एव इदम् सर्वम्'** वेदांच्या उपनिषदीय भागातच नव्हे तर, वेदांच्या कर्मकांड भागात सुद्धा, अभ्यास करताना असे पठन करावयास लावले जाते की, परमात्म्याचे वैभव म्हणजे केवळ परमात्माच होय.

वेदान्त प्रथम 'नेति नेति' म्हणून द्रष्ट्याला दृश्यापासून वेगळे करतो व नंतर सांगतो की, 'द्रष्टा' परिच्छिन्न नाही. तो आत्मा अद्वितीय आहे. आत्मा व ब्रह्म एकच आहेत. जर ब्रह्मच द्रष्टा असेल,तर ब्रह्मरुप द्रष्ट्याहून दुसरी कोणतीही वस्तु भिन्न सिद्ध होत नाही. असे पहा की, सर्व मडकी मातीचीच आहेत. मातीशिवाय मडक्यात दुसरे काहीही नाही. अगदीं तसेच ही सर्व सृष्टि जर परमात्म्यापासनूच बनलेली आहे. तसेच परमात्म्यात स्थित आहे आणि शेवटी परमात्म्यातच लीन होते. म्हणून सृष्टीच्या रुपाने परमात्माच दिसून येतो.

**'वासुदेवः सर्व मिति स महात्मा सुदुर्लभः ।'** भ. गीता.

सर्व परमात्माच आहे, परंतु ही गोष्ट जाणणारा महात्मा अत्यंत दुर्लभ आहे. पण परमात्मा सुलभ आहे. परमात्मा तर हे सर्व काही आहे परंतु याला ओळखणारा दुर्लभ आहे. मेणापासून अनेक वस्तु व खेळणी बनविली जातात. त्याच प्रमाणे जगाच्या सर्व प्राणीमात्रांना सर्व चेतन-वस्तूंना कारणीभूत तो परमात्माच आहे. ही गोष्ट वेदांत सूत्रांच्या सर्व भाष्यकारांना मान्य आहे. जगाचे अभिन्न निमित्तोपादान कारण परमात्माच आहे. ते जड असूच शकत नाही. कारण जडापासून जडाची उत्पत्ति कशी होईल ? चेतन तर जडाला बनवू शकते पण जड चेतनास बनवू शकत नाही.

आपला आत्मा चेतन आहे. अन्य जड आहेत. अनुभूतीच्याद्वारे आपला आत्माच सत्य आहे. याचा अर्थ असा की, चेतन अपरिणामी आहे. त्यात जो परिणामाचा भास होतो तो मिथ्या आहे. एकरस, अखंड, सत्तेच्या स्वरुपात आत्मदेव सृष्टीच्या रुपाने भासत आहेत. जर परमात्म्याच्या अतिरिक्त दुसरी कोणतीही वस्तुच नाही. तर देहाचा हा एक तुकडा 'मी' आत्मा म्हणजे मिथ्याच नाही का ?

या जगातील सर्व व्यक्त आणि अव्यक्त, स्थिर आणि अस्थिर, सजीव आणि निर्जीव, गतिमान आणि गतिशून्य, सान्त आणि अनंत, विनाशी आणि अविनाशी, हे सर्व दुसरे काहीही नसून केवळ पुरुष आहे. असे जर असेल तर शरीर हे आत्मतत्त्व-सत्यतत्त्व कसे असू शकेल ?

**।। हरि ॐ तत् सत् ।।**

## (३६) श्रुतीचे कथन (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **असंग: पुरुष: प्रोक्तो बृहदारण्यके ऽ पि च ।**
**अनन्तमल संश्लिष्ट: कथं स्याद्देहक:पुमान् ॥३६॥**

**अर्थ :-** बृहदारण्याकोपनिषदात सुद्धा पुरुष संपूर्णरित्या असंग आहे, असे म्हटले आहे. मग अनंत मळांनी युक्त असलेले हे शरीर, आत्मतत्त्व कसे असू शकेल ? ॥३६॥

**विवरण :-** श्री भगवद् पूज्यपाद आद्य शंकराचार्यांनी या श्लोकात 'बृहदारण्यक' उपनिषदातील उदाहरण देऊन आत्मा म्हणजे असंग पुरुष कसा, याचे सुंदर विवेचन केलेले आहे. पूर्वीच्या काळी ऋषि-मुनि, संत-महात्मे, अरण्यात जाऊन एकांतात तत्त्व चिंतन करीत असत. अरण्य म्हणजे अ+रण्य=अरण्य. जेथे रण, युद्ध, भांडण, द्वेष, राग नाहीत असे ठिकाण. एकांतासाठी अशा शुद्ध, निर्मळ स्थानाची फार उपयुक्तता असते. ज्या स्थानात जगाचे अनेक व्यवहार व कर्मे होत असतात, तेथील वातावरण तत्त्वचिंतनाला अनुकूल नसते. म्हणून पूर्वीच्या काळी आश्रम, मठ, कुटी अरण्यात असत.

मनुष्याचा स्वभाव असा बनतो की, ज्याच्या विषयी द्वेष निर्माण होतो, त्याच्या ठिकाणी असलेले सद्गुण दिसत नाहीत. सर्व वाईटच दिसते. ज्याच्या संबंधी राग, लोभ, मोह होतो, त्याचे दोषही गुण म्हणून दिसतात. निन्दा-स्तुति करणारे दोन्ही विष देणारे असतात. केवळ परमात्म्याची प्रशंसा करणारा, आपणांस अमृताचे पान करणारा असतो. ज्यामुळे देव-धर्म, संत-सत्पुरुष यांच्याविषयी श्रद्धा निर्माण होईल, ती अमृत देणारी संगति असते.

**असंग पुरुष :-** पुरुष म्हणजे आत्मा, तो या देहरुपी पुरीत शयन करतो, राहतो, म्हणून त्यास पुरुष म्हटले आहे. पुर-म्हणजे नगर, आत्मा या देह नगरीत राहात असल्यामुळे त्याला पुरुष असे म्हटले आहे. हा पुरुष नगरांत राहूनही 'असंग' आहे. आपण गावात राहाणारे अनेकांच्या संगतीत, सहवासात राहतो. संगतीत राहाण्यानेच राग-द्वेष, गुण-दोष निर्माण होतात.

आसक्ति, लोभ, मोह इत्यादी विकार संगदोषांनेच निर्माण होतात. स्वजन, आप्तजन, मित्र, सगे-सोयरे, शेजारी-पाजारी यांच्या संगतीत आपली जीवन गंगा वहात असते. त्यामुळे अनेक दोष, बरे-वाईट, पाप-पुण्य, इत्यादींनी ती गंगा अशुद्ध होत जाते. या आत्मदेवाकडे बघा. तो कसा असंग आहे. अनेकांत राहूनही एकांतात असतो. या देहाच्या इंद्रियांच्या कर्मामध्ये तो कधी भाग घेत नाही. अलिप्त, साक्षी राहतो. या देहांत उत्पन्न होणाऱ्या काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर इत्यादी विकारांचा त्याच्यावर काहीच परिणाम होत नाही. मग या पुरुषाचा हा महान आदर्श आपल्यापुढे ठेवलेला असताना आपण दु:खी, कष्टी, नाराज, निराश का व्हावे ?

या आत्मदेवाला आपण ओळखले पाहिजे. तो सर्वज्ञ आहे. तो ज्ञानाची खाणच आहे. तोच वंदनीय व पूजनीय आहे. या खऱ्या देवाला विसरुन अन्य ठिकाणी जाण्याची आपणास काय आवश्यकता आहे ? हा आत्मदेव ज्ञानाचा चेतन प्रकाश देणारा आहे. मग ह्या चेतन प्रकाशाला सोडून, जड प्रकाशाकडे किड्याप्रमाणे का धांव घ्यावी ? ज्याच्या चेतनप्रकाशात आम्हांला तो कळतो, समजतो. त्याला जर आपण पूर्ण जाणले, पाहिले तर आपणांस पूर्ण सुख, शांति व समाधान मिळू शकते. अर्धवट ज्ञानाने ती शांती मिळणार नाही.

हा पुरुष, आत्मदेव ज्या देहांत राहतो, तो देह फार घाण आहे. त्यात अनेक प्रकारचे मळ आहेत. अनेक व्याधि, रोग, पीडा आहेत. मन, बुद्धींत स्पर्धा, ईर्षा, द्वेष, मत्सर, घृणा, तिरस्कार, निंदा इत्यादी अनेक दोष आहेत. देह व त्याच्या अवस्था सतत बदलणाऱ्या आहेत. त्याचा त्या आत्मदेवावर कसलाच परिणाम होत नाही. तो या देहापासून अखंड, असंग आहे. मग असा देह आत्मा कसा असू शकेल ?

**असंगोऽहं अभंगोऽहं अनंगोऽहं असंश्रय: ।**

हा पुरुष (आत्मा) असंग, अभंग, अनंग (अंग रहित) व असंश्रय - (कशाच्याही आश्रयाने राहणारा नाही.) असा आहे. तो सत्तेच्या दृष्टीने स्वयंभू

आहे, चैतन्याच्या दृष्टीने स्वयंज्योति आहे व आनंदाच्या दृष्टीने आत्मरति आहे व पूर्णकाम आहे. मग असा आत्मा देह कसा बरे असू शकेल ? तर नाही.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (३७) श्रुतीचे कथन (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **तत्रैव च समाख्यातः स्वयं ज्योतिर्हि पूरुषः ।**
**जडः परप्रकाश्योऽयं कथं स्याद्देहकः पुमान् ॥३७॥**

**अर्थ :-** त्याच बृहदारण्यक श्रुतीत पुरुष हा स्वयंप्रकाशी आहे, असेही म्हटले आहे. तेव्हा परप्रकाशित असलेल हे जड शरीर आत्मतत्त्व कसे असू शकेल ? ॥३७॥

**विवरण :-** आत्मा स्वयंज्योति, स्वयंप्रकाश आहे. असे बृहदारण्यक श्रुतीतच सांगितलेले आहे. दिव्याची ज्योतही प्रकाश देते. पण ती स्वयंप्रकाशी नाही. तिला तेल, वात, आगकाडी इत्यादी साहित्याची आवश्यकता असते. हे सर्व साहित्य जमवूनही, तिला पेटविणारा कुणी तरी चेतन असावा लागतो. दिव्याची ज्योत पेटलेली आहे व ती प्रकाश देत आहे, हे पहाण्यासाठी डोळे असावयास हवेत. अंध व्यक्तीला तो प्रकाश दिसत नाही. बरे डोळे असले तर त्या डोळ्यांच्या मागे मन, बुद्धि ही ज्ञानेंद्रिये असावयास हवीत. त्याशिवाय त्या प्रकाशाचे ज्ञान होणार नाही आणि मन, बुद्धीला मिळणारे ज्ञान आत्म्याकडूनच येते. आत्म्याकडूनच सर्व ज्ञानेंद्रियांना ज्ञानाचा प्रकाश मिळतो. आत्मा चेतन असल्याने त्याचा प्रकाशही चेतन आहे. अशा या आत्मप्रकाशानेच सूर्य, चंद्र, ग्रहगोल, तारकांचे प्रकाशन होते. आत्म्याशिवाय त्यांचाही प्रकाश दिसणार नाही. याचा अर्थ सर्व प्रकाशमान असणाऱ्याचें उगमस्थान हा पुरुषच आहे. प्रकाशाच्या उगमस्थानाला प्रकाश देण्यासाठीं आणखी दुसरे उगमस्थान नाही. आत्मा हाच सर्व प्रकाशाचा प्रकाश आहे. **'ज्योतिषामपि तज्ज्योति'** असे श्रुतिच सांगते.

आत्म्याचा प्रकाश हा ज्ञानप्रकाश असल्यामुळे, तो अंधाराचे, अज्ञानाचेही ज्ञान करुन देतो. अन्य प्रकाशानी अंधाराचे व अज्ञानाचे ज्ञान होत नाही. अन्य प्रकाशाचेही ज्ञान आत्मप्रकाशामुळेच होते. इतर प्रकाश अनेक कारणांनी खंडित होतात. पण हा आत्मप्रकाश अखंड असतो.

हा प्रकाश सर्वकाळ, सगळीकडे सगळ्यांच्या अंत:करणात उपस्थित असतो. हा अंतर्बाह्य सर्व अनुभव देणारा आहे.

आत्म्याचा चित्-प्रकाश ज्ञानेंद्रियांच्या पातळीवरही सर्व बोध देणारा आहे. देहाच्या सर्व संवेदना, मनाच्या ठिकाणी असणाऱ्या सर्व भावना, वासना व बुद्धीच्या पातळीवर सर्व विचारांचे ग्रहण, मूल्यमापन व सर्व निर्णय या आत्मप्रकाशाने कळतात. बाह्य वातावरणातील बदल, थंडी, उष्णता, आर्द्रता, वादळे याचेही ज्ञान आत्म्यानेच होत असते. तो आत्मप्रकाश जर नसला तर कसलीही जाणीव होणार नाही. ज्या देहांत हा आत्मप्रकाश आहे, त्या देहाची सुख-दु:खे, शांति-समाधान, त्या देहांच्या सर्व क्रिया-कर्मे या आत्मप्रकाशानेच कळतात.

**जड: परप्रकाशी देह: -** आत्म्याच्या स्वरुपाहून अगदी भिन्न असणारा हा देह जड व परप्रकाशी आहे. त्याला स्वत:चा असा प्रकाश नाही. व स्वत:चे ज्ञानही नाही. आत्म्याचे चित्-तत्त्व जेव्हा शरीराद्वारे कार्य करण्याचे थांबविते, तेव्हा हे शरीर दगडासारखे जड व निर्जीव होते. अशावेळी त्याचे सर्व व्यवहार थांबतात. मग काय अशा शरीराला आत्मा वा पुरुष म्हणता येईल ? फक्त मूर्ख मनुष्यच शरीराला 'मी' आत्मा समजतो.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (३८) कर्म-काण्डानेही देह-आत्मा यांचे भिन्नत्व कसे -

**श्लोक :-** **प्रोक्तो ऽ पि कर्मकाण्डेन ह्यात्मा देहाद्विलक्षण: ।**
**नित्यश्च तत्फलं भुङ्क्ते देहपातादनन्तरम् ॥३८॥**

**अर्थ :-** कर्मकाण्डात सुद्धा, हा, आत्मा शरीराहून वेगळा आहे असे सांगितले आहे. आणि मरणानंतर आपल्या कर्मांची फळे भोगतो. ॥३८॥

**विवरण :-** वेदांचे सामान्यपणे दोन भाग पडतात. पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा पूर्वमीमांसा या भागात निरनिराळया कर्म-क्रिया, विधी-विधान, पूजा-अर्चा, यज्ञ-याग इत्यादी अनेक प्रकाराची चर्चा आलेली आहे. उत्तरमीमांसा या भागात अनेक उपनिषदें व त्यांचे तत्त्वज्ञान येते. यांना श्रुति म्हणून संबोधण्यात येते. हे दोन भाग स्वतंत्र आहेत. त्यामुळे काही लोकांना ते दोन स्वतंत्र धर्म-ग्रंथ वाटतात. मूळात ते वेदाचेच वेगळे दोन भाग आहेत. म्हणून त्यासही श्रुतिच म्हटले जाते. कर्मकांड व ज्ञानकांड एकाच वेदाचे दोन भाग आहेत. त्याचे तत्त्वज्ञान वेगळे वेगळे आहे. कर्मकांडाचे तत्त्वज्ञान द्वैतात येते तर ज्ञानकांडाचे तत्त्वज्ञान अद्वैतात येते.

कर्मकाण्डांच्या विधींनी, विधी करणारा पवित्र होतो. यज्ञ-यागाच्या विधींनीं पुण्यवान होतो व स्वर्गात जातो. तेथे पुष्कळ काळ अमरत्व उपभोगतो. त्या पुण्यकर्मांचे फळ भोगल्यानंतर परत येथे येतो. कर्मकाण्डाचे विधी, पूजा-अर्चा करणाऱ्याची अंत:करणाची शुद्धी झाल्याने वासना क्षय होतो. शुद्ध आणि पवित्र आचरणाने त्याला अद्वैत तत्त्वज्ञानात गोडी वाटू लागते. कर्मकाण्डातील मंत्राचा भाग साधकाला चित्तशुद्धीसाठी अत्यंत आवश्यक आहे. आत्मज्ञान प्राप्तीसाठी, साधन चतुष्ट्याने त्याला सद्गुरुंची प्राप्ति होते व तो साधक गुरुकृपा प्रसादाने, हळूहळू आत्मस्थितीकडे जाऊ लागतो.

भगवान श्रीशंकराचार्यांनी आता पर्यंत ज्ञानकांडातील श्रुति व तर्क शास्त्रांच्या आधारे देह आणि आत्मा यांच्या स्वरुपाविषयी विवेचन केले. या श्लोकात ते कर्मकाण्डाच्या श्रुतीने देह आणि आत्मा यांचे भिन्नत्व सिद्ध करुन,

आत्मा देहापेक्षा कसा विलक्षण आहे ते सांगत आहेत. कर्मकाण्डाचे विधी करणारा पुण्यवान साधक स्वर्गात जातो म्हणजे कोण जातो ? काय देह जातो ? मृत्युनंतर तर देह येथेच नष्ट होतो, मग देहांतील चैतन्य देहापासून वेगळे होते. तेव्हा कर्मकाण्डसुद्धा हेच दर्शविते की चैतन्य हे पार्थिव शरीराहून वेगळे आहे. प्रत्येक मनुष्य स्वत:ला 'मी' म्हणताना देहच ते चैतन्य आहे असे समजत असतो. हा गैरसमज दूर करण्यासाठी भगवान श्रीशंकराचार्य, कर्मकाण्डाच्या श्रुतीचा आधार घेऊन स्पष्ट करीत आहेत. मृत्युनंतर कर्म फळाचा भोग भोगावाच लागतो. हे सत्य, ज्ञानकाण्ड व कर्मकाण्डच मान्य करते असे नाही, तर जगातील सर्व धर्मांनी हे सत्य मान्य केलेले आहे. देहपाता नंतर म्हणजे मृत्यु नंतर, जीवंत असताना केलेल्या चांगल्या-वाईट, पाप-पुण्याच्या कर्मांची फळे, म्हणजे सुख-दु:खाचे भोग भोगावेच लागतात. स्वर्ग आणि नरक या गोष्टीत हेच तत्त्व सांगून माणसाला सावध करण्यात श्रुति फार महत्त्वाचा उपदेश करीत असते.

कर्मकाण्डाने मनुष्याच्या इच्छा, वासना, कामना तृप्त होऊन, तो परमार्थाचा, तत्त्वज्ञानाचा मार्ग चालू लागतो. प्रारंभीच ज्ञानकाण्ड, तत्त्वज्ञान सहसा कुणालाही लाभत नाही. कर्मकाण्डाच्या अनेक विधींनी त्याच्या अंत:करणाची शुद्धि होऊन, त्याला तत्त्वज्ञानाची समज येते व त्याची गोडी लागते. ज्ञानकाण्डातील आत्मबोध, त्याला कर्मकाण्डाच्या अनेक विधींनी मंत्रांनी प्राप्त होत जातो. म्हणून कर्मकाण्डही श्रुतिच आहे, या श्रुतीनेही पुढे देहासक्ति, विरक्ति, वासनाक्षय होत होत तो साधक ज्ञानकाण्डाचा अधिकारी होतो. असा साधक देह आणि आत्मा यातील भेद ओळखू लागतो. कर्मकाण्डही असेच सांगते की, हा देह मृत्युनंतर तर येथेच, इहलोकातच नष्ट होतो मग तो कर्मांची फळे भोगण्यासाठी स्वर्गात कसा जाईल ? तर चैतन्यच वेगळे होऊन स्वर्ग-नरकाच्या ठिकाणी कर्मांची फळे भोगण्यासाठी जाते. मग देह म्हणजे आत्मा कसा बरे असू शकेल ?

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (३९) लिंग देहाची अनात्मता -

**श्लोक :-** **लिंगं चानेकसंयुक्तं चलं दृश्यं विकारि च ।**
**अव्यापकमसद्रूपं तत्कथं स्यात् पुमानयम् ॥३९॥**

**अर्थ :-** लिंग (देह) शरीरसुद्धा अनेक तत्त्वांनी बनलेले आहे. तो देह चल, (अस्थिर) दृश्य व विकारी आहे. तो अव्यापक (मर्यादित) असून असत्‌रुप आहे. तो आत्मतत्त्व कसे बरे असेल ॥३९॥

**विवरण :-** मागच्या ३८ व्या श्लोकात असे सांगितलेले आहे की, आत्मा शरीराहून वेगळा आहे आणि मरणानंतर (देहपाता नंतर) आपल्या कर्मांची फळे भोगतो. शंका अशी आहे की, आत्मा तर कर्मे करीत नाही. तो शरीरात असूनही अकर्ता, असंग आहे. मग तो स्वर्गांत जातो आणि आपल्या कर्मांची फळे भोगतो. आत्मा तर अचल आहे. मग तो स्वर्गांत कसा जाईल. त्याचे कुठे जाणे येणेही नाही. यावर आचार्य येथे असे सांगत आहेत की, जो स्वर्गात जातो, तो आत्मा नाही. तो सूक्ष्म देह, लिंग देह असून तो स्वर्गांत जातो. तो आत्मा नाही, तर सूक्ष्म देह आहे. सूक्ष्म देह तर सूक्ष्म आहे पण ते शुद्ध आत्मतत्त्व नाही. सूक्ष्म देह हा असत्, अव्यापक म्हणजे मर्यादित असा जड देह आहे. हा लिंग देह, पाच कर्मेंद्रियें, पाच ज्ञानेंद्रियें, पाच प्राण, मन व बुद्धि अशा सतरा तत्त्वांचा बनलेला असतो. वर्तमान, भूत व भविष्य काळात हा सारखा राहात नाही. तो सतत बदलत असतो. म्हणजे जे मन व जी बुद्धि आता आहे, ती तशीच पुढच्या वेळी नसेल. आताच्या क्षणाची धारणा ही पुढच्या क्षणाची धारणा नसते. ती सतत बदलत असते. यावेळी त्याची जी अवस्था असेल तीच पुढच्या क्षणी नसेल. आत्म्याचे तसे नाही. आत्मा सर्वकाळ एकाच स्थितीत असतो. आत्मा चेतन आहे तर लिंग शरीर जड आहे. ते आत्म्याप्रमाणे सर्व व्यापक नसून मर्यादित आहे. अशा प्रकारे नित्य बदलणारा हा सूक्ष्म देह वा लिंग देह हा आत्मा कसा होऊ शकेल ? देह नि आत्मा हे वेग-वेगळे दोन आहेत. त्यांना एक समजणे चुकीचे आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (४०) प्रकरण समाप्त -

**श्लोक :-** **एवं देहद्वयादन्य आत्मा पुरुष ईश्वर: ।**
**सर्वात्मा सर्व रुपश्च सर्वातीतोऽहमव्यय: ॥४०॥**

**अर्थ :-** अशा प्रकारे या दोन (स्थूल व सूक्ष्म) देहांपेक्षा, मी पुरुष-ईश्वर, वेगळा आहे. 'मी' सर्वात्मा, सर्वरुप, सर्वातीत व अव्यय असा आहे. ॥४०॥

**विवरण :-** आचार्यांनी आतापर्यंत, श्रुतीमधील वचनांचा, आधार घेऊन तर्कशास्त्र, न्यायशास्त्र, विवेक बुद्धि यांच्या साहाय्याने, आत्मा हा स्थूल वा सूक्ष्म नाही हे सिद्ध केले. या दोन शरीरांनी मनुष्याची अनेक क्रिया-कर्मे घडत असतात. पण या सर्वांचा साक्षी आत्मा असतो. ते आत्मतत्त्व सर्व प्राणीमात्रात व वस्तुमात्रात सर्वकाळ आणि सर्व ठिकाणी व्याप्त आहे. त्याच्यामुळेच बदलणाऱ्या जगाचे रुप कळू शकते. आपल्या मन बुद्धीतही होणारी परिवर्तनाची प्रक्रिया, त्याच्यामुळेच समजू शकते.

हा आत्मा सर्व काही करतो, सर्व काही होतो. याचा अर्थ आत्मा क्रियाशील आहे असा नव्हे, तर सर्वांच्या अंतरंगात असल्याने तो सर्वात्मा आहे. त्याच्यामुळेच विविधरुपे प्रकाशित होतात. म्हणून तो सर्वरुप आहे. तो सर्वरुप असला तरी तो रुपातीत आहे. दिसणारे सारे देह त्याच्यामुळेच प्रकाशित होत असले तरी तो देहातीत, सर्वातीत आहे. तो जसा आहे, तसाच नेहमी असतो. त्यात वाढ वा घट नाही. म्हणून तो अव्यय असा आहे.

स्थूल व सूक्ष्म देह हे दोन्हीही देहच आहेत. या दोन्ही देहांत आत्मा राहात असल्यामुळे त्याला पुरुष म्हटले जाते. तो पुरुष परमेश्वर, या देहाहून वेगळा आहे. मग तो देह कसा असू शकेल ?

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (४१) देह आणि आत्मा यांना वेगळे मानण्याने काय साधले ?

श्लोक :- **इत्यात्मदेहभावेन प्रपंचस्यैव सत्यता ।**
**यथोक्ता तर्कशास्त्रेण ततः किंपुरुषार्थता ॥४१॥**

**अर्थ :-** अशा प्रकारे देहाला आत्म्यापासून अलग (वेगळा) करण्याने, प्रपंचच सत्य आहे हे सिद्ध झाले. न्यायदर्शनही हेच सांगते. मग यात पुरुषार्थ काय साधला ? हा तर कुत्सित (वाईट) पुरुषार्थ झाला. ॥४१॥

**विवरण :-** या श्लोकात 'द्वैताचा सिद्धांत' मांडणारे द्वैत वादीही हेच म्हणतात की, आत्मा व देह अलग आहेत. आत्मा वेगळा व देह वेगळा म्हणजे दोन झाले. यापूर्वी न्यायशास्त्रातही द्वैत सांगीतलेले आहे. मग हे द्वैतवादी आचार्यांना प्रश्न विचारीत आहेत की, शरीर व आत्मा यांच्यात द्वैत आहे, तर या द्वैताने प्रपंच सत्य व सिद्ध केलेला नाही काय ? तर्कशास्त्राच्या युक्तीने प्रपंच सिद्ध करुन काय पुरुषार्थ मिळविला ? किंबहुना असा हा पुरुषार्थ म्हणजे कुत्सित पुरुषार्थ होय. आचार्य तर पूर्ण अद्वैतवादी आहेत.

भगवान श्री शंकराचार्यांना द्वैत मानणाऱ्या तत्त्वज्ञान्यांनी प्रश्न केलेला आहे की आत्मा व शरीर जर दोन वेगवेगळे आहेत तर शरीर = प्रकृति = जग हे दोन्हीही सत्य झाले. आत्मा जितका शाश्वत तितकीच प्रकृति ही शाश्वत नाही का ? प्रकृति जर सत्य आणि शाश्वत असेल तर हा प्रपंचही शाश्वत व सत्य नाही का ? द्वैतवाद्यांनी मांडलेल्या या प्रश्नाचे उत्तर आचार्यांना द्यावयाचे आहे. संस्कृतमध्ये यास 'खंडन-मंडन' वाद असे म्हणतात. तत्त्वज्ञानाच्या इतर पंथातील, तर्कशुद्ध आणि बुद्धिनिष्ठ प्रश्न प्रथम उभे करावयाचे आणि अचुक तर्कशास्त्र, स्पष्ट सखोल ज्ञान आणि तत्त्वज्ञानातील सूक्ष्मदृष्टि यांच्या आधारे त्यांना उत्तरे द्यावयाची. आता भगवान श्रीशंकराचार्य पुढील श्लोकातून उत्तरे द्यावयास सुरुवात करीत आहेत.

भगवान श्रीशंकराचार्यांनी दिलेली उत्तरे अत्यंत शुद्ध तर्कावर आधारलेली

व शुद्ध तत्त्वज्ञानावर आधारलेली आहे. आचार्यांच्या इतक्या लहान वयात, मोठमोठ्या वैदिक, तात्विक व तार्किक पंडितांनाही आचार्यांनी दिलेली उत्तरें मान्य करावी लागली. ही फार प्रशंसनीय गोष्ट नव्हे का ?

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (४२) सत् - असत् - भेद

**श्लोक :-** **इत्यात्मदेह भेदेन देहात्मत्वं निवारितम् ।**
**इदानीं देहभेदस्य ह्यसत्त्वं स्फुटमुच्यते ।।४२।।**

**अर्थ :-** आतापर्यंत आत्मा देहाहून भिन्न (विलक्षण) आहे. या भेद वर्णनाने 'देहच आत्मा आहे' हा भ्रम दूर केला गेला आहे. आता देह हा भिन्न, असत् आहे. हे स्पष्टपणे सांगितले जात आहे. ।।४२।।

**विवरण :-** आतापर्यंत स्थूल देह व सूक्ष्म देह यापेक्षा आत्मा भिन्न आहे असे सिद्ध केले. आत्मा देहातीत, कालातीत, देशातीत, आहे. त्याला कोणतीही उपाधी नाही. देहाच्या कोणत्याही अवस्थेने वा धर्माने आत्म्यांवर कोणताही परिणाम होत नाही. आत्मा, देह, इंद्रिये, मन, बुद्धि इत्यादींच्या प्रभावाखाली येत नाही. आत्मा देहात असूनही देहाचे कोणतेही गुणधर्म त्याला स्पर्श करु शकत नाहीत. शरीर व आत्मा यांच्यातील भेद तर सर्वशास्त्रें मान्य करतात. परंतु अनुभवाने जे कळते, तर्काने जे समजते, त्यासाठी शास्त्रज्ञानाची काहीच आवश्यकता नाही. साखर गोड लागते. कारले कडू असते. हे जाणण्यासाठी शास्त्रज्ञानाची काय आवश्यकता आहे ? जी गोष्ट अनुभवाने, तर्काने कळत नाही, त्यासाठी शास्त्रज्ञानाची आवश्यकता असते.

**प्रत्यक्षेणानुमित्या वा वस्तूपायो न विद्यते ।**
**एनं वदन्ति वेदेन तस्माद् वेदस्य वेदता ।।**

प्रत्यक्ष व अनुमान प्रमाणांनी, जो उपाय कळू शकत नाही, तो वेदांच्याद्वारे जर जाणता येत असेल, तरच वेदांचे वेदत्व असते. आता, देहांत आत्मा असतो हे तर सिद्ध झाले. तर काय आत्म्यात देह असू शकतो ? बघु या-हा आत्मा सत्-सत्य स्वरुप आहे, तर देह असत् आहे. आता भगवान श्रीशंकराचार्य असे सिद्ध करु पहात आहेत की, शरीर हे सुद्धा चित्-तत्त्वाहून जराही भिन्न नाही. शरीराच्या सत्यतेबद्दलचे अन्वेषण या पुढील श्लोकापासून सुरु होत आहे. एकाच शरीरात फसलेला द्वर्थी 'मी' आता बाहेर काढून वेगळा

केला जात आहे. आता शरीराचा 'मी' व आत्म्या संबंधीचा खरा 'मी' याच्या खरेपणाची सिद्धता करण्यात येत आहे. सर्व सामान्य माणसे देहाबद्दल 'मी'-'मी' च म्हणत असतात. वास्तविक 'मी' 'अहं' या आत्म्याचा आहे. तेव्हा-कोणता 'मी' सत्य व कोणता 'मी' असत्य हे तपासलेच पाहिजे.

जसे मातीच्या घागरीहून माती वेगळी असते हे तर पटते. पण काय मातीपासून घागर-घडा वेगळा असू शकतो ? तर अशक्य. त्याचप्रमाणे आत्मा देहाहून वेगळा आहे. ही गोष्ट बरोबर आहे. परंतु देह आत्म्याहून वेगळा असू शकतो हे म्हणणे चुकीचे आहे. कारण देहाला आत्म्यावाचून सत्ताच नाही. म्हणून देहाचे वेगळेपण, सत्तारहित आहे.

स्वप्नात आपणास अनेक प्रकारचे प्राणी दिसतात, गाय, बैल, घोडा, गाढव, हत्ती इत्यादी स्वप्नातील या प्राण्यांचे स्थान व काल अति थोडा असतो. खरे पाहिले तर स्वप्न पहाणाऱ्या व्यतिरिक्त तेथे दुसरा कोणीही नाही. परंतु किती तरी प्राणी, पशु-पक्षी त्या स्वप्नात दिसत असतात. स्वप्न पहाणाऱ्यांचे ज्ञान व संस्कार यांच्या मिलनाने ते स्वप्नातील जग दिसत असते. जागृतीत मात्र जडत्व व संस्कार यांच्या मीलनातून अनेकता भासत असते.

माती तर एकच असते, पण संस्कार भेदाने, आंबे, द्राक्षे, पेरु, जांभूळ इत्यादी फळे वेगवेगळी दिसतात. पाणी एकच असते पण संस्कार भेदाने, खारट, तुरट, गोड, आंबट अशा वेगवेगवळया चवीचे होते. संस्काराना काढून टाकले, तर स्वप्नातील सर्व दृश्य ज्ञानस्वरुप आहे व जागृतीतील सर्व दृश्य सत्-स्वरुप आहे. यातून हेच स्पष्ट होत आहे की, आपला आत्माच सत्स्वरुप व चित्स्वरुप आहे.

आता पुढील श्लोकापासून भगवान श्री शंकराचार्य देहभेदाचे असत्व दाखवित आहेत.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (४३) देह भेदाचे असत्त्व - निरुपण

**श्लोक :-** **चैतन्यस्यैकरुपत्वाद्भेदो युक्तो न कर्हिचित् ।**
**जीवत्त्वं च मृषा ज्ञेयं रज्जौ सर्पग्रहो यथा ॥४३॥**

**अर्थ :-** चैतन्य (चित्तत्त्व) प्रत्येक ठिकाणी एकच असल्यामुळे (एकरुप असल्यामुळे) त्याच्यात भेद करणे हे अयोग्य आहे. जीवाची भावना म्हणजे दोरीला साप मानण्यासारखा भ्रम समजला पाहिजे. ॥४३॥

**विवरण :-** देह आणि आत्मा यांच्यात भेद - वेगळेपण आहे. हे सांगितले गेले आहे. हे दोन वेगवेगळे आहेत. तेव्हा हे द्वैत सिद्ध झाले का ? असा प्रश्न निर्माण होतो. देह आणि आत्मा यांच्या वेगळेपणामुळे द्वैत सिद्ध होत नाही. कारण आत्मा सत् तर देह असत् आहे. त्यामुळे अद्वैत तर नाहीच पण द्वैतही नाही. कारण द्वैतासाठी दोन्ही एकाच सत्तेतील असावयास हवेत. आता या श्लोकात देहाची असत्ता स्पष्ट करीत आहेत.

आत्मा सर्व काळी, सर्व ठिकाणी एकच एक आहे. त्यात भेद नाही. चैतन्य एकरुप आहे. पण हेच चैतन्य प्रत्येक प्राणीमात्रात, तुमच्यात, माझ्यात, जगातील सर्व प्राणी व वस्तूमात्रात व्याप्त आहे. त्यात भेद नाहीत. देहभावात, जीवभावात भेद आहेत. ज्या प्रमाणे सूर्याचा प्रकाश सर्वत्र सारखाच आहे. तो सुर्य, राजवाडे, गरीबांच्या झोपड्या व घरे या सर्वांना सारखाच प्रकाशित करतो. प्रकाशात भेद नाही. ज्यांना प्रकाशित करतो, त्यांच्यात भेद आहेत. आंबा, पेरु, जांभूळ, द्राक्षे ही फळे भिन्न भिन्न दिसतात, परंतु पंचमहाभूते वा सत्तेच्या दृष्टीने त्यांच्यात काही फरक नसतो. पिकलेली फळे जास्त दिवस पडून राहिली की ती सडू लागतात. त्यांच्यात जीवजंतु, आळ्या पडू लागतात. या फळाच्या बीजात, बियांमध्ये सडण्याची प्रकिया नसते. संस्कार युक्त जड तत्त्वालाच **बीज-बी,** म्हणतात तर संस्कार युक्त चेतन सत्तेला **'जीव'** असे म्हटले जाते. जीव-ग्रंथी, स्थूलदेहांत व सूक्ष्मदेहांत अहंबुद्धीने निर्माण होतात. यासच जीवभाव वा देहभाव असे संबोधण्यात येते.

अंधारात पडलेल्या दोरीला साप समजणे हा भ्रम आहे. दोरीला दोरी न जाणणे अज्ञान आहे. अशा अज्ञानाने व भ्रमानेच आत्म्याला देश, काल, वस्तु यांनी कधीही न बदलणाऱ्या ब्रह्मस्वरुपाला मी जीव, मी मनुष्य, मी ब्राह्मण, मी क्षत्रीय, मी पापी-पुण्यात्मा, मी सुखी - दु:खी समजतो. वास्तविक चैतन्यस्वरुपात असे भेद पडत नाहीत. ते सर्व ठिकाणी, सर्वकाळी एकच एक समरुप असते. देहच मी आहे. मी वास्तविक ते आत्मचैतन्य आहे. देहाचा भाव घेऊन प्रगटणाऱ्या चैतन्याला 'जीव' असे म्हणतात. हे जीवभावात आलेले चैतन्य, आत्मा-ब्रह्म यांच्या अज्ञानामुळे, भ्रांतिमुळे येते आणि ते खरे नाही. देह आत्मा होऊच शकत नाही. हेच भगवान आचार्य या श्लोकातून स्पष्ट करीत आहेत.

जीवाचे स्वरुप सतत बदलणारे आहे. कधी दु:खी, कधी रमणारा तर कधी वैतागलेला, कधी प्रसन्न तर कधी अप्रसन्न, तर कधी निराश दिसणारा असतो. तसे आत्म्याचे नाही. आत्मा सदैव एकस्वरुप, एकरस असा असतो. म्हणून जीव व आत्मा सारखे नसतात. जीवातील देहभाव गेल्यास उरते ते आत्मचैतन्यच ! म्हणून जीवाला आत्म्याचेच स्वरुप समजले जाते. परंतु भ्रमाने, अज्ञानाने जीव देहाचे अंग बनून असतो.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (४४) शुद्ध चित् तत्त्वाची विश्वाकारता

श्लोक :- रज्ज्वज्ञानात्क्षणेनैव यद्वद्रज्जुर्हिसर्पिणी ।
भाति तद्वच्चितिः साक्षाद्विश्वाकारेण केवला ॥४४॥

**अर्थ :-** ज्या प्रमाणे दोरीच्या अज्ञानाच्या क्षणी, दोरी ही सर्पिण आहे असे भासते, त्याच प्रमाणे शुद्ध आणि अविकारी चित्-तत्त्व हे अज्ञानामुळे जग वा विश्व आहे असे भासते ॥४४॥

**विवरण :-** अंधारात पडलेल्या दोरीला साप समजून, तो किती मोठा आहे ? तो कोणत्या जातीचा साप असावा ? किती वयाचा असावा ? अशा अनेक कल्पना, त्या दोरीच्या अज्ञानामुळे निर्माण होतात. दोरीवर दिसणारी सापाची आकृति हा केवळ भ्रम आहे हे कळत नाही. प्रकाशात दोरीचे खरे स्वरुप दिसल्या बरोबर सापाचा भ्रम नष्ट होतो. अज्ञानाने केलेल्या कल्पनाही खोट्या ठरतात.

त्याच प्रमाणे चित्-तत्त्व म्हणजे आत्मतत्त्व वा ब्रह्म यांच्या अज्ञानामुळे स्वतःला मी देह आहे, देहधारी मनुष्य आहे अशी कल्पना करीत असतो. तसेच सभोवार पसरलेल्या सृष्टीला, जगाला अनादि समजू लागतो. तो प्रवाहरुप प्रपंच हा नित्य व अखंड आहे व तो सत्यही आहे, असे अज्ञानामुळे समजत असतो. वास्तविक जो प्रपंच, जी सृष्टि, जे जगत् या ब्रह्मांत प्रतीत होत आहे, या आत्मचैतन्यात प्रगट होत आहे, हे त्या आत्म्याच्या वा ब्रह्माच्या अज्ञानामुळे कळत नाही. आत्मा-ब्रह्म हे शाश्वत, अखंड नित्यस्वरुप असून दिसणारे जगत् हे भ्रमरुप आहे हे कळत नाही. ब्रह्मस्वरुपांत जगताचा व प्रपंचाचा भास हे केवळ भ्रमरुप आहे. हे अज्ञानामुळे कळत नाही. जसा दोरीवर भासणारा साप भ्रम आहे, असत् आहे. त्याच प्रमाणे या आत्मचैतन्यात भासणारे विश्वाचे-जगाचे स्वरुप केवळ भ्रम मात्र आहे. सत्यस्वरुपाचे हे अज्ञान, प्रकृति जगताबद्दल गैरसमज निर्माण करते-भ्रम निर्माण करते. वस्तुतः फक्त एक जिनसी अशा एकच एक चित्-तत्त्वाची रास आपल्या आत व बाहेर अस्तित्वात आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (४५) प्रपंचाचे उपादान ब्रह्मच ।

**श्लोक :-** **उपादानं प्रपंचस्य ब्रह्मणोऽन्यन्न विद्यते ।**
**तस्मात्सर्व प्रपंचोऽयं ब्रह्मैवास्ति न चेतरत् ॥४५॥**

**अर्थ :-** ब्रह्माहून भिन्न असे दुसरे कोणतेही या प्रपंचाला (विश्वाला) उपादान (अधिष्ठान) नाही. म्हणून सर्व प्रपंच (विश्व) हे ब्रह्मच होय. दुसरे काहीही नाही. ॥४५॥

**विवरण :-** सोन्याचे अंगठी, माळ, कुंडल, बांगडी, नथ इत्यादी सर्व अलंकार, दागिनें सोन्यापासूनच बनविलेले असतात. मातीची घागर, मडके, परळ, पणती इत्यादी सर्व भांडी मातीपासूनच बनविलेली असतात. तसेच धोतर, लुगडे, उपरणे, कपडा इत्यादी सर्व सूतापासूनच बनविलेले असतात. यात सोने-माती-सूत हे त्या त्या निर्मित पदार्थांचे उपादान आहे. उपादान हे कारण व जे बनते ते, उदा. दागिने, भांडी, वस्त्रे हे कार्य असते. सोनार, कुंभार, विणकर हे निर्माते होत. म्हणून वस्तूंची निर्मिती तीन घटकांनी होते. कारण-कार्य-निर्माता.

हे सारे जग, विश्व, प्रकृति हे सर्व कार्य आहे. या कार्याचे - प्रपंचाचे कारण कोणते ? तर पंच म्हणजे पाच याचा संघात, एकत्र येणे. हे पाच म्हणजे पृथ्वी, आप (पाणी) तेज (उष्णता) बायु आणि आकाश हीं पंचमहाभूते होत. हा सारा जगताचा पसारा, प्रपंच या पंचमहाभूतांपासून बनलेला आहे. पण ही पंचमहाभूतें आली कोठून ? ही महाकारणातून आलीं आणि ते महाकारण आले कोठून ? तर ते ब्रह्म-परब्रह्म, आत्मा-परमात्मा या एकाच कारणातून आली.

आचार्य या श्लोकातून प्रपंचाचे-जगाचे वा विश्वाचे कारण ब्रह्मच आहे असे सांगत आहेत. ब्रह्मा व्यतिरिक्त दुसरे कोणतेही या प्रपंचाचे कारण, उपादान नाही. हा सारा प्रपंच-जग-विश्व-त्या एका ब्रह्मातून निर्माण झालेले आहे. त्या ब्रह्माहून इत्तर दुसरे कोणतेही अन्य दुसरे कारण नाही. प्रपंच-जग-

विश्व हे कार्य व ब्रह्म हे एकमेव त्याचे कारण-उपादान. कार्यात कारण अनुगत झालेले असते. उदाहरणार्थ मडके हे कार्य व माती हे कारण किंवा उपादान. मडक्यात मातीशिवाय दुसरे काहीही नसते. मडके हे मातीत आलेला आकार, विकार आहे.

**एकेन मृत्पिण्डेन सर्वं मृण्मयं विज्ञातं स्यात् -**
**वाचारम्भणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् ।** छांदोग्य ६-१-६-४

एका मृत्पिण्डाने (मातीच्या भांड्याने) सर्व मृण्मय (सर्व मातीच) असल्याचे समजते. मातीतून तयार होणारे पदार्थ, आकार भिन्नतेमुळे भिन्न प्रकारे वर्णन केले तरी सर्व मातीचेच असल्याचे कळते. मातीच या सर्वांना व्यापून आहे, तीच सत् आहे हे समजते.

सत् हीच विश्वाची आदिसत्ता आहे. एकातून अनेकत्व निर्माण झाले आहे. त्यामागे विश्वसृजनाचा चित् संकल्प आहे. आचार्य येथे म्हणतात की, काळाच्या ओघात अनंत नामें आणि रुपें यात विस्फोटित झालेली प्रकृति आणि प्रेरक शक्ति यांच्या खेळाचे उपादान कारण ब्रह्म आहे. या सर्व बहुविध जगाच्या उत्पत्तीसाठी ब्रह्माखेरीज दुसरे कुठलेही उपादान कारण संभवत नाही. छांदोग्य उपनिषदात ही विश्वसृजनाची म्हणजे निर्मितीची प्रक्रिया फारच उत्तम रीतीने वर्णिली आहे.

**सदैव सौम्येदमग्र आसीत् एकमेवा द्वितीयम् ।**
**तदैक्षत बहुस्यां प्रजायेयेति । छांदोग्य - ६-२, १-३**

ही विश्वसृजनाची प्रक्रिया 'त्रिवृत् करण' पद्धतीने घडते. पंच महाभूतांपैकीं एका भूताचे प्राधान्य आणि इतर भूतांचा एक तृतीयांश सहभाग या प्रमाणे उद्भिज्ज, अण्डज, स्वेदज व जारज अशी प्राण्यांची उत्पत्ति होत जाते. मन, प्राण, वाक् (वाणी) यांचाही प्रादुर्भाव महाभूतांतूनच होतो.

**अन्नमयं हि मन, आपोमय: प्राणस्तेजोमयी वाक् इति ।** छांदोग्य ६-७-६
अशा स्थूल, सूक्ष्म शरीरात जीवात्म्याचा प्रवेश घडतो व नामरुपात्मक सृष्टि तयार होते. **अनेनैव जीवेनात्मना तु प्रविश्य नामरुपें व्याकरोत् ।** छांदोग्य-६-३.३

छांदोग्य उपनिषदाचा हेतु सृष्टीचा विस्तार व विविधता स्पष्ट करणे. तसेच तिची एकात्मता स्पष्ट करणे हा आहे. अशा या सृष्टीचे प्राणसूत्र ब्रह्म म्हणजेच आत्मा आहे. तो आत्माच माणसात शुद्धस्वरुपात राहून, त्यालाही शुद्धस्वरुपात ठेवू इच्छितो. व्यक्ति आणि सृष्टि यांचे आंतरिक अद्वैत **छांदोग्य** उपनिषदाने सांगितले आहे.

**स य एषो आत्ममिदं सर्वं तत्सत्यं स आत्मा तत्त्वमसि विश्वकेतो ।**- ६-८-१६

या छांदोग्य उपनिषदात आरुणीनी विविध उदाहरणांनी ही अद्वैत दृष्टि श्वेतकेतूला समजावून दिलेली आहे. सर्वांतर्यामी, सर्वव्यापक आत्मसत्ताच आहे. हा प्रपंच, सर्व सृष्टि, सर्व जगत् त्या आत्मसत्तेहून-ब्रह्माहून भिन्न नाही. ज्या एका वस्तूपासून दुसरी वस्तू बनते, ती जिच्या पासून बनते, तिच्याहून भिन्न-वेगळी असू शकत नाही. उदाहरणार्थ सोन्याचा दागिना, सोन्याहून भिन्न-वेगळा असू शकत नाही. या दृश्य प्रपंचाचे मूळ उपादान जर ब्रह्म आहे तर प्रपंचही ब्रह्मापासून भिन्न असू शकत नाही. आत्मा-ब्रह्म-चेतन चैतन्यमय आहे. चेतन च साक्षी, द्रष्टा व ज्ञानस्वरुप असतो. त्यात परिवर्तन होत नाही.

**सर्वं प्रपंचोऽयं ब्रह्मैवास्ति न चेतरत् ।**

हा सर्व प्रपंच आहे अन्य दुसरे काहीही नाही. हा आपला, हा परका, हा ईश्वर हा अनीश्वर असे समजणे, हे केवळ अज्ञान आहे. ब्रह्माशिवाय अन्य दुसरे काहीही नाही.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (४६) भेदाची असत्यता

श्लोक :- व्याप्य व्यापकता मिथ्या सर्वमात्मेति शासनात् ।
इति ज्ञाते परे तत्त्वे भेदस्यावसरः कुतः ।।४६।।

**अर्थ :-** श्रुति (वेद) म्हणते की सर्व आत्माच आहे. मग व्याप्य आणि व्यापकता हा भेद मिथ्या आहे. अशा प्रकारे परमतत्त्वाला (परम सत्य स्वरुपाला) जाणल्यावर भेदाला अवसरच कुठे रहातो ? ।।४६।।

**विवरण :-** भेद म्हणजे भिन्नता, या भेदाची जाणीव कोठून सिद्ध होऊ लागते ? देहाच्या इंद्रियांनी भेद-भिन्नता जाणता येते. डोळे रुप दाखवितात, तर नाक गंध-सुगंध ज़ाणते. कान शब्द, नाद, आवाज जाणतात. या इंद्रियांच्या मागे मन आहे. या मनातील भेद म्हणजे निरनिराळे संकल्प-विकल्प आहेत. या मनाच्या मागे जे परिपूर्ण, अविनाशी, अभेद चैतन्य आहे, त्याचे स्वरुप जाणण्यासाठी वेदांताचे साहाय्य हवे. त्या अखंड आत्मचैतन्यात कुठेही भेदाला स्थान नाही.

**व्याप्य व्यापकता मिथ्या ।** हे वचन 'तेजोबिंदु' उपनिषदात आलेले आहे. ज्या प्रमाणे आकाशात व्याप्य-व्यापकता हा दिसणारा भेद मिथ्या आहे. उदाहरणार्थ-खोलीत-घरात जे आकाश आहे ते व्याप्य आहे व खोली-घर यांच्या बाहेरील महाकाश व्यापक आहे. त्या प्रमाणे व्याप्य-व्यापकतेचा भेद आकाशात नाही.

मातीची घागर वा माठ यात, माती व्यापक व घागर वा माठ व्याप्य असे लोक समजतात. तथापि हा केवळ भ्रम आहे. कारण मातीशिवाय घागर वा माठ काहीही नाही. सर्व मातीच माती आहे. लोक समजतात की माठ बनला व नंतर आकाश त्यात प्रविष्ट झाले वा जेव्हा जीव बनला नंतर आत्मचैतन्याने त्यात प्रवेश केला. हे सर्व अज्ञानमूलक आहे. आकाश तर अगोदर पासून आहे. वा आत्मचैतन्य तर सर्वत्र भरलेलेच आहे. मग आकाशाचा घट प्रवेश वा आत्मचैतन्याचा जीवात प्रवेश असे म्हणणे म्हणजे अज्ञानच

आहे.

एक व्यापक असेल तर दुसरे व्याप्य होईल. आत्मचैतन्यात असा व्यापक-व्याप्यतेचा भेदच नाही. जे सर्व काही आहे ते आत्मचैतन्यच आहे. श्रुति चे म्हणणे आहे की, आत्म्या व्यतिरिक्त दुसरे काहीही नाही. सर्वत्र सर्व ठिकाणी ते एकच एक आत्मतत्त्व आहे. येथे हा-तो-तू या रुपात तसेच आत-बाहेर, आता-नंतर, जे जे काही भासत आहे ते ते सर्व आत्मतत्त्वच आहे. परम आत्मतत्त्वाचे ज्ञान झाल्यानंतर, मीच आत्मा आहे-आत्मस्वरुप आहे. या आत्मस्वरुपातून बाह्य जगताकडे पाहिले असताना सर्वत्र तेच आत्मचैतन्य पसरलेले आहे असा आत्मज्ञानी विभूतीला अनुभव येतो.

**'यस्मिन् सर्वाणि भूतानि आत्मैवाभूद्विजानतः।'** ईशोपनिषद - ७

ज्या वेळी सर्व भूतमात्र 'आत्म' रुपानेच दिसू लागतात, तेव्हा फक्त 'ऐक्य'च अनुभविणाऱ्या त्या आत्मज्ञानी जीवन्मुक्ताला सर्वत्र आत्म्याचाच, आत्मचैतन्याचा भास होत असतो. अशी ही 'चेतना,' सर्व सृष्टीत सर्वत्र भरुन राहिली आहे. अणुं-रेणुंतही ती शक्ति आहे. कृमि-क़ीटक, तृण, वृक्ष, लता इत्यादी स्थावर वस्तूतही ती आहे. म्हणून आपण 'हे झाड जगले, हे झाड मेले' असे शब्द प्रयोग करीत असतो. निर्जीव म्हटल्या जाणाऱ्या लाकूड, दगड, धातू इत्यादी पदार्थातही ती शक्ति आहे. मात्र राखेत पुरलेल्या अग्नीसारखी किंवा लाकडात असलेल्या अग्नीसारखी गुप्त असते. ईश उपनिषदाच्या पहिल्याच चरणांत सांगितले आहे की,

**ईशा वास्यमिदं सर्वं यत् किंच जगत्यां जगत् ।** ईश - १

या विश्वात जे जे काही आहे ते सर्व ईश - (आत्म) शक्तीचेच निवासस्थान आहे. हे विश्व उत्पन्न होण्यापूर्वी फक्त 'आत्मा' च होता. हे बृहदारण्यक श्रुतीत ही सांगीतले आहे.

**आत्मैवेदमग्र आसीत् ।** ब्रहदारण्यक - १-४-१

सृष्टीपूर्वी सत् हे आत्मा-ब्रह्म या शब्दांनी व्यक्त होणारे फक्त एक मात्र तत्त्व तेवढेच होते.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (४७) नानात्वाचा (अनेकत्वाचा) निषेध -

श्लोक :- श्रुत्या निवारितं नूनं नानात्वं स्वमुखेन हि ।
कथं भासो भवेदन्यः स्थिते चाद्वयकारणे ।।४७।।

**अर्थ :-** श्रुतीनेच आपल्या मुखाने नानात्वाचा (अनेकत्वाचा) निषेध केलेला आहे. अद्वय कारण (फक्त एकच एक) असताना, त्याच्याशिवाय दुसरे काही कसे असू शकेल ? ।।४७।।

**विवरण :-** सृष्टीच्या निर्मितीत दोन प्रकारची मते दिसून येतात. एक म्हणजे मूळात सर्व चैतन्यच आहे व त्यातून ही सारी सृष्टि निर्माण झाली. देश, काल, वस्तुंच्या संस्कारांनी जेव्हा विस्मृति, विकृति येते, तेव्हा वेळोवेळी महापुरुष अवतीर्ण होऊन या विस्मृतीच्या आवरणाला दूर करुन त्या मूळ चैतन्याचा साक्षात्कार घडवितात.

दुसरे मत असे आहे की सृष्टीच्या मूळ निर्मितींत 'जड' तत्त्व आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, पंचमहाभूतांतून, पंच प्राणांतून ही सृष्टि निर्माण होऊन अनेक आकार, अनेक रुपें, अनेक प्रकार निर्माण झाले. यात मनुष्याच्या मन, बुद्धि, चित्त व अहं चा भाग आहे. या मतात आत्मा, ब्रह्म, चैतन्य इत्यादी काही नाही.

भगवान श्री आद्य शंकराचार्य पहिल्या मताचा पुरस्कार करणारे आहेत. त्यांच्या मते सर्व सृष्टि मूळ ब्रह्म चैतन्यातून निर्माण झालेली आहे. मुळात ते ब्रह्म, आत्मा, परमात्माच चैतन्य स्वरुपात सर्वत्र असल्याने ते सत्य नि शाश्वत तत्त्व आहे. त्यांतून निर्माण होणाऱ्या सृष्टिचा, जगाचा भास मिथ्या आहे. सामान्य माणसाच्या बुद्धीला दिसणारे विविध प्रकारचे जग, विविध आकारांची, रुपांची सृष्टि रचना सत्यच वाटते. दिसणारा हा प्रपंचाचा पसारा खराच आहे असेच वाटत असते. याचे कारण मूळ चैतन्याबद्दलचे अज्ञान ! आत्मा, परमात्मा, ब्रह्म, परब्रह्म यांची विस्मृति व अज्ञान यामुळे डोळ्यांनी दिसणारे सर्व पदार्थ, प्राणी, वस्तू हे सत्य वाटतात. हीच भ्रांति, भ्रम आहे. हा

भ्रम अज्ञानजनित आहे. हे अज्ञान ज्ञानाशिवाय दूर होत नाही. ते ज्ञान म्हणजे आत्मज्ञान वा ब्रह्मज्ञान होय. श्रुति म्हणते -

**'सत्यं ज्ञानम् अनन्तं ब्रह्म ।'** - तैत्तिरीय - ब्रह्मवल्ली

ते ब्रह्म-'सत्य' म्हणजे सदैव अस्तित्वात असणारे आहे. ज्ञान हे चिन्मयस्वरुप व अनंतम् म्हणजे मर्यादारहित, अविनाशी असे हे ब्रह्म आहे. या ब्रह्मस्वरुपात द्वैत नाही. ब्रह्मस्वरुपात संपूर्ण अद्वैत आहे. देश, काळ, वस्तू या द्वैत दर्शविणाऱ्या गोष्टी या ब्रह्मस्वरुपात नाहीत. त्यामुळे स्वर्ग-नरक, जन्म-मरण, हत्ती-मुंगी या भेदजनक गोष्टीही ब्रह्म स्वरुपात नाहीत. भय, भ्रांति, अज्ञान या द्वैतातील गोष्टीही ब्रह्मस्वरुपात नाहीत.

श्रुतीनेच, श्लोकात सांगितल्याप्रमाणे, नानात्वाचा, अनेकत्वाचा निषेध केलेला असताना, अद्वैत स्थितीत, इतर कोणतीही गोष्ट भासमान होऊ शकत नाही.

**नेह नानास्ति किंचन । श्रुति.**

'न इह तत्त्व विचारे ना ना न अस्ति ।' म्हणजे येथे तत्त्व विचारात नानात्वाची सत्ताच नाही.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (४८) नानात्व दर्शनात दोष

**श्लोक :-** **दोषोऽ पि विहित: श्रुत्या मृत्योर्मृत्यं स गच्छति ।**
**इह पश्यति नानात्वं मायया वञ्चितो नर: ॥४८॥**

**अर्थ :-** मायेने जो फसला आहे, तो येथे नानात्व (अनेकता) पाहतो. श्रुतीने हे नानात्व (अनेकत्व) पाहाण्यात असा दोष दाखविला आहे की तो नानात्व पाहाणारा मृत्युकडून मृत्युकडेच जाऊ लागतो. ॥४८॥

**विवरण :-** माणसाला मोहित, भ्रमित करणारी शक्ति म्हणजे माया. अज्ञानाने आणि त्याच्या परिणामाने असमंजस व भ्रांत झालेल्या मनुष्याला या अफाट विश्वात, जगात वा संसारात अनेक प्रकारची दृश्ये दिसतात. अनेक स्वभावाचे स्त्री-पुरुष, प्राणी, पशु-पक्षी, वृक्ष-वनस्पति, अनेक वस्तु, पदार्थ दिसतात. यातील काहींचा त्याला मोह होतो. त्यामुळे त्याच्या चित्तात अनेक वासना निर्माण होतात. इच्छा, वासना, कामना यांचा गोंधळ त्याच्या मनात थैमान घालतो. त्याच्या तृप्तिसाठी तो उद्योगी बनतो. अनेक प्रकारच्या प्रयत्नांनी, युक्ति-प्रयुक्तींनी, त्या वासना पूर्ण करण्यातच तो नेहमी दंग असतो. अशा वेळी त्याला त्याच्या कर्तव्याचेही भान रहात नाही. धर्म, न्याय, नीति, सदाचार याचाही विसर पडतो. मायेने मोहित झालेल्या माणसाला, या अनेकत्वाच्या दर्शनाने, मनात अनेक संकल्प विकल्प निर्माण होतात. चित्तात विक्षिप्तता निर्माण होऊन, ते कधीही स्थिर होत नाही. चित्तात एकाग्रता येत नसल्याने, त्याच्या आचरणात, कर्मांत अनेक चुका, प्रमाद, दोष निर्माण होतात. राग-द्वेष, निर्माण होतो, त्याच्या भेद बुद्धीनेच त्याला सुख-दु:ख येते. सुख दु:खाच्या भोवऱ्यात फिरणाऱ्याला, सुखाची आशा व दु:खाची अनिच्छा, स्तुतिची आवड व निंदेची कटुता, अनुभवावीच लागते.

आपल्या कौटुंबिक व सामाजिक जीवनात आप-पर असा भेद निर्माण झाला की आपले ते परके वाटू लागतात. स्वार्थ बुद्धि वाढते. सर्व सुख-सोयी मलाच हव्यात, इतरांच्या गैरसोयीकडे त्याचे लक्षच जात नाही. आपल्याला

आवडणाऱ्या गोष्टी, आपल्याच वाट्याला याव्यात, सुखाची साधनें आपणांसच मिळावीत, अशी त्याची धडपड सतत चाललेली असते. त्याचे ममत्व, अहंता, आसक्ति सतत वाढत जाते. त्याचा स्वभाव एककल्ली, आपमतलबी व स्वार्थ क्रेंद्रित बनतो. केवळ आपल्याच देहासाठी, हे सर्व निर्माण झालेले आहे, असा त्याचा भाव असल्याने, दुसऱ्यासाठी काही करावे, अशी त्याची बुद्धि नसते. दान, धर्म, इतरांना मदत, साहाय्य करण्याची त्याला इच्छाच होत नाही.

**सर्वे सुखीनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयः ।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ॥**

सर्वांनी सुखी असावे, सर्वांना आरोग्य प्राप्त होवो, सर्वांनी शुभच पहावे व कुणालाही दुःख येऊनये. असा हा उदात्त, सर्वांच्या कल्याणाचा विचार मायेच्या पाशात अडकलेल्या त्या क्षुद्र बुद्धीच्या माणसाला कधीच येत नाही. समतेचा दृष्टिकोन त्याला कसा येणार ? दरिद्री, गरीब, असाहाय्य, पीडित, दुःखी अशा लोकांना पाहून त्याला दया, प्रेम, कळवळा कसा येणार ? तो इतरांसाठी झिजायलाच तयार नाही, मग त्याच्यावर येणाऱ्या आपत्ती मध्ये कोण त्याच्याकडे धावून येणार ? संसाराच्या प्रवाहात बुडणाऱ्याला मग कोण वाचविणार ? ज्याने कधी देव, धर्म, गुरु ओळखला नाही, त्याला त्याच्या संकटकाळी कोण ओळखणार ?

**मृत्योर्मृत्यु स गच्छति ।**

तो मृत्युकडून मृत्युकडेच जात असतो. मायेने फसलेल्या व भ्रमित झालेल्या माणसाची अशीच दुर्गति होते. यातून सुटण्याचा मार्ग संत-सत्पुरुषच दाखवितात. श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचे 'पसाय-दान' फार उद्बोधक व सर्वश्रेष्ठ असे आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (४९) ब्रह्मातून जगाची उत्पत्ति

**श्लोक :-** **ब्रह्मण: सर्वभूतानि जायन्ते परमात्मन: ।**
**तस्मादेतानि ब्रह्मैव भवन्तीत्यवधारयेत् ।।४९।।**

**अर्थ :-** सर्व प्राणीमात्र ब्रह्मापासून म्हणजेच परम आत्मतत्त्वापासून जन्मली आहेत, म्हणून ती सर्व ब्रह्मच आहेत, हे आपण जाणावे. ।।४९।।

**विवरण :-** हे सर्व दृश्य जगत् ब्रह्मच आहे. याची उत्पत्ती ब्रह्मापासून झालेली आहे. ब्रह्म हे जगाचे आद्य कारण आहे हे सांगण्यासाठी हे सर्व ब्रह्मच आहे असे म्हटलेले नाही. तर ब्रह्माची अद्वितीयता सिद्ध करण्यासाठी असे सांगितले जात आहे. ब्रह्मात कार्य-कारण भेद नाही. सामान्य माणसाच्या डोक्यात हाच भ्रम फार दिवसापर्यंत असतो की, ब्रह्म हे कारण असून हा संसार कार्य आहे. आत ब्रह्म आहे व बाहेर संसार आहे. ब्रह्म द्रष्टा आहे तर संसार दृश्य आहे. वास्तविक असा विचार करणे म्हणजे द्वैतच सिद्ध करणे आहे. आत-बाहेरची कल्पना देश भेद आहे. अगोदर-नंतरची कल्पना काल भेद आहे. द्रष्टा-दृश्याचर कल्पना वस्तु भेद आहे. ब्रह्मस्वरुपात तर देश-काल-वस्तु असा भेदच नाही. ते तर परिपूर्ण एक स्वरुप आहे.

जग कसे निर्माण झाले या संबंधी शास्त्रकारांची अनेक, वेग वेगळी मते आहेत. कुणी म्हणतात पंचभूतांपासून जग निर्माण झाले. कुणी अणुं-परमाणुंच्या संयोगातून जग उत्पन्न झाले. कोणी अनेक द्रव्यातून तर कुणी शून्यातून जगाची उत्पत्ती मानतात. कुणी ईश्वर, देव-देवता यांनी जग निर्माण केले असे समजतात.

श्रुति या सर्व मताचे निराकरण करुन, म्हणते की त्या एक, अद्वितीय, अनंत परमात्मा परम ब्रह्मापासून हे जग उत्पन्न झालेले आहे.

**यतो वा इमानि भूतानि जायन्ते, येन जातानि जीवन्ति,**
**यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति तद् ब्रह्म । तद् विजिज्ञासस्व । तैत्तिरीय भृगुवल्ली -**

अर्थात् जेथून हे सर्व प्राणि-पदार्थ उत्पन्न होतात, ज्यामुळे यांचे जीवन चालते,

ज्यामुळे हे क्रियाशील आहेत आणि शेवटी ज्यात हे सर्व विलीन होतात, अशा त्या ब्रह्माची जिज्ञासा करा. (त्या ब्रह्माचे ज्ञान प्राप्त करा.)

ज्याप्रमाणे लाटांचा जन्म सागराच्या पाण्यात होतो. त्यांना सागराचाच आधार असतो. सागरात त्या राहतात आणि खेळतात आणि शेवटी सागरातच विलीन होतात. त्याच प्रमाणे या परब्रह्म चैतन्यात सर्व प्राणीमात्रांचे असणे, खेळणे, नाहिसे होणे, उत्पन्न होणे - विलीन होणे अनादि काळापासून चालू आहे. ते ब्रह्मच फक्त सत्यतत्त्व आहे. या महान सत्य तत्वाची प्रचीति-अनुभव घेतलाच पाहिजे. श्रुतीच्या आधारे भगवान श्री आद्य शंकराचार्य सांगत आहेत की, या विश्वातील सर्व गोष्टी ब्रह्मापासून आल्या आहेत. म्हणून वस्तुमात्र आणि प्राणीमात्र दुसरे काहीही नसून ब्रह्मच आहेत.

ज्याप्रमाणे साखरेपासून बनविलेले विविध प्राणी, व वस्तु हार, कंगण, टोप, नारळ या सर्वांत साखरेशिवाय अन्य काहीही नसते. माणसांना जडापासून वस्तूंची निर्मिती, उत्पत्ति व प्रलय होतांना खरे वाटते. त्यांना नेहमी तसेच घडत असताना दिसल्यामुळे, त्यांची त्यांना सवय झालेली आहे. तथापि चेतनापासून जडाची उत्पत्ति व प्रलय होतो हे समजणे कठीण जाते. जडात एखादी वस्तु निर्माण होणे, राहाणे व बिघडणे, त्या वस्तूची उत्पत्ति, स्थिति व प्रलय नाश होणे, त्यांना चेतन सत्तेत वस्तु बनणे, राहणे, बिघडणे समजत नाही. कारण चेतन सत्तेत कार्य-कारण शब्दाचा प्रयोग होत नाही.

जडवादी जडसत्तेला स्वयंभू मानतात. पाश्चात जडवादी उत्क्रांतिवादी आहेत. ते विकासवादी समजतात की प्रथम माकडापासून मनुष्य विकसित होत होत मनुष्य बनला. परंतु गेल्या १०-१५ हजार वर्षात असा माकडापासून मनुष्य बनल्याचा पुरावा नाही. म्हणून प्रश्न निर्माण होतो की ही विकासाची धारा बंद का झाली ? तसेच मनुष्याचाही पुढे पुढे विकास होत अति मानव बनावयास हवा होता पण तेही दिसत नाही.

ज्ञान आणि वस्तु यात आधी कोण आहे ? वस्तू वस्तूची सिद्धि कशी करणार ? ज्ञानाशिवाय वस्तूची सिद्धि होऊच शकत नाही. म्हणून वेदांत,

चैतन्यापासून देश-काल-वस्तु याची सिद्धि होते असे मानतो. 'अहं' नसल्यास 'इदं' चे भान कसे होणार ? म्हणून 'हे' होण्यापूर्वी 'मी' असणे अत्यावश्यक आहे. **'तस्मादेतानि ब्रह्मैव' -** म्हणून जे जे दिसे, भासे, असे, ते ते सर्व ब्रह्मच आहे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (५०) ब्रह्माचे विभुत्व - विशालत्व -

**श्लोक :-** **ब्रह्मैव सर्व नामानि रुपाणी विविधानिच ।**
**कर्माण्यपि समग्राणि बिभर्तीति श्रुतिर्जगौ ॥५०॥**

**अर्थ :-** ब्रह्मच सर्व नामांना, रुपांना, निरनिराळ्या क्रिया-कर्मांना धारण करणारे आहे. असे श्रुतीने सांगितले आहे. ॥५०॥

**विवरण :-** त्या एकमेवाद्वितीय ब्रह्मापासूनच हे जग उत्पन्न झाले. बृहदारण्यकोपनिषद् मध्ये सांगितल्याप्रमाणे -

**आत्मा वा इदमग्र आसीत् ।**
**एकाकी न रमते स द्वितीयं ऐच्छत् । १-४-१-३**

यात विश्व निर्मितीची प्रक्रिया आली आहे. त्या प्रारंभी असलेल्या एका आत्मतत्त्वातून म्हणजेच ब्रह्मातून, द्वितीय कसे निर्माण झाले, तर 'एकाकी न रमते' एकट्याला करमत नव्हते म्हणून दुसऱ्याची इच्छा झाली. पुढे त्यातूनच **'बहुस्यां प्रजायेयतिं ।'** यात विश्व सृजनाचा म्हणजे विश्व निर्मितीचा अभिप्राय आहे. यात सृजन-निर्मिती हे रमणे आहे. रमण्यात आनंद आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, विश्व निर्मिती ही जड वा यांत्रिक प्रक्रिया नाही. अशातूनच स्त्री-पुरुष, स्थावर-जंगम, स्थूल-सूक्ष्म अशी सृष्टी तयार झाली.

सृष्टीच्या या विविध अंगानी अनेक आकार, अनेक नाम-रुपें निर्माण झाली. या सर्वांचे आधारभूत तत्त्व आत्मतत्त्व वा ब्रह्मच असल्याने, ही सर्व नाम-रुपें व क्रिया-कर्मेही ब्रह्मस्वरुप आहेत. भगवान श्री आद्य शंकराचार्य या श्लोकातून ब्रह्माचे विभुत्व वा विशालत्व वर्णन करताना सांगत आहेत की, या जगातील सर्व भूत प्राणीमात्र, त्याची विविध आकारांनी, विविधरुपांनी व नावांनी प्रगट झालेली ही सृष्टिरचना म्हणजे सर्व ब्रह्मच आहे. या सृष्टींत होणाऱ्या अनेक घडामोडी, सर्व क्रिया-कर्मे या ब्रह्माशिवाय दुसरे काहीही नाही.

**त्रयं वा इदं नाम रुपं कर्म ।** बृहदारण्यकोपनिषद-ही श्रुतिही तेच

सांगत आहे की, सर्व नाम, रुपें, कर्मे त्या परमात्म्याचीच आहेत. सर्व ब्रह्मच आहे. पंचमहाभूतें, त्यांचे गुण-गंध, रस, रुप, शब्द, स्पर्श व सर्व कर्मे ब्रह्मस्वरुपच आहेत. आपण ही सर्व ब्रह्मस्वरुप कसे आहोत, तो ब्रह्मभाव कसा असावा हे खालील काव्य पंक्तीतून अभिव्यक्त करीत आहेत -

**शिव मानस पूजा स्तोत्र -** आद्य श्रीमद् शंकराचार्यकृत

**आत्मा त्वं, गिरीजा मतिः, सहचराः प्राणाः शरीरं गृहं।**
**पूजा ते विषयोपभोग रचना, स्तोत्राणि सर्वा गिरः ॥**
**संचारः पदयोः प्रदक्षिण विधिः, निद्रा समाधि स्थितिः।**
**यत् यत् कर्म करोमि, तत्तदअखिल शम्भो ! तवाराधनम् ॥**

हे भगवान् शिव ! तुम्ही माझा आत्मा आहात !
हे गिरीजा - पार्वती माते ! तुम्हीच माझी बुद्धि आहांत.
तुमचे पार्षद गण, म्हणजे माझे प्राण आहेत !
हे माझे शरीर म्हणजे तुमचे मंदिर आहे !
मी इंद्रियांनी जो विषयांचा उपभोग घेतो, ती तुझी पूजाच आहे !
माझ्या वाणीतून प्रसविणारे सारे वाक्प्रवाह तुझी स्तुतिच आहे !
माझ्या पायांनी चालणे, ही आपल्या भोवती घातलेली प्रदक्षिणाच आहे !
मला येणारी निद्रा (झोप), आपली समाधि स्थिति आहे !
मी जे जे कर्म करतो, ते ते सर्व आपली आराधनाच आहे !

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (५१) विश्व आणि ब्रह्म यांचे एकत्व -

**श्लोक :-** सुवर्णाज्जायमानस्य सुवर्ण त्वं च शाश्वतम् ।
ब्रह्मणोजायमानस्य ब्रह्मत्वं च तथा भवेत् ॥५१॥

**अर्थ :-** सोन्यातून उत्पन्न होणारे सर्व जसे सोने असणे शाश्वत आहे. त्याच प्रमाणे ब्रह्मापासून उत्पन्न होणारे सर्व ब्रह्मही शाश्वत आहे. ॥५१॥

**विवरण :-** भगवान श्री आद्य शंकराचार्य या श्लोकातून लोकप्रसिद्ध दृष्टांताने या विश्वाचे स्वरुप सांगत आहेत. सोन्यापासून बनविलेल्या अलंकारामध्ये निरनिराळ्या प्रकारचे दागिने-अलंकार असतात. उदाहरणार्थ बांगड्या, कडें, नथ, बाळी, हार, मुदी-आंगठी, इत्यादी अलंकार सोन्यापासून बनविलेले असताना, त्या दागिन्यांचे आकार, त्यांची रुपे वेगवेगळी असतात. हे आकार व रुपें जरी बदलली तरी त्यांच्यात असलेले सोने कायम राहते. सोने म्हणून त्यात काहीही बदल होत नाही. त्याच प्रमाणे ब्रह्मापासून उत्पन्न झालेले हे अफाट विश्व, हे जग, ही सृष्टी, हा सारा प्रपंच, या प्रपंचातील विविध आकारांचे व प्रकारचे प्राणी, पशु, पक्षी, पदार्थ, वनस्पति, हे सर्व त्या ब्रह्मातून निर्माण झालेले असल्याने, हे सर्व ब्रह्मच आहेत. ब्रह्मांत प्रगट होणारे हे विश्वाचे आकार व प्रकार बदलतात, पण त्यातील चेतनतत्त्व, आत्म-तत्व, ब्रह्मस्वरुप अखंड जसेच्या तसेच राहाते. ते शाश्वत आहे. त्यात बदल होत नाही.

लोकांना या विश्वातील आकार, रुपें, बदलतांना प्रत्यक्ष दिसतात पण न बदलणारे शाश्वत ब्रह्म दिसत नाही, कळत नाही. साधे आपल्या देहाचेच उदाहरण घ्या. हा देह क्षणाक्षणाला झिजत असतो. वाढतही असतो. त्याची वाढ व झीज समजते. कारण त्यामुळे देहाचे रुप व आकार बदलतो. वजन बदलते. पण या देहांतील आत्मा बदलत नाही. कारण तो चेतन आहे. अति सूक्ष्मातिसूक्ष्म आहे. तो देहाच्या आरंभापासून अंतापर्यंत जशाच्या तसाच असतो. हे त्या ब्रह्माचेच शाश्वत स्वरुप आहे.

या विश्वाला ब्रह्म मानल्यानेच दु:खाची निवृत्ति होऊ शकेल. म्हणूनच हे विश्व ब्रह्मातून उत्पन्न झालेले असल्याने तेही ब्रह्मच आहे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (५२) भेद पाहण्यात भीति आहे -

**श्लोक :-** **स्वल्पमप्यन्तरं कृत्वा जीवात्मपरमात्मनोः ।**
**यः संतिष्ठति मूढात्मा भयं तस्याभिभाषितम् ॥५२॥**

**अर्थ :-** जो मूढ चित्त (मूर्ख) जीवात्मा आणि परमात्मा यांच्यात किंचितही फरक मानेल, त्याला भय वाटेल असे श्रुतीने म्हटले आहे. ॥५२॥

**विवरण :-** आता पर्यंत जग आणि ब्रह्म यांच्यात फरक नाही. सर्व ब्रह्मच आहे असे समजले, तथापि जीव व ब्रह्म यात वेगळेपण, पृथकत्त्व आहे असे मानले, तर ते न केवळ अज्ञान आहे अपितु भयाचेही कारण आहे.

**'अथ तस्य भयं भवति, द्वैतात् भयं भवति ।'**

असे श्रुति वचन आहे. याचा अर्थ द्वैत मानणाऱ्यास भय असते. द्वैतापासूनच भय-भीति निर्माण होते. जीवात्मा व परमात्मा यांत वेगळेपण नाही. त्यांना वेगळे समजणे हे अज्ञान आहे. जर ते अज्ञान आहे तर अज्ञानानेच सर्व अनर्थ होतात. जो अज्ञानी आहे तो मूढ-मूर्ख आहे. मूर्ख म्हटला की त्याच्या हातून मूर्खपणा घडणारच. मूढ वा मूर्ख मनुष्याला विवेक नसतो. अविवेकी मनुष्य चांगले-वाईट, खरे-खोटे, हित-अहित, नफा-नुकसान जाणत नाही. खऱ्या खोट्याची पारख नसल्यामुळे त्याला कुणीही फसवू शकतो संकटात टाकू शकतो. हे भयदायक नाही का ?

या एकमेवाद्वितीय असलेल्या महान परमात्मस्वरुपात तुम्ही थोडाही भेद दाखविला, तरी तुम्हाला भय वाटेल. आपल्यापेक्षा काहीतरी वेगळे आहे, असे जेव्हा तुम्ही समजता तेव्हा भीति निर्माण होते. एकाकीपणात भय नसते. तुम्हाला स्वतःची भीति वाटत नाही. जेव्हा मी एकटाच माझ्या बरोबर असतो, तेव्हा मुळीसुद्धा भीति वाटत नाही. अनोळखी, अपरिचित माणसाच्या संगतीत भय असते. आपण सुरक्षित राहू काय ? आपल्याला चुकीचे मार्ग तर दाखवणार नाही ना ? अशा भलत्या शंका, संशय आले की भय निर्माण होणारच.

मी जीवात्मा त्या परमात्म्यापासून वेगळे मानले तर असे भय वाटणारच. म्हणून मीच तो आत्मा-परमात्मा आहे. माझ्यात व आत्म्यात द्वैत नाही, भेद नाही. मग भय कुठले ? चला तर हा भयाचा भ्रम दूर करु या आणि त्या सर्व शक्तिमान परमेश्वराशी एकरुप होण्याची अनुभूति घेऊ या. ही अनुभूति म्हणजेच स्वात्मानुभूति आहे. आपणच आपल्या स्वरुपाची अनुभूति घेणे आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (५३) अज्ञानाने द्वैत भासते

श्लोक :- **यत्राज्ञानाद्भवेद् द्वैतमितरस्तत्र पश्यति ।**

**आत्मत्वेन यदा सर्वं नेतरस्तत्र चाण्यपि ॥५३॥**

**अर्थ :-** जेथे अज्ञानामुळे द्वैत दिसेल, तेथे पहाणारा आपणाहून भिन्न पहातो. जेथे सर्व आत्माच झालेला असतो, तेथे आपणाहून दुसरा कोणीही भिन्न नसतो ॥५३॥

**विवरण :-** अज्ञानामुळे द्वैत दिसते. विषय ब्रह्मज्ञानाचा व आत्मज्ञानाचा चाललेला आहे. जो आत्मा नित्य आपल्या देहांत असून त्याच्याविषयी अज्ञान असते. या अज्ञानामुळे शरीर म्हणजेच सार सर्वस्व आहे. आपल्या शरीराकडेच 'मी' 'मी' म्हणून पाहाणारा इतरांकडे जेव्हा पहातो, तेव्हा इतरांची शरीरेही दिसतात. ती पाहाणाऱ्याच्या शरीराहून भिन्न दिसतात. हेच द्वैत दर्शन आहे. माझ्या शरीराच्या मालकीच्या व इतरांच्या शरीराच्याही मालकीच्या अनेक वस्तु दिसतात. हा सारा संसार, ही सारी सृष्टि, हे सारे जग व हे सारे विश्व तर अनंत गोष्टींनी भरलेले आहे. हे अनंताचे, अनेकत्वाचेच दर्शन आपण झोपेतून उठल्यापासून पुन्हा झोपेपर्यंत दररोज घेत असतो. तात्पर्य अनेकत्वात, भिन्नतेतच आमचे मन, बुद्धि, चित्त सदैव भटकत असते. मग एकत्वाचे, अद्वैताचे दर्शन कसे घडणार ? ज्या आत्म्यात हे एकत्वाचे, अद्वैताचे स्वरुप आहे, तो आत्मा आहे असे कळते, पण त्याचे अज्ञान आहे आणि या अज्ञानामुळेच भिन्नत्व, अनेकत्व, विविधत्व याचा अनुभव येतो. आत्मा तर परिच्छेदरहित अखंड, भेदरहित, एकरुप, असंग, असा आहे असे श्रुति सांगते

**यत्र हि द्वैतमिव भवतितत्र इतर इतरं पश्यति ।**

**यत्र तु सर्वमात्मैवाभूत तत्र कः कं पश्यति - ॥**

जेथे द्वैत असते, तेथे दुसरा (आपणाहून भिन्न) दुसऱ्यास पहातो. जेथे सर्व आत्मस्वरुप आहे, तेथे कोण कुणाला वेगळे कसे पाहील ? त्याला द्वैत दिसणारच नाही.

वेदांताची हीच शिकवण आहे की, तुम्ही परिछिन्न म्हणजे भिन्न, भिन्न नाहीत. जीवात्मा परमात्मा भिन्न नाहीत. जीवत्व नावाची कोणतीही वस्तु नाही. सर्वत्र एकमेव आत्माच आहे. शरीर तर एक वस्त्र आहे. हे वस्त्र जीर्ण-मळकट झाले की ते काढून आत्मा नवे वस्त्र धारण करतो. भगवान श्रीकृष्ण भगवद्गीतेत सांगतात -

**वासांसि जीर्णानि यथा विहायाय।**
**नवानि गृह्णाति नरोऽपराणि ॥**
**तथा शरीराणि विहाय जीर्णा -**
**न्यन्यानि संयाति नवानि देही ॥** अ-२, २२

ज्या प्रमाणे मनुष्य जुनी वस्त्रें टाकून, दुसरी नवीन वस्त्रें धारण करतो. त्याच प्रमाणे आत्मा, जुन्या शरीरांना टाकून, त्यांचा त्याग करुन, नवीन शरीरांना प्राप्त होतो.

या वरुन प्रत्येकाच्या शरीरात तो परमश्रेष्ठ, सर्वज्ञ आत्माच अखंड आहे. ज्यावेळी कुणी एखाद्याचा अपमान करतो व अहित चिंतितो, त्यावेळी तो अपमान करणारा त्याला केवळ देह समजत असतो, त्याला आपल्यासारखाच आत्मा असून त्याचा आत्मा व माझा आत्मा एकच आहे, हे कळत नसते. दुसऱ्यांना दु:ख देते वेळी तो स्वत:लाच दु:ख देत आहे हे अज्ञानामुळे कळत नाही. सर्व दु:खाचे मूळ आपल्या आत्मस्वरुपाचे अज्ञान हेच असते.

**आत्मत्वेन यदा सर्वम्** - जेव्हा आपण सर्वांना आपल्या आत्मरुपाने जाणून घेऊ, त्या वेळी दु:ख, भय, अज्ञान वा भ्रम या तीन गोष्टींतून वेदांत आपणांस मुक्त करील. वेदांत आपणांस अद्वैताच्या स्वरुपप्राप्तीचा मार्ग दाखवितो. हे अद्वैत आत्मस्वरुपात नित्य आहे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (५४) अद्वैत भावात सुख -

श्लोक :- यस्मिन् सर्व भूतानि ह्यात्मत्वेन विजानतः ।
न वै तस्य भवेन्मोहो न शोको ऽ द्वितीयता ॥५४॥

**अर्थ :-** ज्या मनुष्याने सर्व प्राणीमात्र हे आपला आत्माच आहे असा अनुभव घेतला आहे. त्याला मोह आणि शोक होत नाही कारण तेथ दुसरा नाहीच ॥५४॥

**विवरण :-** सामान्य माणसाचे सारे व्यवहार द्वैतांत चाललेले असल्यामुळे, इतरांशी राग-द्वेष, शत्रुत्व-मित्रत्व, संघर्ष-कटुत्व निर्माण होणारे अनेक प्रसंग येतात. मनाला आसक्त करणाऱ्या, मोहित करणाऱ्या अनेक गोष्टींनी, त्या अप्राप्त झाल्याने दुःख येते. आज जगांत विषमतेचेच दर्शन घडते. सुख आणि दुःख यात दुःखाचेच आधिक्य आहे. या दुःखातून सुटण्याचा व खऱ्या सुखाला प्राप्त करण्याचा उपाय म्हणजे ज्ञान, आत्मज्ञान हाच आहे.

हा ज्ञानप्राप्तीचा मार्ग द्वैतातून अद्वैताकडे जाणारा आहे. प्रवृत्तिकडून निवृत्तीकडे जाणारा आहे. प्रवृत्तीतील भोगांमध्ये रमलेल्या जीवाला निवृत्ति नको असते. मग द्वैत तर कधीच संपणार नाही. म्हणूनच भगवान श्री आद्य शंकराचार्य वेदांताच्या आधारे उपदेश करीत आहेत. ईशावास्य उपनिषद सांगत आहे की, **'ईशावास्यमिदं सर्वम्' -** या जगात जे काही सर्व आहे, ते ईश्वराने भरलेले आहे. हा ईश्वर म्हणजेच ते ब्रह्मचैतन्य. तेच या जगातील स्थावर-जंगमातील प्राणीमात्रांत भरलेले आहे. ते तुझ्यातही आहेच. त्याचाच प्रथम अनुभव घे. तो अद्वैताचा, एकरुपतेचा, एकत्वाचा अनुभव आहे. या चराचरात त्या ईश्वराचाच वास आहे. सारे काही ईश्वरमय आहे. त्याचा उपभोग घे. **तेन त्यक्तेन भुंजीथाः।-** त्याचा त्याग करुन नव्हे, तर अनासक्त होऊन भोग घे. भोगात आसक्ति आली की तिच्या बरोबर अडकणे, गुंतणे, बद्ध होणे आलेच. असे अडकण्यात दुःखही येणारच. द्वैतातून दुःखे येतात. अद्वैतात, एकत्वात दुःख कसले ? सर्व प्राणी, पदार्थ जर आपलेच स्वरुप आहे, तर मोह नाही, शोक नाही. ज्ञानी-आत्मज्ञानी सर्व प्राणीमात्राला आपला आत्माच मानतो. मग तेथे दुःख कसले. सर्व सुखच सुख आहे.

## (५५) श्रुतीचे प्रमाण -

श्लोक :- **अयमात्मा हि ब्रह्मैव सर्वात्मकतया स्थितः ।**
**इति निर्धारितं श्रुत्या बृहदारण्यसंस्थया ॥५५॥**

**अर्थ :-** सर्वात्म स्वरुपांत स्थित असलेला हा आत्माच ब्रह्म आहे. असे बृहदारण्यक श्रुतीनेच स्पष्ट, सिद्ध केलेले आहे. ॥५५॥

**विवरण :-** मनुष्यात व इतरही सर्व प्राणीमात्रांत स्थित असलेला हा आत्माच शरीराच्या बाहेरही सर्व विश्वांत व ब्रह्माण्डांत सर्वत्र भरुन राहिलेला आहे. आत्म्याचे हे बृहद् स्वरुप, ब्रह्म म्हणून संबोधण्यात येते. आत्मा आणि ब्रह्म एकच चित्तत्त्व आहे. **स वा अयमात्मा विज्ञानमयः ।** बृहदारण्यकोपनिषद.

अर्थात् श्रुतिच स्पष्ट करीत आहे की, हा विज्ञानमय आत्माच ब्रह्म आहे. हा आत्मा विज्ञानमय म्हणजे ज्ञानस्वरुप आहे आणि तेच ब्रह्मही आहे. ब्रह्म आणि आत्मा यात भेद नाही, द्वैत नाही. शरीरांतर्गत सर्व कणाकणांत, सर्व पेशींमध्ये हे परम चित्-तत्त्व, सूक्ष्माति-सूक्ष्म असून, तेच बाहेरही साऱ्या ब्रह्माण्डांमध्ये कणाकणांत भरुन आहे. ते सर्व ज्ञान-विज्ञानस्वरुप असल्याने त्याच्याच आधारावर या विश्वाच्या असंख्य घडामोडी होत आहेत.

**आत्मैवेदमग्र आसीत् ।** बृहदारण्यक - १ । ४ । १

हे विश्व उत्पन्न होण्यापूर्वी फक्त 'आत्मा' च होता. सृष्टीपूर्वी सत्-आत्मा **'ब्रह्म'** या शब्दाने व्यक्त होणारे फक्त एकमात्र चित्-तत्त्व, तेवढेच होते. दुसरे काहीही नव्हते. **'एकं एव अद्वितीयम्'** या तीन शब्दांनी, त्या आत्मतत्त्वात स्वगत म्हणजे सजातीय व विजातीय असे भेद नाहीत. उदाहरणार्थ- एक माणूस, एक वृक्ष - असे म्हटले तरी माणसाचे हात पाय, झाडाची पाने, फांद्या, फुले यांचाही समावेश त्या एकात होतो. हा सजातीय भेद आहे. एक बाग म्हटले, तरी त्यात अनेक प्रकारची झाडे, वनस्पती त्या एकात आहेत. हा त्या ठिकाणी विजातीय भेद आहे. आत्मा अशा कोणत्याही भेदात नाही. तो एकमेव, एकच एक आहे. हेच ते बृहदारण्यक उपनिषद सांगत आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (५६) प्रपंच मिथ्या कसा -

श्लोक :- अनुभूतोऽप्ययं लोको व्यवहार क्षमोऽपि सत् ।
असद्रूपो यथा स्वप्न उत्तर क्षणबाधत: ॥५६॥

**अर्थ :-** दररोजच्या व्यवहाराची ही प्रपंचातील जागृतावस्था आपण अनुभवीत असलो, तरी ती स्वप्नाप्रमाणेच खोटी (असत्‌रुप) आहे. कारण ज्ञानोत्तर कालात ती बाधित होते. ॥५६॥

**विवरण :-** या श्लोकांत भगवान श्री आद्य शंकराचार्य, सामान्य मनुष्यापुढे अत्यंत दुर्बोध वाटणारे, सत्य-तत्त्व सांगत आहेत. हे दिसणारे जग, प्रपंच, संसार हा स्वप्नाप्रमाणे मिथ्या आहे. असत् आहे. खरा नाही. म्हणजे खोटा आहे. हा तात्त्विक विचार सहजासहजी पटणारा नाही, म्हणून प्रथम स्वप्नातील अनुभव, स्वप्नातील व्यवहार खोटा कसा हे कळणे अत्यावश्यक आहे. यासाठीं काही उदाहरणें पाहू या. समजा स्वप्नात एका मेजवानीत आपण खूप पोटभर जेवलो. नको नको म्हणेपर्यंत जेवलो. पोट फुगले होते. नंतर जाग आली. आता या जागृतीत तेच भरलेले पोट आहे काय ? तर नाही. मग ते खाल्लेले अन्न कुठे गेले ? तर स्वप्नातील क्रिया-कर्म जागृतीत खोटे ठरले. समजा, एखाद्या गरीब माणसाला स्वप्नात आपण खूप श्रीमंत झालो आहोत असे दिसले. राजा झालो असेही दिसले. तर काय जागृतीत तो राजा राहील ? त्याची श्रीमंती राहील ? तर नाही. याचाच अर्थ स्वप्नातील व्यवहार, अनुभव हे स्वप्न काळात जरी खरे वाटले, तरी ते जागृतीत खरे नसतात.

आता प्रत्यक्ष जागृत अवस्थेत केलेले व्यवहार, कर्मे, घेतलेले अनुभव हे तरी खरे, सत्य आहेत का ? तर आचार्य सांगतात की, जागृति ही स्वप्नासारखीच एक अवस्था, स्थिती आहे. तीही स्वप्नावस्थेप्रमाणे बदलणारी अवस्था आहे. कोणत्याही विचाराने वा तर्काने हे म्हणणे खोटे ठरविता येणार नाही. तेव्हा स्वप्नातील व्यवहार व अनुभव हे जर खरे नाहीत, तर जागृतीतील व्यवहार व अनुभव हे ही खोटेच नाहीत काय ? जर स्वप्नातील संसार-जगत

अनुभव मिथ्या असतील तर जागृतीतील संसार, जग, अनुभव हे सत्य कसे ?

तत्त्वज्ञानाचा हा सिद्धांत जरी पटला, होकारार्थी मान हालविली, तरी त्याचा परिणाम आकलन करणे, त्याचा स्वीकार करणे इतकेसे सोपे नाही. तत्त्व जरी समजले असले, तरी निर्णय मान्य करणे आपल्याला शक्य होत नाही. म्हणून ते आपणास टाळावेसे वाटतात. भगवान श्री आद्य शंकराचार्य व इतरही ऋषि मुनि, संत महात्मे हेच सांगत आले आहेत की, स्वप्न पाहाणारा, स्वप्नात असेपर्यंत स्वप्नातील प्रपंच, जग, सृष्टि खरी आहे, पण जागृति येताच स्वप्न मिथ्या, असत् होते. त्याच प्रमाणे जागृतीमधील प्रपंच, जग, सृष्टि, सारे व्यवहार हे जागृति असे पर्यंतच खरे वाटतात. जागृतीचे स्वप्न दीर्घकाळ टिकते. आत्मजागृति आल्याशिवाय ते भग्न होत नाही. ती आत्मजागृति म्हणजे आत्मस्वरुप, आत्मज्ञान, ब्रह्मस्वरुप, ब्रह्मज्ञान प्राप्त होणे होय. त्या ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीने आपणास पटू लागते की, मी म्हणजे शरीर, मन, बुद्धि व इतर इंद्रिय समुदाय नाही. मी म्हणजे परम सत्य, अखंड असणारे आत्मतत्त्वच आहे, मीच ब्रह्म आहे. ही अत्युच्च, सर्वश्रेष्ठ, अखंड जागृति आल्याशिवाय, ती पूर्वीची येणारी-जाणारी स्वप्न जागृति भग्न होत नाही. आत्मजागृतीतील दिसणारे बाह्य जग सुद्धा असत् आहे याची खात्री पटते. हा मायेचा महान चमत्कार आहे की, या असत् प्रपंचाला, या मिथ्या जगाला ती सत्य भासविते. तथापि हा सत्याचा अभास, भास आहे. खरे, तात्त्विक सत्य नाही.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (५७) स्वप्न - जागृति - निद्रा यांचे स्वरुप -

**श्लोक :-** **स्वप्नो जागरणेऽलीक: स्वप्नेऽपि न हि जागर: ।**
**द्वयमेव लये नास्ति लयोऽपि ह्युभयोनंच (ह्युभयोर्न च) ।।५७।।**

**अर्थ :-** जागृत अवस्थेत स्वप्न मिथ्या (असत्) असते. स्वप्नावस्थेंत जागृति नसते. जागृति आणि स्वप्न या दोन्हीही अवस्था सुषुप्तित नसतात. तसेच सुषुप्ति ही जागृत व स्वप्न अवस्थेत नसते. ।।५७।।

**विवरण :-** स्वप्न, जागृति व निद्रा या देहाच्या तीन अवस्था आम्ही नित्य अनुभवित असतो. ज्याचा आम्हाला अनुभव येतो, त्या आम्ही खऱ्याच समजतो. खरी वा सत्य गोष्ट ती असते, जी भूतकाळ, वर्तमान काळ व भविष्यकाळात एकच राहते. उदाहरणार्थ साखर गोड असते हे विधान, भूतकाळ, वर्तमान व भविष्यातही खरे-सत्य आहे. साखर तिन्ही काळात गोडच असते. ती कडु, आंबट, गोड, अशी कालप्रवाहात बदलत नाही. म्हणून साखर गोड असते हे बोलणे सत्य आहे. परंतु आपल्या प्रत्येकाच्या जीवनात अनुभवात येणाऱ्या, स्वप्न, जागृति, व निद्रा या खऱ्या नाहीत. कारण स्वप्नात असताना आम्ही ज्या गोष्टींचा अनुभव घेतला, त्या जागृतीत खऱ्या होत नाहीत. उदाहरणार्थ- स्वप्नात आम्ही एखादी आम्हाला प्रिय असणारी व्यक्ति भेटली, परंतु ती मरण पावलेली आहे. अशी व्यक्ति भेटली, तिच्या बरोबर संवाद झाला. हा प्रसंग जाग येताच नष्ट होतो. आता जागृतीत ती व्यक्ति भेटेल काय ? तर नाही किंवा स्वप्नात एखादा मनुष्य राजा झाला आहे वा मोठा श्रीमंत झालेला आहे. तर जागृतीत तो तसा असेल असे नाही. म्हणून स्वप्नसृष्टि, स्वप्नातील प्रपंच मिथ्या आहे. हे जागृतीत सिद्ध होते. आता आम्ही जागे आहोत. आता स्वप्न पडेल काय ? तर नाही. याचा अर्थ स्वप्नात जागृति नाही व जागृतीत स्वप्न नाही. अत्यंत गाढ झोपेत स्वप्नही नाही व जागृतिही नाही.

स्वप्न, जागृति, निद्रा या बदलणाऱ्या अवस्था आहेत. प्रत्येक अवस्थेतील अनुभव, बदलणारा असतो. म्हणून या अवस्था खऱ्या नाहीत. तथापि या

प्रत्येक अवस्थेचा अनुभव मात्र असतो. त्या अनुभवाचे ज्ञान असते. याचे कारण या बदलणाऱ्या अवस्था, एका न बदलणाऱ्या, शाश्वत तत्त्वावर आधारलेल्या असतात. ते पायाभूत शाश्वत, सत्-तत्त्व म्हणजे ब्रह्म असे होय, त्या सत्, चित्, आनंदस्वरुपावरच या अवस्था येतात व जातात.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (५८) तिन्हीही अवस्था मिथ्या - (विषय पुढे चालू)

श्लोक :- त्रयमेवं भवेन्मिथ्या गुणत्रय विनिर्मितम् ।
अस्य द्रष्टा गुणातीतो नित्यो ह्येकश्चिदात्मकः ॥५८॥

**अर्थ :-** या प्रमाणे तीन गुणांनी निर्माण केलेल्या या तीन अवस्था मिथ्या आहेत. त्यांचा द्रष्टा त्या गुणांच्या अतीत असून, नित्य असलेले ते एकमेव चित्-तत्त्व आहे. ॥५८॥

**विवरण :-** तीन गुण म्हणजे सत्त्वगुण, रजोगुण व तमोगुण. या तीन गुणांनी युक्त अशी कर्मे घडतात. कर्मामध्ये हे गुण आले कोठून, तर मनातून. आमचे मन ज्या वेळी शांत व सुखी असते, त्या वेळी मनात सत्त्वगुण असतो. तेच धावपळ करते, ते विचलित व विक्षेपित झालेले असते तेव्हा रजोगुण वाढलेला असतो. तमोगुणात ते विकारी होते. क्रोध, क्रूरता, निर्दयता इ. विकार तरी असतात किंवा आळस, निद्रा यांच्यात तरी ते असते. मनाच्या या त्रिगुणात्मक अवस्था स्वप्न, जागृति व सुषुप्ति या बाह्य तीन अवस्थांना अनुकूल होतात. अस्तित्वाच्या या निरनिराळया तीन पातळ्या-अवस्था, या तीन गुणांची निर्मिती आहे व त्या सर्व मिथ्या आहेत. यांचे मिथ्यात्व, आपली खरी जागृति, आत्मस्थिति प्राप्त झाल्यानंतर कळते. अंधारात दोरीवर भासणारा साप, प्रकाशाने भ्रम दूर होऊन कळतो. त्याच प्रमाणे आपल्या चित्स्वरुपातील आत्मप्रकाशाने स्वप्न, जागृति व निद्रा या अवस्था सत्य वाटण्याचा भ्रम नाहीसा होतो. या अवस्था मिथ्या आहेत हे आत्मज्ञानी-ब्रह्मज्ञानी महात्म्यालाच कळते. इतर सामान्य जनांना त्या खऱ्याच वाटतात. आत्मज्ञानी सत्पुरुषच त्रिगुणातीत असतात व स्वप्न, जागृति, सुषुप्ति यांच्या पलिकडे जाऊन अखंड आत्मानंदाच्या अवस्थेत रममाण झालेले दिसून येतात. या ज्ञान-समाधीत त्यांना जेथे देहाचेही भान नसते, तेथे स्वप्न, जागृति व निद्रा यांचे भान कोठून असणार ? इतरांची जी निद्रा-सुषुप्ति असते, त्यावेळी हा महात्मा जागृति अनुभवतो. श्रीमद् भगवद् गीतेमध्ये श्री भगवान अर्जुनाला सांगत आहेत -

**या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी ।**

**यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ।। अ-२-६९**

सर्व प्राणी ज्याविषयी निद्रित असतात (त्या नित्य ज्ञानस्वरुप परमानंदाच्या प्राप्तीत) संयमी, स्थित-प्रज्ञ योगी जागृत असतो आणि ज्या नाशवंत सुखाच्या प्राप्तीसाठी सर्व प्राणी जागतात, तेव्हा परमात्म तत्त्वाच्या अनुभवात असलेल्या मुनीला ती रात्र असते. संत श्री ज्ञानेश्वर महाराजांनी या श्लोकावर फारच उद्‌बोधक स्पष्टीकरण दिलेले आहे.

**देखे भूत जात निदेले । तेथेचि जया पाहलें ।**

**आणि जीव जेथ चेइलें । तेथ निद्रितु जो ।।५५।।**

**तोचि तो निरुपाधि । अर्जुना तो स्थिर बुद्धि ।**

**तोचि जाणें निरवधि । मुनीश्वर ।।५६।।**

पहा, सर्व मनुष्ये ज्या आत्मस्वरुपाच्या ठिकाणी निजलेली (अज्ञानी) असतात, त्या ठिकाणी ज्याला उजाडलेले असते. (म्हणजे ज्याला आत्मज्ञान झालेले असते.) आणि जीव ज्या (देहादि प्रपंच्या) ठिकाणी जागे (विषय सुख अनुभवणारे) असतात, त्या ठिकाणी जो निजलेला (विषय निवृत्त) असतो ।।५५।। तोच खरा निरुपाधि होय. अर्जुना, त्याचीच बुद्धि स्थिर झालेली आहे आणि तोच अखंड मुनीश्वर आहे असे समज ।।५६।।

**।। हरि ॐ तत् सत् ।।**

## (५९) ब्रह्मात जीवत्वाचा भ्रम -

**श्लोक :-** **यद्वन्मृदि घटभ्रान्तिं शुक्तौ वा रजतस्थितिम् ।**
**तद्वद् ब्रह्मणि जीवत्वं वीक्षमाणे न पश्यति ॥५९॥**

**अर्थ :-** जसा मातीत घट (मातीची घागर) आणि शिंपल्यांत चांदी असण्याचा भ्रम होतो, त्याच प्रमाणे ब्रह्मात जीवाचा (जीवत्वाचा) भ्रम होतो. अज्ञानी मनुष्य या गोष्टी दिसणाऱ्या असताना पाहात नाही. (ब्रह्म म्हणजे जीव असा अज्ञानामुळे गैर समज करुन घेतला जातो. पण ते खरे नाही.) ॥५९॥

**विवरण :-** भगवान श्री आद्य शंकराचार्य दृष्टांताच्या साहाय्याने मनुष्याच्या मनातील, चित्तातील भ्रम दूर करीत आहेत मातीत मातीच्या मडक्याचा, घागरीचा भ्रम होतो किंवा शिंपल्यात चांदीचा भ्रम होतो. त्या प्रमाणे आत्मस्वरुपात, ब्रह्मस्वरुपात मी एक जीव आहे असा भ्रम होतो. वास्तविक आत्म्यात आत्म्या शिवाय दुसरे काहीही नाही. ज्या प्रमाणे पाण्याचा एक थेंब असो वा समुद्र असो सर्व पाणीच आहे. अग्नीची एक ठिणगी असो वा भडकलेला मोठा अग्नी असो सर्व अग्नीच आहे. यात जे एकात आहे, लहानात आहे, तेच सर्व मोठ्यात आहे. त्याच प्रमाणे चित्-तत्त्व सर्वत्र अखंड आहे.

प्रश्न असा आहे की, जागृतावस्थेत दिसणारे हे जग, ही सृष्टी, हा प्रपंच मिथ्या, असत्य कसा मानायचा ? ब्रह्म सत्य आणि जग मिथ्या मानताना मनाची तयारी होत नाही. जे जे सर्व दिसत आहे, ते ते सर्व खरे-सत्यच आहे असे आम्ही समजून बसलो आहोत. आमचा समज हा केवळ भ्रम आहे. हे पटवून घेणे कठीण वाटते. कारण हे जग अस्तित्वात आहे व त्यात आमचे अनुभव आहेत. मग ते खोटे कसे ?

आचार्य सांगतात की हे बहुविध जग दुसरे काहीही नसून भ्रम आहे. यथायोग्य ज्ञानाच्या आधारे त्याचे आकलन झालेले नसल्यामुळे, ती एक मनाची कल्पना आहे. समजूत आहे. आत्मस्वरुपातील जागृतीतच हा भ्रम नाहिसा होतो. जगाचे हे मायावी स्वरुप तेव्हाच कळते, जेव्हा आम्ही मायामुक्त

होऊन आत्मस्वरुपात असतो. मडके हे ज्याप्रमाणे दुसरे काहीही नसून मातीच आहे. शिंपला चांदी समजणे, हे जसे भ्रमात्मक आहे. त्याच प्रमाणे मी जीव आहे ही कल्पना सुद्धा भ्रमच आहे. सत्यस्वरुपात जग, संसार, सृष्टि, हे सर्व भ्रम स्वरुप आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (६०) आत्म स्वरुपात जीवत्व नाही -

**श्लोक :-** **यथा मृदि घटो नाम कनके कुण्डलाभिधा ।**
**शुक्तौ हि रजतख्याति:जीव शब्दस्तथा परे ।।६०।।**

**अर्थ :-** ज्या प्रमाणे मडके हे केवळ मातीचे एक नांव आहे. कुण्डल हे केवळ सोन्याचे एक नांव आहे किंवा शिंपल्या मध्ये चांदी हा भ्रम आहे. त्याच प्रमाणें जीव हा शब्द ब्रह्माच्या एका नांवा व्यतिरिक्त अन्य काहीही नाही. ।।६०।।

**विवरण :-** भगवान श्री आद्य शंकराचार्य या श्लोकातही निरनिराळी उदाहरणे घेऊन आत्मस्वरुपात जीवत्व कसे नाही हे सांगताहेत. जीवत्व हा एक शब्द मात्र आहे आणि शब्दाची गति, स्थिति आत्मरुपात नाही. जिथे परा, पश्यन्ति, मध्यमा व वैखरी या वाणींची पोच आत्मस्वरुपात नाही तेथे शब्दाची काय असणार ? ज्या प्रमाणे माठ हे केवळ मातीच्या आकाराचे नाव आहे. मातीपासून माठ, मडके, परळ, खुजा, घागर इत्यादी निरनिराळ्या आकाराची भांडी बनविली जातात. या आकारांना ओळखण्यासाठीच त्यांना निरनिराळीं नावे दिली जातात. त्याच प्रमाणे सोन्याचे अनेक आकार म्हणजे दागिने. कुंडले, हार, मुदी, नथ, कंकण इत्यादी. सोने तर एकच आहे आकार निरनिराळे बनले. या आकारांना ओळखण्यासाठीच त्यांना निरनिराळी नांवे आहेत. त्याच प्रमाणे शिंपला आतून चांदीसारखा चमकतो व पाहाणाराला वाटते की त्यांत चांदी आहे. हा पाहाणाऱ्या व्यक्तीला अज्ञानामुळे भ्रम होतो. त्याच प्रमाणे जीव हा शब्द म्हणजे ब्रह्माच्यास्वरुपात केवळ एक नाम मात्र आहे. एका नामा व्यतिरिक्त अन्य काहीही नाही. ब्रह्मात वा परमात्म्यात जीवाचा असा कोणताही आकार नाही. जीवत्व केवळ भ्रम मात्र आहे. श्री विद्यारण्य स्वामी आपल्या दीपिका भाष्यात म्हणतात -

**'रजतस्य ख्यातिराख्या, नामेति यावत् । परे परे परब्रह्मणि जीव शब्दस्तथा ।'**

शिंपल्या मध्ये चांदी (एक नाव) हा जसा भ्रम आहे, त्याच प्रमाणे जीव हा शब्द म्हणजे ब्रह्माच्या एका नावा व्यतिरिक्त अन्य काहीही नाही.

।। हरि ॐ तत् सत् ।।

## (६१) पर ब्रह्मांत विश्व भ्रममूलक आहे -

**श्लोक :-** **यथैव व्योम्नि नीलत्वं, यथा नीरं मरुस्थळे ।**
**पुरुषत्वं यथा स्थाणौं तद्वद्विश्वं चिदात्मनि ||६१||**

**अर्थ :-** आकाशातील निळेपणा, वाळवंटाच्या मृगजळातील पाणी, आणि अंधारात खांबामध्ये भासलेला पुरुष, ही सर्व जशी भ्रममूलक आहेत, त्याच प्रमाण चेतन आत्म्यात हे विश्व भ्रम मूलक प्रतीत होत आहे. (दिसत आहे.) ||६१||

**विवरण :-** आकाशाला कुणीही निळा रंग दिलेला नाही. तरी पण ते आपणास निळ्या रंगाचे दिसते. आकाशाचा निळा रंग आपणांस-पाहाणाऱ्यास होणारा निव्वळ भास आहे. त्याच प्रमाणे उन्हाळ्यात वाळवंटात दूरवर पाणी आहे असा भास होतो. मृग म्हणजे हरिण त्याला ते पाणीच आहे असे वाटते म्हणून तेथे ते धावत जाते. त्याची निराशा होते. अशा वाळवंटातील भ्रममूलक दिसणाऱ्या पाण्याला मृगजळ म्हटले जाते. हा दृष्टिभ्रम केवळ हरणांनाच होतो असे नाही तर माणसांनाही तो होत असतो. त्याच प्रमाणे, अंधुक प्रकाशात दूरवर लाकडाचा उभा खांब दिसतो, तो कुणी पुरुषच आहे वा भूत आहे असा दृष्टिभ्रम होतो. वास्तविक तेथे तसे काही नसते. जवळ गेल्यानंतर तो लाकडाचा उभा खांब आहे हे स्पष्ट होते.

आकाशाचा निळा रंग, वाळवंटातील मृगजळ व अंधारातील उभ्या खांबात दिसणारा पुरुष हे सर्व जसे भ्रममूलक आहेत, त्याच प्रमाणे या विश्वात - जगात, प्रपंचात, संसारात-आपणांस दिसणारे अनेकानेक आकार, रुपें, वस्तु, पदार्थ, प्राणीमात्र या चेतन अद्वितीय आत्म्यात वा ब्रह्मात, सर्वथा विपरीत, भेदपूर्ण, जड जगत् त्या आत्म्याच्या वा परब्रह्माच्या अज्ञानामुळे सत्य भासते. वास्तविक हे सर्व भ्रम स्वरुप, भासमान आहे.

|| हरि ॐ तत् सत् ||

## (६२) परब्रह्मांत - विश्व भ्रम - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **यथैव शून्ये वैतालो गन्धर्वाणां पुरं यथा ।**
**यथाकाशे द्विचन्द्रत्वं तद्वत्सत्ये जगत्थितिः ॥६२॥**

**अर्थ :-** जसे शून्यात म्हणजे उजाड जागी वेताळ (छाया पुरुष) भासतो, स्वर्गात गंधर्व नगर, आकाशांत दृष्टिदोषामुळे दोन चंद्र भासतात. त्याप्रमाणे सत्यतत्त्वांत (परब्रह्मात) जगाचे अस्तित्वही खोटे आहे. ॥६२॥

**विवरण :-** अंधारांतून एकटे ओसाड रानातून जात असतांना अचानक एखाद्या प्राण्याचे ओरडणे वा पक्ष्याचे फडफडणे ऐकून तर मनुष्य दचकून उठतो व कुणी भूत तर नाही ना ? असा भ्रम होतो. अशा वेळी एखाद्या झाडाचे पान जरी डोक्यावर पडले, तरी घाबरुन भूतानेच डोक्यावर हात ठेवला असा भ्रम होतो. वास्तविक तेथे भयाचे वा भूताचे काहीही अस्तित्व नसताना खोटा भास होतो. त्याच प्रमाणे आकाशात ढगाकडे पहात असताना तेथे एखाद्या सुंदर नगरीची रचना झालेली दृष्टीस पडते. छोटी मोठी घरे, त्यातून जाणारे रस्ते, प्रकाश, अंधाराचे झरोके, अशा अनेक गोष्टी दिसतात. आकाशात जणु गंधर्व नगर वसले आहे असा भास होतो. तसेच काही वेळा आपल्या दृष्टि दोषामुळे, एकच चंद्र प्रकाशित असताना, दोन चंद्र आहेत असे भासते. हा दृष्टिभ्रम आहे. असे पाहाणाऱ्याच्या ध्यानात येत नाही. त्याच प्रमाणे या बाह्य जगाकडे पहात असताना, जगातील असंख्य नाम रुपात्मक गोष्टी दिसत असतात. प्रपंच आणि संसार यांचा पसारा, यातील विविध घटना, प्रसंग व नाना प्रकारची कर्मे पाहून हे सर्व खरेच आहे असा भ्रम होतो. वास्तविक हे सर्व त्या शुद्ध-सत्य, परमात्मस्वरुपात काहीही नाही. त्यात द्वैताचा थोडाही अंश नाही. ते आत्मतत्त्व पूर्णपणे अद्वैतात आहे. अशा या शुद्ध आत्मतत्त्वात, भासणारे हे जग म्हणजे केवळ भ्रममात्र आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (६३) परब्रह्मात विश्व वा जग भ्रम स्वरुप आहे - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **यथा तरङ्गकल्लोलैर्जलमेव स्फुरत्यलम् ।**
**पात्ररुपेण ताम्रं हि ब्रह्माण्डौधैस्तथात्मता ॥६३॥**

**अर्थ :-** ज्या प्रमाणे तरंग कल्लोळात पाणीच खेळते, जसे भांड्याच्या रुपांत तांबेच दिसते, त्याच प्रमाणे आत्मतत्त्वांमध्ये ब्रह्माण्डाचा ओघ दिसतो. (आत्माच ब्रह्माण्ड रुप आहे.) ॥६३॥

**विवरण :-** जलाशयांत वा जलप्रवाहांत अनेक लहान मोठ्या लाटा उसळतात, पाण्याचे तरंग, भोवरे, सरपटणे इत्यादी विविध आकारांत केवळ पाणीच असते. त्या खळखळ वाहात्या पाण्यावर अनेक बुडबुडे, फेसाळ वलये निर्माण होतात, पाण्याचेच हे विविध आकार, विविध प्रकारची रुपें पाहाताना, त्यात पाण्याशिवाय अन्य काहीही नसते. तसेच तांब्याची अनेक आकाराची लहान मोठी भांडी, वस्तु, खेळणी आपण पहातो. घंगाळ, तांब्या, फुलपात्र, थाळी, ताम्हण इत्यादी अनेक प्रकारची भांडी तांब्यापासून बनवितात. या सर्व लहान मोठ्या आकारातील वस्तूंमध्ये जसे केवळ तांबेच असते. त्याच प्रमाणे एकमेवाद्वितीय सत्यस्वरुप असे आत्मतत्त्वच या जगात अनेक नाम, रुप, आकारांनी व्यक्त होत असताना दिसून येते. अनेक रंगाची लहान मोठी माणसे, स्त्रिया, बालके, प्राणी, पशु, पक्षी, फुलपाखरे, कीटक, मुंग्या, मुंगळे इत्यादी कितीतरी जीव-जीवाणु अनेक नाम, रुपे, आकार घेऊन व्यक्त होतात.

हे सर्व विश्व त्या परब्रह्मांतून साकार झालेले आहे. या विश्वात, सृष्टीच्या विविध रचना, पर्वत, टेकड्या, नद्या, नाले, तलाव, समुद्र इत्यादी सर्व त्या ब्रह्मातून अभिव्यक्त होणारी रुपें आहेत. अर्थात् भासणारे हे विश्व, जग खरे नाही. त्यात अनेक घडामोडी नित्य होताना दिसतात. हे सर्व परिवर्तनशील, बदलणारे आहे. ब्रह्मस्वरुपात काहीही बदल नाही. ते अखंड शाश्वत, चिरंतन सत्-तत्त्व आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (६४) परब्रह्मात हे विश्व भ्रम रुप आहे - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **घटनाम्ना यथा पृथ्वी पटनाम्ना हि तन्तवः ।**
**जगन्नाम्ना चिदाभाति ज्ञेयं तत्तदभावतः ॥६४॥**

**अर्थ :-** ज्याप्रमाणे घट (घागर) नांवाने पृथ्वी म्हणजे मातीच आहे. पट म्हणजे वस्त्र नांवाने तंतु (धागे-सूत) ओळखले जातात, त्याच प्रमाणे जगाच्या त्या त्या रुपांतही चित्-सत्ताच आहे. नांव-रुपें सोडून त्याला जाणावे. ॥६४॥

**विवरण :-** श्लोक क्रमांक ६० ते ६४, पर्यंत अनेक दृष्टांताच्या, उदाहरणाच्या साहाय्याने भगवान श्री आद्य शंकराचार्य, विश्व, जग, सृष्टि, प्रपंच व संसार या अनेक नावांनी दिसणारे दृश्य, हे परब्रह्मात भासमान होणारे भ्रम आहेत, असे सांगत आहेत.

या श्लोकांत पुन्हा, मातीच्या घटाने जशी सर्व मातीच असते. घट हा त्या मातीचा आकार आहे व तो आकार सोडला, तर सर्व मातीच ना. श्रुति ही तेच सांगते - **'वाचारम्भणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् ।'** घट या नावाने मातीच असते. तसेच वस्त्र, पट म्हणजे अनेक तंतूचा समुदाय, सूताचे धागे होत. तसेच जगाच्या अनेक नाम, रुपांत, आकारांत ती चित् सत्ताच आहे. या जगांतील नाम रुप आकारांतून दिसणाऱ्या वस्तूंना ना कोठे वेगळे स्थान, ना वेळ, ना वेगळे रुप ना वेगळे गुण, न वेगळे धर्म ना वेगळे वजन असते. त्यांचे अस्तित्व त्या परब्रह्म तत्त्वात आहे ते अस्तित्व सोडले तर सगळे ब्रह्मच आहे. ब्रह्मात भासणारी ही विश्वाची अनेक दर्शने भ्रममूलक आहेत. आम्हाला हा जो संसार वा प्रपंच दृष्टिगोचर होत आहे, त्यात आम्ही जेथे बसून पहात आहोत त्या स्थानाचे महत्त्व आहे. आम्ही शरीरात बसून पहात आहोत, म्हणून तो संसार खूपच अफाट दिसून येतो. आम्ही लहान, संसार मोठा झाला. 'मी' स्वतःला देह समजलो की, आमचे वय फार तर ५० - १०० वर्षांचे होईल व या संसाराने आयुष्य कोटी वर्षे होईल. 'मी' देहस्वरुप, साडे तीन हाताचा, तर विश्व कोटी कोटी मैल पसरलेले. म्हणजे माझ्याहून हे दिसणारे

सारे जग फारच मोठे व विशाल आहे असे वाटते. परंतु तू देह नाहीस, तू तर ते चित्-तत्त्व, आत्म-तत्त्व आहेस. तुझ्यातच हे सर्व प्रतीत होत आहे. मी परब्रह्म स्वरुप आहे, हा जगाचे अंग असलेला देह नाही. हा भ्रम गेला पाहिजे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (६५) सर्व व्यवहार ही ब्रह्ममयच आहे.

**श्लोक :-** सर्वोऽपि व्यवहारस्तु ब्रह्मणः क्रियते जनैः ।
अज्ञानान्न विजानन्ति मृदेव हि घटादिकम् ।।६५।।

**अर्थ :-** ज्याप्रमाणे मातीचा माठ वा मडके वापरत असतांना, त्यांना माती समजत नाहीत. त्याच प्रमाणे आपण सर्व लोक आपला सर्व व्यवहार ब्रह्मानेच करीत असतो. तथापि अज्ञानामुळे ते आपणांस कळत नाही. ।।६५।।

**विवरण :-** आपल्या देहांत व देहा बाहेरही सर्व ब्रह्माण्डामध्ये, ते परम श्रेष्ठ, आदितत्त्व, परब्रह्मच-आत्मतत्त्वच परिपूर्ण, भरगच्च भरलेले आहे. त्याच्या शिवाय अन्य दुसरे काहीही नाही. आपली सर्व क्रिया-कर्मे, सारे व्यवहार, त्या ब्रह्मांत वा आत्मतत्त्वांतच चाललेले असतात. ब्रह्मांत राहून, ब्रह्माने, ब्रह्माशी सारे व्यवहार करीत असतो. तथापि मी ब्रह्म आहे, मी ब्रह्मात आहे आणि ब्रह्मानेच ब्रह्माशी क्रिया-कर्मे, सारे व्यवहार करीत आहे, हे त्या ब्रह्माचे अज्ञान असल्यामुळे समजत नाही. जसे एखाद्या मातीच्या भांड्याच्या उदाहरणार्थ माठ, मडके, परळ इत्यादी वापरत असताना, ही भांडी म्हणजे सर्व मातीच आहे असे ध्यानात येत नाही, म्हणजे कळत नाही.

सकाळी झोपेतून उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण आपल्या इंद्रियांनी असंख्य क्रिया-कर्मे करीत असतो. स्नान-संध्या, पूजा-अर्चा, पोथी-पुराण, घरातील व बाहेरील व्यक्तीशी संवाद-विवाद, घेणे-देणे, खान-पान, गरजेच्या वस्तु विकत वा उधार आणणे, पै-पैसा मोजून, हिशोब ठेवणे, अशा व्यवहाराच्या असंख्य गोष्टी आपण करीत असतो. पण असे कधीं ध्यानात येते का ? मी ब्रह्म आहे, इतरही सर्व ब्रह्मच आहेत. आमच्या व्यवहाराच्या ज्या असंख्य गोष्टी आम्ही केल्या, त्या सर्व ब्रह्ममय होत्या. जो सारा व्यवहार झाला, तो ब्रह्माशीच झाला, ब्रह्मांतच झाला. असे आमच्या ध्यानात का येत नाही ? जर सर्वच ब्रह्म आहे, तर झालेला व्यवहार, क्रिया-कर्मे ब्रह्ममय होती, ब्रह्मांतच घडली. हे न कळण्याचे कारण म्हणजे ब्रह्म, आत्मा, चित् तत्त्व, याचे अज्ञान आहे. मी

आणि ही सर्व सृष्टी, सर्वच ब्रह्म असून, माझ्या 'मी' च्या स्वरुपांत ते अभिव्यक्त होते. हा 'मी' जर कळला नाही तर या सृष्टीतील आत्मतत्त्व, ते ब्रह्मही कळणार नाही. प्रपंचातील आमची बंधने व सुटका - मोक्ष, आमच्या भाव भावना, आमचे विचार, त्या परमात्म्या व्यतिरिक्त दुसरे काहीही नाही. ब्रह्माशिवाय येथे इतर काहीही नाही.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (६६) ब्रह्मांत कार्य - कारणत्व

**श्लोक :-** **कार्यकारणता नित्यमास्ते घटमृदोर्यथा।**
**तथैव श्रुति युक्तिभ्यां प्रपञ्चब्रह्मणोरिह ॥६६॥**

**अर्थ :-** जसे घट (घागर) नित्य कार्य आहे व माती नित्य कारण आहे. तसे जग आणि ब्रह्म (प्रपंच आणि ब्रह्म) यामधील कार्य कारण नित्य असून तो संबंध श्रुति आणि युक्तिवाद यांनी प्रस्थापित केलेला आहे. ॥६६॥

**विवरण :-** हे सर्व ब्रह्मच आहे, असे कुणी सांगितले, तर माझाही या गोष्टीवर विश्वास आहे असे म्हणणे म्हणजे, ब्रह्मासंबंधी वा आत्म्यासंबंधी ज्ञान झालें असे होत नाही. विश्वास, श्रध्दा आपला संशय, शंका दूर करेल अज्ञान जाणार नाही. अज्ञान जाण्यासाठी त्या ब्रह्माचे वा आत्म्याचे ज्ञान व्हावयास हवे. ज्ञानाशिवाय अज्ञान नष्ट होत नाही.

भगवान श्री आद्य शंकराचार्य माती आणि मातीची घागर (घट) याचे उदाहरण घेऊन या ब्रह्माचे व प्रपंचाचे स्वरुप स्पष्ट करीत आहेत. **'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या.'** ब्रह्म सत्य व जग, हा प्रपंच मिथ्या आहे. हे सत्य, माती आणि घटाच्या उदाहरणाने सिद्ध करीत आहेत. जेव्हा घडा बनविलेला नव्हता, तेव्हा ही मातीच होती. घडा बनल्यानंतर घड्यात सर्व मातीच आहे. घडा फुटला तरी मातीच, माती असते. मातीच घडयाचे कारण आहे. घडा कार्य आहे. कार्यांत कारण अनुगत असते. कार्यात नाम, आकार, रुप येते तें कारणाहून भिन्न भासते. घड्याचे नाम व आकार हे मातीत कल्पित असते. तें बदलणारे असू शकते. पण माती बदलत नाही. ती नित्य व सत्य असते. **'मृत्तिकेत्येव सत्यम्।'** असे श्रुति ही सांगते. त्याच प्रमाणे या अखंड, अविनाशी, एकमेवाद्वितीय अशा ब्रह्मात हे जग, हा प्रपंच अध्यारोपित म्हणजे मिथ्या आहे.

जग वा प्रपंच मिथ्या आहे याचा अर्थ खोटा, असत्य असा नव्हे. तर परिवर्तनशील, बदलणारा, असा आहे. ज्या अर्थी हे विश्व ब्रह्मापासून निर्माण झालेले आहे, त्या अर्थी ते ब्रह्माशिवाय अन्य काहीही असू शकणार नाही. या

विश्वाच्या कणा कणात सर्वत्र ते ब्रह्मच भरुन राहिले आहे. हे सत्य श्रुति, तर्कशास्त्र, सद्सद् विवेकबुद्धि, धर्मशास्त्र यांच्या आधारे आपण या निष्कर्षाप्रत आलो आहोत. छांदोग्य उपनिषद म्हणते - **'सर्वं खल्विदं ब्रह्म।'** खरोखर हे सर्व ब्रह्मच आहे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (६७) ब्रह्मांत कार्य - कारणत्व (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **गृह्यमाणे घटे यद्वन्मृत्तिका भाति वै बलात् ।**
**वीक्ष्यमाणे प्रपञ्चेऽपि ब्रह्मैवाभाति भासुरम् ॥६७॥**

**अर्थ :-** मडके हातात धरुन पाहात असतांना, प्रकर्षाने मातीच पहात असतो. त्याच प्रमाणे या प्रपंचाकडे पाहात असतांना, त्या रुपांत प्रकाशमान ब्रह्मच भासमान होते. ॥६७॥

**विवरण :-** मडके वा घट (घागर) हे मातीचे कल्पित रुप आहे. त्याचा आकार व नाम, हे मूळ मातीत नाही. त्याच प्रमाणे या जगांतील अनेक पदार्थ, वस्तु, विषय किंबहुना हे सारे विश्व, परब्रह्मांतून प्रगटलेले आहे. त्या परबह्मांत असे अनेकत्व, विविधत्व नाही. ते तर परिपूर्ण एकरस, अद्वितीय, अद्वय असे आहे. वास्तविक या अनेक विषयांमधून ते अभिव्यक्त होत असते. आपले शरीर व इंद्रिये यांच्याद्वारे आपण अनेक विषयांचे सेवन करतो. बाजारात अनेक भाज्या घेतांना गाजर, मुळा, काकडी, टमाटे, वांगी इत्यादी आपल्या इच्छेनुसार घेतो. आपल्या आवडीप्रमाणे खातो. खाद्य पदार्थ म्हणून त्याला 'भाजी' असेच म्हणतो. पण त्यातील प्रत्येकाचे आकार, रुप, नाम, चव भिन्न भिन्न असते. या भिन्न भिन्न चवींमुळेच त्यांना निरनिराळी नावे आलेली आहेत. आवड, चव, रुचि हे त्या आत्मचेतनेतून आलेली असते. तथापि खाताना हे आपणांस कळत नाही. गाजर, काकडी, मूळा यांच्या रुचि वा आवड जीभेला कळतात. तेव्हा जीभच मुख्य आहे असे आपण गृहीत धरतो. पण जीभेला ही रुचि, चव घेण्याची शक्ति कुणी दिली ? मेलेल्या माणसाच्या जीभेला ही चव समजेल का ? तर नाही. मग शेवटी त्या आत्मचैतन्याकडेच, ब्रह्माकडेच यावें लागते. तो आत्मा - ते ब्रह्मच या सर्व गोष्टींचे मूळ आहे. त्या आत्मज्ञानाशिवाय या प्रपंचातील कोणत्याही विषयाचे ज्ञान होऊ शकत नाही. मूळ मातीच जर पाहयची नसेल तर तिच्यात निर्माण झालेला घडा कसा दिसू शकेल ? या जगातील सर्व विषयांचे, पद-पदार्थांचे ज्ञान आत्म्याकडून येते. आपण बुद्धीला

महत्त्व देतो. बुद्धिमुळे, त्या बुद्धीतील ज्ञानामुळे हे सर्व आम्हास समजते असे म्हणतो. तर त्या बुद्धिरुपी इंद्रियात तरी ते ज्ञान कोठून येते ? शेवटी मानावेच लागते की आत्म्यामुळे बुद्धिही ज्ञानवती झालेली आहे. ही ज्ञानवती बुद्धि जगातील, प्रपंचातील अनेक विषयांचे ज्ञान करुन देईल. तथापि ती त्या आत्म्याचे वा ब्रह्माचे ज्ञान करुन देऊ शकत नाही. या वरुन एक गोष्ट स्पष्ट होते; ती ही की, बुद्धिने होणारे ज्ञान लौकिक ज्ञान आहे. लौकिक ज्ञान जगाचे, प्रपंचाचे ज्ञान आहे. आणि ते नश्वर, नाशवान आहे. देह संपताच ते ज्ञानही नष्ट होते. तात्पर्य लौकिक ज्ञान म्हणजे खरे ज्ञान नव्हे. ते माहिती देणारे असते. तसे 'आत्मज्ञान' नाही. ते शाश्वत, चिरंतन नित्य असणारे ज्ञान आहे. ते आत्म्यासारखेच अखंड, अक्षय, सत्य ज्ञान आहे.

आपल्या मनांत विषयांची आसक्ति असताना, जो विषय उपभोगित असतो त्याचे मिथ्यात्व कळत नाही. भोग, उपभोगांनी मन अधिकच आसक्त झाल्यामुळे, त्या विषयाची खरी जाणीव, वास्तविकता आपल्या लक्षातच येत नाही. त्यासाठीच अनासक्ति, वैराग्याची आवश्यकता असते. आम्ही प्रपंचात वा संसारात खरे सुख भरलेले आहे असेच समजत असतो. संसारातील विषयांचे सुख हे खरे सुख नसून, तो सुखाचा आभास असतो. खरे सुख, खरा आनंद आपल्या आत, आत्म्यात, ब्रह्मातच भरलेला आहे. बृहदारण्यक उपनिषदात याज्ञवल्क ऋषि आपल्या पत्निला-मैत्रेयिला सांगत आहेत -

**आत्मा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यः मैत्रेयि ।**
**आत्मनो वा अरे दर्शनेन श्रवणेन मत्या विज्ञानेन इदं सर्वं विदितम् ॥**

बृहदारण्यक - (२-४-५)

हे मैत्रेयि ! तो आत्माच पहावा, ऐकावा, मनन व निदिध्यासन करण्यास योग्य आहे. त्याच्या दर्शनाने श्रवणाने, मननाने, विशेष प्रकारे जाणल्याने, हे सर्व जाणले जाते.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (६८) आत्मा दोन प्रकारचा भासतो.

**श्लोक :-** **सदैवात्मा विशुद्धोऽपि ह्यशुद्धो भाति वै सदा ।**
**यथैव द्विविधा रज्जुर्ज्ञानिनोऽज्ञानिनोऽनिशम् ॥६८॥**

**अर्थ :-** ज्याप्रमाणे दोरी (अंधारात) अज्ञानी माणसाला सर्प दिसते. ज्ञानी माणसाला दोरीच दिसते. त्या प्रमाणे सदैव, अज्ञानी माणसाला आत्मा अशुद्ध भासतो तर ज्ञानी माणसाला विशुद्ध भासतो. ॥६८॥

**विवरण :-** एखादा पदार्थ शुद्ध आहे की अशुद्ध आहे, हे पहाणाऱ्याच्या दृष्टीवर, मनावर, बुद्धिवर अवलंबून असते. ही वस्तु-निरीक्षणाची उपकरणे आहेत. ही उपकरणेच स्वच्छ व शुद्ध नसतील तर दिसणारा पदार्थ ही स्वच्छ व शुद्ध दिसणार नाही. साधी गोष्ट आहे की, चष्म्याची काच मळकट, अस्वच्छ असेल तर दिसणारा पदार्थ स्वच्छ दिसू शकेल का ? चष्मा, दृष्टी, मन ही सलग यंत्रणा पाहाण्याचे काम करते. मुख्यत: मनच बेचैन, अस्वस्थ, धुंद, विकारी झालेले असेल तर दृष्टि व चष्मा तरी काय करील ? आणि अशा मनाच्या सोबत दृष्टीही अधु, चष्माही मळकट असेल तर मग दिसणारी वस्तु, पदार्थ स्वच्छ आणि शुद्ध भासेलच कशी ? अर्थात् नाही.

आमच्या देहांत असणारे आत्मतत्त्व अत्यंत शुद्ध, निर्मळ, स्वच्छ, पवित्र असे आहे. आता हे आत्मतत्त्व तर एखादा स्थूल, जड पदार्थ नाही. ते सूक्ष्माति-सूक्ष्म असे आहे. ज्याला चष्मा, दृष्टि, मन इत्यादी उपकरणे पाहू शकत नाहीत. अशा वेळी मनुष्य कल्पना करतो की, देहांत तर आत खूप घाण आहे. मनात तर अनेक विकार व संस्कार आहेत, बुद्धीतही अनेक कुविचार येतात. या सर्वांना आत्म्याचा स्पर्श होतच असणार ना ? ती आत्मचेतना यानाही प्राप्त होतच असणार ना ? मग ते आत्मतत्त्व शुद्ध व स्वच्छ कसे असू शकेल ? असा प्रश्न तेव्हांच उपस्थित होतो, जेव्हा आत्म्यासंबंधी अज्ञान असेल. ज्ञानी, आत्मज्ञानी मनुष्य हे जाणतो की आत्मा या देहात असूनही असंग आहे, तो कर्ता उपभोक्ता नाही. आपल्या हातून होणाऱ्य सर्व प्रकारच्या

कर्मांपासून तो अलिप्त असतो. अशा वेळी तो अशुद्ध वा अस्वच्छ होईलच कसा ? त्याला आपल्या विकारांची, संस्कारांची, विचारांची घाण लागेलच कशी ? अर्थात् नाही. मैत्रायणी उपनिषदांत ऋषि सांगतात -

**स वा एष शुद्धः शान्तः अनन्तः शाश्वतः स्वतंत्रः ।**
**स्वे महिम्नि तिष्ठति शरीरं प्रचोदायिता ॥**

तो आत्मा अत्यंत शुद्ध आहे, शांत आहे, अनंत आहे, शाश्वत आहे व स्वतंत्र आहे. ते आत्मतत्त्व स्वतःच्या महिमेत राहून, या शरीराला प्रेरक बनते.

दोरी तर एकच असते, परंतु तिचे ज्ञान असणाऱ्यास ती दोरीच दिसते. जो दोरीला जाणत नाही. त्या भ्रमिष्ट माणसाला ती सर्प भासते. त्याच प्रमाणे ज्ञानी-तत्त्वज्ञानी मनुष्याला आत्मा भासतो परंतु अज्ञानी माणसाला तो अशुद्ध भासतो.

वास्तविक आत्मस्वरुपांत कोणतीही घाण नाही, कलंक नाही. कलंक, डाग, घाण तर वस्त्राला लागते. ते वस्त्र म्हणजे देह होय. आत्मा तर अगोदर पासूनच नित्य शुद्ध-बुद्ध-मुक्त आहे. तो आधीही तसाच होता, आताही तसाच आहे व पुढे ही तसाच राहतो. परंतु अशा आत्म्याचे वा ब्रह्माचे अज्ञान असल्यामुळे मनुष्य त्याच्याविषयी अनेक कल्पना करतो वा शंका घेतो. त्याचे हे अज्ञान त्या आत्म्याच्या ज्ञानानेच नष्ट होते.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (६९) आत्मा व अनात्मा भेद मिथ्या -

**श्लोक :-** **यथैव मृण्मयः कुम्भस्तद्वद्देहोऽपि चिन्मयः ।**
**आत्मानात्म विभागोऽयं मुधैव क्रियतेऽबुधैः ॥६९॥**

**अर्थ :-** ज्याप्रमाणे मातीची घागर (घडा) म्हणजे सर्व मातीच असते. त्याच प्रमाणे हा देह सुद्धा सर्व चिन्मय (चित्-तत्त्व) होय. आत्मा आणि अनात्मा हा भेद खरोखरी अज्ञानी माणसांनी निष्कारण निर्माण केलेला आहे.

**विवरण :-** आतापर्यंत आत्मा आणि अनात्मा म्हणजे शरीर यांचे वेगळेपण सिद्ध केले. देह आणि आत्मा भिन्न दाखविण्याचे कारण, देहामध्येच आमचा अहंभाव बसला होता तो देहभाव, अहंबुद्धि, दूर करणे आवश्यक होते. आता देह नि आत्मा एकच तत्त्व आहे, हे सांगत आहेत. जर सर्व ब्रह्मच आहे, ते आत्म-तत्त्वच आहे, त्याच्याशिवाय अन्य काहीही नाही, तर देहही त्याच आत्म-तत्त्वात आला ना. मग देह नि आत्मा यांच्यात भिन्नता राहिलीच कुठे ? सृष्टि जर त्या परमात्म्याची अभिव्यक्ति आहे, तर तात्त्विक दृष्टीने शरीर सुद्धा ब्रह्मात्मकच आहे. अबुध म्हणजे मूर्ख माणूसच असे म्हणतो की, ह्या देहांत आत्मा आहे व देह अनात्मा आहे. भगवान श्रीकृष्ण यांच्या श्री विग्रहात म्हणजे पवित्र देहांत जड व चेतन असा भेद नाही. भगवानच सांगत आहेत-

**बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च ।**
**सूक्ष्मत्वात्तद विज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत् ॥१५॥ अ.१३**

तो आत्मा चराचर सर्व प्राण्यांच्या आत-बाहेर परिपूर्ण असून, चर-अचर सुद्धा तोच आहे. आणि तो सूक्ष्म असल्याने तो परमात्मा अविज्ञेय म्हणजे जाणता येत नाही. तसाच तो अतिजवळ व दूरही स्थित आहे. भगवान असे कधीही म्हणत नाही की मी व माझा देह भिन्न आहेत. कारण ते तर संपूर्ण पंचभूत वा प्रकृतीला आपले स्वरुप पहातात. म्हणून म्हटले गेले आहे की,

**देह देहि विभागोऽयमीश्वरे न प्रवर्तते ।**

म्हणून ईश्वरांत देह व देही (आत्मा) असा भेद नाही. फक्त देहालाच आत्मा

समजणे हे वेडेपणाचे आहे. देहाला 'मी''मी' आत्मस्वरुपाने संबोधणे मूर्खपणाचे आहे. देहाचि भ्रांति 'मी' नाहिशी व्हावी, हेच सांगण्याचे तात्पर्य आहे. जग मिथ्या आहे व ब्रह्म सत्य आहे. म्हणून जगाच्या स्वरुपात जे भासत आहे, प्रतीत होत आहे, ते ब्रह्मच आहे.

**अहं ब्रह्म परंधाम परमं पदम् ।**

हा श्रीमद् भागवत ग्रंथातील सर्व श्रेष्ठ उपदेश आहे. मी च ब्रह्म असून ब्रह्माचे धाम-स्थानही मीच आहे. कार्य-कारण-यात, कार्यांत निरनिराळया रुपात कारणच आलेले असते. जसे मडके, घडा, माठ या मातीच्या भांड्यामध्ये मूळ कारण मातीशिवाय अन्य काहीही नसते. त्यातून माती काढून घेतली, तर कोणत्याही भांड्याचे अस्तित्व राहाणार नाही.

त्याच प्रमाणे हे शरीर म्हणजे दूसरे काहीही नसून ते परमात्म तत्त्व वा चित्-तत्त्व आहे. परंतु या साठी आपली अनुभवाची कक्षा, बुद्धीच्याही अतीत व्हावयास हवी. अतींद्रिय सत्यस्वरुपात गेल्याशिवाय, आत्मा आणि अनात्मा यांचा भेद दूर होत नाही. आपण आपल्या परिपूर्ण अवस्थेला जाणण्यासाठी, ते सत्, चित्, आनंद स्वरुपाचे ज्ञान प्राप्त असणे अत्यावश्यक आहे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (७०) देहालाच आत्मा मानणे - भ्रान्ति

**श्लोक :-** **सर्पत्वेन यथा रज्जू रजतत्वेन शुक्तिका ।**
**विनिर्णीता विमूढेन देहत्वेन तथात्मता ॥७०॥**

**अर्थ :-** अंधुक अवस्थेत दिसणाऱ्या दोरीला साप म्हणून समजले जाते. शिंपल्याला चुकीने चांदी म्हणून समजले जाते. त्याच प्रमाणे, अज्ञानी मनुष्य आत्म्याला चुकीने देह म्हणून समजतो. ॥७०॥

**विवरण :-** या श्लोकाच्या अगोदरच्या श्लोकांत, आत्मा-अनात्मा भेद मिथ्या आहे. सर्व ब्रह्मच आहे. याचा अर्थ देहच आत्मा आहे असे नव्हे. देहसुद्धा आत्मस्वरुपांत भासमान आहे. परंतु देहालाच आत्मा समजून बसणे मूर्खता आहे. हेच पाच श्लोकांच्या द्वारे, दृष्टांताने आचार्य स्पष्ट करीत आहेत.

आपल्याला या सृष्टीत अनेक भास, भासतात. भासमान पदार्थ, प्रत्यक्ष नसतो. तो भ्रांतिजन्य असतो. अंधारात वेडी-वाकडी पडलेली दोरी सर्पाकृति दिसते. दोरीचे ज्ञान न झाल्याने ती सर्पच आहे ही भ्रांति मनात निर्माण होते. तसेच चांदीसारखा चमकणारा शिंपला, चांदीच आहे असा अज्ञानामुळे भ्रम होतो. त्याच प्रमाणे शरीर हे आत्मस्वरुपात भ्रमाने आत्माच आहे, असे चूकीचे मूल्यमापन करुन मूर्ख माणूस, शरीरालाच आत्मा समजतो. मनाने कल्पना केलेली गोष्ट खरीच आहे असे त्याला त्याच्या बुद्धीने सांगितले की अनर्थ घडतो. अचूक विचार करता आला नाही तर त्याला विमूढ- म्हणजे मूर्खच म्हटले जाते. म्हणून मूर्ख मनुष्यच शरीराला आत्मा समजण्याची चूक करतो.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (७१) देहालाच आत्मा मानणे - भ्रान्ति (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **घटत्वेन यथा पृथिवी पटत्त्वेनेव तन्तव: ।**
**विनिर्णीता विमूढेन देहत्वेन तथात्मता ॥७१॥**

**अर्थ :-** जसे कुणी पृथ्वीला - म्हणजे मातीलाच घट (घागर) समजतो. सूताला (तंतूना) च वस्त्र समजतो. याच प्रमाणे विमूढ (अज्ञानी) मनुष्य आत्म्याला देह समजतो. ॥७०॥

**विवरण :-** माती पासून घट बनतो. म्हणून सर्व माती-पृथ्वीला घट समजणे हे बुद्धीचे दारिद्र्य आहे. तसेच सूताच्या धाग्याने वस्त्र बनले आहे. परंतु जर कुणी सर्व तंतू-धागे म्हणजेच वस्त्र आहे असे म्हणणे मूर्खताच नाही का ? त्याच प्रमाणे या शरीरालाच 'मी''मी' म्हणून आत्मा समजणे मूर्खपणाचे आहे. शरीर आणि आत्मा दोघे सारखे नाहीत. शरीर स्थूल, जड तर आत्मा सूक्ष्माति सूक्ष्म चित्-तत्त्व आहे. आत्मा तर देश-काल-वस्तु यांनी अपरिच्छिन्न म्हणजे वेगळा न होणारा, असा अखंड, एकरुपात आहे. तेव्हा शरीर आत्मा कसे होऊ शकेल ? सामान्य, बौद्धिक ज्ञानाने, शरीर जसे दिसेल जसे भासेल. तसे आत्मज्ञानी, ब्रह्मज्ञानी महात्म्याला भासत नाही. ब्रह्मज्ञानी महात्मा सर्वत्र त्या ब्रह्माशिवाय, आत्म्याशिवाय दुसरे काहीही नाही असे पहातो. मग त्याला हे शरीरही ब्रह्मस्वरुपच दिसते. अर्थात् ही सामान्य, लौकिक दृष्टि नाही. सामान्य, बौद्धिक ज्ञानाला आत्मस्वरुपाची ओळख नसल्यसाने, तो शरीरालाच 'मी''मी' म्हणून संबोधित असतो.

भगवान श्री आद्य शंकराचार्यांनी, निरनिराळ्या दृष्टांताच्या आधारे देहाला 'मी' आत्मा समजण्याचा भ्रम दूर करण्याचा स्तुत्य प्रयत्न केलेला आहे. तथापि प्रपंचाच्या प्रवाहात बुडालेल्या सामान्य जीवांना, हे तत्त्वज्ञान कळण्यासाठी त्यांचाही स्वप्रयत्न आवश्यकच नाही का ?

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (७२) देहालाच आत्मा मानणे - भ्रांति (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **कनकं कुण्डेलत्त्वेन तरङ्गत्त्वेन वै जलम् ।**
**विनिर्णीता विमूढेन देहत्वेन तथात्मता ॥७२॥**

**अर्थ :-** सोन्याच्या कुण्डलालाच सोने समजणे, पाण्यावरील तरंगांना (लाटांना)च पाणी समजणे, त्याच प्रमाणे मोहांत पडलेल्या व्यक्तिने देहालाच आत्मा समजणे वेडेपणाचे आहे. ॥७२॥

**विवरण :-** सोन्यापासून कुंडल, हार, नथ, फुली, इत्यादी अनेक अलंकार बनतात. सोन्याला नाम, रुप, आकार देऊन हे अलंकार बनतात. अलंकाराकडे पाहून त्यांनाच सोने म्हणणे, तसेच समुद्रात अनेक तरंग म्हणजे लाटा उसळतात. पाहाणाऱ्याचे लक्ष त्या उसळणाऱ्या लाटांकडे गेले, की तो त्यांनाच समुद्र वा पाणी समजतो. वास्तविक ते तरंग वा लाटा, पाण्याचे अनेक लहान मोठे आकार, रुप व नामे आहेत. त्यांना समुद्र वा पाणी म्हणणे चुकीचे आहे. तो लाटांचा एक प्रचंड खेळ वा क्रिडा असते. त्याला समुद्र वा पाणी म्हणता येत नाही. जेव्हा पाहाणाऱ्याचे लक्ष, ज्या पदार्थापासून वा द्रव्यापासून बनलेल्या नाम, रुप, आकाराकडे असते, त्यावेळी त्या नाम, रुप, आकाराने बनलेल्या विशिष्ट पदार्थाकडे असल्यामूळे केंद्र स्थित् द्रव्य वा पदार्थाला, पाहाणारा विसरुन जातो व जे नाम, रुप आकार दिसतात त्यांना तो मूळ पदार्थ म्हणतो. उदाहरणार्थ दागिन्यांना पाहून, त्यांनाच सोने म्हणणे वा लाटांना पाहून त्यांनाच पाणी वा समुद्र म्हणणे. हे जसे चुकीचे आहे, तसेच शरीर म्हणजेच आत्मा आहे असे समजून त्यालाच मूर्ख माणूस मी मी म्हणत असतो. शरीर आणि आत्मा किती भिन्न व वेगळे आहेत हे त्याला कळत नाही. याचे कारण अज्ञानच आहे. या अज्ञानाला दूर करण्याचा प्रयत्न त्या मुर्ख माणसानेच करावयास हवा. दुसरा मनुष्य त्याचे अज्ञान कसे आहे, तो नेमके कोणत्या वस्तूला काय समजतो, हे त्याने दुसऱ्या शहाण्या माणसाला सांगितले, तर दुसराही त्याला मार्गदर्शन करु शकतो.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (७३) देहालाच आत्मा मानणे - भ्रांति (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **पुरुषत्वेन यथा वै स्थाणुर्जलत्वेन मरीचिका ।**
**विनिर्णीता विमूढेन देहत्वेन तथात्मता ।।७३।।**

**अर्थ :-** लाकडाचा स्तंभ वा स्थाणु हा अंधारांत माणूस समजला जातो, वाळवंटात वाळुवर सूर्य किरणांनी भासणाऱ्या तरंगांना मृगजळ समजतो. त्याच प्रमाणे अज्ञानी मनुष्य शरीरालाच आत्मा समजतो. ।।७३।।

**विवरण :-** या श्लोकांत भगवान श्री आद्य शंकराचार्य दृष्टिभ्रमाची काहीं उदाहरणे घेऊन, शरीर म्हणजे आत्मा नव्हे हे स्पष्ट करीत आहेत. रस्त्याच्या बाजूला अंधारात फिरत असताना, लाकडाचा जाड खांब उभा असलेला जाणारा पहातो. तो खांब अंधारात, एखाद्या चोरासारखा वा भूतासारखा वाटतो. पहाणारा चुकीने त्याला आपल्या कल्पनेप्रमाणे चोर वा भूत समजून घाबरु लागतो. या घाबरण्याच्या स्थितीत त्याची बुद्धि अधिकच कमकुवत होते. आता पळावे की येथे उभे रहावे हे त्याला कळत नाही. पाय भीतीने लटपटू लागतात, अंगात कापरे भरते. आता ते भूत आपणांस झपाटणार अशी कल्पना करुन तो खाली बसतो. डोळे घट्ट लावून घेतो. तोंडाने किंचाळ्या फोडतो. मदतीसाठी इतरांना हाका मारतो. अशा वेळी त्याच रस्त्याने, त्याच वेळी जाणारा एखादा प्रवासी जर त्याच्या जवळ मदतीसाठी धावून गेला, तर तो अधिकच घाबरतो. त्या दुसऱ्या प्रवाशालाही तो भूतच समजतो. त्या प्रवाशाने त्याला शांत करण्यासाठी भगवंताचे नाम घेतले की, मग त्याची भिती कमी होते. व तो शांत होतो.

दुसऱ्या उदाहरणात, आचार्य सांगतात, उन्हाळ्यात भर दिवसा, दूरवर असलेले वाळवंट रखरखीत तापलेले असताना, दूरुन पाहाणाऱ्यास तेथे मृगजळ दिसते. हरणांनाही ते पाणी वाटते म्हणून अशा फसव्या जलाला मृगजळ म्हटले आहे. माणसेही फसतात, तशीच ती हरणेही फसतात.त्यामुळे बिचाऱ्या तहानलेल्या हरणांना तेथे धावत जाऊन निराश व्हावे लागते.

या वरील दोन्ही उदाहरणांनी, आचार्य सांगत आहेत की, मूर्ख माणूस त्याच्या शरीरालाच आत्मा समजून 'मी' 'मी' म्हणत असतो. ही अज्ञानजन्य भ्रमाची स्थिती खऱ्या साधकाला वा भक्ताला येऊ नये, म्हणून आचार्यांनी हा बोध दिलेला आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (७४) देहालाच आत्मा मानणे - भ्रांति (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** गृहत्त्वेनेव काष्ठानि खड्गत्वेनेव लोहता ।
विनिर्णीता विमूढेन देहत्त्वेन तथात्मता ।।७४।।

**अर्थ :-** लाकडाचा ढीग पाहून त्याला घर समजणे, पोलादाचा (लोखंडाचा) तुकडाच खड्ग म्हणजे तलवार समजणे. याप्रमाणे मूर्ख-अज्ञानी मनुष्या कडून देहालाच आत्मा म्हणून समजले जाते. ।।७४।।

**विवरण :-** देह म्हणजे आत्मा, ही अज्ञानी माणसाची वेडगळ समजूत दूर करण्यासाठी, आचार्य या श्लोकांत पुन्हा काही उदाहरणांनी स्पष्ट करीत आहेत. एखादी झोपडी वा घर बांधण्यासाठी, लाकडाच्या दांडया, फळया यांचा ढिग असावा लागतो. त्यातूनच घराला वेगवेगळ्या लाकडांनी तयार करावे लागते. घर म्हणजे लाकडांनी रचना करुन तयार केलेली आकृती होय. लाकडाच्या पडलेल्या ढीगालाच घर समजणे, अथवा एखादी लोखंडाची पट्टी पाहून, ती तलवारच आहे असे मानणे वेडेपणाचे आहे. कारण, तलवारीला एक विशिष्ट आकार असतो. तिला धरायला मूठ असते. तिचे पाते, धारधार असावे लागते. तरच त्या पोलादी वा लोखंडी पट्टीचे तलवारीत रुपांतर होते. केवळ एखादी सामान्य लोखंडी वा पोलादी पट्टी म्हणजे तलवार नव्हे. त्याच प्रमाणे शरीर म्हणजे आत्मा नव्हे.

शरीर हे अनेक अवयवांनी वा इंद्रियांनी बनलेला समूह आहे. त्याची रचना, आकार, रंग, रुप, पाहूनच त्याला शरीर वा देह म्हणतात. आत्म्याला तर कोणताही अवयव वा इंद्रियें नाहीत. त्याला रंग, रुप, आकारही नाही. शरीर जड तर आत्मा अति सूक्ष्म, या दोघांत कोणतेही साम्य नाही. तरीही शरीरालाच आत्मा समजणे हे मूर्खपणाचे नाही का ?

।। हरि ॐ तत् सत् ।।

## (७५) आत्म्यात देह भ्रान्ति -

**श्लोक :-** **यथा वृक्षविपर्यासो जलाद्भवति कस्यचित् ।**
**तद्वदात्मनि देहत्वं पश्यत्यज्ञान योगत: ||७५||**

**अर्थ :-** ज्याप्रमाणे एखादा मनुष्य पाण्यामध्ये वृक्षाचे उलटे प्रतिबिंब पहातो, त्या प्रमाणे अज्ञानी लोक, अज्ञानामुळे आत्म्यालाच देह समजतात. ||७५||

**विवरण :-** एखाद्या तलावाच्या काठी, संथ पाण्यांत, एका वृक्षाचे प्रतिबिंब उलटे दिसते. वृक्ष पाण्यात नाही. तलावाच्या काठावर उभा आहे. त्याचे प्रतिबिंब मात्र पाण्यांत दिसते. एकदा एका सिंहाला खूप तहान लागली. तो पाण्यासाठी खूप इकडे तिकडे धावत होता. त्याला कुठेच पाणी दिसेना. शेवटी त्याला एक विहीर दिसली. तो धावत त्या विहीरीजवळ गेला. विहीरीत पाणी होते. त्याने डोकावून विहीरीत पाहिले. तर त्याला पाण्यांत त्याचेच प्रतिबिंब दिसले. त्याला वाटले की दुसरा कोणी एक सिंह त्या पाण्यांत पडलेला आहे. त्या पाण्यांत पडलेल्या सिंहावर जो जबडा फाडून मोठ्याने ओरडला. त्याबरोबर तो पाण्यांतला सिंहही तसाच ओरडला. आता या बाहेरुन ओरडणाऱ्या सिंहाला भयंकर क्रोध आला. त्या क्रोधाच्या आवेशात तो तहानही विसरला. त्याने त्या पाण्यांतल्या सिंहाला मारण्यासाठी विहीरीत उडी मारली. काय झाले ? तो पाण्यांतला सिंह नाहीसा झाला. कारण तो सिंह नव्हताच, त्याचेच ते प्रतिबिंब होते. बिंब-प्रतिबिंब दोन्हीही नष्ट झाले. कारण अज्ञान !

या कथेतून आपल्या ध्यानांत येते की, हे दिसणारे जग, हा प्रपंच आपल्याच अंत:करणाचे प्रतिबिंब आहे. वृक्षाचे उलटे रुप पाण्यांत प्रतिबिंब रुपाने दिसणे म्हणजे परावर्तन करणाऱ्या पाण्याच्या पृष्ठभागामुळे, हा दृष्टिभ्रम निर्माण होतो. खरा वृक्ष पाहाण्यासाठी आपली दृष्टि प्रतिबिंबापासून काढून घेतली पाहिजे.

त्याच प्रमाणे, या आत्मतत्त्वांत 'मी' आहे. म्हणजे शरीर आहे असे अज्ञानी मनुष्य समजतो. अज्ञानामुळेच गैर समज होतो. शरीर हे आत्म्याच्या

उलट आहे. विरुद्ध आहे. आत्मा-ब्रह्म एकच, आत्मा वा ब्रह्म सर्वव्यापी तर शरीर हे मर्यादित आहे. आत्म्याला जन्म नाही, मरण नाही. शरीराला दोन्हीही आहेत. आत्मा अमर, चित्-स्वरुप तर शरीर नाशवान, जड आहे. असे असतांना, शरीर म्हणजेच आत्मा 'मी' म्हणणे हे अज्ञान आहे. आत्म्यांत देहभाव हीच भ्रांति-भ्रम आहे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (७६) आत्म्यात देह भ्रांति - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **पोतेन गच्छत: पुंस: सर्वं भातीव चञ्चलम् ।**
**तद्वदात्मनि देहत्वं पश्यत्यज्ञान योगत: ॥७६॥**

**अर्थ :-** ज्या प्रमाण नावतून जाणाऱ्या माणसाला सर्वच गतिमान (चंचल) भासत. त्याच प्रमाण मनुष्य, अज्ञानामुळे, आत्म-तत्त्वामध्य देहत्व पाहतो. ॥७६॥

**विवरण :-** जहाजांतून वा एखाद्या नावेतून प्रवास करणाऱ्या माणसाला समुद्राच्या वा नदीच्या काठावरील झाडे, घरे, विरुद्ध दिशेने जात असल्याचे भासते. हाच अनुभव आगगाडीच्या-रेल्वेच्या डब्यात बसलेल्या मनुष्यालाही डब्याच्या खिडकीतून बाहेर पाहाणाऱ्यालाही येत असतो. गाडी वेगात चाललेली असते. डब्यात बसलेले सर्व लोक स्थिर असतात. खिडकीतून बाहेर पाहाणाराही स्थिर बसलेला असतो. तथापि, जवळ दिसणारे वृक्ष, वनस्पति, घरे, भराभर उलट वेगाने धावत आहेत असा दृष्टिभ्रम होतो. आपणांस माहीत असते की, रस्त्याच्या कडेला असलेली झाडे, घरे हालत नाहीत. ती हालत आहेत, मागे पळत, धावत आहेत असा भास होतो.

आपले शरीर, ही जणु एक नाव आहे. शरीर चंचल, हालणारे, डोलणारे असते. परंतु याच शरीरांत असलेला आत्मराज नित्य स्थिर असतो. त्याच्यात कोणतीही हालचाल नाही. धावणे - पळणे नाही. मग अशा आत्म तत्त्वाला शरीर वा देह समजणे ही भ्रामक समजूत आहे. काळाच्या ओघात, ही देहरुपी नौका सतत धावत आहे. भूत-वर्तमान-भविष्य या तीन कालांतून हे शरीर चाललेले आहे. त्या त्या कालातून जात असताना ते बदलत जात आहे. भूतकाळात जैसे होते, तैसे ते आता वर्तमान काळात नाही. आणि भविष्याकडे वाटचाल करतानाही ते आज आहे तसेच उद्याही राहणार नाही. कालाचा हा परिणाम देह स्थितीवर होतच असतो. असे असताना याच देहांत असणारा तो आत्मराज मात्र पूर्णपणे स्थिर असतो. तो जसा होता, तसाच सर्व काळात असतो. त्याच्यावर काळाचा कोणताही प्रभाव पडत नाही. मग अशा

आत्म्याला देह समजणे किती वेडेपणाचेच नाही का ? ज्ञानी आणि अज्ञानी यांच्यात हाच फरक आहे. ज्ञानी-आत्मज्ञानी-शरीराला चंचल मानतो तर आत्म्याला स्थिर समजतो.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (७७) आत्म्यात देहत्व भ्रांति - (विषय पुढे चालू)

**श्लोक :- पीतत्वं हि यथा शुभ्रे दोषाद्भवति कस्यचित् ।
तद्वदात्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगत: ॥७७॥**

**अर्थ :-** ज्या प्रमाणे कावीळ झालेल्या माणसाला शुभ्र (पांढरी) वस्तु सुद्धा पिवळी दिसते. त्याच प्रमाणे, अज्ञानामुळे माणूस आत्म्यात देहत्व पहातो. ॥७७॥

**विवरण :-** दृष्टीत भ्रम-भ्रांति, अज्ञानामुळे होते, तर दोष-बिघाड एखाद्या रोगामुळे होतो. उदाहरणार्थ कावीळ, पीतरोग, पण्डुरोग यामुळे दृष्टीत दोष निर्माण होतो. डोळे व सारे अंग पिवळे होते. त्यामुळे सगळे पांढरे पदार्थ पिवळे दिसू लागतात किंवा डोळ्यावर रंगीत चष्मा घातला तरी पाहाणाऱ्याला, ज्या रंगाचा चष्मा असेल, त्या रंगाच्या वस्तु व इतर पदार्थ दिसू लागतात. यांत दृष्टिचा दोष वा भ्रम नसून पाहाणाऱ्याच्या हौसेखातर, रंगीत चष्म्याने बाहेरील वस्तु वा पदार्थ चष्म्याच्या रंगानुसार दिसत असतात.

त्याच प्रमाणे अज्ञानाच्या चष्म्यामुळे, अज्ञानी माणसाला आत्म्यात देहत्वाची भ्रांति होते. वास्तविक आत्मा आणि देह यांचे स्वरुप फार भिन्न-भिन्न आहे. आत्म-स्वरुपाचे अज्ञानच या भ्रमाचे वा भ्रांतीचे कारण असते.

दृष्टीत निर्माण झालेला दोष, वैद्य वा डॉक्टर यांनी दिलेल्या औषधाने वा उपचाराने बरा होऊ शकतो. तथापि अज्ञान घालविण्यासाठी या वैद्याचा वा डॉक्टराचा ईलाज चालत नाही. ज्ञानाशिवाय अज्ञान नष्ट होऊ शकत नाही. हे अज्ञान दूर करणारा डॉक्टर **सद्‌गुरु** असतो. संत महात्म्यांनी लिहीलेले ग्रंथही हे कार्य करु शकतात. तथापि तेही समजण्यासाठी पूर्वतयारी, पूर्वाभ्यास असणे आवश्यकच असते.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (७८) आत्म्यात देह भ्रांति - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **चक्षुर्भ्यां भ्रमशीलाभ्यां सर्वं भाति भ्रमात्मकम् ।**
**तद्वदात्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगत: ॥७८॥**

**अर्थ :-** जशी एखादी व्यक्ति स्वत: भोवती गरगर फिरते, त्यावेळी तिचे डोळेही गरगर फिरण्याने, तिला आजूबाजूचे दृश्यही गरगर, चक्राकार फिरताना दिसते. त्याच प्रमाणे अज्ञानामुळे मनुष्य आत्म्यामध्ये देहत्व वा देह पाहातो. ॥७८॥

**विवरण :-** खेळत असताना मुले स्वत:भोवती गरगर फिरतात. असे चक्राकार वेगाने फिरत असताना, आजूबाजूची घरे, झाडे, पशु आदीही गरगर फिरताना दिसून येतात. वास्तविक आजूबाजूच्या या फिरणाऱ्या वस्तु स्थिर असतात. फिरणाऱ्याचे शरीर वेगाने फिरत असते. त्याचे डोळेही, दृष्टीही वेगाने शरीरा बरोबर फिरत असते. गति दृष्टीत आहे. आजूबाजूच्या दिसणाऱ्या पदार्थांमध्ये, वस्तूंमध्ये नाही. तथापि दृष्टिच्या गतीमुळे, दोषामुळे अन्य विषय, पदार्थ, वस्तु गतिमान झालेल्या दिसतात.

त्याच प्रमाणे आपले हे शरीर फिरणारे आहे. त्यातील मन चंचल आहे. तसेच बुद्धि विचाराधीन आहे, परंतु आत्मा स्थिर आहे. त्यात फिरणे, चंचलत्व व भावना वा विचार येत नाहीत. तथापि आत्म्याचे हे स्थिरत्व ध्यानी येत नाही. या अज्ञानाच्या योगाने आत्म्यामध्ये देहाचा भ्रम होतो. आत्म्या मध्ये होणारी ही देहत्वाची भ्रांति, त्या आत्म्याच्या ज्ञानानेच दूर होते. सामान्य लौकिक वा वैषयिक ज्ञानाने ही भ्रांति दूर तर होतच नाही, उलट अधिक वाढते. आत्मा व आत्म्याचे ज्ञान या दोन भिन्न गोष्टी नाहीत. शब्द दोन आहेत. तथापि आत्मा व त्याचे ज्ञान हे दोन नाहीत. ज्या प्रमाणे साखर व गोडी, हे दोन शब्द आहेत. तथापि साखर वेगळी व तिची गोडी वेगळी करता येत नाही. साखरेतच जशी गोडी एकरुप झालेली असते, त्याच प्रमाणे आत्म्यांतच त्याचे ज्ञानही एकरुप झालेले असते. म्हणजेच आत्मस्वरुप झाल्याशिवाय आत्म्याचे ज्ञान होत नसते व त्या शुद्ध, अनुभूत ज्ञानानेच अज्ञान नाहिसे होते.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (७९) आत्म्यात देह भ्रांति - (विषय पुढे चालू)

श्लोक :- अलातं भ्रमणेनैव वर्तुलं भाति सूर्यवत् ।
तद्वदात्मनि देहत्वं पश्यत्यज्ञान योगत: ॥७९॥

**अर्थ :-** कोलीत (मशाल) गोल वेगाने फिरविल्यावर सूर्यासारखे वर्तुळाकार तेज भासते. त्याच प्रमाणे मनुष्य, अज्ञानामुळे आत्म्यांत देहत्व पहातो. ॥७९॥

**विवरण :-** सर्व सामान्य माणसाच्या अनुभवातील हे उदाहरण आचार्य सांगत आहेत. कपड्याचा पेटवलेला गोळा दोरीने बांधून खूप वेगाने गरगर फिरविला की, तो सलग एक चक्रच दिसते किंवा कोलित वा मशाल पेटवून तीही वेगाने गरगर फिरविली तर प्रकाशाचे एक वर्तुळ भासते. वास्तविक त्या प्रकाशाच्या वर्तुळात अखंडत्व नाही. पेटलेला गोळा अति वेगाने गरगर फिरत असल्याने, त्याची गति आपल्या दृष्टीने पकडली जात नाही. तीच स्थिति विजेवर फिरणाऱ्या पंख्याची दिसते. वास्तविक पंख्याला तीन वा चारच पाती अलग अलग जोडलेली असतात. परंतु पंखा सुरु करताच, अति वेगामुळे ती पाती आता पूर्वीसारखी निरनिराळी, वेगळी दिसत नाहीत. जणु काय ती पाती एकमेकांना जोडलेली आहेत, त्यांचा एकच आकार आहे, ते तीन वा चारही नाहीत, केवळ एकचक्र, वर्तुळ आहे असे भासते. हा दृष्टिभ्रम आहे.

त्याच प्रकारे, आत्म्याच्या परिपूर्णतेला, त्याच्या अद्वैतस्थितीला, व वृत्तिरहित ज्ञानस्वरुपाला अज्ञानामुळे आम्ही ग्रहण करु शकत नसल्यामुळे, अज्ञानी मनुष्य आपल्या शरीरालाच आत्मा मानतो. आपले शरीर हे भ्रमणशील आहे. ते मनाच्या चंचलत्वाने स्थिर असत नाही. मनामुळे इंद्रियांना चंचलत्व येते. अशा प्रकारे सर्व इंद्रियें अखंड क्रियाशील होत असतात. त्यामुळे शरीरही भ्रमणशील असते. तथापि अज्ञानामुळे आत्मा आणि देह यांच्यातील फरक कळत नसल्यामुळे, अज्ञानी मनुष्य देहालाच आत्मा समजतो.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (८०) आत्म्यात देहत्व भ्रांति - (विषय पुढे चालू)

**श्लोक :- महत्त्वे सर्व वस्तूनामणुत्वं ह्यातिदूरत: ।**
**तद्वदात्मनि देहत्वं पश्यत्यज्ञान योगत: ॥८०॥**

**अर्थ :-** ज्या प्रमाणे सर्व मोठमोठ्या आकाराच्या वस्तु, खुप दूरुन, अंतरातून पाहिल्या असतांना, त्या अगदी लहान दिसतात. त्याच प्रमाणे, मनुष्य अज्ञानामुळे देहत्व पहातो. ॥८०॥

**विवरण :-** खूप अंतरावरुन, दूरवर असलेल्या एखाद्या उंच पर्वताला पाहिले तर तो लहान वाटतो. त्या पर्वताच्या एखाद्या उंच शिखरावर चढलेला व उभा असलेला गिर्यारोहक एकदम छोटा वा बुटका वाटतो. वास्तविक तो माणूस चांगला उंच व धिप्पाड असतो, परंतु अंतरामुळे त्याचे मोठेपण कळत नाही. साधी गोष्टच घ्या, आकाशात प्रकाशमान सूर्य वा चंद्र किती लहान दिसतो. तथापि तो पृथ्वीवरुन जसा दिसतो, त्याच्या पेक्षां लाखोपटीने तो मूळात मोठा असतो. आकाशात दिसणारे रात्रीच्या वेळी चमकणारे ग्रह, तारे आपणांस खूप लहान लहान दिसतात. ते आपल्यापासून कोट्यावधी मैल दूर आहेत. या अंतरामुळे त्यांचा मूळचा आकार आपणास कळत नाही. देश व काल यांच्या विस्तीर्णतेमुळे आपणांस अनेक दृष्टिभ्रम होतात. आपणांस होणारी ही भ्रांतदर्शनें, आपणांस मूळ सत्यस्वरुपाची जाणीव होऊच देत नाहीत.

त्याच प्रमाणे आपल्याच देहांत असणारा हा देहाच्या उपाधीमुळे देहच भासतो. वास्तविक त्या आत्म्याचे सत्य स्वरुप न कळल्यामुळे, म्हणजेच अज्ञानामुळे त्या आत्म्यात देहत्वाची भ्रांति होते.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (८१) आत्म्यात देहत्वाची भ्रांति - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **सूक्ष्मत्वे सर्ववस्तूनां स्थूलत्वं चोपनेत्रत: ।**
**तद्वदात्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगत: ॥८१॥**

**अर्थ :-** सूक्ष्मदर्शक यंत्रासारख्या उपनेत्रांतून पाहिलेल्या सर्व बारीक वस्तू आकाराने मोठ्या झालेल्या दिसतात. त्याच प्रमाणे मनुष्य आपल्या अज्ञानामुळे, आत्म्यामध्ये देहत्व पहातो. ॥८१॥

**विवरण :-** सूक्ष्मदर्शक यंत्र वा जाड भिंग यांतून पाहिले असता, अत्यंत लहान, बारीक, वस्तु मोठ्या होऊन दिसतात. अणुतुल्य कण, परमाणुस्वरुप कीटक यांना आपली इंद्रिये बघु शकत नाहीत. आमच्या इंद्रियांची वस्तु जाणण्याची काही क्षमता असते. त्या क्षमतेच्या पलिकडे असणाऱ्या अत्यंत लहान वस्तु, बारीक कण, धुलिकण आम्ही पाहू शकत नाही. आमच्या डोळ्यांना वा दृष्टीला त्या पदार्थांचे यथार्थ रुप दिसू शकत नाही. आकाशातील रात्रीच्या वेळीं अत्यंत लहान असलेले ग्रहगोल, नक्षत्रे पहाण्यासाठी खगोल शास्त्रज्ञांना दुर्बिणीतूनच पहावे लागते. तरच त्या ग्रह गोलाचे स्थान, आकार, रुप निश्चित जाणता येते.

आपली इंद्रियें जे काही दाखवितात, त्यांत काल, देशाचे अंतर आणि वस्तूंचा आकार या गोष्टींचा संबंध असतो. वस्तूचे सत्यस्वरुप जाणण्यासाठी दृष्टीची शक्ति अपुरी पडते. अशा वेळी दुर्बिण, भिंग दृष्टीला साहाय्य करतात. तसेच डोळ्यांची शक्ति वयाप्रमाणे अधु होत जाते वा दृष्टिदोष निर्माण होतो. त्यामुळे बारीक अक्षर वाचता येत नाही. त्यासाठी दृष्टिदोष दूर करण्यासाठी योग्य तो चष्मा घेऊन वाचावे लागते.

आत्मा अति सूक्ष्म व अंतर्बाह्य सर्वव्याप्त असूनही तो आपल्याला दिसत नाही. त्याला पाहण्यासाठी आपल्याजवळ कोणतेही सक्षम इंद्रिय नाही. त्यामुळे अज्ञानाने आपल्या देहत्वाचेच स्वरुप आपण आत्म्यांत पहातो.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (८२) आत्म्यात देहत्वाची भ्रांति - (विषय पुढे चालू)

**श्लोक :- काचभूमौ जलत्वं वा जलभूमौ हि काचता ।**
**तद्वदात्मनि देहत्वं पश्यत्यज्ञान योगत: ॥८२॥**

**अर्थ :-** जमिनीवर ठेवलेला काचेचा पृष्ठभाग हा चुकीने पाणी आहे असा भ्रम होतो किंवा पाण्याचा स्थिर पृष्ठभाग चुकीने काच आहे असे वाटते. त्याच प्रमाणे मनुष्य अज्ञानाच्या योगाने आत्म्यामध्ये देहत्वाची भ्रांति घेतो. ॥८२॥

**विवरण :-** या श्लोकात, भगवान श्री आद्य शंकराचार्यांनी दृष्टीभ्रमामुळे आत्म्यांत देहत्वाची भ्रांति कशी होते हे समर्पक उदाहरणाने स्पष्ट करुन सांगितले आहे. जमिनीवर ठेवलेल्या काचेच्या पृष्ठभागाला थोड्या अंतराहून पाहिले तर, त्या ठिकाणी पाणीच आहे असे भासते. तसेच जमिनीच्या पृष्ठभागावर पाणी साचले असेल तर ते काचेप्रमाणे चमकते.

महाभारतात अशीच एक कथा आलेली आहे. मय नावाच्या कुशल दानवाकडून युधिष्ठिराने आपली राजसभा अशी काही चमत्कारिक बनविली होती की, दुर्योधनाला त्या मय सभेत आल्याबरोबर असा भ्रम झाला की, सुकलेल्या भूमीवर पाणी साचलेले आहे. म्हणून त्याने येताना नेसलेले धोतर वर करुन घेतले, अशासाठी की, ते ओले होऊ नये. तथापि तेथे पाणी नव्हते. पुढे गेल्यावर जेथे खरोखरच पाणी साचले होते, ती भूमि कोरडी आहे, असा भ्रम झाला व तो वस्त्र न आवरता, पाण्यात पडला. सारी राजसभा हसली. द्रौपदीही हसली. त्याला, द्रौपदीच्या हसण्याबद्दल भयंकर क्रोध आला होता व पुढे त्याने त्याचा बदला घेतलेला आहे.

जसे मयाच्या रचना कौशल्याने दुर्योधनाची फजिती झाली, तशीच अज्ञानी माणसाची मायेमुळे फजिती होते. अज्ञानाचा प्रभावच असा आहे की, चेतन आत्म्यांत जड देहाचा भास होतो. भ्रम होतो.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (८३) आत्म्यात देहत्वाची भ्रांति - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **यद्वदग्नौ मणित्वं हि मणौ वा वन्हिता पुमान् ।**
**तद्वदात्मनि देहत्वं पश्यत्यज्ञान योगत: ॥८३॥**

**अर्थ :-** ज्या प्रमाणे अंधारात अग्नीची ठिणगी, हे रत्नच आहे असे पाहाणारा समजतो वा एखाद्या चमकणाऱ्या रत्नाला अग्नीची ठिणगी समजतो. त्याच प्रमाणे मनुष्य अज्ञानाने आत्म्यामध्ये देहत्व पहातो. ॥८३॥

**विवरण :-** दृष्टिभ्रमाचे हे चांगले उदाहरण घेऊन आचार्यश्री, आत्मा आणि देहत्व यांच्यातला फरक स्पष्ट करीत आहेत. अंधाऱ्या रात्री थोड्या दूरीवर एक अग्नीची ठिणगी दिसत आहे. हवेमुळे ती चमकत असताना पाहिली की वाटते एखादे लाल रंगाचे रत्नच पडलेले आहे. जवळ जाऊन बघितले, तर ते रत्न नसून अग्नीची लहान लहान ठिणगी आहे. त्याच प्रमाणे, खरोखर अंधुक जागी, रस्त्याच्या कडेला, एक लाल रंगाचे रत्न चमकत आहे. ते जवळ नसल्याने वाटते की, ती एक अग्नीची लहान ठिणगीच पडलेली आहे. परंतु जवळ जाऊन पाहिले, तर ती अग्नीची ठिणगी नसून, ते एक सुंदर लाल रंगाचे रत्न आहे. ठिणगी आणि रत्न दोघांचे बाह्यदर्शन, पाहाणाऱ्याच्या चित्तांत भ्रम निर्माण करतात.

अगदी तशीच भ्रांति आपल्या बुद्धींत निर्माण होऊन, विचारहीन मनुष्य घाई घाईने आपल्या शरीराकडे पाहाताना, हा देहच आत्मा आहे व त्यालाच 'मी' 'मी' म्हणून संबोधित असतो. वास्तविक देह व आत्मा यांच्यात खूप फरक असताना, आत्म्याच्या अज्ञानामुळे, भ्रमाने, आत्म्यांत देहत्व पाहतो. वास्तविक देहत्व म्हणून आत्म्यात काहीही नाही. जे काही सर्व आहे, ते एक आत्मतत्त्वच आहे.

॥ हरि ॐ तत् संत् ॥

## (८४) आत्म्यांत देहत्वाची भ्रान्ति - (विषय पुढे चालू)

श्लोक :- अभ्रेषु सत्सु धावत्सु सोमो धावति भाति वै ।
तद्वदात्मनि देहत्वं पश्यत्यज्ञान योगत: ॥८४॥

**अर्थ :-** धावणाऱ्या ढगामधून चंद्राकडे पहात असताना, चंद्रच धावत आहे असे वाटते. त्याच प्रमाणे मनुष्य अज्ञानामुळे आत्माच देह आहे असे समजतो. ॥८४॥

**विवरण :-** आपले शास्त्रीय ज्ञान काही असो, पण आपण प्रत्यक्ष चांदण्या रात्रीं आकाशाकडे पहात असताना, ढगाच्या मागे चंद्र धावताना दिसतो. खरे तर ती अभ्रे वा ढग वाऱ्यामुळे ढकलली, लोटली जातात. ढगाच्या मागे चंद्र कितीतरी मैल दूर आहे. पण आपल्या डोळ्यांना असे दिसते की, चंद्र अगदी ढगांच्या मागेच असून, तोच धावत आहे. वास्तविक चंद्र स्वत:भोवती व पृथ्वी भोवतीही फिरतो, पण या ढगांच्या संदर्भात हा शास्त्रबोध नसतो. दृष्टीला जे प्रत्यक्ष दिसते तेच खरे आहे. आणि ते म्हणजे ढग धावत नसून त्याच्या पाठीमागे असलेला चंद्रच धावत आहे. हाच दृष्टीभ्रम आहे. ढग धावत असताना, चंद्र धावत आहे असे समजणे म्हणजे डोळ्यांना खोटे ठरविणे आहे. आम्हीं आमच्या बुद्धीच्या वा शास्त्रीय ज्ञानाचा तिरस्कार करुन या इंद्रियांनी, डोळ्यांनी दाखविलेलीच गोष्ट खरी मानतो. इंद्रियांनी विषयभोग घेत असताना सुद्धा, आसक्तीमुळे, कामना, वासनांमुळे बद्ध झाल्याने तो भोग नैतिक आहे की अनैतिक आहे याची शुद्ध काहींना राहत नाही. हे इंद्रिय दौर्बल्य असते म्हणून जो कोणी शरीर, मन आणि बुद्धि यांच्याशी तादात्म्य पावून या उपकरणांच्या माध्यमातून पहातो वा जाणतो, त्याला भ्रमिष्ट असे म्हटले जाते.

आत्मा स्थिर, एकरस, असंग, असा असताना त्याच्या अज्ञानामुळे मनुष्य चंचल, विकारी, नश्वर अशा देहालाच आत्मा समजतो.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (८५) आत्म्यात देहत्वाची भ्रांति - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **यथैव दिग्विपर्यासो मोहाद्भवति कस्यचित् ।**
**तद्वदात्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगत: ॥८५॥**

**अर्थ :-** जसे मोहामुळे वा अज्ञानामुळे दिशांच्या बाबतीत संभ्रम होतो. त्याच प्रमाणे अज्ञानी मनुष्य आत्म्याच्या ठिकाणी देह पाहतो. ॥८५॥

**विवरण :-** एखाद्या गावातील एखाद्या घरात, आपला बराच काळ निवास झाला की त्या गावाच्या, घराच्या, दिशा आपल्या परिचयाच्या होऊन जातात. त्या गावांत एखादे मंदिर, नदी, विद्यालय हे कोणकोणत्या दिशेला आहेत हे आपण बाहेरुन आलेल्या अपरिचित व्यक्तीला बरोबर सांगू शकतो. पण समजा, आपल्यालाच अचानकपणे खूप दूरच्या गावी जाणे झाले व ज्या ठिकाणी आपला निवास आहे, ते ठिकाण गावाच्या कोणत्या दिशेला आहे, हे फोनवरुन कुणाला सांगावयाचे झाल्यास मोठीच अडचण पडते. विशेषत: त्यावेळी सूर्योदय झालेला नसल्यास आपला दिग्भ्रम होतो. सूर्योदयाच्या वेळीं मग हळूहळू दिशांचे ज्ञान होऊ लागते.

एखाद्या मोठ्या जत्रेत, वडिलांचा हात धरुन चालणाऱ्या लहान मुलाचा जर गर्दीमुळे हात सुटला व ते त्या वडिलांना लवकर कळले नाही, तर ते मूल भांबावून कोणत्याही दिशेला धावत सुटते. त्यालाही दिशा भ्रम होऊन घराची दिशा वा वडिलांची जाण्याची दिशा समजत नाही.

दिशांचे संस्कार फार बलवान असतात. तथापि अपरिचित ठिकाणी, अचानक गेल्यानंतर दिग्भ्रम प्रबल होतो व पूर्वीचे संस्कार दबले जातात. त्याच प्रमाणे अज्ञानी मनुष्याची स्थिति होते. अज्ञानामुळे तो शरीरालाच आत्मा समजत असतो.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (८६) आत्म्यात देहत्वाची भ्रांति - (विषय पुढे चालू)

श्लोक :- **यथा शशी जले भाति चञ्चलत्वेन कस्यचित् ।**
**तद्वदात्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगत: ॥८६॥**

**अर्थ :-** पाण्याचा पृष्ठभाग हलत असताना, त्यात पडलेले चंद्राचे प्रतिबिंब, हलत असल्यासारखे दिसते. त्याच प्रमाणे अज्ञानी मनुष्य आत्म्याला देह समजण्याची चूक करतो. ॥८६॥

**विवरण :-** आकाशात रात्री चंद्र प्रकाशित आहे. पौर्णिमेची रात्र आहे. पूर्ण चंद्राचे प्रतिबिंब खाली तलावाच्या स्वच्छ पाण्यात दिसत आहे. अशावेळी पाण्याचा पृष्ठभाग वाऱ्याने थोडासा जरी हालला, तरी ते प्रतिबिंब हालल्या सारखे दिसते. वास्तविक चंद्र तर खूप दूर आकाशात स्थिर आहे. प्रतिबिंब हालले की आपणांस चंद्रच थरथरल्यासारखा दिसतो. पाणी चंचल आहे, त्यामुळे प्रतिबिंब चंचल भासले व त्यावरुन पाहाणाऱ्याने चंद्रच चंचल असल्याची समजूत करुन घेतली. दृष्टिभ्रमाचे हे एक चांगले उदाहरण आहे. एका माकडाची गोष्ट आहे. एका तलावाच्याच काठावर एक मोठा वृक्ष होता. व त्यावर काही माकडें झोपलेली वा बसलेली होती.

अचानक एका माकडाला जाग आली व त्याने खाली पाहिले. तर त्याला चंद्र तळ्यांत पडल्यासारखे दिसले. चंद्राचे प्रतिबिंब तळ्यात पडलेले दिसले तर त्याने चंद्रच तळ्यात पडलेला आहे अशी समजूत करुन घेतली व इतर सर्व माकडांना त्याने जागे केले. तळ्यांतून चंद्राला बाहेर काढावयाचे त्यांनी ठरविले. जी फांदी जलाजवळ गेलेली होती, तिच्याच वर ते सर्व बसले. त्यांनी प्रत्येकाची शेपटी खाली सोडून त्या शेपटीनी प्रत्येकाने तळ्याच्या पाण्यापर्यंत हात पोहचेल अशी शिडीच केली. शेवटी एक माकड तळ्याच्या पाण्यात हात घालून चंद्राला वर काढण्याचा प्रयत्न करत असताना, ओझ्याने ती फांदी काडकन मोडली व सर्व माकडें पाण्यात पडली. डोके वर करुन आकाशाकडे पहातात तो त्यांना आकाशात चंद्र दिसला व ते सर्व आनंदाने

गर्जना करुन म्हणू लागले की, आम्ही चंद्राला तळ्यातून बाहेर काढले.

मांकडांना तळ्यात पडलेले चंद्राचे प्रतिबिंब, खरोखरीचा चंद्रच वाटला. माकड आणि अज्ञानी मनुष्य सारखेच असतात. आत्म्यात अज्ञानामुळे देहाची भ्रांति होते. वास्तविक आत्म्यांत, आत्म्याखेरीज दुसरे काहीही नाही. मग त्यात देह कसा असेल ? तर मुळीच नाही.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (८७) ज्ञानानेच देह भ्रांति - देहाध्यास - जातो.

**श्लोक :-** **एवमात्मन्यविद्यातो देहाध्यासो हि जायते ।**
**स एवात्मा परिज्ञातो लीयते च परात्मनि ॥८७॥**

**अर्थ :-** अशा रीतीने जो पर्यंत आत्मतत्त्व जाणले जात नाही, तोपर्यंत देहाध्यास म्हणजे मी देहच आहे असा ध्यास चालू राहील. (हीच अविद्या आहे) जेव्हा आत्मतत्त्व जाणले जाईल, तेव्हा तो ध्यास परमात्म्यामध्ये विलीन होईल. ॥८७॥

**विवरण :-** आतापर्यंतच्या विवेचनावरुन आपणांस असे समजून आले आहे की, जोपर्यंत आपणांस आत्म्याचे स्वरुप कळत नाही, तो पर्यंत त्या आत्म्याविषयीं चुकीचे ज्ञान उत्पन्न होते. या श्लोकांत 'अध्यास' हा एक नवीन शब्द आलेला आहे. त्याचा अर्थ आहे - अ म्हणजे नाही, ध्यास म्हणजे समजूत. अध्यास म्हणजे जी समज खरी नाही, चुकीची आहे. उदाहरणार्थ, अंधारातील खांब जसे भूत वाटते. वास्तविक तो खांबच आहे पण अज्ञानामुळे चुकीची समजूत भूत आहे अशी करुन घेतली. त्याच प्रमाणे आत्म्याच्या अज्ञानामुळे, आत्म्यावर अध्यारोपण (अध्यास) म्हणजे, आम्ही आत्म्यालाच शरीर समजून वागतो.

अविद्या म्हणजे चुकीचे ज्ञान, यामुळेच आत्म्यांत देहाध्यास होतो. आत्म्याला न जाणणारी उलटी बुद्धि म्हणजे 'मी' शरीर आहे असा विचार करणे. आत्म्यांत मी शरीर, देह आहे हाच अध्यास आहे. आत्म्यांत काहीच नाही मग देह तरी कसा असेल ? शरीराच्या अहंकार, जाँगृति-स्वप्न-निद्रा-या अवस्था, आत्म्यांत नाहीत. अज्ञान, अविद्येमुळे हे सर्व चुकीचे घडत आहे. आत्मज्ञानाने या सर्व गोष्टी नाहिशा होतात. आज जगांत सर्व सामान्य माणसाचे व्यवहार बौद्धिक, लौकिक वा विषयज्ञानानेच होत आहेत. विचार, भावना, कल्पना, वासना यात शरीर, इंद्रिये यांचेच प्रभुत्व आहे. वास्तविक या सर्वांच्या मागे उभे असलेले चेतन आत्मतत्त्व हेच प्रमुख आधारभूत तत्त्व आहे. परंतु त्याचे अज्ञान असल्यामुळे, 'मी' म्हणजे देहच आहे असा ध्यास सुरु राहतो.

## (८८) ज्ञानाने देहाध्यास जातो - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **सर्वमात्मतया ज्ञातं जगत् स्थावरजङ्गमम् ।**
**अभावात् सर्वभावानां देहानां चात्मता कुतः ॥८८॥**

**अर्थ :-** जेव्हा संपूर्ण चराचर जग आत्मस्वरुपच आहे अस ज्ञान झाल, तर सर्व भाव, अभावाच झालेत. मग शरीरात आत्मबुद्धि कशी राहू शकेल ? ॥८८॥

**विवरण :-** सर्व चराचर सृष्टिच आत्मस्वरुप आहे, असा बोध, असे निश्चित ज्ञान झालेले असेल, तर मग आपणांहून भिन्न असा दुसरा कोणी राहू शकेल का ? आपणांहून जे जे अलग वा वेगळे हा भावच अभाव झाला, मग अशा अवस्थेत, 'मी शरीर आहे.' ही बुद्धि तरी कशी राहू शकेल ? अर्थात् नाही.

जगातील प्रत्येक सचेतन व अचेतन, म्हणजे स्थावर व जंगम गोष्ट ही आत्मस्वरुपात, आत्मतत्त्वात आहे. असे ज्ञान झाल्यानंतर, सर्वच भाव अभाव रुप होतात. देह हा स्वतंत्र, आत्मा आहे असे कसे म्हणता येईल ? हा देहही त्या चराचे सृष्टीचेच एक अंग आहे. अशा वेळी तो आत्म्याची जागा कशी बरे घेऊ शकेल ? अर्थात् नाही.

ज्या वेळी, आपण झोपेत एखादे स्वप्न पाहतो, त्यावेळी आपला खरा देह तर अंथरुणांत-बिछान्यांत झोपलेला असतो. मग त्या स्वप्न सृष्टीतील विषयभोग, प्रपंचाचा व्यवहार व अनेक कर्मे कोणत्या देहाने वा देहाच्या इंद्रियांनी करीत असतो ? अशा वेळी स्वप्नातील देह व त्याची इंद्रियें या देह व इंद्रियांहून वेगळी आहेत असे मानणे भाग पडते. कारण स्वप्नात घेतलेले जेवण, त्यातील अनेक पदार्थ कोणत्या हातांनी, कोणत्या तोंडात घातले जातात. पोट भरते, ते कोणत्या देहाचे पोट असते ? तसेच स्वप्नातील विचार, भावना, वासना व कामना या कोणत्या मनाच्या वा बुद्धीच्या आधारावर उत्पन्न होतात ? म्हणून मानावेच लागते की, स्वप्न सृष्टि व त्या सृष्टीतील देह हे भिन्न असतात. परंतु स्वप्नातील देहाशी असलेले तादाम्य स्वप्न जो पर्यंत अस्तित्वात आहे, तोपर्यंतच चालू असते. स्वप्नातील मनुष्य जेव्हा जागा होतो,

तेव्हा स्वप्न अस्तित्वांत रहात नाही. पुन्हा असे बघा की स्वप्नांतील देहांतील आत्मा व खऱ्या झोपलेल्या देहांतील आत्मा वेगवेगळे दोन आहेत काय ? तर मुळीच नाही. तेच आत्मतत्त्व स्वप्नांतही आहे व झोपेतही आहे. आत्म्यांत द्वैत नाही. या विश्वातील सर्व चराचर वस्तु, दुसरे काहीही नसून ते एकमेवाद्वितीय आत्म-तत्त्वच आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (८९) आत्म चिंतन करीत जगणे -

**श्लोक :-** **आत्मानं सततं जानन् कालं नय महातमे ।**
**प्रारब्धमखिलं भुञ्जन्नोद्वेगं कर्तुमर्हसि ॥८९॥**

**अर्थ :-** हे महामतिवान माणसा ! निरंतर आपल्या स्वरुपाचे चिंतन करीत, आणि प्रारब्ध पूर्णत: भोगत असताना जीवन व्यतीत कर. त्यात उद्विग्न होणे उचित नाही. ॥८९॥

**विवरण :- 'अपरोक्षानुभूति'** या ग्रंथातील विवेचनांतून, श्रीमत् भगवद् पूज्यपाद श्री आद्य शंकराचार्यजी या श्लोकांतून, आत्म-चिंतन करणाऱ्या साधकाला, भक्ताला, फार महत्त्वाचा संदेश देत आहेत. साधक-भक्तांनी आपले जीवन कसे जगांवे, आयुष्याचा काळ कसा व्यतीत करावा, याचे सुस्पष्ट मार्गदर्शन केलेले आहे.

**आत्मानं सततं जानन् - कालं नय -** साधक, भक्ताने आपल्या आत्म्याला जाणून काळ घालवावा. यात आत्मा जाणणे म्हणजे निश्चित काय करावे ? कारण आत्मा हा बुद्धीने जाणण्याचा विषय नाही. बुद्धि कितीही प्रगल्भ, विद्यावती असली तरी आत्म्याच्या बाबतीत ती इतर मन, चित्त, अहं यांच्यासारखीच असमर्थ आहे. बुद्धीच्या क्षेत्रात अनेक विचारांचे प्रवाह आहेत. विचारांनी आत्म्याविषयी चर्चा, वाद संवाद करता येतील, शब्दांनीच हे सर्व घडते. पण आत्म्यांत जेथे वाणी सुद्धा पोहचू शकत नाही तेथे शब्द कसे जाणार ? म्हणून आत्म्याला जाणण्यासाठी, म्हणजे अनुभव घेण्यासाठी, आत्म्याच्या अपरोक्षानुभूति साठी दुसराच उपाय शोधला पाहिजे. आणि तो उपाय म्हणजे **गुरु: उपाय:।** गुरु म्हणजे सद्‌गुरुंची प्राप्ति हाच उपाय आहे. श्री सद्‌गुरुंच्या कृपेने-दीक्षेने-शिष्याच्या देहांतील आंतरीक, आत्मशक्ति जागृत होते. शक्ति जागृत झाल्याशिवाय ती ज्ञानाचा उदय घडवून आणू शकत नाही व देह तादात्म्य संपत नाही. आत्मस्वरुपाची उपलब्धी आत्मज्ञानानेच होते. तसे पाहिले तर आत्मज्ञान व आत्मा या दोन वेगळ्या गोष्टी नाहीत. आत्माच

ज्ञानस्वरुप आहे. तोच खरा ज्ञान दाता गुरुही आहे. पांतजल योग सूत्र-१-२६, मध्ये सांगितल्याप्रमाणे -

**"स एष पूर्वेषामपि गुरु: कालेनानवच्छेदात् ।"**

तो आत्मा प्राचीन गुरुंचाही गुरु आहे कारण तो कालाने मर्यादित नाही. शास्त्रही तेच सांगते - **'आत्मा वै गुरुरेक:'** । तो आत्माच एक सर्वांचा गुरु आहे. हे जरी खरे असले, तरी ती आंतरिक कुंण्डलिनी शक्ति-आत्मशक्ति जागृतिसाठी दीक्षेची आवश्यकता असते. ही दीक्षा म्हणजे काय हेही जाणून घेणे अत्यावश्यकच आहे. दीक्षा या शब्दात दी + क्षा ही दोन अक्षरे आहेत. दी म्हणजे देणारी, क्षा = क्षालन करणारी

**ददाति शिव तादात्म्यं क्षिणोतिच मलत्रयम् ।**
**अतो दीक्षेति संप्रोक्ता दीक्षा तंत्रार्थ वेदभि: ॥**
**दीयते परमं ज्ञानं क्षीयते पाप पद्धति: ।**
**तेन दीक्षोच्यते मंत्रे स्वागमार्थ बलाबलात् ॥** विश्वसार शारदातिलक

शिवाशी-आत्म्याशी-तादात्म्य घडवून आणणारी, आणव, कर्मणा, मायिक या तीन मलांचा क्षय करणारी, परम दिव्यज्ञान देणारी, पाप शृंखला नष्ट करणारी, अशी मंत्र शास्त्रांत व आगम शास्त्रांत 'दीक्षा' म्हणून संबोधिली जाते. अशी दीक्षा देणाऱ्या श्री सद्‌गुरुंचे वर्णन वायवीय संहितेत खालील प्रमाणे आहे.

**दर्शनात् स्पर्शनात् शब्दात् कृपया शिष्य देहके ।**
**जनयेद्य: समावेशं शांभवं सहि देशिक: ॥**

अशा सामर्थ्य संपन्न देशिक म्हणजे सद्‌गुरुंच्या कृपेने-दर्शनाने, स्पर्शाने, नाम वा मंत्राने (शब्दाने) शिष्यांत ज्ञानाचा समावेश करुन दिला जातो. शाम्भव, शम्भुपद प्राप्त करुन देणारी अशी ही दीक्षा असते. श्रीमत् भगवद् पूज्यपाद श्री आद्य शंकराचार्यांनी **'सौंदर्य लहरी - आनंद लहरी'** या स्तोत्रस्वरुप ग्रंथात या विषयावर फारच उद्‌बोधक स्तोत्रें लिहीलेली आहेत. या सौंदर्य लहरी व आनंद लहरी या स्तोत्र ग्रंथावर आमचे परम सद्‌गुरु ब्रह्मलीन

**प.पू. श्री विष्णुतीर्थजी महाराज** यांनी हिन्दी भाषेत, फारच उपयुक्त अशी टीका - म्हणजे भाष्य लिहिलेले आहे. ते शक्तिपात मार्गांतील सर्व साधकांनी नित्य अभ्यासात ठेवावे. आत्मशक्ति, कुण्डलिनीचे अति मनोवेधक व सुबोध चित्रण त्यांनी केलेले आहे.

आत्मस्वरुपाची अनुभूति जर साधकाला-भक्ताला सर्वकाळ घ्यावयाची असेल तर त्याने गुरुप्रदत्त साधन अखंड करीत राहिले पाहिजे, साधने व्यतिरिक्त काळात भगवंताच्या नामाचा वा मंत्राचा जप सदैव करीत राहिले पाहिजे. शरीराचा कर्मभोग भोगत असताना दु:खी कष्टी न होता, मनाने सुस्थिर राहून, समोर जे जे येईल त्याचा स्वीकार करीत रहावा. इतरांना आपल्यामुळे त्रास न होईल असे वाचिक, शारीरिक व मानसिक संतुंलन ठेवले पाहिजे. भूतकाळात जे जे घडले ते ते अनुचित, अयोग्य सर्व विसरावे. भविष्याची चिंता, काळजी करु नये. वर्तमानात जगावे. आपल्या साधु-संतांनी लिहीलेले ग्रंथ वाचनात ठेवावेत. त्यांना या अध्यात्माच्या क्षेत्रात कोणकोणते अनुभव कसे कसे आले, ते अनुभव आपल्याही जीवनात येण्यासाठीं काय काय करावे लागेल याचा नीट विचार करावा. केवळ अंधानुकरण नसावे. यासाठी श्री संत तुकाराम महाराजांचे अनुभव योग्य आहेत. ते म्हणतात -

**स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण । अमृताची खूण पाउनियां ॥१॥**
**पुंजाळलें नेत्र जाले अर्धोन्मीलित । कंट सद्‌गदित रोमांच आले ॥२॥**
**चित्त चाकाटलें, स्वरुपा माझारीं । न निघे बाहेरी सुखावलों ॥३॥**
**सुनीळ प्रकाश उदेजला दिन । अमृताचें पान जीवनकळा ॥४॥**
**शशि सूर्या जाली जीवें ओवाळणीं । आनंद दाटणीं आनंदाची ॥५॥**
**तुका म्हणे सुखें प्रेमेसी डुल्लत । विरालों निश्चित निश्चिंतीनें ॥६॥**

आत्मा आपल्या शरीर व इंद्रियांपासून असंग असल्यामूळे तो आपल्या सर्व कर्म क्रियांचा साक्षी आहे. तो कर्मांमुळे निर्माण होणाऱ्या सुख-दु:खाचा भोक्ताही नाही. स्वर्ग-नरक या गति त्याला नाहीत. तो स्वयं परिपूर्ण व एकमेवाद्वितीय असा आहे.

**प्रारब्ध मखिलं भुञ्जन -** आपल्या वाट्याला येणाऱ्या आपल्याच पूर्व कर्मांचा सुख-दु:खांचा भोग, म्हणजे प्रारब्ध भोगत असताना, उद्विग्न न होता काल व्यतीत करीत रहा. प्रारब्ध म्हणजे नशीब वा दैव. मागील देहांत व याच देहांत, या पूर्वी होऊन गेलेल्या कर्मांचा सुख-दु:ख भोग होय. प्रारब्धाने तीन गोष्टी आपल्या वाट्याला येतात. १) जाति २) आयुष्य ३) भोग. जाति म्हणजे चार योनीं पैकी कोणती तरी एक योनी. (१) जारज (२) अंडज (३) स्वेदज (४) उद्भिज. या चार पैकी जारज म्हणजे आता आपल्याला प्राप्त झालेली योनी आहे. या योनीत किती काळ राहणे होईल ते आयुष्य व या आयुष्यात कोणते सुख-दु:खांचे प्रसंग येतील ते उद्विग्न न होता, म्हणजे शांतपणे तटस्थ भावनेने भोगत राहवे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (९०) आत्मज्ञानी महात्म्याच्या प्रारब्धाचे निराकरण -

**श्लोक :-** उत्पन्नेऽप्यात्मविज्ञाने प्रारब्धं नैव मुञ्चति ।
इति यच्छ्रूयते शास्त्रे तन्निराक्रियतेऽधुना ॥९०॥

**अर्थ :-** आत्मज्ञान झाल्यानंतरही प्रारब्ध सुटत नाही. शास्त्राच्या या विधानाचे आता खंडन केले जात आहे. ॥९०॥

**विवरण :-** मागच्या श्लोकांत महामति व्यक्तीने , निरंतर आत्मस्वरुपाचे चिंतन करीत, व प्रारब्धाचे भोग भोगत असताना जीवन व्यतीत करावे, उद्विग्न होऊ नये. असे सांगितले आहे.

आता या श्लोकांत, श्री आद्य शंकराचार्यांनी आत्मज्ञानी महात्म्याला प्रारब्ध असते की नाही ? असा प्रश्न उपस्थित करुन, प्रारब्धाचे निराकरण केलेले आहे. प्रारब्ध म्हणजे भूतकाळात, मागच्या जन्मात, केलेल्या चांगल्या वा वाईट कर्मांचा फळ भोग. चांगल्या कर्मांनी सुख व वाईट कर्मांनी दु:ख येते. अशा सुख-दु:खांचा भोग त्या त्या व्यक्तीला चालू देहांत भोगावा लागतो.

प्रारब्धाने तीन गोष्टी येतात. जाति, आयु व सुख-दु:खभोग, असे शास्त्र सांगते. शास्त्राच्या दृष्टीने ज्ञानी वा अज्ञानी सर्वांना प्रारब्ध भोगावेच लागते. तथापि आचार्य म्हणतात की, आत्मज्ञानी महात्म्याला प्रारब्ध, नशीब व दैव उरतच नाही. आचार्यांच्या दृष्टीकोनात व शास्त्रकारांच्या दृष्टिकोनात हा मोठा फरक आहे. शास्त्र सांगते की, आत्मज्ञान, ब्रह्मज्ञान झाल्याबरोबर त्या महात्म्याचे आयुष्य संपून जाते काय ? त्याचा देह मृत्यु पावतो का ? अर्थात् नाही. मग आयुष्यही आहे व देहही आहे तर भोगही असतातच. भोग तर शरीर, मन, बुद्धि व इतर इंद्रियांनी केलेल्या कर्मांचे फळ आहे. मग जीवंत असताना कर्मभोग कसा सुटेल ? मोठमोठे महंत, संत, आत्मज्ञानी, ब्रह्मज्ञानी महात्म्यांनाही सुख-दु:खे येतात व ते त्या काळी त्यांचा भोग भोगतांना दृष्टीस पडतात. अशा वेळी त्यांना कुणी विचारले की आपण तर महाज्ञानी, आत्मज्ञानी आहात मग असे संकट, असे दु:ख आपल्या वाट्याला कसे



एनए ४००४-१३

आले ? तर ते म्हणतात थोडी त्रुटी, थोडी अविद्या राहून गेलेली असेल. जर अविद्याच राहून गेली असेल तर आत्मज्ञानी कसा ? कारण आत्मस्वरुपांत, अज्ञान, अविद्याच नाही. तर प्रारब्ध तरी कसे असणार ?

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (९१) आत्म-ज्ञानी महात्म्यास प्रारब्ध नसते. (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **तत्त्वज्ञानोदयादूर्ध्वं प्रारब्धं नैव विद्यते ।**
**देहादीनाम् असत्यत्वातु यथा स्वप्नो विबोधत: ॥९१॥**

**अर्थ :-** जागा झालेल्यास ज्याप्रमाणे स्वप्न खोटे असते, त्याप्रमाणे आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर शरीर हे असत्य असते. आणि म्हणून तेथे प्रारब्ध नसते. ॥९१॥

**विवरण :-** झोपेत आपणाला अनेक स्वप्ने पडतात. त्या स्वप्न सृष्टीत अनेक दृश्ये, प्रसंग, घटना, घडत असताना आपणांस दिसत असतात. स्वप्नात जागृती प्रमाणेच सुख-दु:खाचे प्रसंग, जन्म-मरणाच्या घटना, गरीबी-श्रीमंतीची दृश्यें बघावयास मिळतात. समता-विषमतायुक्त समाज रचना पाहून कधी समाधान वाटते तर कधी वैषम्य, दु:ख होते. कधी डोळ्यांत दु:खाने अश्रु तर कधी आनंदाने येणारे अश्रु येतात. आता जेव्हा आपणास जाग येते, त्यावेळी ती स्वप्न सृष्टीतील दृश्ये खरी वाटतात का ? डोळ्यांत आलेले स्वप्नातील आनंदाश्रु वा दु:खाचे अश्रु आता डोळ्यांत आहेत काय ? डोळे पाणावलेले आहेत काय ? तर नाहीत. मग जागृतीत स्वप्नातील जग खोटे होते. स्वप्नात अनुभवलेली सुख दु:खे आता नाहीत. स्वप्नातील रडणारी वा हसणारी माणसे, त्यांची गरीबी वा श्रीमंती आता जागृतीत नाही.

त्याच प्रमाणे आता आलेली जागृति ही तरी खरी आहे का ? या जागृतीत येणारी सुख-दु:खे, श्रीमंती-गरीबी, जन्म-मरणाच्या घटना, या विविध रचना, हे रडणे-हसणे, त्या स्वप्नसृष्टीतील अनुभवांसारखेच नाही काय ? जागृतीतली ही सर्व दृश्ये झोपेत असतात काय ? तर नाही. यावरुन हे स्पष्ट दिसते की, स्वप्नातले अनुभव जागृतीत खोटे, जागृतीतील अनुभव झोपेत खोटे असतात. सांगण्याचे तात्पर्य हे की, स्वप्न-जागृति व निद्रा या बदलणाऱ्या, परिवर्तनशील, मिथ्या, अशा अवस्था आहेत.

आता प्रारब्ध, नशीब वा दैव म्हणून आपण अनेक प्रसंगाचे, घटनांचे, हानि-लाभांचे कारण मानतो. प्रारब्ध हे घडून गेलेल्या कर्मांचे फळ मानतो.

भूतकाळात आपणच केलेल्या कर्मांचे भोग वर्तमानात भोगत असतो. हा भोग कुठून व कसा आला हे कळत नसते, तेव्हा नशीब, दैव वा प्रारब्ध हे कारण सापडते. आपल्या नशीबातच असे व्हावयाचे होते, आपल्या दैवातच असे लिहीलेले होते, म्हणून भोगावे लागत आहे. हा प्रारब्धाचा खेळ आहे. अशी समजूत करुन माणसे समाधान मानतात.

आता हा येणारा प्रारब्धाचा भोग कोण भोगते ? आत्मा भोगतो का ? तर मुळीच नाही. आत्मा तर या सर्व गोष्टींपासून अलिप्त आहे. तो सूक्ष्मातिसूक्ष्म आत्मा शरीरात असूनही असंग आहे. कुठल्याही कर्माचा कर्ता नाही व भोक्ताही नाही. मग प्रारब्धाचा भोग कुणाला घडतो ? तर शरीरालाच म्हणावे लागेल. प्रारब्धाने येणारी सुख-दु:खे, हानिलाभ, जन्म-मरण, गरिबी-श्रीमंती यांचे भोग शरीरच भोगते.

आता जे शरीर हे प्रारब्ध भोगते, ते शरीर तरी सत्य आहे का ? सारे जग, सारे विश्व, सारा प्रपंच व संसार आत्मज्ञानाच्या दृष्टीने मिथ्याच आहे ना ? मग शरीर ही मिथ्याच ठरते. आणि शरीरच जर मिथ्या आहे. तर त्याचा प्रारब्ध भोगही मिथ्याच होय. आत्मज्ञानी-ब्रह्मज्ञानी महात्म्याला शरीर मिथ्या, परिवर्तनशील, जन्म-मरणाधीन असल्यामुळे, मिथ्या शरीराचे प्रारब्धही मिथ्याच वाटते. स्वप्नातील शरीर भासमान असते, तसे जागृतीतील शरीरही भासमान व मिथ्या आहे. केवळ आपलेच शरीर नव्हे तर सर्व शरीरे, सारे जग, जर भासमान व मिथ्या आहे. तर प्रारब्ध, नशीब, दैव कुठे व कसे राहील? जेथे ब्रह्माशिवाय अन्य काहीही नाही. तेथे, तत्त्वाज्ञानी महात्म्याच्या दृष्टीने प्रारब्धच नाही. प्रारब्ध मानणे हे आत्म्याच्या अज्ञानामुळे अज्ञानी मनुष्य मानत असतो. सिद्ध, साक्षात्कारी, आत्मज्ञानी मनुष्याला प्रारब्ध कसे असणार ?

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (९२) प्रारब्ध मिथ्या कसे - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **कर्म जन्मान्तरकृतं प्रारब्धमिति कीर्तितम् ।**
**तत्तु जन्मान्तराभावात्पुंसो नैवास्ति कर्हिचित् ॥९२॥**

**अर्थ :-** मागील दुसऱ्या जन्मांतील कर्मांना प्रारब्ध समजले जाते. आत्मज्ञांनी, साक्षात्कारी पुरुषांना दुसरा जन्मच नाही, तर मग त्यांच्या बाबतीत प्रारब्ध तरी कसे असणार ? ॥९२॥

**विवरण :-** या श्लोकांत आचार्यांनी प्रारब्धाची व्याख्याच स्पष्ट करुन दिलेली आहे. **'कर्म जन्मातर कृतम् प्रारब्धं इति ।'** प्रारब्ध म्हणजे पूर्व कर्मांचे फळ. कर्मांचे तीन प्रकार पडतात. १) संचित २) प्रारब्ध ३) क्रियमाण. आपल्या हातून अहंकार, वासना, कामना, विकारयुक्त होऊन जे कर्म होते, त्याचा ठसा, छाप आपल्या अंत:करणात-मन-बुद्धीत, पडतो. अनादि काळापासून अशा प्रकारच्या कर्म संस्काराना **संचित कर्म** म्हणतात. हे कर्मांचे संस्कार अनेक जन्मांचेही असू शकतात. त्यांचा संचय म्हणजे संचित कर्मांचे संस्कार. या संचित कर्म संस्कारांमधून काही भाग या जन्मांत त्यांचा भोग घडण्यासाठी, या देहांत आलेला असतो. हा देहच त्याचे भोग घेतो. त्यास **प्रारब्ध कर्म**, नशीब वा दैव असे म्हटले जाते. संचित व प्रारब्ध कर्म संस्कार याच देहांत, अंत:करणात आहेत. संचितातूनच प्रारब्ध प्रगट होते. जसे एखाद्या गोदामात आपण अनेक प्रकारचा माल भरतो, साठवितो, त्यास संचय म्हणतात. म्हणजे एका ठिकाणी साचविलेला माल म्हणतो. आता जेव्हा आपल्याला वापरण्यासाठी जो माल या संचयातून काढून वापरात घेतो, त्यासच **प्रारब्ध** म्हणतात. आता आणखी एक प्रकारचे संस्कार आपण त्या गोदामात भरतो. ते म्हणजे चालू काळातील केलेल्या कर्मांचे संस्कार. यांना **क्रियमाण** कर्मांचे संस्कार असे म्हणतात.

सकाम कर्मांचे संस्कार मन, बुद्धि, चित्त यांत भरले जातात व त्यामुळे अंत:करण मलीन होते. निष्काम कर्मांचे संस्कार येत नाहीत. म्हणून कर्मयोगात, निष्काम कर्म करण्याचाच उपदेश देण्यात येतो. मी, माझे, मला,

अहंकार, ममत्व, मोहादी विकार यामुळे कर्मे सकाम बनतात.

आता आत्मज्ञानी, ब्रह्मज्ञानी, साक्षात्कारी, तत्त्वज्ञ महात्म्याचे संचित जळून जाते. त्याच्या अंतरंग, आत्मिक साधनेने त्याचे अंत:करण स्वच्छ होते. संचित जर संपले, तर त्यांतून प्रारब्ध तरी कसे प्रगट होईल ? प्रारब्ध तर मागील कर्माचे संस्कार पुढील देहांत भोगायचे असतात. आत्मज्ञानी, ब्रह्मज्ञानी महात्म्याला पुढे देहच घ्यावयाचा नसतो. तो जन्म-मृत्युच्या फेऱ्यातून मुक्त झालेला असल्यामुळे, त्याला पुर्नजन्म नाही. पुन्हा जर जन्मच नाही तर तो मागील जन्माचे प्रारब्ध कुठे व कसे भोगणार ? अर्थात् आत्मस्वरुपात गेलेल्या महात्म्याला प्रारब्धच नसते.

जेव्हा जागृति व स्वप्न या दोन्ही अवस्था नसतात, तेव्हा सुषुप्ति म्हणजे निद्रा असते. निद्रेत-झोपेत या सुषुप्ति अवस्थेचे ज्ञान नसते. झोपेत जर झोपेचे ज्ञान असेल तर ती झोप कसली ? झोप, निद्रा वा सुषुप्ति ही पूर्ण अज्ञानाची अवस्था आहे. शरीर व इंद्रियें झोपलेली असताना, कुणीतरी जागा असतो तो म्हणजे आत्माच नव्हे का ? आत्मा ज्ञानघन आहे. त्याला झोप, म्हणजे सुषुप्ति, जागृति व स्वप्न या तिन्हीही अवस्थांचे ज्ञान असते. आपल्या बुद्धीला तसे ज्ञान नसते. झोपेत बुद्धीही झोपलेली असते.

बुद्धीचे कर्म, बुद्धीचे ज्ञान, बुद्धीचा राग - द्वेष, बुद्धीचे जागणे-झोपणे, हे आत्म्यांत नाही. जन्म-जन्मान्तरही आत्म्यांत नाही. मग मागील जन्माचे संचितही नाही, क्रियमाणही नाही मग प्रारब्ध कसे असेल ? अर्थात् प्रारब्धही मिथ्याच नाही का ?

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (९३) हा देह ही स्वप्नातील देहासारखा अध्यस्त आहे -

**श्लोक :-** **स्वप्न देहो यथाध्यस्तस्तथैवायं हि देहक: ।**
**अध्यस्तस्य कुतो जन्म जन्माभावे हि तत् कुत: ॥९३॥**

**अर्थ :-** जसा स्वप्नाभिमानी आत्म्याचा देह अध्यारोपित (अध्यस्त) असतो. त्याच प्रमाणे जागृति अभिमानी आत्म्याचा देह अध्यारोपित (अध्यस्त) असतो. अध्यारोपिताला जन्म कोठे असतो ? जन्मच नाही तर त्याची सत्ता (प्रारब्ध) तरी कशी असणार ? ॥९३॥

**विवरण :-** आत्मसाक्षात्कारी वा ब्रह्मज्ञानी महात्म्याला प्रारब्ध नसते. हे आणखी एका वेगळ्या पद्धतीने वा युक्तीने सिद्ध करीत आहेत. उदाहरणार्थ आपण झोपेत स्वप्न पाहात असताना आपला देह व इतरांचेही देह पाहात असतो. वास्तविक आपला खरा देह तर झोपी गेलेला आहे. मग हा स्वप्नातील आपला देह आला कोठून ? अर्थात् तो मन: कल्पित, अध्यस्त देह आहे. अध्यस्त म्हणजे अधि म्हणजे वरुन, अस्त म्हणजे ठेवलेला. अध्यस्त म्हणजे वरुन ठेवलेला, अध्यस्तम् । जसा अंधारात दोरीवर साप दिसतो. तसा दोरीवर साप कल्पना करुन ठेवलेला आहे. साप अध्यस्त आहे किंवा अंधारात दूरुन लाकडी खांब पाहून भूत आहे अशी कल्पना करणे म्हणजे भूत अध्यस्त आहे. खांबच खरा आहे. साप व भूत हे दोन्ही जसे खरे नाहीत, त्यांना जन्म-मरणही नाही. अध्यस्ताला जन्मच नसतो, तर त्याला मरणही नाही. मग त्याला प्रारब्धही नाही. कारण प्रारब्ध म्हणजे मागील जन्माचे संस्कार भोग रुपाने पुढील जन्मात भोगणे.

आता स्वप्नातील देह हा जसा अध्यस्त देह आहे, तो खरा नाही. त्याच प्रमाणे जागृतीतील देहही अध्यस्तच आहे. जागृतीत जेव्हा 'मी' करतो, मी जाणतो असे म्हणतो, त्या वेळी मी म्हणजे चेतन आत्मा आहे व हा देह जड आहे. जड देहाला करता येत नाही व जाणताही येत नाही. चेतन आत्म्यावर हा जड देह अध्यस्त आहे. कल्पित आहे. मग अशा कल्पित, अध्यस्त देहाला

प्रारब्ध तरी कोठून असणार? कल्पित अध्यस्त देहाला जन्मच नाही तर त्याला मागील जन्माचे प्रारब्ध भोग तरी कसे असणार ?

चेतन आत्मसत्ता नसेल, तर स्वप्नही दिसणार नाही. त्याच प्रमाणे चेतन आत्मसत्ता नसेल तर जागृत अवस्थाही येणार नाही. स्वप्नात या चेतन सत्तेतच सर्व काही दिसत असताना, देहाचे तेथे काहीच काम नाही, त्यावेळी देह तर झोपलेला असतो. त्याच प्रमाणे जागृती ही सर्व चेतनात दिसते. चेतनच जाणणारे आहे. जड देह हा त्या चेतनावर अध्यस्त आहे.

ही सृष्टी, जगाचा हा सर्व देखावा, आत्मचैतन्यात, निर्माण न होतानांही दिसत आहे. तसेच स्वप्नात दिसणारे व्यक्तित्व, तुमचे नाही. तुम्ही तर आत्मस्वरुपाने संपूर्ण स्वप्नाला पाहाणारे, जाणणारे आहात. स्वप्नात दिसणारे हजारो पशु-पक्षी, वृक्ष-लता, स्त्री-पुरुष, नदी-पर्वत, तुम्ही पाहाता. त्याच प्रमाणे जागृतीतही तुम्ही जो तुमचा देह पाहात आहात, तो तुम्ही नाही. तुम्ही तर असे आहात की, तुम्हाला संपूर्ण जागृत अवस्था दिसू शकते. तत्त्वदृष्टीने तेच आत्मतत्त्व, ब्रह्म, तुम्हीच आहात.

मनुष्य या कालांत सुख दुःखाचे भोग भोगीत आहे. तो हे भोग म्हणजे पूर्वी केलेल्या कर्मांचे फळ आहे, असे समजून भोक्ता होतो व करीत असलेल्या कर्मांचा कर्ता होतो. भोग भोगतांना हे प्रारब्ध आहे म्हणून स्वीकार करतो. जर मी आत्मा आहे, ब्रह्म आहे, तर हे प्रारब्ध आत्म्यांत वा ब्रह्मांत मुळीच नाही. म्हणून आत्मज्ञानी महात्म्यास प्रारब्धच नसते. कारण त्याला पुढचा जन्म नाही. मग मागच्या जन्मातील प्रारब्धाचा भोग कसा असेल ? अर्थात् नाही.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (९४) आत्मज्ञानाने प्रपंचाची निवृत्ति

**श्लोक :-** **उपादानं प्रपञ्चस्य मृद्भाण्डस्येव कथ्यते ।**
**अज्ञानं चैव वेदान्तैस्तस्मिन्नष्टे क्व विश्वता ॥९४॥**

**अर्थ :-** मडक्याच्या उपादान कारणाला माती असे म्हणतात. त्याच प्रमाणे वेदांतात प्रपंचाच्या कारणाला अज्ञान म्हणतात. ते अज्ञानच जर नष्ट झाले, तर विश्व कोठून राहाणार ? ॥९४॥

**विवरण :-** अज्ञानाची जाणीव प्रत्येकाला असते. अज्ञानाने सत्य कळत नाही. व जे कळते ते चुकीचे असते. चुकीच्या कळण्याने, व्यवहारात फसगत होते. फसल्यानंतर ध्यानात येते की ते करणे चुकीचे होते. या चुकांचे, दोषांचे निराकरण मन, बुद्धीच्या साहाय्याने करता येऊ शकते. तथापि आत्मा, ब्रह्म, यांच्या अज्ञानाने फार मोठी हानि होते. आयुष्याचा फार मोठा भाग अशा अज्ञानात निघून जातो. प्रपंचातील हरवलेल्या, गमावलेल्या गोष्टी कदाचित पुन्हा प्राप्त होऊ शकतात, परंतु गेलेल्या आयुष्याचा एक क्षणही परत मिळवता येत नाही. आयुष्य हे फार मोलाचे आहे. आत्मज्ञान प्राप्तीसाठी देहाचे आयुष्य संपले असेल, तर ही केवढी मोठी हानि आहे.

सामान्य माणसांनी प्रपंचातील गोष्टी प्राप्त करण्यासाठीच जर इतक्या मोलाचे आयुष्य खर्च केले, तर ते शहाणपणाचे होईल काय ? तर मुळीच नाही. जसे मातीच्या मडक्याला माती हेच उपादान कारण आहे. तसेच वेदांताने प्रपंचाचे कारण अज्ञान असल्याचे सांगितले आहे. हा सारा प्रपंच, संसार, जग, विश्व याचे कारण अज्ञानच आहे. या अज्ञानाने आलेले अंधत्व, ज्ञानरुपी अंजनाने घालविता येते. पण त्याचे अंजन-औषध, आपल्या जवळ नाही. जसा डोळ्यांचा रोग बरा करण्यासाठी, डोळ्यांचा वैद्य वा डॉक्टर पहावा लागतो. त्याच प्रमाणे हे अज्ञानाने आलेले अंधत्व कोणत्या वैद्याकडून नष्ट करावे ? तर **सद्‌गुरु** हेच भवरोगाचे औषध देणारे, **भवरोग वैद्य** आहेत.

भगवान शंकर माता पार्वतीला सांगत आहेत -

**अज्ञान तिमिरांधस्य, ज्ञानांजन शलाकया ।**

**चक्षुरुन्मीलितं येन, तस्मै श्रीगुरवे नमः ॥३४॥** - श्री गुरुगीता

अज्ञानरुपी अंधकाराने ज्याच्या नेत्रांतील ज्योत विझून गेली आहे म्हणजे जो आंधळा झालेला आहे, त्याला आत्मज्ञानरुपी अंजनाची शलाका (किरण रेषा) घालून ज्यांनी दृष्टि प्रदान केली, अशा श्री सद्गुरुंना मी वंदन करतो.

असे अज्ञानच नष्ट झाले तर हे विश्व, जग, प्रपंच, संसार तरी कुठे राहील ?

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (९५) आत्मज्ञानाने प्रपंच निवृत्ति (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** यथा रज्जुं परित्यज्य सर्पं गृह्णाति वै भ्रमात् ।
तद्वत्सत्यमविज्ञाय जगत्पश्यति मुढधी: ।।९५।।

**अर्थ :-** जसे अज्ञानी मनुष्य, (अंधारात पडलेल्या) दोरीला न जाणता भ्रमाने तिला साप समजतो, त्याच प्रमाणे सत्यतत्त्व न जाणता अज्ञानी, मूर्ख मनुष्य, त्या ठिकाणी जग पहातो. ।।९५।।

**विवरण :-** डोळे उघडल्याबरोबर आपल्याला दिसते ते जगाचे, सृष्टीचे, वा आपल्या घरातील, संसारातील पदार्थ, वस्तु, प्राणी, यांचे दर्शन. अशा या विविध व नाना प्रकारच्या नाम, रुप, आकारांच्या वस्तूंचे नित्य दर्शन आम्हीं घेत आलेलो आहोत. देव-देवतांची दर्शनेही आम्ही निरनिराळया क्षेत्री जाऊन, मठ-मंदिरात जाऊन नाम, रुप, आकारातच घेत असतो. तथापि घरातील थाळी, तांब्या, पेला, वाटी या नाम-रुप, आकारांच्या वस्तू आपल्या अंत:करणात भावजागृति, भक्ति, प्रेम, साधना यांची निर्मिती न करता भोगविषयांचीच स्मृति, आठवणी निर्माण करतात. देव-देवतांच्या दर्शनात व प्रपंचातील वस्तू दर्शनात असा महत्त्वाचा फरक आहे.

भगवान श्री आद्य शंकराचार्य या श्लोकांत पुन्हा दोरी व सर्पाचेच उदाहरण घेऊन ज्ञान आणि अज्ञान, सत्य नि मिथ्या, यांचा परिचय करुन देत आहेत. अंधारात पडलेली दोरी सत्य आहे. तथापि अज्ञानामुळे तिचे सत्यत्व न कळल्याने मूर्ख वा भ्रम झालेला मनुष्य तिला साप समजतो. दोरीवर भासणारा साप मिथ्या आहे. पण त्या दोरीचे ज्ञान नसल्यामुळे हा मिथ्या सापच खरा आहे, असे त्या भ्रमिष्ट माणसाला वाटत असते. हा अज्ञानाचा परिणाम आहे.

त्याच प्रमाणे हे जग, सृष्टि, प्रपंच, संसार ही सर्व त्या ब्रह्मावर, त्या आत्मतत्त्वावर, त्या सत्यतत्त्वावर भासणारी दृश्ये मिथ्या आहेत. तथापि आत्म्याच्या

वा ब्रह्माच्या अज्ञानामुळे, भ्रमाने तीच सत्य आहेत अशी आमची समजूत असते.

**ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ।** आचार्यांचा हा सिद्धांत अज्ञानामुळे आमच्या पचनी पडत नाही.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (९६) आत्मज्ञानाने प्रपंच निवृत्ति (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **रज्जूरुपे परिज्ञानेसर्पभ्रान्तिर्न तिष्ठति ।**
**अधिष्टाने तथा ज्ञाते प्रपञ्चः शून्यतां व्रजेत् ॥९६॥**

**अर्थ :-** दोरीच रुप समजल्यावर सापाचा भ्रम राहत नाही. त्याच प्रमाण अधिष्ठानाच ज्ञान झाल्यावर प्रपंच (जग) निःशेष (समाप्त) होऊन जातो. ॥९६॥

**विवरण :-** अधिष्ठानाचे ज्ञान झाल्यावर प्रपंचाचे स्थान रहात नाही. प्रपंच समाप्त होऊन जातो. यात अधिष्ठान म्हणजे काय हे अगोदर समजले पाहिजे. ज्यावर ठेवले जाते, उभारलें जाते ते स्थान म्हणजे अधिष्ठान. उदाहरणार्थ भिंत तिच्या पायावर उभी असते. उतरंड, म्हणजे भांड्यांची उभी रचना-रांग, या उतरंडीचा पाय म्हणजे जमिनीवरचे खालचे शेवटचे भांडे, त्या उतरंडीचा पाया असतो, अधिष्ठान असते. हा पायाच काढून घेतला तर उतरंड कोसळून पडते. उभी राहू शकत नाही. पाया ढासळला की भिंतही कोसळून पडते.

तसेच अंधारात पडलेल्या दोरीवर साप भासतो. दोरी हे सर्प भासाचे अधिष्ठान आहे. दोरीच काढून घेतली तर सर्पच भासणार नाही. या ठिकाणी सर्प भ्रमाचे अधिष्ठान दोरी आहे. सर्पाचा भ्रम दोरीरुपी अधिष्ठान नष्ट होताच, नष्ट होऊन जातो. त्याच प्रमाणे हा भासमान प्रपंच, हा संसार, हे जग, हे विश्व, हे त्या ब्रह्माच्या, आत्म्याच्या अधिष्ठानावर भासत आहे. ज्या आत्मतत्त्वाच्या अधिष्ठानावर हा प्रपंच भासत आहे त्या आत्मतत्त्वाचे ज्ञान झाल्यानंतर प्रपंचाचे भानही समाप्त होऊन जाते. भूताचे अधिष्ठान अंधारातील खांब आहे. त्याचे ज्ञान झाल्यानंतर भूताचा भ्रमही नष्ट होतो. अलंकारांचे अधिष्ठान सोने असते. सोनेच नाम, रुप, आकाराने अलंकार बनते. सोन्याकडे लक्ष गेले की अलंकाराकडील पाहणे असत नाही.

प्रपंच, संसार आपणास खरा वाटतो. तथापि त्याचे अधिष्ठान जो आत्मा, तो अखंड, नित्य सत्य आहे. त्याचे सत्यत्त्व कळले की प्रपंच मिथ्या

वाटतो. प्रपंचातील आसक्ति कमी होण्यासाठी किंवा नाहीशी होण्यासाठी, अधिष्ठान स्वरुप आत्मज्ञानाची नितांत आवश्यकता आहे. आत्मज्ञानानेच प्रपंचाचे मिथ्यात्व स्पष्ट होते.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (९७) शरीराला प्रारब्ध भोग नाही.

**श्लोक :-** **देहस्यापि प्रपञ्चत्वात्प्रारब्धावस्थिति: कुत: ।**
**अज्ञानिजन बोधार्थं प्रारब्धं वक्ति वै श्रुति: ॥९७॥**

**अर्थ :-** हे शरीरही एक प्रपंच आहे. ते जर बाधित झाले, तर मग प्रारब्धाची स्थिति कोठे असेल ? अर्थात् नाही. परंतु अज्ञानी लोकांना बोध व्हावा, म्हणून श्रुति प्रारब्धाबद्दल सांगत आहे. ॥९७॥

**विवरण :-** मनुष्याचा देह हे जगताचे अंग आहे. जग, प्रपंच, संसार यांच्या सारखा देहही एक आहे. प्रपंच नि देह यात बरेच साम्य आहे. प्र + पंच म्हणजे प्रकर्षेण + पांच - प्रपंचात पाच ठळकपणे दिसतात. हे पंच विषय मनुष्याच्या शरीरातही आहेत. पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, पाच प्राण, पाच महाभूते, पाच विषय, पाच वृत्ति, प्रमाण, वितर्क, विकल्प, निद्रा, व स्मृति या पाच वृत्ति आहेत. हे सर्व अज्ञानाचे कार्य आहे. अशा या देहाला-प्रपंचाला प्रारब्ध कसे असेल ? आत्मा-ब्रह्म यातही प्रारब्ध नाही. मी देहच आहे असा विचार केल्यास देहाला प्रारब्ध चिकटते व मी आत्मा-मी ब्रह्मच आहे असा विचार केला तर प्रारब्ध सुटते. प्रारब्ध व्यवहारिक आहे. आत्मा ब्रह्मच आहे. आत्म्याची सत्ता पारमार्थिक आहे. स्वप्न प्रतिभासिक आहे. संकटे, आपत्ति, दु:ख, शोक, नाना प्रकारचे आघात, यात सांत्वन, समाधान करण्यासाठी प्रारब्धाचे नाव सांगावे लागते. अज्ञानी माणसाला समाधान व्हावे, त्याचा कर्तुत्व, भोक्तृत्व यातील अहंकार नष्ट व्हावा, म्हणून श्रुति लौकिक दृष्टीने प्रारब्धाचे कारण सांगते. हे शरीर आम्हाला कसे प्राप्त झाले ? त्याचे कारण सांगताना प्रारब्ध सांगावे लागते. तथापि मी आत्मा, ब्रह्मच आहे असा विचार केला तर प्रारब्ध सिद्ध होत नाही. वेदांत, अज्ञानी मनुष्याला, देह दृष्टीने प्रारब्ध असल्याचे सांगतो. तत्त्व दृष्टीने प्रारब्ध नाही. शरीर-मन, बुद्धि ही बदलणारी, नष्ट होणारी स्थिति आहे. ते बदलणाऱ्या जगाचेच अंग आहे. परंतु जेव्हा आत्म्याचे सत्यत्व पटले, समजले की शरीराचे अस्तित्व बाधित होऊन जाते. मग प्रारब्ध

तरी कसे राहील ?

वेदांताचे शास्त्र शुद्ध, तात्त्विक ज्ञान नसल्यामुळे, अज्ञानी लोकांना त्यांच्या समाधानासाठी श्रुति प्रारब्धाचे नाव सांगते. वास्तविक आत्मज्ञानी महात्म्याला शरीर असूनही नसल्यासारखे असते मग तेथे प्रारब्ध कसले ?

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (९८) प्रारब्ध नाहीच.

**श्लोक :-** **क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ।**
**बहुत्वं तन्निषेधार्थं श्रुत्या गीतं च यत्स्फुटम् ॥९८॥**

**अर्थ :-** त्या परावराला (परमश्रेष्ठ तत्त्वाला) पाहिल्यानंतर (जाणल्यानंतर) त्या ज्ञानी महात्म्याच्या कर्मांचा क्षय होतो. प्रारब्धाचा निषेध करण्यासाठी श्रुतीने कर्मांचा (प्रारब्ध, संचित व क्रियपाण या कर्मांचा) उल्लेख अनेक वचनांत केलेला आहे. ॥९८॥

**विवरण :-** या श्लोकातील पहिल्या चरणात, मुंडकोपनिषद् या श्रुतीचा उल्लेख आलेला आहे. श्रुतीचे दोन चरण असे आहेत -

**भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्व संशयः ।**
**क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ॥ मंत्र ८ ॥**

श्रुति म्हणते की, जो पर म्हणजे श्रेष्ठ व अपर (कनिष्ठ) असा दोन्हीही असू शकतो, तो आत्मा, त्याचा साक्षात्कार झाल्यानंतर, त्या ज्ञानी महात्म्याला, अज्ञानाचे कार्य उरतच नाही. अज्ञानच नष्ट झाल्याने, त्याच्या हृदयग्रंथी म्हणजे - अज्ञान, कामना, कर्मे ह्या हृदयग्रंथी (गाठीं) तुटून गेलेल्या असतात. सत्य काय, अधर्म काय इत्यादी सर्व संशय, आत्मानुभूतीमुळे नाहिसे झालेले असतात. असा आत्मज्ञानी पुरुष, वर्तमानातील प्रतिक्रिया व पूर्व कर्मं यांच्या बंधनांत, जाळ्यांत सापडू शकत नाही. तो मग जन्म-मरणाच्या फेऱ्यातही सापडत नाही. आत्म्याला बांधू शकेल अशी कोणतीही वस्तु संसारात नाही. आकाशाला बांधता येईल अशी कोणती दोरी आहे. हा आत्मस्थिति-गति, देश-काल, यांच्या बंधनांत सापडत नाही. परंतु -

**जड़ चेतना ही ग्रंथि परिगई । जदपि मृषा छूटत कठिनाई ॥**

जड आणि चैतन्याची अशी गाठ बांधली गेली आहे की, ती खोटी, भासमान गाठ सोडविणे फारच कठीण जाते. ही ग्रंथी अविद्याजनक आहे. हीच जीवग्रंथी आहे. मी-मी म्हणणारा जीवभाव, देहभाव, शरीर व आत्मचेतनेची

गाळ आहे. आत्मज्ञानानेच अविद्या मूलक सर्व संशय नष्ट होतात. त्या परावर-परमात्म्याला पाहिल्यानंतर सर्व कर्मांचा क्षय होतो. कर्ता भाव, भोक्ताभाव नष्ट होतो. मग पूर्व कर्मभोग असे प्रारब्ध तरी कुठे राहील ?

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (९९) प्रारब्ध मानण्याने होणारी हानि ।

**श्लोक :-** **उच्चतेऽज्ञैर्बलाच्चैतत्त दानर्थ द्वयागमः ।**
**वेदान्तमतहानं च यतो ज्ञानमितिंश्रुति ॥९९॥**

**अर्थ :-** तरी सुद्धा प्रारब्ध आहेच असा अज्ञानी लोक हेका धरत असतील तर ते स्वतः दोन अनर्थात सापडतील (मोक्षाची अशक्यता वेदांत विरोधी मत व ज्ञानाची निष्फळता) शिवाय श्रुतींनी स्पष्ट सांगितलेली ज्ञानाची शक्यता त्यांना सोडावी लागेल. श्रुति ज्ञानानेच मोक्ष मानते ॥९९॥

**विवरण :-** हिंदु धर्म शास्त्राप्रमाणे तर सर्वच प्रारब्ध-दैव, नशीब मानत आलेले आहेत. लोक व्यवहारातही प्रारब्ध स्वीकारुन दुःखी कष्टी माणसाचे समाधान केले जाते. अचानक आलेल्या मृत्युने, द्रव्य हानिने, लाभाने उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीचे कारण जेव्हा सापडत नाही तेव्हा लोक प्रारब्धाचाच आश्रय घेतात. प्रारब्ध मानणारे तर सांगत असतात की, दैवात असेल तितकेच व तसेच मिळणार, दैवात नसेल तर नाही. असा दैववाद सर्व साधारण लोकांमध्ये प्रचलित आहे.

आता श्रीमत् भगवद् पूज्यपाद आद्य शंकराचार्य या प्रारब्धाचे वा दैव वादाचे खंडण करीत आहेत. ते म्हणतात, दैववाद वा प्रारब्ध हे अज्ञानी लोकांचे समर्थन आहे. अज्ञानी लोक दुसऱ्या अज्ञानी माणसाच्या समाधानासाठी, सांत्वनासाठी त्याचा आधार घेतात.

आचार्य सांगतात की प्रारब्ध, दैव, नशीब, मानण्याने दोन प्रकारची हानि, नुकसान आहे. एक म्हणजे मोक्ष सिद्ध होणार नाही. दुसरे ज्ञानही सिद्ध होणार नाही. एखाद्याने जर असे म्हटले की नशीबात, दैवांत असेल तर मोक्ष मिळेल. असे म्हणणे हे वेदांत विरोधी आहे. आत्मज्ञानानेच मोक्षसिद्धि मिळते. जर प्रारब्धात असेल तर आत्मज्ञान प्राप्त होईल हे म्हणणेही चुकीचेच आहे. आत्मज्ञानासाठी कराव्या लागणाऱ्या साधना, सद्गुण, स्वाध्याय, सद्गुरु हे सर्व निरर्थक ठरतील.

आता आत्मज्ञानी, साक्षात्कारी महात्म्यालाही प्रारब्ध असते, असे चुकीचे व विसंगत मत असेल तर मोक्षाला काहीच अर्थ नाही. मोक्ष, मुक्ति, जीवनमुक्ती हे थोतांड होईल. आत्मस्वरुप हा एक भ्रमाचाच प्रकार होईल. प्रारब्धाचा स्वीकार केल्यास श्रुति वचनाला विरोध होतो. साक्षात्कारी सिद्ध सत्पुरुषाला प्रारब्ध असते हे मान्य केल्यास वेदान्ताचे प्रचलित धर्म खंडित होईल. वास्तविक वेदांताचे सिद्धांत अढळ, स्थिर व निश्चल अशा तत्त्वज्ञानावर आधारलेले आहेत. आत्मा अकर्ता, अभोक्ता, असंग, असा असताना, त्याला जर कर्ता मानले, तरी मोक्ष सिद्धच होऊ शकणार नाही. मग सृष्टीत कोणताही ज्ञानी महात्मा मुक्त होऊच शकणार नाही. श्रुतीचे सांगणे असे आहे की, आत्मज्ञान, ब्रह्मज्ञान, हे साधकाला अद्वैतस्थिती प्रत नेणारे असते. प्रारब्ध, दैव मान्य केले तर, तो त्या अवस्थेपर्यंत जाऊच शकणार नाही. अद्वैतस्थिति ही परमार्थातील उच्च कोटीची स्थिती आहे. ती प्रारब्धाने कशी बरे प्राप्त होऊ शकेल ? अर्थात् मुळीच नाही. भक्त आणि देव, गुरु आणि शिष्य यांच्यात असलेले द्वैत नष्ट होऊन, अद्वैतस्थिती प्राप्त होते. ज्या तंत्राने वा पद्धतीने ह्या परम श्रेष्ठ, परम-सत्यतत्त्वाची अनुभूति घेतली जाते, त्या पद्धतीला 'साधना' असे म्हणतात. प्रारब्धाचे श्रेष्ठत्व, महत्त्व मान्य केल्यास, साधनेला महत्त्वच उरणार नाही. साधना गौण होऊन जाईल. मग साधक तरी कसा तयार होईल ? साधक नाही, साधना नाही, तर साध्य कशास म्हणावे ? प्रारब्धाने हे सर्व प्राप्त करता येत असेल, तर साधना व्यर्थ म्हणावी लागेल.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१००) साधन मार्गाचे वर्णन -

**श्लोक :-** **त्रिपञ्चाङ्गन्यथो वक्षे पूर्वोक्तस्य हि लब्धये ।**
**तैश्च सर्वे: सदा कार्यं निदिध्यासनमेव तु ॥१००॥**

**अर्थ :-** या पूर्वी वर्णन केलेल्या ज्ञानाच्या प्राप्तीसाठी पंधरा अंगांनी साधनेचे वर्णन करीत आहे. त्या सर्व अंगांनी नेहमी निदिध्यासन (गाढध्यान) करावयास हवे. ॥१००॥

**विवरण :-** या श्लोकांत भगवान श्री आद्य शंकराचार्यांनी, 'अपरोक्षानुभूति' प्राप्त होण्यासाठी ज्ञान म्हणजे आत्मज्ञान आवश्यक आहे असे सांगितले आहे. हे आत्मज्ञान आत्म्यात असते. त्या आत्म्याच्या स्वरुपात जाण्यासाठी जे ज्ञानमार्ग सांगितले आहेत, त्यात प्रथम साधन चतुष्ट्य आहे. त्यात विवेक-वैराग्य-शमदमादी षट्संपत्ति आणि मुमुक्षा हे आहेत. षट्संपत्ति मध्ये शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रद्धा, आणि समाधान यांचा समावेश होतो. अज्ञानाचे वर्णन, आत्म्याचे प्रकाशत्व, ज्ञानाचे स्वरुप, देह-आत्मवाद निराकरण, तीन देह, चितिशक्ति विश्वाकार ब्रह्म-जगाची उत्पत्ति, प्रपंचाचे मिथ्यात्व, देहात्म भ्रांति, मननशील मनुष्याचे वागणे, प्रारब्धाचा निषेध इत्यादी अनेक महत्त्वाच्या बोधप्रद गोष्टी सांगितल्या आहेत. त्यातही विशेष म्हणजे, स्वप्न, जागृति व निद्रा या देहाच्या तीन अवस्था मिथ्या कशा आहेत. याचेही सुस्पष्ट विवेचन केले आहे.

आता या सर्व अत्यावश्यक ज्ञानासाठी साधना आवश्यक आहे. त्या साधनेची त्रिपंच म्हणजे त्रि = तिन, पंच = पांच, तीनला पाचाने गुणिले म्हणजे ३ x ५ = १५ अशी संख्या येते. साधनेची ही पंधरा अंगे कोणती ? त्यांचे वर्णन येथून पुढील भागात, आचार्य करीत आहेत. त्या सर्व अंगांचे निदिध्यासन करावे लागणार आहे. नि + दिध्यासन नि हा उपसर्ग आहे, व दिध्यासन गाढ ध्यान.

आता ज्याचे निदिध्यासन करावयाचे, ध्यान करावयाचे, तो आत्मा वा ब्रह्म आहे. आत्मा वा ब्रह्म तर ध्यानाचाही विषय होऊ शकत नाही. मग त्याचे गाढध्यान कसे लागणार ? तर ध्यान म्हणजे 'ध्ये' 'चिन्तायाम्' धातुपासून ध्यान शब्द बनला आहे. निदिध्यासन म्हणजे ब्रह्माचे, आत्म्याचे चिंतन करण्याचा प्रयत्न. हा ब्रह्म चिंतनाचा प्रयत्न इतका महत्त्वाचा आहे की, त्यामुळे आत्म्यासंबंधी वा ब्रह्मासंबंधी असंभावना, विपरीत भावना, संशय, विपर्यय समाप्त होऊन जातात. या पुढे निदिध्यासन म्हणजे गाढध्यानाची, चिंतनाची पंधरा अंगे सांगितली जात आहेत.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (१०१) निदिध्यासनाची आवश्यकता -

श्लोक :- नित्याभ्यासादृते प्राप्तिर्न भवेत्सच्चिदात्मनः ।
तस्माद् ब्रह्म निदिध्यासेज्जिज्ञासुः श्रेयसे चिरम् ॥१०१॥

**अर्थ :-** नित्य अभ्यास केल्याशिवाय सच्चिदानंद स्वरुप आत्मतत्त्वाची प्राप्ति होणार नाही. म्हणून आपल्या कल्याणासाठी, तळमळीच्या जिज्ञासू साधकाने आत्म्याचे वा ब्रह्माचे सतत, अखंड ध्यान करावयास हवे. ॥१०१॥

**विवरण :-** भगवान श्री आद्य शंकराचार्यांनी जिज्ञासू, मुमुक्षु व आत्मानुभवाची म्हणजेच अपरोक्षानुभूतीची तळमळ असणाऱ्या साधकांना, आत्मानुभव घेण्यासाठी निदिध्यासनाच्या पंधरा अंगांनी अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. असे सांगितलेले आहे. सतत अभ्यास केल्यानेच प्रगती, उन्नती, विकास होत असतो. पुनःपुन्हा करीत राहणे यासच अभ्यास म्हटले जाते. सवय, सराव, स्वभाव या गोष्टीही सातत्याने करण्यानेच अंगी बाणतात. म्हणून साधन म्हणजे सततचा अभ्यास होय. साधनेतील हे सातत्य, अखंडत्व टिकविण्यासाठी साधनेची आवड, गोडी लागली पाहिजे व आवश्यकता वाटली पाहिजे. विशेषतः आत्मप्राप्तीची ओढ, जिज्ञासा, तर फारच तीव्र असावयास हवी. संसारातील अनेक मोह, आकर्षणें, साधकाच्या चित्तवृत्तीत विक्षेप निर्माण करतात. त्यामुळे बरेचसे साधक साधनेच्या बाबतीत उदासीन होऊन जातात. त्यामुळे साधना प्रगत होत नाही. शेवटी निराशा पदरी येते.

साधनेनेच अनुभूति प्राप्त होते. अनुभूतीने साधनेची गोडी लागते. अविरत ब्रह्म चिंतन करणाऱ्या साधकाला, अन्य सांसारिक विषय भ्रांत करु शकत नाही. असा साधक आपल्या ध्येयाशी एकरुप व एकनिष्ठ झालेला असतो. त्यासाठी तो अन्य प्रतिबंधात्मक गोष्टीचा त्याग करुन यशोशिखरावर पोहोचण्याचा प्रयत्न करीत असतो. ब्रह्म वा आत्मा यांच्या निदिध्यासनाला कोणकोणत्या अंगांची आवश्यकता असते, ते पुढील श्लोकातून सांगितले जात आहे. त्याचा साधकांनी अंगीकार करावा.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

# (१०२,१०३) निदिध्यासनांची अंगे

**श्लोक :-** **यमो हि नियमस्त्यागो मौनं देशश्च कालता ।**
**आसनं मूल बन्धश्च देहसाम्यं च दृक् स्थिति: ॥१०२॥**
**प्राणसंयमनं चैव प्रत्याहारश्च धारणा ।**
**आत्मध्यानं समाधिश्च प्रोक्तान्यङ्गनि वै क्रमात ॥१०३॥**

**अर्थ :-** यम, नियम, त्याग, मौन, देश, काल, आसन, मूलबन्ध देहसाम्य व दृष्टिची स्थिति अशी एकूण दहा अंगे ॥१०२॥

प्राणसंयम, प्रत्याहार, धारणा, आत्मध्यान आणि समाधी ही पाच अंगे मिळून दोन्ही श्लोकांत १५ अंगे सांगितली गेली आहेत. ॥१०३॥

**विवरण :-** पातंजल योगदर्शन, हठयोग प्रदीपिका, राजयोग या ग्रंथांमधून योगाबद्दल माहिती देताना या अंगांचा उल्लेख आलेला आहे. यम नियम हे शब्द जैन संप्रदाय, नाथ संप्रदायात चालत आलेले आहेत. योग शास्त्रात - अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या पाचांना **'यम'** संबोधिले जाते. शौच, संतोष, स्वाध्याय, तप आणि ईश्वर प्रणिधान यांना नियम म्हटलें जाते.

भगवान श्री आद्य शंकराचार्य, या योगशास्त्रांतील पंधरा नामांचा केवळ रुढ अर्थच सांगत नसून, अंत:स्फूर्तीने, त्या त्या संज्ञेची वा नामाच्या अर्थाची वेगळीच झलक दाखवित आहेत. साधकाच्या दृष्टीने आचार्यांचें हे प्रबोधन अत्यंत सुलभ व हितकारी आहे. कुण्डलिनी सिद्ध महायोग अर्थात् शक्तिपात योग, यातही हे सर्व विषय आलेले आहेत. या योगात जागृत कुण्डलिनी शक्ति, या सर्व अंगांचा साधकाला प्रत्यक्ष अनुभव देते. तथापी योगशास्त्राचा परिचय नसेल, तर हा प्रत्यक्ष क्रियांच्या माध्यमातून येणारा अनुभव कोणत्या अंगाचा आहे, हे त्याला कळणार नाही व सांगताही येणार नाही. अशा साधकांसाठी आचार्यांचा हा ग्रंथ व त्यातील योगाची ही पंधरा अंगे अभ्यासून ठेवल्यास त्यांना ज्ञानानुभूति लाभेल. यात मुळीच शंका नाही.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१०४) यमाचे महत्त्व

**श्लोक :-** **सर्वं ब्रह्मेति विज्ञानादिन्द्रियग्राम संयमः ।**
**यमोऽयमिति सम्प्रोक्तोऽभ्यसनीयो मुहुर्मुहुः ॥१०४॥**

**अर्थ :-** 'सर्व ब्रह्मच आहे.' या प्रत्यक्ष ज्ञानाने, इंद्रिय समुदायावर जो संयम ठेवायचा असतो, त्याला **'यम'** असे म्हटले जाते. त्याचा पुन:पुन्हा: अभ्यास करणे योग्यच व अत्यावश्यकच आहे. ॥१०४॥

**विवरण :-** मनुष्याच्या जीवनात काही महत्वाच्या गोष्टी अभ्यासानेच साध्य होतात. उदाहरणार्थ भारतीय संगीताचे ज्ञान, खूप अभ्यासाने, सरावाने प्राप्त होते. रागदारी संगीतात निरनिराळ्या रागांचे सूर, शिकणाऱ्यास खूप आळवावे लागतात. त्याला रियाज वा अभ्यास केल्याशिवाय ते रागदारी संगीत गाताच येत नाही. त्याचप्रमाणे एखाद्याला पाण्यात कसे पोहायचे ते आधी शिकून नंतर पोहण्याचा सराव, अभ्यास करावाच लागतो. एखादी भाषा जरी शिकायची असली, तरी त्या भाषेतील शब्द, वाक्यरचना, वाक्प्रयोग, व्याकरण इत्यादी केवळ एक वेळ वाचनांनी ती भाषा अवगत होत नाही. त्यासाठी सतत अभ्यासाची आवश्यकता असते. ती भाषा बोलण्याचाही सराव करावा लागतो.

त्याचप्रमाणे अध्यात्मशास्त्रात, 'सर्व ब्रह्मच आहे' ही ब्रह्माची वा आत्म्याची अनुभूति घेण्यासाठी अभ्यासाची, इंद्रिय संयमाची, इंद्रियांना नियंत्रणात ठेवण्याची सवय, सराव वा अभ्यास करावाच लागतो. इंद्रियांचा स्वभाव त्यांच्या त्यांच्या विषयांकडे धाव घेण्याचाच असतो. विषय लोलूप इंद्रियांना संयमित करणे अत्यावश्यकच असते. इंद्रिय संयमाचा हा प्रकार म्हणजे 'यम'. यम राजाला मुठीत आणणे म्हणजे यमाचा अभ्यास -

हे 'यम' पांच आहेत - ते असे. **१) सत्य २) अहिंसा ३) अपरिग्रह ४) अस्तेय ५) ब्रह्मचर्य.** या पांचाचे स्वरुप सांगितले जात आहे.

**१) सत्य :-** सत्य म्हणजे खरे, हे सत्य, ब्रह्मानुभवासाठी पहिली पायरी आहे. विचार, उच्चार, व आचार यात खरेपणा असणे अति महत्त्वाचे

आहे. त्यासाठी सत्यावर प्रेम असणे आवश्यक आहे. सत्यावरच प्रेम, आवड, गोडी नसेल, तर त्या परम सत्याला, ब्रह्माला कसे अनुभवणार ? शास्त्र वचन सांगते की, -

**यो वै अनृतं वदति सः समूलं परिशुष्यति ।**

'जो खोटे बोलतो, तो मुळासहित सूकून जातो.' सत्याचा पक्ष सोडल्याने, तो स्वतःच अन्यायी होतो. आम्ही नेहमी अशी अपेक्षा करतो की, घरातील सर्वांनी आमच्याशी खरे बोलावे, नोकर-चाकर, शेजारी-पाजारी, मित्र, नातेवाईक या सर्वांनी आमच्याशी नेहमी खरे-सत्य बोलावे. पण आम्हीच जेव्हा खोटे बोलतो, त्यावेळी आमच्या अंतरात्म्यावर कुऱ्हाडीचे घाव घालतो. सत्य हे आमच्या अंतरात्म्याची मागणी आहे. खोटे बोलून इतरांच्या आत्म्याला फसवून दुःख देऊन आपला अंतरात्मा कसा प्रसन्न होईल ? अर्थात् मुळीच नाही. आपला आत्मा व इतरांचा आत्मा भिन्न नाहीत. आत्मा एकच एक आहे. म्हणून इतरांशी खोटे बोलण्याने आपल्या आत्म्याला प्रसन्नता कशी वाटेल ? श्री समर्थ रामदास स्वामी सांगत आहेत -

**मना सर्वथा सत्य सांडू नकोरे ।**
**मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे ॥**
**मना सत्य तें सत्य वाचे वदावें ।**
**मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें ॥**

जगातील सर्व संत-सत्पुरुषांनी, ऋषि, मुनींनी, अवतारी, देव-देवतांनी सत्याचाच पुरस्कार केलेला असून, सत्याचीच शिकवण दिलेली आहे. ते सर्व एकमुखाने गर्जना करीत आहेत. **'सत्या परता नाहीं धर्म, सत्य हेंचि परब्रह्म !'**

**२) अहिंसा :-** हिंसा न करणे म्हणजे अहिंसा. दुसऱ्यांना पीडा, दुःख, कष्ट, न देणे म्हणजे अहिंसा. हिंसा तीन प्रकारची असते. १) कायिक-देहाची २) वाचिक-वाणीने ३) मानसिक-मन दुखविणे. अनादि काळापासून महापुरुष अहिंसेची शिकवण देत आलेले आहेत. दुसऱ्याला कष्ट देण्याने कष्ट देणारा स्वतःलाच कष्ट देत असतो. दुसऱ्याचे धन-संपत्ति

चोरण्याने तो स्वतःचीच धन-संपत्ति चोरत असतो. जो खड्डा दुसऱ्यासाठी खोदला, त्यात एकदा तरी तुला पडावेच लागेल, दुसऱ्याची निंदा, दुसऱ्यांना कलंक लावणाऱ्यास स्वतःच कलंकित व्हावे लागेल. या गोष्टी शतशः अनुभूत आहेत. वाईट, निंद्य, घृणास्पद कर्मे, हत्या कायिक, वाचिक, मानसिक हिंसा, यामुळे आपला अंतरात्मा कधीही प्रसन्न होणार नाही. मग बाह्यपूजा, पठन, नमस्कार उपचार व्यर्थच नाही का ?

**३) अपरिग्रह :-** अपरिग्रह म्हणजे - अ = नाही, परिग्रह = संचय, साठा, संग्रह. आपल्या आवश्यकतेपेक्षा अधिक संग्रह न करणे म्हणजे **'अपरिग्रह'** या यमाचे पालन होते. विशेषतः धन, संपत्ति, मालमत्ता, आपल्या गरजे इतकीच जमवावी व ती जमविताना, मिळविताना, धर्म, न्याय व नितिने मिळवावयास हवी. या यमाचे पालन न झाले तर समाजात विषमता निर्माण होते. काही लोक खूपच श्रीमंत, धनवान होतात तर काही खूपच दरिद्री व गरीब दिसतात. ब्रह्म वा आत्मप्राप्तीसाठी मनावर, बुद्धीवर संयम ठेवणे किती आवश्यक आहे, मोह व लोभ, अहंकार, ममत्व या विकारांना अशा वेळी काबूत ठेवणे अति महत्त्वाचे असते.

**४) अस्तेय :-** दुसऱ्याच्या मालकीची लहान-वा-मोठी, क्षुल्लक वा किंमतीची कोणतीही वस्तु न चोरणे, छळ करुन वा कपटाने हिरावून न घेणे म्हणजे अस्तेय या यमाचे पालन होते. ज्याच्या इंद्रियांवर, विशेषतः मन-बुद्धीवर संयम नसेल तर, दुसऱ्याच्या वस्तु आपल्या करताना 'अस्तेय' या व्रताचे पालन होत नाही. यात अत्यंतिक स्वार्थ, विषय लोलुपता, नीति धर्माचा त्याग करुनच, दुसऱ्याच्या वस्तु चोरुन आपल्या म्हणतो. चोरीचे, लुटमारीचे गुन्हे वा प्रमाद यामुळेच घडतात. इंद्रिय संयम सुटला तर भोगवृत्ति बळावते. मग ब्रह्म, आत्मा यांच्या प्राप्तीसाठी स्वच्छ व शुद्ध आचरण कसे घडणार ?

**५) ब्रह्मचर्य :-** ब्रह्माच्या ठिकाणी आपली चर्या असणे म्हणजे **ब्रह्मचर्य.** ब्रह्मचर्य पालन म्हणजे अनुचित मार्गाने वीर्य-संयम भग्न होऊ न देणे. ब्रह्मचर्य पालन हे महाव्रत आहे. आपल्या चार आश्रमात, ब्रह्मचर्याश्रम हा

प्रारंभीचा आश्रम आहे. त्याचे पावित्र्य ठेवणे, मनोविकार यावर नियंत्रण ठेवणे हाच खरा पुरुषार्थ आहे. कामविकार बळावला की मनुष्याची नैतिक बुद्धि भ्रष्ट होते. अशा कामलंपट मनुष्याला कुत्र्यापेक्षाही हलकट जिणे जगावे लागेल. मग आत्मा, ब्रह्म यांची प्राप्ति सुतराम् शक्य नाही. शास्त्रात ब्रह्मचर्य पालनाचे अनेक नियम सांगितलेले आहेत. मुमुक्षु साधकाने त्यांचे पालन करणे अत्यावश्यकच आहे.

**सर्वं ब्रह्मेति :-** सर्वच ब्रह्म आहे या विज्ञानात अचिंतनाची म्हणजे चिंतन न करण्याची स्थितिच 'यम' आहे. यमात वृत्ति प्रवाह नाही. नियमात वृत्ति प्रवाह असतो. जे आत आहे, तेच बाहेरही आहे. मग आत-बाहेर जाण्यात कोणती विशेषता आहे ? जो ब्रह्मानंद, आत्मानंद आपल्या आतच आहे मग तो घेण्यासाठी दुसरीकडे जाण्याची आवश्यकता कुठे आहे. मी च स्वयं आनंदस्वरुप आहे. जे माझ्यात आहे, त्यापेक्षा अधिक दुसरीकडे कशाला शोधता ? इंद्रियांचा संयम तर हवाच, पण हे सर्व माझेच, आत्म्याचेच स्वरुप आहे या आधारावर हवा. सर्वत्र एकरस, परिपूर्ण, अविनाशी आत्मस्वरुपच भरलेले आहे हाच संयमाचा आधार असावा.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१०५) नियमाचे महत्त्व

**श्लोक :-** **सजातीय प्रवाहश्च विजातीय तिरस्कृतिः ।**
**नियमो हि परानन्दो नियमात्क्रियते बुधैः ॥१०५॥**

**अर्थ :-** सजातीय प्रत्यय (विचार) प्रवाह ठेवणे आणि विजातीय प्रत्ययाचा (विचार प्रवाहाचा) त्याग, परमानंद देणारा नियम आहे. बुद्धिमान-सूज्ञ लोक याचा पद्धतशीर अभ्यास करतात. ॥१०५॥

**विवरण :-** सजातीय प्रत्यय प्रवाह म्हणजे अशा विचारांचा प्रवाह, ज्यात सर्व चेतन ही चेतन भरलेले आहे. सर्व आनंदच आनंद आहे. याशिवाय जे जे वेगळे भासत आहे, ते सर्व तुच्छ आहे. हेय आहे. हा नियम परमानन्दरुप आहे. ज्ञानी याच नियमाचे पालन करतात.

'नियम' शब्दाचा प्रयोग लोक व्यवहार, योग, धर्मकर्म, या अनेक ठिकाणी केला जातो. व्यवहारांत, आचरणांत आपण काही नियम बनवून वागतो. स्नान झाल्यानंतरच पूजा-अर्चा व नंतर भोजन हा नियम असतो. दिलेले दान परत न घेणे, त्याची वाच्यताही न करणे, हा धार्मिक नियम आहे. पातंजल योग दर्शनात नियमात पुढील गोष्टी येतात -

**शौचसंतोष तपः स्वाध्याय, ईश्वर प्रणिधानानि नियमाः ॥** साधनपद-सूत्र-३२

**सूत्रार्थ :-**

१) शरीर स्वच्छ ठेवणे, आणि मन पवित्र राखणे हे **शौच** होय.

२) प्राप्त परिस्थितीत मनाचे समाधान ठेवणे, हा **संतोष** होय.

३) रसनेंद्रियावर नियमन, नियंत्रण ठेवणे, शीतोष्णादी द्वंद्वें सहन करणे आणि इंद्रियांना स्वाधिन ठेवणे हे **तप** होय.

४) उपास्य देवतेच्या मंत्राचा जप करणे, वेदाध्ययन करणे, बुद्धीला सूक्ष्मता आणि शुद्धि प्राप्त करुन देणाऱ्या न्याय, योग, वेदांत इत्यादी शास्त्रांचे अध्ययन करणे हा **स्वाध्याय** होय.

५) सर्व कर्मे ईश्वरार्पण बुद्धीने करणे हे **ईश्वर प्रणिधान** होय. असे हे पांच नियम आहेत.

**सजातीय प्रवाहश्च-विजातीय तिरस्कृति ।** सजातीय प्रवाह ठेवणे, विजातीय टाकणे. भगवान श्री आद्य शंकराचार्यांची वर्णन पद्धति जरा लक्षपूर्वक पहा. त्यांची वर्णन पद्धति अद्वितीय व विलक्षण असल्याने, ती आपणांस थक्क करते. त्यांच्या वर्णन पद्धतीचा जेव्हा आम्ही पुन्हा सखोल विचार करतों व आपल्यातच तिचा शोध घेतो, तेव्हा अचानक एक टवटवीत बहरलेले गूढज्ञान, तत्त्वज्ञान, आपल्या मध्ये प्रगट होते. श्री शंकराचार्यांनी वर्णन केलेली स्थिति, आपल्या अनुभवास येऊ लागते. त्या वेळी भगवान पातंजलींनी सांगितलेलीं ही पांच नियमावलि, प्रयत्नाशिवाय आपल्यामध्ये परिपूर्ण भरलेली ज्ञात होतात.

आचार्य, नियमांची व्याख्याच अशी काही आश्चर्यजनक करतात की, साधकाला त्या नियमांचे आकलन होऊन, त्यांचे पालन करण्यात कोणतीही कठिणता येत नाही. त्या नियमांचे पालन करणे सुगम होऊन जाते. आत्मतत्त्वामध्ये, परब्रह्मामध्ये स्थिरावलेल्या वृत्तींना, शांत आणि निःशब्द अवस्थेला बाहेरील कोणत्याही विजातीय प्रवाहाला थोपविणे, आपल्या स्वस्थ, शांत, निश्चल अवस्थेतला बिघडू न देणे, सजातीय अनुकूल प्रवाहच चालू ठेवणे, अखंड त्याच आनंदाच्या स्थितीत राहाणे, यासच 'निमय' असे म्हणतात. पातंजलींनी सांगितलेल्या पांचही प्रकारच्या नियमांचा या स्थितीत समावेश झालेला दिसून येतो.

मनाची स्थिरता, निश्चलता असताना, संसाराचे भान नसते. समाधि ही अशीच स्थिर व निश्चल स्थिती आहे. ही अवस्था सुटली की मनाची चंचलता सुरु होते व संसाराचे भान येते. भिन्न भिन्न वस्तूंचे दर्शन होते. द्वैत-दर्शन मनाच्या चंचलतेमुळेच होत असते. वेदांताचा असा नियम आहे की, कुठेही द्वैत नाही. सर्वत्र अद्वैतच आहे. सर्वत्र तेच आनंदस्वरुप ब्रह्म चैतन्य पसरलेले आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१०६) त्यागाचे निरुपण

**श्लोक :-** **त्याग: प्रपञ्चरुपस्य चिदात्मत्वावलोकनात्।**
**त्यागो हि महतां पूज्य: स द्यो मोक्षमयो यत: ॥१०६॥**

**अर्थ :-** चिदात्म्याच्या रुपात, प्रपंचाच्या रुपाला पाहिल्यानंतर त्याचा स्वत:च त्याग होऊन जातो. महात्म्यांना हाच त्याग पूजनीय आहे कारण त्यामुळे तत्काल मोक्ष प्राप्त होतो. ॥१०६॥

**विवरण :-** सर्वच ब्रह्म आहे. ब्रह्माशिवाय अन्य काहीही नाही. मग या ब्रह्म स्वरुपात भासणारा प्रपंचही मिथ्या होऊन जातो. अशा प्रकारे प्रपंच्याचे मिथ्यात्व कळले की, त्याच्या संबंधीच्या कामना, वासनाही समाप्त होऊन जातात. हाच खरा त्याग आहे. स्वप्नांतील पदार्थ जसे जागृतीत मिथ्या होतात व त्या पदार्थांची आसक्ति, वासना वा कामना राहात नाही. हा स्वप्नमय स्थितीचा जागृतीत त्याग होऊन जातो. त्याच प्रमाणे आत्मजागृतीत, जागृत अवस्थेतील प्रपंचादी सर्वांचा आपोआप त्याग होऊन जातो. संत महात्म्यांच्या दृष्टीने हाच खरा व पूजनीय त्याग आहे.

जो वैराग्य संपन्न होतो व त्याला जर ब्रह्मज्ञान, आत्मज्ञान झाले तर तो सिद्ध महात्मा, अवधूत होऊन जातो. जर सर्व आपलेच स्वरुप आहे तर त्याला कसलीही कामना, वासना, अपेक्षा, व संग्रहाची इच्छा होत नाही. पण एखाद्या संसारी गृहस्थाला वाटले की मीच ब्रह्म आहे, माझ्या शिवाय दुसरे काहीच नाही, तर तो भोगी होतो. कारण चित्तात वैराग्य नसते. जगात काहीही त्याज्य नाही, मग त्याची भोगप्रवृत्ति अधिकच वाढते, म्हणून त्यागाची स्थिति वैराग्यातून यावयास हवी.

संग्रह करण्याने ममत्व व आसक्ति निर्माण होते. ममत्वातून अहंकार येतो. अहंकाराने चित्त विक्षिप्त होते. अस्थिर व चंचल चित्तात शांति, समाधान नसते. ज्या संग्रह वृत्तीने अहंकार पोसला जातो, व चित्त अशांत होते. अशा अशांत मनाला शांत करण्यासाठी, त्यागाचीच आवश्यकता असते. त्याग हा

काया, वाचा, मनाने घडावयास हवा. सोडलेला विषय, त्यागलेली उपाधी, स्मरणातही येऊ नये. मनातून त्यांचा त्याग व्हावयास हवा. चिंता, काळजी, स्मरण इत्यादी मनातील शांती नष्ट करतात. म्हणून -

**त्यागात् शांति निरंतरम् ।** ही निरंतर, अखंड शांती त्यागानेच प्राप्त होते.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (१०७) मौना संबंधी कथन

**श्लोक :-** **यस्माद्वाचा निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ।**
**यन्मौनं योगिभिर्गम्य तद्भवेत्सर्वदा बुध: ||१०७||**

**अर्थ :-** वाणीसह मन ज्यास प्राप्त न करता परत येते, जे मौन तत्त्व योगीजनांनाच प्राप्त होते. बुद्धिवानाने सतत अशाच मौनात असावे. ||१०७||

**विवरण :-** मौन म्हणजे न बोलणे, वाणीचा उपयोग, शब्दांचा उपयोग न करणे. सर्व सामान्य माणसे यासच मौन म्हणतात. मौन कशासाठी पाळायचे हे आधी समजले पाहिजे. जगातील सर्वच व्यवहार वाणीच्या साहाय्यानेच होतात. ज्यावेळी आपणास हव्या असलेल्या गोष्टी इतरांना सांगूनच प्राप्त करता येतात. त्यावेळी बोलणे भागच पडते. मुका मनुष्य बोलू शकत नाही. मग तो हातवारे, खाणाखुणा, बोटांच्या हालचाली करुन आपल्या मनातील हेतू इतरांना प्रगट करु शकतो. अशावेळी, जेथे मूकासुद्धा आपला हेतु, उद्देश व्यक्त करण्याची धडपड करतो, तेथे ज्याला वाणी दिलेली आहे, तो वाणीचा उपयोग केल्याशिवाय कसा बरे राहू शकेल ?

मग मौन कशासाठी ? मौनाने काय साध्य होते ? या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे बोलण्यातून शक्ति खर्च होते. बोलण्या बोलण्यातूनच वाद-विवाद, संवाद निर्माण होतात. खूप बोलण्यातूनही, जर आपला हेतु, आपली बाजू दुसऱ्या पक्षाला पटवून देता आली नाही तर सर्व बोलणे व्यर्थ जाते व निराशा येते. अति बडबड, वाचाळता- कंटाळवाणी होते. '**कृतिवीण वाचाळता व्यर्थ आहे.**' बोलण्यातून काहीच निर्माण झाले नाही, तर बोलणे व्यर्थ जाते. बोलण्याचा मग शीण येतो. हा बोलण्याचा शीण, कंटाळवाणेपणा घालविण्यासाठी, अबोल होणे म्हणजे मौन होणे हे ही खरे मौन नाही.

खरा मौनी महात्मा, भोगकथा, रोगकथा व रागकथा यासाठी वाणीचा उपयोग करीत नाही. जगांत अनेक भाषा आहे. एकेका भाषेत असंख्य शब्द आहेत. शब्दच शब्दांना पकडून वाक्ये बनवितात व वाक्या-वाक्याने वाणी-

भाषा तयार होते. एकदा या सर्व वाणींनी एकत्र येऊन त्या आत्म्याला भेटण्याचा विचार केला. पण त्यांना त्या आत्म्याचे ठिकाण, त्या ठिकाणाकडे जाण्याचा रस्ता माहीत नव्हता. अशावेळी त्यांच्या सोबत, त्यांना मार्गदर्शक म्हणून मनाला घेतले. सर्व वाणीं व मन त्या आत्म्याच्या द्वारापर्यंतच पोहचू शकले. जो पर्यंत गंध, रस-रुप, स्पर्श-शब्द या मनाच्या राज्यातील प्रसन्न करणाऱ्या गोष्टी त्या वाणींना भेटत होत्या, तो पर्यंत त्यांचा प्रवास छान झाला. परंतु जस जसे त्या आत्मराजाचे क्षेत्र येऊ लागले, तस तसे सर्व वैराण, शुन्य होऊ लागले. आता मनाला भय वाटू लागले, त्याचे धैर्य खचले. यापुढे आता आपल्याला जाता येणे शक्य नाही. म्हणून ते तेथूनच, त्या आत्म्याला न बघताच त्याचे दर्शन न घेताच माघारी परतले. त्याच्या सोबत आलेल्या सर्व वाणींही तशाच परतल्या. त्या परमात्म्याजवळ कोणीच पोहचू शकले नाहीत.

याचा अर्थ असा, आम्हीं जे वाणीने बोलतो, बोलू शकतो व मनाने-बुद्धीने विचार, कल्पना करु शकतो, तसे त्या आत्म्याचे स्वरुप नाही. तो आत्मा तर मन, बुद्धि, वाणी, शब्द यांच्या अतीत आहे. तो या सर्वांचा साक्षी आहे. तेथे पूर्ण शांती आहे. त्या आत्मचैतन्यात, त्या ब्रह्मस्वरुपात थोडेही चांचल्य नाही. तेथे कुठलाही नाद, स्वर वा सूर नाही. परिपूर्ण शांततेची योगगम्य स्थिति आहे. या स्थितीचेच नाव **'मौन'** आहे. त्या स्थितीत जो पोहचला, तोच खरा बुद्ध, बुद्धिमान, विद्वान आहे.

आजकाल मौनाचेही वेगवेगळे प्रकार दृष्टीस पडतात. धर्म शास्त्रांत होम-हवन करीत असतांना बोलू नये. बोलताना हवन कुंडात बोलणाऱ्याची थुंकी, थेंब पडण्याची शक्यता असते. देवपूजा करतानाही मौन पाळणे आवश्यक असते. समजा, देवाची पूजा करीत असताना, संसारातील काही अडचणी उद्‌भवल्या, व पूजा करणाऱ्याचा सल्ला अत्यावश्यक असला आणि तो विचारला, तरी तो पूजेत प्रतिबंध आहे. म्हणून त्यावेळी मौन पाळणे आवश्यकच असते. पूजेचे मंत्र म्हणणे ठीक, पण ते मंत्र म्हणण्याऐवजी संसाराचेच मंत्र,

रडगाणे गात बसला, तर तो देव पूजेचा विधि धर्मशास्त्राला अमान्य आहे. तो त्या देव-देवतांना तरी कसा मान्य होणार ?

मल-मूत्र त्यागते वेळी, मौन राहणे आवश्यक आहे. स्नान, भोजन करतानाही मौन असणे आवश्यक आहे. तथापि आपण पहातो की, स्नान करताना देव-देवताचे मंत्र म्हणणे एक मान्य होईल, पण संसाराच्या गोष्टी करणे अयोग्य व अनुचित आहे. जेवताना तर काही लोक सारखी बडबड करीत असतात. त्या वेळी वक्तृत्वाचे स्फुरण चढणे, धर्म शास्त्राच्या दृष्टीने अयोग्य आहे. वास्तविक ही सांसारिक कर्मे-क्रिया, जर मौनात राहून केल्या, तरच त्या धार्मिक होऊ शकतात. आपल्या चार पुरुषार्थांपैकी धर्म हा पहिलाच पुरुषार्थ आहे. धर्माच्या नियमाप्रमाणे त्या त्या क्रिया-कर्मे केलीत, तर त्या धार्मिक होतील. धर्मशास्त्राला मौन हे उपकारक आहे. मौनांत स्थैर्य, एकाग्रता, शांति असल्याने ती ती कर्मे अधिकच फलदायी होतात.

मौन पाळणे फारच आवश्यक असते. ज्यावेळी, ज्या ठिकाणी, आपल्या बोलण्याने ते कार्य बिघडण्याचा संभव अथवा आपल्या बोलण्याने आपलेच व्यक्तिमत्त्व विकृत स्वरुपांत इतरांपुढे प्रगट होते, अशा बोलण्याने काय साधले ? अशा वेळी मौन पाळणे, शहाणपणाचे लक्षण ठरते.

पुष्कळ वेळा मौन का व कशासाठी पाळायचे ? हे त्या मौनी व्यक्तीला उमगले नाही, तर मौनाचे विडंबन होऊन जाते. उदाहरणार्थ, मौनव्रत घेऊन बोलणे तर बंद केले, पण बोलण्याचाच उद्योग वेगळ्या प्रकारे चालू राहतो. कुणी काही विचारले की, लगेचच पाटीवर लिहून दाखवावयाचे, पुस्तकातील तो श्लोक बोटाने दाखवावयचा, मान डोलवायची, खाणा खुणा करायच्या. बोलण्याऐवजी ते काम वेगळया पद्धतीने करीत राहणे हे मौन व्रताचे विडंबनच नाही का ? स्त्री रागावली, बालक रागावले की बोलत नाही. हे काय मौन झाले ? भक्तीत देवाशी संवाद करतात हे काय मौन आहे ? काष्टमौन म्हणजे अगदी चुपचाप लाकडासारखे बसणे. या सर्व प्रकारच्या मौनात उद्दिष्ट, तर पूर्णपणे विसरलेले दिसते आणि खऱ्या मौनाचे विडंबन झालेले दिसते.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

# (१०८) मौनाचे स्वरुप

**श्लोक :-** **वाचो यस्मान्निवर्तन्ते तद्वक्तुं केन शक्यते ।**
**प्रपञ्चो यदि वक्तव्य: सोऽपि शब्दविवर्जित: ॥१०८॥**

**अर्थ :-** जेथून वाणी माघारी परत येते, त्याचे वर्णन कशा रीतीने करता येणे शक्य आहे ? दृश्यमान् असलेल्या बहुविध प्रपंचाचे वर्णन करणेही शब्दांनी अशक्य व अनिर्वचनीय आहे. ॥१०८॥

**विवरण :-** कोणताही वर्णनाचा विषय असो, तो शब्दांनी, वाणीनेच वर्णन करुन सांगता येतो. वाणीच्या पलिकडे असलेल्या आत्म्याचे वर्णन, वाणीने होऊच शकत नाही. आत्मा अवर्णनीय आहे. म्हणून त्याचे वर्णन, वाणीने होऊच शकत नाही. कोणी म्हणेल आत्म्याचे राहू द्या. या दृश्यमान प्रपंचाचे वर्णन तरी वाणीने करता येईल ना ? तर नाही. कारण प्रपंचही अनिर्वचनीय आहे. मग त्याचे वर्णन तरी वाणीने कसे करता येईल ? या प्रपंचाची अनेक अंगे, अनेक कर्मे आहेत. मग कोणते कर्म-धर्म व कोणते कर्म-अधर्म ? धर्म-अधर्म ही देश, काल व अधिकारी मनुष्याच्या मतांप्रमाणे होतात. या प्रपंचात अनेक मत-मतांतरे आहेत. त्यांतील कोणती खरी व कोणती खोटी ? हे विविध प्रकारचे जीवन, विविध प्रकारची आचरणें, काही योग्य तर काही अयोग्य असतात. या सर्वांचे वर्णन करणे असंभवनीय आहे. म्हणूनच प्रपंचाला अनिर्वचनीय म्हटले जाते. यात सत् कोणते व असत् कोणते ? दिसणारे प्रपंचाचे दृश्य परिवर्तनीय आहे. मग ते सत् कसे म्हणावे. त्याला सत् म्हणावे तर प्रपंच अनुभवात येणारा आहे. म्हणून तो सत्-असत् विलक्षण असा आहे. परब्रह्म, परमात्म्याच्या दृष्टीने पाहिले, तो सत्‌ही नाही आणि असत्‌ही नाही. म्हणून प्रपंच वर्णन करण्यास योग्य नाही. दृश्य आहे तर निर्विकार नाही. अदृश्य असेल तर त्याला कुणी पाहिले ? मग अदृश्य विकारी वा अविकारी ठरविताही येत नाही. म्हणून बुद्धिमान पुरुष बोलणेच बंद करतो. हेच त्याचे मौन असते.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१०९) सहज मौनाचे लक्षण

श्लोक :- इति वा तद्भवेन्मौनं सतां सहज संज्ञितम् ।
गिरा मौनं तु बालानां प्रयुक्तं ब्रह्मवादिभिः ॥१०९॥

**अर्थ :-** अशा प्रकारे जे संत सत्पुरुषांचे मौन असते ते सहज संज्ञक असते. वाणीचे मौन तर वेदज्ञ पुरुषांनी बालांसाठी (अज्ञानी लोकांसाठीं) सांगितलेलें आहे. ॥१०९॥

**विवरण :-** या श्लोकांत आचार्यांनी सहज संज्ञक मौनाची एक अत्यंत वेगळी अशी पद्धति वा रीत सांगीतली आहे. 'सहज संज्ञित' म्हणजे ज्या मौनाला सहज नाम देता येईल असे मौन. असे सहज स्वाभाविक मौन केव्हा निर्माण होते ? तर साधकाला 'सहज' स्थितीत ते आपोआप प्राप्त होते. संत सत्पुरुष ज्यावेळी परमात्म्याचे, परब्रह्माचे वर्णन करण्याचा प्रयत्न करतात, त्यावेळी तो परमात्मा वाणीच्या पलिकडे, शब्दांच्या पलिकडे आहे, त्याचे वर्णन करताच येत नाही, म्हणून गप्प राहतात. तसेच प्रपंच सद्-असद्, विलक्षण, अनिर्वचनीय असल्यामुळे प्रपंचाचे वर्णन करता येत नाही, म्हणून गप्प असतात, ही न बोलण्याची सहज-स्वाभाविक स्थिति असते. या अवस्थेतील मौनाला 'सहज' मौन म्हणतात.

**गिरा मौनं तु बालानाम् -** गिरा म्हणजे वाणी. वाणीने मौन धरणे, म्हणजे बोलण्याची क्रिया थांबविणे. यास बालकाचे, लहान मुलाचे मौन म्हटले जाते. साधकाच्या प्रारंभिक अवस्थेत असे मौन धरावे लागते. अनावश्यक, अयोग्य, बडबड, जी एक अर्थशून्य असते, ती तोंड बंद करुन थांबविणे, ही बालक-मौनाची अवस्था आहे. वाणी असून ती उच्चारु न देणे. बोलू न देणे, कारण त्या बोलण्यातून काहीही निष्पन्न होत नाही. असे बोलणे बंद करणे, हे बालकाचे मौन असते.

परमात्म्यांत शब्दादी गुण नाहीत. तो परमात्मा निर्गुण आहे. त्यात कोणतीही क्रिया नाही म्हणून तो निष्क्रिय आहे. त्याची कल्पनाही करता येत नाही, म्हणून तो कल्पनातीत आहे. तो कोणत्याही इंद्रियांचा विषय नाही.

म्हणून तो निर्विषय आहे. मग अशा आत्म्याचे वर्णन होणार तरी कसे ? म्हणून तो वर्णनातीत आहे. सर्वांच्या अतीत, पलिकडे तो आहे. अशा वेळी बोलणाऱ्याची वाणी आपोआप बंद होते. या स्थितिला 'सहज' मौनाची स्थिति म्हणता येते. ब्रह्मवादी, आत्मज्ञानी महात्म्याची ही स्थिती असते. त्या स्थितीत सदैव शांति, निष्क्रियता व स्वाभाविक मौन असते. वेदांती मौनाबद्दल म्हणतात-

**'मौनं मुनि वृत्तिः, मुर्नेर्थावं मौनम्, मननात्मुनिः ।'**

साधन अवस्थेत, सत्याचे अनुसंधान करणे, सत्याचे आचरण करणे म्हणजेच मनन होय. सिद्ध अवस्थेत मौनाचा अर्थ सत्यस्वरुप राहाणे, अवस्थित होणे. श्रुतीत मौनाचे वर्णन असे आहे. -

**'पाण्डित्येन निर्विध बाल्येन निष्ठासेत,**
**बाल्येन निर्विध मौनेन तिष्ठासेत,**
**मौनं च अमौनं निर्विद्य अथ ब्राह्मणो भवति ।'**

संसारात प्रथम विरक्त होऊन, शास्त्रज्ञान यथा योग्य प्राप्त करावयास हवे. शास्त्रज्ञानाने चांगले पांडित्य आले की, अखंड आत्मवस्तुमध्ये भेद वा व्यवहार नाही. मग पांडित्याचाही त्याग करुन बाल्यभावात, बालकासारखे निरागस भावात राहावे. पुढे बाल्यभावही सोडून मौन धरुन राहावे. अर्थात् ते मौन 'सहज संज्ञित' म्हणजे स्वाभाविक असावे.

मनुष्याचे जीवन इतर सर्व प्राणीमात्रांच्या जीवनापेक्षा अधिक सुज्ञ आहे. आणि म्हणूनच ते अधिक मौल्यवान आहे. असे मौलिक जीवन आपल्या मन-बुद्धि इत्यादी इंद्रियांना प्रिय होईल असे करुन ते खर्च करु नये. कारण इंद्रियांची धांव त्यांना प्रिय असणाऱ्या विषयांकडेच असते. अंर्तदृष्टीने, त्या परमात्म्याला प्रिय, अनुकूल होईल असेच ते व्यतीत करावे.

'मौन' हेही साधन आहे. या साधनाने काय साध्य करावयाचे ते त्या मौन पाळणाऱ्या व्यक्तिला माहिती असावे. वाणीचा व मन, बुद्धिचा संयम प्राप्त होण्यासाठी मौन पाळावे. त्यानंतर शांति प्राप्त होते. वासना, कामना, इच्छा कमी व्हाव्यात, म्हणून मौन पाळावे. आणि हे प्राप्त होत नसेल तर जे मौन धरले आहे, ते बालीश बालकाचे मौन समजावे. वाणीचे व्यर्थ बोलणे, वाक्

ज्योतिचा अपव्यय आहे. दिव्यात तेल भरुन दिवा नुसताच जळत ठेवणे हा दीप ज्योतीचा दुरुपयोग आहे. बोलणे आवश्यकच असेल तर त्या संबंधी काही नियम पाळणे अत्यावश्यकच आहेत. उदाहरणार्थ -

१) अनावश्यक बोल, शब्द तोंडातून न निघू देणे.

२) दुसऱ्यांचे दोष आपल्या मुखाने न सांगणे. निंदा न करणे.

३) आपले गुण, सद्गुण, आपल्याच मुखाने न सांगणे. आत्मस्तुति न करणें

४) बोलायचेच असेल तर भगवंत, परमात्मा, श्री सद्गुरु, साधना या संबंधीच बोलत जावे.

श्रीमत् भगवद्गीतेत भगवंतांनी, तपाचे वर्णन करताना, मौनाला मानसिक तप म्हटले आहे. सर्व दु:खे, यातना, असमाधान, पीडा, क्लेश देणारीच आहेत. यातील काही दु:खे बोलण्याने निर्माण होतात. कटु बोलणे, जिव्हाग्री लागेल असणे बोलणे, सतत खूपत, टोचत राहते. म्हणून बोलतांना काही महत्त्वाच्या गोष्टी ध्यानांत ठेवणे आवश्यकच आहेत -

सत्यं, हितं, मितं ब्रूयाद अभिसंवादि, पेशलम् ।

१) सत्य २) हित ३) मर्यादित (सीमित) ४) मत भेद रहित ५) कोमल वाणीने, मृदुशब्दांनी गोड व प्रिय मधुर वाणीने बोलले पाहिजे. तसे पाहिले तर न बोलणे वाणीचे तप समजण्यात येते. परंतु एका विशेष प्रकारच्या बोलण्याला भगवान मानसिक तप असे म्हणतात -

**मन:प्रसाद:साम्यत्वं मौनमात्मविनिग्रह: ।**

**भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ।। गीता - अ - १७. श्लो. १६**

मनाची प्रसन्नता, सम-शांतभाव, भगवद् चिंतन करणारा स्वभाव, मनाचा निग्रह, आणि अंत:करणांतील भाव-भावनांची पवित्रता, यास मानसिक तप म्हटले जाते.

वाणीचे मौन सर्वांना समजते. तथापि मनाचे मौन कळत नाही. दुसऱ्याच्या भीतिने, द्वेषाने, संतापाने अविचाराने वा कुविचाराने, स्वत:च्या मनाला दु:खी न होऊ देणे. सदा मनाने अलिप्त, असंग अनुद्विग्न असणे, हे **मानस मौन** आहे.

।। हरि ॐ तत् सत् ।।

## (११०) देश - एकांताची आवश्यकता -

**श्लोक :-** **आदावन्ते च मध्ये च जनो यस्मिन्न विद्यते ।**
**येनेदं सततं व्याप्तं स देशो विजनः स्मृतः ॥११०॥**

**अर्थ :-** ज्याच्या आदि-मध्य व अंति, कोणीही असत नाही. आणि ज्यामुळे हे विश्व निरंतर व्याप्त आहे, त्यासच एकांत देश म्हटले पाहिजे. ॥११०॥

**विवरण :-** आत्मसाक्षात्कारासाठी करावयाच्या साधनेला देश-म्हणजे एकांताची आवश्यकता असते. आपणच आपले एकटे असणे, **'जायत इति जनः'**, जो उत्पन्न होतो, तो जन आहे. हा सारा प्रपंच जन आहे. प्रपंचात अनेकांनी गर्दी केलेली आहे. त्यामुळे प्रपंचात एकटे राहाता येत नाही. संसाराचे चित्रही तसेच आहे. ज्या ठिकाणी एकांतासाठी बसाल, तेथे तेथे जन म्हणजे उत्पन्न झालेले जीव आहेतच. माणसे, पशु, पक्षी, कीटक, मच्छर, भुंगे, मुंग्या इत्यादी सर्व ठिकाणी भेटणारच. त्यांचा उपद्रव होणारच. मग एकांत कसा मिळणार ? खरा एकांत म्हणजे अनेकांत एकाचा बोध होणे. एकाचाही अंत होणे हाच खरा एकांत आहे.

धर्म क्रिया, यज्ञविधिसाठी यज्ञ शाळेत बसणे एकांत आहे. पूजापाठ करण्यासाठी देवघरात वा मंदिरात बसणे एकांत आहे. वैराग्यासाठी, विरक्त होण्यासाठी, जंगलात, गुहेत, पर्वतावर वा नदी किनारी बसणे एकांत आहे. योगाभ्यासासाठी मनाची एकाग्रता आवश्यक आहे. तत्त्व-ज्ञानाच्या दृष्टीने आत्म्याशिवाय अन्य कोणतीही वस्तु नाही..अष्टावक्रगीतेत सांगितल्या प्रमाणे-

**अहो जनसमूहेऽपि न द्वैतं पश्यतो मम ।**
**अरण्यमिव संवृत्तं क्व रतिं करवाण्यहम् ॥**

अहो, काय आश्चर्य ! या जन समुहात, गर्दीत, मला माझ्याशिवाय दुसरे काहीच दिसत नाही. माझा आत्माच द्वैताच्या रुपाने प्रकट होत असल्याचे दिसत आहे. माझ्यात द्वैतदृष्टिच नाही. जसे घोर जंगलात राहावे, तसेच गर्दीत राहावे. यात या गर्दीला वा अरण्याला प्रिय समजण्यात काहीच अर्थ नाही.

जेथे दुसऱ्याशी काहीही संबंध नाही, प्रेमाचा बंध नाही, तेथे एकांतच असतो. आत्मैक्याने सर्व पाहाणे म्हणजे खरा एकांत होय. तसेच आपल्या मनांत दुसरे काहीही नसणे. हा मानसिक एकांत, म्हणजे खरा एकांत होय. माझ्या आत्मस्वरुपाशिवाय दुसरे अन्य काहीही नाही. हा खरा आत्मिक एकांत होय !

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१११) कालाचे महत्त्व

**श्लोक :- कलनात्सर्वभूतानां ब्रह्मादीनां निमेषतः ।**
**काल शब्देन निर्दिष्टो ह्यखण्डानन्द अद्वयः ॥१११॥**

**अर्थ :-** ब्रह्मदेवापासून सर्व प्राणीमात्रांना निमिषांत कलन-आकलन (उत्पति-स्थिति- प्रलय) करीत असल्यामुळे, आनंदस्वरुप, अद्वितीय असे ब्रह्मच काल शब्दाने दाखविले जाते. ॥१११॥

**विवरण :-** भगवान श्री आद्य शंकराचार्यांनी या ग्रंथात कालाला ब्रह्मच म्हटलेले आहे. कारण ब्रह्माहून श्रेष्ठ, बलिष्ठ, वेगवान असे दुसरे अन्य तत्त्व नाही. कालाचा महिमा अगाध आहे. एका निमिषांत म्हणजे डोळ्यांची पापणी उघडण्यात वा मिटण्यात जितका वेळ लागतो, त्या क्षणार्धात काल या सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व प्रलय घडवून आणू शकतो व ब्रह्मदेवापासून सर्व लहान थोर प्राण्यांना उत्पत्ति-स्थिती व प्रलयात संपवू शकतो. हे कालाचे अचाट सामर्थ्य पाहूनच सर्व देव-दानव व मानव कालाची आराधना करताना दिसून येतात.

प्रत्येक दिवशी सकाळी ब्राह्म मुहूर्त असतो. त्यावेळी झोपेतून, उठून, हातपाय तोंड धुवून सूर्योदयाच्या वेळी सूर्याला नमस्कार करण्याची प्रथा आहे. साऱ्या जगाला प्रकाश देण्यासाठी सूर्याचा उदय होतो. तसाच आपल्या अंतःकरणात ज्ञानाचा उदय होतो. आपला अभ्युदय होतो.

**सूर्यमात्मा जगत स्तरथुषश्च ।**

सर्व जगाचा म्हणजे सर्व प्राणीमात्रांचा, वनस्पतींचा सूर्य आत्माच आहे. सूर्यामुळेच जगात जीवन प्रवाह वहात आहेत. सूर्यच कालाची स्मृति देणारा महान् द्रष्टा आहे. रात्र आणि दिवसाची कल्पना सूर्यामुळेच निर्माण झालेली आहे. पुढे या दिवसाचे अनेक भाग करुन पळ, घटिका, पक्ष, दिन, आठवडा, महिना, वर्ष, संवत्सर, युग इत्यादी स्वरुपात कालाची विभागणी होऊन, कालाचे मोज माप केले जाते. तथापि कालाचे असे खंड वा तुकडे होत नाहीत. कालाचा प्रवाह हा अखंड वाहाणारा आहे. या काल प्रवाहातच

जगातील सर्व प्राणीमात्रांच्या जीवनाचा उदय-स्थिती व अस्त होताना दिसून येतो. वर्तमान-भूतकाळ व भविष्यकाळ असे त्या काळाचे विभाजन करुन मनुष्य आपली जीवन-नौका चालवीत आलेला आहे. वास्तविक कालांत भेद नाही. शरीर, वस्तु, पदार्थ यांच्या उपाधीमुळे कालाचे खंड करुन मोजणे होते. अशा या कालाचा प्रकाशक, त्याचे मूळ अधिष्ठान, ते मूळ परब्रह्मच आहे. या परब्रह्मस्वरुपी कालांत मानवाने अनेक शास्त्रांची निर्मिती केलेली आहे. ज्योतिष, खगोल, संख्या, इतिहास इत्यादी शास्त्रांचे ज्ञान त्या परब्रह्मस्वरुप कालौघातूनच प्रकट झालेले आहे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (११२) आसनाचे स्वरुप

**श्लोक :-** **सुखेनैव भवेद्यस्मिन्नजस्त्रं ब्रह्म चिन्तनम् ।**
**आसनं तद्विजानीयान्नेतरत्सुखनाशम् ॥११२॥**

**अर्थ :-** शरीराच्या ज्या अवस्थेत सुखाने अजस्त्र ब्रह्म-चिंतन होईल, त्या अवस्थेला **'आसन'** समजावयास हवे. सुखनाश करणारी शरीराची इतर कोणतीही अवस्था म्हणजे आसन नव्हे. ॥११२॥

**विवरण :-** आसन म्हणजे एखाद्या कार्यासाठी बसण्याची शरीराची विशिष्ट अवस्था होय. शरीराची ही विशिष्ट अवस्था तशीच टिकवून ठेवणे, त्या त्या विशेष कार्यसिद्धीसाठी आवश्यक असते. तथापि ज्यामुळे शरीराला पीडा, त्रास होईल असे आसन नको. सहज वस्तुसाठी सहज आसन चांगले. योग शास्त्रांत अनेक आसनें सांगितलेली आहेत. विशेषत: हठयोगाची आसनें शरीराला मजबूती, बळकटी आणण्यासाठी, व्यायाम करण्यासारखी आहेत. आसन स्थिर झाले तर चित्ताला स्थैर्य येते. एकाग्र चित्ताने श्वासाची गति मंद होते. श्वासावर नियंत्रण हे ध्यानासाठी आवश्यक असते. योगातील ध्यान, धारणा व समाधि या अवस्थांमध्ये स्थिर आसन अति महत्त्वाचे असते.

**स्थिर सुखमासनम् ।** योगदर्शन

केवळ शरीर, पाय स्थिर होणेच महत्त्वाचे नाही. ज्या आसनात सुख स्थिर होतें तेच श्रेष्ठ आसन होय. आसनसिद्धी साधनेला उपकारक आहे. तथापि त्याचाच अभिमान निर्माण होणे अयोग्य आहे. अनेक लोक आसनांचा अभ्यास नेहमी शिकवितात व शिकणारेही शिकत असतात. व्यायामाचे प्रकार व शरीर सुदृढतेसाठी अशी आसनें ठीक आहेत. तथापि अशा आसनांनी आत्मचिंतन, ब्रह्मचिंतन होणे हे महत्त्वाचे आहे.

**नेतरत् सुखनाशनम् ।**

ज्यामुळे अंत:करणात सुख निर्माण होऊन ब्रह्मचिंतन घडेल तेच योग्य आसन होय. ज्यामुळे सुख तर नाहीच, पण दु:ख, पीडा होत असेल,

त्यास आसन म्हणता येणार नाही. काही यौगिक आसनांनी शरीरातील रोगही बरे होतात. शरीर सुडौल व चपळ बनते. काम करण्यात स्फूर्ति येते. हे शारीरिक लाभ प्राप्त करुन जर आत्मलाभ झाला नाही तर काय साधले ? मनाची एकाग्रता करुन आत्मतत्त्वाच्या दिशेने जीवनाचा ओघ वळविला नाही, तर त्या आसन सिद्धीचा काय उपयोग ? अंत:करणाची पूर्ण शुद्धि होऊन, ब्रह्मप्राप्तीसाठी कोणताही विक्षेप न येता स्थिर बसणे म्हणजे खरे आसन होय. **आसीन: सम्भावत् ।** सहज स्थितींत असणे, खरे आसन होय.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (११३) सिद्धासनाचा अर्थ -

श्लोक :- सिद्धं यत्सर्व भूतादि विश्वधिष्टानमव्ययम् ।
यास्मिन् सिद्धाः समाविष्टास्तद्वै सिद्धासनं विदुः ॥११३॥

**अर्थ :-** जे सर्व प्राणीमात्रांचे आदि-उत्पत्ति स्थान असून विश्वाचे अव्यय व सिद्ध असे, अधिष्ठान आहे. ज्या मध्ये सर्व पुरुष समाविष्ट होऊन राहतात, तें 'सिद्धासन' असे समजावे. ॥११३॥

**विवरण :-** आसनांचे अनेक प्रकार आहेत. व्यायामासाठी, शरीराच्या आरोग्यासाठी, यौगिक क्रियांसाठी विविध प्रकारची आसनें सांगितलेली आहेत. यात काहीं आसनें सरळ व सोपी आहेत. उदाहणार्थ पद्मासन, वीरासन, स्वस्तिकासन व सिद्धासन इत्यादी. यात सिद्धासन सरळ आहे. त्याचेच महत्त्व वर्णिलेले आहे.

आमची इंद्रियें विषयांकडे धांव घेतात. त्या पूर्वी, ती आपापल्या स्थितीत चूपचाप असतात. तीच त्यांची सिद्धस्थिती आहे. तसेच आमचे मन निरनिराळ्या कल्पना, चिंतन, स्मरण, मनन करते. हे सर्व करण्यापूर्वी ते शांत व स्थिर असते. ही त्याची सिद्ध अवस्था आहे. जागृति स्वप्न-निद्रा येण्यापूर्वी जी स्थिति असते, ती सिद्धस्थिति आहे. या अवस्था न राहता, जी मूळ, स्थिर, निस्पंद स्थिति असते, ती सिद्धस्थिति असते.

एक साध्य स्थिति असते व एक सिद्धस्थिति असते. साध्य स्थितीत, इंद्रियांनी काही विचार करुन हस्तगत करण्याची जी स्थिति ती साध्य होय. सिद्धस्थितीत काही घेणे-देणे नाही. स्थिर व स्वस्थ असणे ही सिद्धस्थिति आहे. आपला आत्मा कोणत्याही स्थितीत चंचल होत नाही. त्याचा कर्म-क्रियांशी, कर्तेपणाशी, भोक्तेपणाशी काहीही संबंध नाही. अशा आत्म्याच्या साक्षीने, आपल्या शरीराने व इंद्रियांनी, त्या स्वाभाविक अवस्थेत बसणे म्हणजे सिद्धासनांत बसणे होय. सर्व सिद्धि प्राप्त होण्यासाठी नव्हे, तर सर्व सिद्धींच्या इच्छा, कामना, वासना समाप्त करुन, त्या आत्मस्वरुपाचे चिंतन, मनन,

निदिध्यासन करण्यास बसणे म्हणजे सिद्धासनांत बसणे होय. यांत केवळ शरीराचे बसणे नाही. यात शरीराचेही भान विसरुन असणे, म्हणजे सिद्धासनात बसणे होय. या स्थितीत भेद दर्शन नाही.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (११४) मूलबंधाचे स्वरुप -

**श्लोक :-** **यन्मूलं सर्व भूतानां यन्मूलं चित्तबन्धनम् ।**
**मूलबन्धः सदा सेव्यो योगोऽसौ राजयोगिनाम् ॥११४॥**

**अर्थ :-** जे सर्व प्राणीमात्रांचे (भूतांचे) मूळ आहे. जे चित्तस्थितीचे मूळ आहे. त्या मूळ स्थितीत आपली स्थिती स्थिर व्हावयास हवी. त्याला **'मूलबन्ध'** असे म्हणतात. राजयोगी याचा अभ्यास करतात. ॥११४॥

**विवरण :-** चिंतन, मनन, निदिध्यासन करण्यासाठी आसनात बसावे लागते. योगशास्त्रांतही आसनात बसून बंध लावावे लागतात. बंध म्हणजे बंद करणे. एकेक इंद्रियाची गति रोखणे. एक बंद म्हणजे तोंड बंद करणे, द्विबन्ध-मुख व नेत्र बंद करणे. त्रिबन्ध म्हणजे मुख,नेत्र व कान बंद करणे. आणि चतुर्बन्ध म्हणजे मुख, नेत्र, कान व नाक बंद करणे. ह्यापेक्षा योगाची बंध पद्धति वेगळी आहे. योगात तीन मुख्य बंध आहेत -

**१) उड्डीयान बंध २) जालंधर बंध ३) मूलबंध.**

१) उड्डीयान बंध प्राणाला सुषुम्ना नाडीत पोहचवून ऊर्ध्वगति प्राप्त करण्यासाठी लावला जातो.

२) जालंधर बंध म्हणजे हनुवटी ह्रदयाला लावणे. यामुळे अनेक ज्ञानसिद्धि प्राप्त होतात.

३) मूलबंध म्हणजे गुदद्वाराचे संकोच करुन अपान वायुला वर खेचणे व प्राण व अपान यांचे मीलन घडविणे. यामुळे अधोगति न होता जीवन निर्विकार बनते.

वेदांताचा मूलबन्ध यापेक्षा फारच वेगळा आहे. **'यन्मूलं सर्व भूतानां'** सर्व प्राणीमात्रांचे जे मूळ आहे तो चैतन्यघन आत्मा आहे. शरीराची सर्व इंद्रियें ज्याच्या चेतन शक्तीने कार्य करुन, स्वतःचा परिचय देतात व मनाला प्रिय-अप्रिय, त्या आत्मचेतनेनेच समजते. असा सर्वांचे मूळ स्थान असलेला आत्माच आहे. श्रुतिही तेच सांगते.

**एवमेव प्राणबन्धनः खलु सौम्य मनः ।**

मन आणि इतर सर्व इंद्रिये आमच्या ठिकाणी बांधलेली आहेत. मी-आत्माच ते मूळ केंद्र आहे. सर्व मानसिक व इंद्रियजन्य अनुभूति त्या आत्मचैतन्याशी निगडीत आहेत. सर्व उपाधींच्या पलिकडे, म्हणजे उपाधीरहित, ते आत्मचैतन्यच राजयोग्यांचा मूलबंध आहे.

मन, बुद्धि आणि इतर सर्व इंद्रियांना स्थिर करण्यासाठीच मूलबंध आहे. इंद्रियेंच चंचल असतील तर साधना नीट होणार नाही आणि साधनेने जे साधावयाचे आहे ते आत्मतत्त्व, तेही प्राप्त होणार नाही. म्हणून मूलबंधाची अत्यंत आवश्यकता आहे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (११५) देह साम्य - स्थिति -

श्लोक :- **अङ्गानां समतां विद्यात् समे ब्रह्मणि लीयते ।**
**नो चेन्नैव समानत्वमृजुत्वं शुष्क वृक्षवत् ॥११५॥**

**अर्थ :-** सम ब्रह्मांत लीन होऊन जाणे, यासच अंगाची समता समजावयास हवी. सुकलेल्या वृक्षाप्रमाणे, शरीर सरळ करुन त्याला स्थिर ठेवणे म्हणजे शरीराला सम ठेवणे (समानत्व) नव्हे. ॥११५॥

**विवरण :-** ब्रह्म वा आत्मा अखंड समस्थितीत असतो. आपले शरीर मात्र विषम स्थितीत असते. भगवंतांनी गीतेच्या तिसऱ्या अध्यायाच्या शेवटी अर्जुनाला या सम ब्रह्मस्थितीचे लक्षण सांगितलेले आहे. भगवान म्हणतात -

**एषा ब्रह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।**
**स्थित्वास्यामन्त कालेऽपि ब्रह्म निर्वाण मृच्छति ॥७२॥**

हे अर्जुन ! ही ब्रह्माला प्राप्त झालेल्या पुरुषाची स्थिती असते. ती स्थिती प्राप्त झाल्यानंतर, योगी कधीच मोहित होत नाही आणि अंतकाळीही या ब्राह्मी स्थितीत स्थित होऊन ब्रह्मानंदाला प्राप्त होऊन जातो.

भगवान श्री आद्य शंकराचार्यजी येथे सांगतात की, केवळ शरीराला सरळ करुन स्थिर ठेवणे म्हणजे शरीराला सम ठेवणे नव्हे. ही अशी स्थिति म्हणजे सुकलेल्या कोरड्या वृक्षाप्रमाणे स्थिती होय. प्राणाचा सुषुम्ना नाडीत संचार होण्यासाठी शरीर सरळ, ताठ असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे मेरुदंडही सरळ, ताठ ठेवून, मूलाधार चक्रापासून सहस्त्रार चक्रापर्यंत, शरीर सरळ, ताठ असेल तर सुषुम्ना नाडीतून कुण्डलिनी शक्ति संचार करते. सर्व नाडयांमध्ये सुषुम्ना नाडी सूक्ष्म असून तीत संचार करणारी कुण्डलिनी शक्तिही सूक्ष्मच आहे.

ध्यान, मंत्रजप, प्राणायाम इत्यादी साधनांनी ही कुण्डलिनी शक्ति जागृत होऊन सुषुम्ना नाडीतून संचार करु शकते. तथापि आणखी ही एक सरळ व सोपा उपाय आहे व तो म्हणजे **'गुरु उपाय'!** सद्‌गुरुंच्या कृपेने वा

दीक्षेने शिष्याच्या मूलाधार केंद्रात स्थित असलेली, ही कुण्डलिनी शक्ति जागृत होऊन, सुषुम्नेचे द्वार उघडून, सुषुम्नेत प्रविष्ट होते. यांस कुण्डलिनी सिद्धमहायोगाची वा शक्तिपाताची दीक्षा म्हटली जाते. ही दीक्षा शक्तिपात परंपरेतील सद्‌गुरुच देऊ शकतात. या दीक्षेने आत्मशक्ति कुण्डलिनी, त्या साधक शिष्याला आत्मानुभूति व त्या अगोदर समाधीचा अनुभव सहज प्राप्त करुन देते. या शक्तिपात साधनेनेही देह साम्यस्थिति प्राप्त होऊ शकते.

योग साधनेने जसे देह समत्व प्राप्त करता येते, तसे वेदांतानेही, अशी समस्थिति प्राप्त करण्यासंबंधी आचार्य येथे सांगत आहेत. योगाने समाधि प्राप्त झाल्यानंतर जर त्याचा अहंकार गेला नसेल तर ती समाधि शुष्क वृक्षासारखीच असेल. शरीर व जग यांना आपल्या जाणीवेतून पुसून टाकणे, म्हणजेच शुद्ध चित्-तत्त्वाच्या अवस्थेत राहाणे होय. त्याग, तप, विद्या, वैराग्य यामुळे जर साधकांचा अहंकार पुष्ट होत असेल, तर ते साधक नसून बाधकच सिद्ध होतील. म्हणून आम्हाला सुकलेल्या कोरड्या वृक्षाप्रमाणे स्थिर बनायचे नसून, ब्रह्मभावांत स्थिर बनायचे आहे. मी आणि तो परमात्मा एकच आहोत, अशा आत्मस्वरुपातील समत्व प्राप्त करावयाचे आहे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (११६) दृक स्थिति - कशी असावी -

**श्लोक :-** **दृष्टिं ज्ञानमयीं कृत्वा पश्येद् ब्रह्ममयं जगत् ।**
**सा दृष्टि: परमोदारा न नासाग्रावलोकिनी ॥११६॥**

**अर्थ :-** दृष्टि ज्ञानमय करुन जगाला ब्रह्ममय पहावे. हीच परम उदार दृष्टि आहे. नासाग्रावलोकिनी दृष्टि परमोदारा नाही. ॥११६॥

**विवरण :-** योग शास्त्रांत प्रारंभी अनेक प्राथमिक शारीरिक, ऐंद्रिक व मानसिक क्रिया शिकाव्या लागतात. भगवान श्रीकृष्ण, अर्जुनाला योगी हो, म्हणत असताना, ६ व्या अध्यायात योगाचा अभ्यास कसा करावा ते सांगत आहेत. प्रथम एकांत स्थानी स्थिर होऊन बसावे. आसन घ्यावे. ते ही स्थिर राहील असे पहावे. आसनावर बसल्यानंतर चित्त व इंद्रियांच्या क्रियांना स्वाधीन ठेवून, मनाची एकाग्रता करावी. अंत:करण शुद्धिसाठी हा योगाभ्यास आहे. ते पुढे सांगतात -

**समं काय शिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिर: ।**
**संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥१३॥** अ-६

शरीर, डोके, आणि मान, गळा समान व स्थिर करुन, स्थिर होऊन, आपल्या नाकाच्या शेंड्यावर (अग्रभागीं) दृष्टि स्थिर करावी, इतर दिशांकडे पाहू नये. योगाचा हा प्रारंभिक अभ्यास आहे. वेदांताच्या आभ्यासात, शेवटचे टोक गाठावयाचे असल्याने, आचार्य सांगतात, दृष्टि ज्ञानमय करावी व जगाला ब्रह्ममय पाहावे. या दृष्टिला परम उदार दृष्टि म्हटले जाते. नाकाच्या शेंड्याकडे पाहाणारी दृष्टि परम उदार दृष्टि नाही. कारण दृष्टि दृश्यमयी, म्हणजे पाहाणारी व ते ही नाकाचे अग्र (टोक) पाहाणारी दृष्टी, उदार दृष्टि होऊच शकणार नाही. परमात्याकडे लागलेली दृष्टि ज्ञानमय दृष्टि असते. अशा ज्ञानमय दृष्टीने जे जे बघाल, ते ते सर्व परमात्मस्वरुप वा ब्रह्ममयच दिसेल. त्या ब्रह्माशिवाय अन्य काहीच नाही, तेच सर्वत्र, कणाकणांत व्याप्त आहे. हीच अद्वैतदृष्टि आहे. जेथे जेथे मन जाईल, तेथे तेथे ते सम्यग् दर्शन होते.

**यत्र यत्र मनो याति तत्र तत्र समाधय: ।**

मनाची ही उन्नत अवस्था आहे. तथापि ज्ञानमयी दृष्टि असलेला ज्ञान योगी कसा असतो, ते भगवानच अर्जुनाला सांगत आहेत -

**सर्व भूतस्थमात्मानं सर्व भूतानि चात्मनि ।**
**ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शन: ॥२९॥** अ-६

सर्वव्यापी अनंत चेतनेत, एकाच भावात स्थित असलेला, योगयुक्त आत्मरुप असलेला व सर्वांकडे समभावात पहाणारा योगी सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणीं आत्म्यास पहातो व आत्म्याच्या ठिकाणी प्राणीमात्र आहेत असे पहातो.

वेदांताच्या दृष्टीने समभाव म्हणजे द्वैत, भेद न पहाता, अद्वैतदृष्टि आहे. अज्ञानाने दिसणारे, बदलणारे जग न पहाता, त्या बदलणाऱ्या गतीच्या अधिष्ठानाकडे, त्या गतिच्या प्रकाशक प्ररब्रह्माकडे पाहणे. म्हणजे ब्रह्म चिंतनात असणे ही परम उदार दृष्टि आहे. नासाग्रावलोकिनी दृष्टि परम उदार दृष्टि नाही. नासिका म्हणजे - **'इयंआसिका न भवति इति-नासिका ।'** अर्थात् जे बसावयाचे स्थान नाही. मग जे बसावयाचे स्थानच नाही. तेथे बसलेली दृष्टि परम उदार कशी असू शकेल ? तर नाही. अष्टावक्रगीतेत तर महात्मा अष्टावक्र म्हणतात -

**अयमेव हि ते बन्ध: समाधिमनुतिष्ठसि ।**

तुमच्या जीवनात हेच मोठे बंधन आहे की, तुम्ही समाधि लावू इच्छिता. वास्तविक तुम्ही तर स्वत: समाधिस्वरुप आहात. ही गोष्ट तुमच्या ध्यानात कशी येत नाही की, सर्वांचे अधिष्ठानच तुम्ही आहात. सर्वांची समाधि तुमच्यातच लागलेली आहे. हीच ज्ञानमयी साधकाची दृष्टि असावी. आता सिद्ध महात्म्याची दृष्टि कशी असावी ते पुढे सांगत आहेत.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (११७) दृक स्थिति कशी असावी ? (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **द्रष्टृदर्शनदृश्यानां विरामो यत्र वा भवेत् ।**
**दृष्टिस्तत्रैव कर्त्तव्या न नासाग्रावलोकिनी ॥११७॥**

**अर्थ :-** द्रष्टा, दर्शन आणि दृश्य हे तिघेही जेथे विराम (समाप्त) पावतात, (तिघांचाही बाध होतो) त्या ठिकाणी दृष्टि ठेवावयास हवी. नासाग्रावलोकिनी (म्हणजे नाकाच्या शेंड्यावर) दृष्टि नव्हे. ॥११७॥

**विवरण :-** द्रष्टा, दर्शन व दृश्य ही नेत्राची त्रिपुटी आहे. जगातील विषयांचे ज्ञान, त्या त्या इंद्रियांच्या त्रिपुटीने आपणांस होत असते. आत्म्यांत त्रिपुटी तर नाहीच पण द्वैतही नाही. तो सूक्ष्माति-सूक्ष्म सर्वत्र, सर्व ठिकाणी असल्यामुळे त्यास एकही म्हणता येत नाहीं. हवा, आकाश यांना जसे एक म्हणणे जमत नाही, त्याच प्रमाणे एक आत्मा असेही म्हणता येत नाही.

योगाभ्यासात मनाला स्थिर करण्यासाठी, प्रथम दृष्टि एकाग्र करण्याची रीत आहे. त्यास त्राटक असे म्हणतात. मन अत्यंत चंचल आहे. या दृष्टीच्या माध्यमातून ते जगातील अनेक विषयांकडे धावते. म्हणून शरीर सरळ ताठ बसून, दृष्टि नाकाच्या शेंड्यावर स्थिर ठेवून, मनाला एकाग्र करण्याचा प्रयत्न करावा लागतो. तथापि वेदांताची पद्धति वेगळी आहे. दृष्टि नाकाच्या अग्र भागावर स्थिर करण्याऐवजी, द्रष्टा, दर्शन व दृश्य ही त्रिपुटीच जेथे संपते, विराम पावते, त्या ठिकाणी दृष्टि ठेवायची असते. ही दृष्टि बाहेर जगाकडे न जाता, ती अंतरात वळते. ही आंतरदृष्टि बनते. अंतरंगात दृष्टि स्थिर झाली की, मनही स्थिर होते. मन स्थिर झाले की सर्व इंद्रियें आपोआपच स्थिर होतात. एकदा ही स्थिरता प्राप्त झाली की आपली अंतरदृष्टि आत्मस्वरुपाकडे लावावयास हवी. दृष्टि अंतर्मुखी होऊनच खरी साधना होते.

निर्गुण, निराकार, निर्विशेष, निधर्मक आत्मतत्त्वाच्या ठिकाणी दृश्य, दर्शन व द्रष्टा ही त्रिपुटी असूच शकत नाही. आत्मज्ञानात, कर्तृत्व, भोक्तृत्व, काहीही नाही. आत्मज्ञानी महात्म्याच्या जीवनात चार महत्वाच्या गोष्टी आलेल्या

असतात. १) आता जाणणे म्हणून काही उरले नाही. २) करणें म्हणून काहीही नाही ३) सोडणे, त्यागणे म्हणून काहीच नाही. ४) प्राप्त करणे, मिळवणे म्हणून काही राहिले नाही. असा महात्मा स्वत: सच्चिदानंद स्वरुपच होऊन जातो. जो सत् स्वरुप झालेला आहे त्याला मरणाची भीति कुठली ? जो चित्स्वरुप झालेला आहे त्याला काय जाणावयाचे राहिले आहे ? जो आनंद स्वरुप झालेला आहे त्याला भोगण्याची कोणती इच्छा असणार ? तो स्वत: सुखरुपच आहे. जो अद्वय आहे त्याला काय सोडावयाचे आहे ? त्याच्या शिवाय दुसरा कोणीच नाही. अशा स्थितीत द्रष्टा, दर्शन, दृश्य ही त्रिपुटी कशी भासणार ? ती आत्मस्वरुपात विलीन होऊन जाते. नाकाच्या शेंडयावर दृष्टि ठेवण्याने, परमार्थाची सुरुवात होते. परमार्थाविषयी आवड निर्माण होण्यासाठी ते ठीक आहे. आत्मस्थिती तर खूप पुढची व अंतिम स्थिती आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (११८) वेदान्तातील प्राणायाम

**श्लोक :-** **चित्तादिसर्वभावेषु ब्रह्मत्वेनैव भावनात् ।**
**निरोधः सर्व वृत्तीनां प्राणायामः स उच्चते ॥११८॥**

**अर्थ :-** चित्तादि सर्व वृत्तींमध्ये ब्रह्मच आहे. अशा भावनेने सर्व वृत्तींचा निरोध करणे, यासच प्राणायाम असे म्हणतात. ॥११८॥

**विवरण :-** योगशास्त्रांत प्राणाचे नियमन करण्यासाठी प्राणायामाचा अभ्यास करावा लागतो. प्राणाचा व मनाचा अतूट संबंध आहे. प्राण क्रियाशक्ति असल्याने शरीराच्या सर्व इंद्रियांना सक्रिय बनवितो. मनालाही चंचल,अस्थिर बवविण्याचे काम हा क्रियाशक्तिरुप प्राणच करतो. या प्राणाला संयमित करण्यासाठी आसन, बंध, मुद्रा, शरीर सम ठेवून दृष्टि स्थिर करुन प्राणायाम करावा लागतो. प्राणायामात नेहमीचा सामान्य प्राणायाम, शीतलीकरण प्राणायाम, भस्त्रिका प्राणायाम, उज्जायी प्राणायाम इत्यादी अनेक प्रकार आहे. सामान्य प्राणायामांत पूरक, कुम्भक व रेचक या तीन महत्त्वाच्या क्रियांनी एक प्राणायाम होतो.

प्रथम डाव्या नाकपुडीने श्वास ओढून, तो काही वेळ तसाच फुप्फुसात रोखून धरुन नंतर हळूहळू उजव्या नाकपुडीने सोडणे. श्वास आत ओढणे म्हणजे पूरक, तो काही वेळ आत ठेवणे म्हणजे कुम्भक व दुसऱ्या नाकपुडीने हळूहळू सोडणे म्हणजे रेचक. अशा रीतीने प्राणायाम केल्याने प्राणाची गति मंद होत जाते. त्यामुळे मनही शांत व स्थिर होत जाते.

आता वेदांताचा प्राणायाम कसा असतो ते भगवान श्री आद्य शंकराचार्य तीन श्लोकांत सांगत आहेत - **निरोधः सर्व वृत्तीनां -** श्वासाचा, वायुचा निरोध म्हणजे प्राणायाम नसून सर्व वृत्तींचा निरोध म्हणजे प्राणायाम होय. योगी यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व शेवटी समाधि प्राप्त वृत्तीचा निरोध करतो. वेदांतात केवळ बाह्य वृत्तींनाच निरुद्ध करावयाचे नसून, चित्तादि सर्व भावात, 'इदंब्रह्म' म्हणून बघणे आहे.

**मनो ब्रह्म इत्युपासीत ।** श्रुति म्हणते की, मन ही ब्रह्मच आहे अशी उपासना करावी. मनात जे जे येईल ते ते ब्रह्मच आहे. **अन्नं ब्रह्म इत्युपासीत ।** अन्नही ब्रह्मच आहे. अन्नापासून बनलेले सर्व पदार्थ ब्रह्मच आहे. **नाम ब्रह्म इत्युपासीत ।** नामही ब्रह्मच आहे अशी उपासना करावी. घट, पट, मठादी सर्व आकार, नामें ब्रह्मच आहेत. अंतर-बाह्य सर्व भाव, सर्व वृत्ति, सर्व कल्पना यात ब्रह्मभाव धरणे, वृत्तींमध्ये प्रिय-अप्रिय असा भेद न करणे. संयोग-वियोग, जन्म-मरण, सुख-दुःख आदि सर्व ब्रह्मच आहे. या भावांत वृत्ति ठेवणे, म्हणजे प्राणायाम होय.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (११९,१२०) वेदान्तातील - प्राणायाम - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **निषेधनं प्रपंचस्य रेचकाख्यः समीरणः ।**
**ब्रह्मैवास्मीति या वृत्तिः पूरको वायुरीरितः ॥११९॥**

**ततस्तद् वृत्ति नैश्चल्यं कुंभकः प्राणसंयमः ।**
**अयं चापि प्रबुद्धानामज्ञानां घ्राण पीडनम् ॥१२०॥**

**अर्थ :-** प्रपंचाचा निषेध करणे म्हणजे रेचक प्राणायाम, 'मी ब्रह्म आहे' अशी वृत्ति पूरक प्राणायाम आहे. ॥११९॥ आणि त्यानंतर त्या वृत्तीला स्थिर ठेवणे याला कुम्भक असे म्हणतात. ज्ञानी लोकांच्या दृष्टीने हा खरा प्राणायाम होय. तर अज्ञानी लोक केवळ नाकाला पीडा देत बसतात. ॥१२०॥

**विवरण :-** प्रपंचात **'प्र'** हा उपसर्ग आहे, बाकी **'पंच'**, म्हणजे पाच मिळून प्रपंच बनतो. पंच विषय, पंच महाभूतें, पंच ज्ञानेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये, पंच प्राण, पंच तन्मात्रा असा हा पाचांचा पसारा आहे. वृत्तीत प्रपंच भरलेला असतो. मन, बुद्धि, चित्त या अंतःकरणात प्रपंच भरलेला असून, आपल्या वृत्तींमधून तो वहात असतो. प्रपंच भेदजनक आहे. भेदानेच राग द्वेष निर्माण होतात. राग-द्वेषाने शांति मिळत नाही. अशांति असेल तर परमानंदाची प्राप्ति कशी होणार ? प्रपंच बंधनाचे कारण आहे.

प्रपंचाच्या बंधनातून सुटण्यासाठी, वैराग्याची, अनासक्तीची आवश्यकता असते. संपूर्ण प्रपंचाचे बंधन तोडून मुक्त होणे, म्हणजे प्रपंचाचा निषेध करणे होय. असा प्रपंचाचा निषेध करणे म्हणजे रेचक प्राणायाम आहे. घेतलेला श्वास-वायु नाकाने सोडणे हा सामान्य प्राणायाम आहे. परब्रह्म तत्त्वातून प्रपंच काढून टाकणे हा वेदांताचा खरा रेचक आहे.

मी आत्मा आहे, ब्रह्म आहे, असे केवळ शब्दाने म्हणण्याने, कुणी ब्रह्म होत नाही. ब्रह्माचा अर्थ आधी कळला पाहिजे. केवळ कळून उपयोगी नाही तर अनुभव घेतला पाहिजे. ज्यात निरतिशय बृहत्ता आहे, ते ब्रह्म आहे.

आपल्या देहांत असलेले आत्मतत्त्वही ब्रह्मच आहे. या देहाच्या आत-बाहेर, तेच सर्वत्र भरलेले आहे.

**ब्रह्मैवास्मि न जीवः, न परिच्छिन्नः ।**

मी ब्रह्म आहे, मी जीव नाही. मी परिच्छिन्न नाही. अशी वृत्ति पूरक प्राणायाम आहे. रेचकाद्वारे मनातून प्रपंचाला बाहेर काढून, ब्रह्माकार वृत्ति बनविणे हा पूरक प्राणायाम आहे. हा वेदांतातील पूरक प्राणायाम प्रबुद्ध, समजदार, ज्ञानी साधकाचा आहे. पुढे हीच ब्रह्माकार वृत्ति स्थिर झाली की तो कुम्भक प्राणायाम होतो.

प्रपंचाच्या निषेध, वृत्तीतून प्रपंच काढून टाकणे हा रेचक प्राणायाम, वृत्ति ब्रह्माकार करणे हा पूरक प्राणायाम व ब्रह्माकार वृत्ति स्थिर ठेवणे हा कुम्भक प्राणायाम होय. ज्ञानी जनांचा हा खरा प्राणायाम होय, नाकाला पीडा देणे हा काही खरा प्राणायाम नाही.

हाच विषय अगदी सोप्या भाषेतही असा सांगता येईल. हे वस्तुमात्राचे जग, ज्यात प्रपंचच भरलेला आहे, ते आपल्या लक्षात येऊ न देणे म्हणजे 'रेचक' प्राणायाम होय. आपली मानसिक व बौद्धिक शक्ति आपले लक्ष, अंतरात्म्याकडे वळविणे म्हणजे 'पूरक' व त्या अंतरात्म्याकडे वळविलेली ती शक्ति व लक्ष स्थिर करणे म्हणजे 'कुम्भक' होय. हाच ज्ञानी, समजदार लोकांचा खरा प्राणायाम होय.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१२१) वेदान्ताचा प्रत्याहार

**श्लोक :-** **विषयेष्वात्मतां दृष्ट्वा मनसश्चिति मज्जनम्।**
**प्रत्याहारः स विज्ञेयोऽभ्यसनीयो मुमुक्षुभिः ॥१२१॥**

**अर्थ :-** विषय आत्मस्वरुपच आहेत असे पाहून, मनाला त्या चिदात्म्यात बुडवून टाकणे, याचे नाव प्रत्याहार होय. मुमुक्षुंनी याचा अभ्यास करावयास हवा. ॥१२१॥

**विवरण :-** प्रत्याहार आहाराच्या उलट आहे. प्रति + आहार, प्रती म्हणजे उलट, आहाराच्या उलट. आपले मन, इंद्रियें काही ना काही आहार घेत असतात. उदा.- शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध हे त्यांचे आहार आहेत. **आन्हियत इति आहारः।** अर्थात् बाहेरचे ओढून आत भरणे. जेवण करणे हा आहार आहे. उपवास धरणे प्रत्याहार आहे. मन, इंद्रियें त्यांच्या विषयांकडे बाहेर धावतात त्यांना आवरुन, आत ढकलणे हा योगातील प्रत्याहार आहे.

आता वेदांतातील प्रत्याहार कसा आहे ते बघा. वेदांतातील प्रत्याहार म्हणजे मन व इंद्रिये ज्या ज्या विषयांकडे जातील, ते ते सर्व विषय ब्रह्मच आहे असे समजून त्या मनाला आत्मतत्त्वात, ब्रह्मात बुडवून टाकणे. मन व इंद्रिये आत ओढायची नाहीत. आत व बाहेर सर्व ब्रह्मच आहे. अशा तऱ्हेने जेथे जो इंद्रियांचा विषय आहे, तेथे तो विषय आहे असे न पाहता ब्रह्मच पाहणे. हा प्रत्याहार आहे.

डोळ्यांनी दिसणारे रुप, कानांनी ऐकू येणारा शब्द, जीभेवर येणारा रस, नाकात येणारा गंध, त्वचेने होणारा स्पर्श, मनात येणारा संकल्प, बुद्धीत येणारा विचार हे सर्व ब्रह्मच आहे. अशा प्रकारे आत्मचैतन्याच्या अनादि-अनंत समुद्रात मनाला बुडवून टाकणे म्हणजे खरा प्रत्याहार आहे.

मनातून विषयांना बाहेर काढून टाकणे हा योगातील प्रत्याहार आहे, तर जे विषय जेथे जसे आहेत, ते सर्व ब्रह्मच आहे. मनालाच त्या ब्रह्मस्थितीत आणणे, हा वेदांताचा प्रत्याहार आहे. यात मनाला जिंकणे वा अमन करणे,

त्याला नाहिसे करणे नव्हे. तर मन जेथे जेथे जाईल, तेथे तेथे त्या आत्मतत्त्वाचे वा ब्रह्माचे अस्तित्व अनुभवू देणे म्हणजे खरा प्रत्याहार होय. सर्वत्र जर ब्रह्मच आहे, तर सर्व विषयांतही तेच भरलेलले आहे. मनाला त्या ब्रह्मस्वरुपात स्नान घालणे म्हणजे प्रत्याहार आहे. मुमुक्षुस याचा अभ्यास करावयास हवा. मुक्त होण्यासाठी असा अभ्यास आवश्यकच आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१२२) धारणा - स्थिति

**श्लोक :-** **यत्र यत्र मनो याति ब्रह्मणस्तत्र दर्शनात् ।**
**मनसो धारणं चैव धारणा सा परा मता ॥१२२॥**

**अर्थ :-** जेथे जेथे मन धावते, तेथे तेथे ब्रह्म पाहून मन स्थिर करणे, याला धारणा म्हणून ओळखले जाते आणि ती म्हणजे परा धारणा वा उच्च एकाग्रता आहे. ॥१२२॥

**विवरण :-** योग शास्त्रांत मनाला एकाग्र करण्यासाठी धारणा, ध्यान करावयाचे असते. पातंजल योगदर्शनात धारणेची व्याख्या देताना म्हटले आहे.

**धारणासु च योग्यता मनसः ।** साधनपाद - ५३

धारणेनेच मनाला योग्यता येते. धारणा, ध्यान, समाधि ही योगांतील अंतरंग साधनें आहेत. प्रत्याहार हे क्रियाप्रधान बहिर्मुख साधन आहे तर धारणा अंतरंग भावनाप्रधान साधन आहे. धारणेचे योग शास्त्रातील स्वरुप सांगताना म्हटले आहे -

**देश बन्ध चित्तस्य धारणा ।**

मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, आज्ञा व सहस्त्रार- हीं मेरुदण्डातील चक्रे आहेत. सहस्रार हे शेवटचे चक्र आहे. तेथून पुढे प्रवास नाही. आज्ञाचक्रापर्यंत प्रवास आहे. योगशास्त्र सांगते की या षट्चक्रांपैकी, म्हणजे कोणत्याही चक्रात धारणा धरुन मनाला स्थिर करा. ही चक्रे म्हणजे देश. कोणत्या तरी देशात चित्ताला स्थिर करा म्हणजे धारणा होईल.

भगवान श्री आद्य शंकराचार्यजी आता वेदांतातील धारणा सांगत आहेत. जेथे जेथे मन जाईल, तेथे तेथे ब्रह्मच असल्याने, त्यात मनाची धारणा, एकाग्रता करणे, पराधारणा आहे.

**देहाभिमाने गलिते विज्ञाते परमात्मनि ।**
**यत्र यत्र मनो याति तत्र तत्र समाधयः ॥**

देहाभिमान नष्ट झालेला आहे, परमात्म्याचे ज्ञान झालेले आहे.

आता मन जेथे जेथे जाईल, तेथे तेथे ब्रह्मस्वरुप, आत्मस्वरुपच आहे. म्हणजे तेथेच समाधि आहे. ही सिद्ध दशा आहे. साधक याचा अभ्यास करीत असताना, ती धारणा म्हणून समजली जाते.

जेव्हा मनांतील अज्ञान ग्रंथीचा भेद होतो, नाश होतो, मग मनाला आणखी एकाग्र करुन, धारणा धरुन काय साधायचे आहे ? मनात चंचलत्व, अस्थिरता, अज्ञान, अशांति असेल तर धारणेने त्याला स्थिर करावे लागते. म्हणून जेथे जेथे मन जाईल, तेथे तेथे ब्रह्मच आहे, अशी मनाने धारणा करावी, हीच परा धारणा आहे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (१२३) ध्यानाचे स्वरुप -

**श्लोक :-** **ब्रह्मैवास्मीति सद्रुत्त्या निरालम्बतया स्थितिः ।**
**ध्यान शब्देन विख्याता परमानन्ददायिनी ॥१२३॥**

**अर्थ :-** मी ब्रह्मच आहे, या सद्वृत्तीत जी निरालम्ब म्हणजे आधाररहित स्थिति असते, तीच ध्यान शब्दाने प्रसिद्ध आहे. ही स्थिती परमानंद देणारी आहे. ॥१२३॥

**विवरण :-** योगशास्त्रांत ध्यानाचे फार महत्त्व वर्णिलेले आहे. मनाला संयमित, नियंत्रित करण्यासाठी ध्यानाची आवश्यकता सांगितलेली आहे. पातंजल योग दर्शनात ध्यान म्हणजे- **तत्रैकतानता ध्यानम् ।** विभूतिपाद-सूत्र-२. तत्र म्हणजे त्या धारणेची, प्रत्यय एकतानता म्हणजे ज्ञानाचा अखंड धारा प्रवाह, त्या धारणेत जेव्हा ज्ञानाच्या अखंड प्रवाहात एकतानता येते, तेव्हा त्यास ध्यान होते असे समजतात. परंतु ध्यानात, ध्याता, ध्यान, ध्येय ही त्रिपुटीही असते. एकाग्रतेच्या अभ्यासासाठी तुटक तुटक ध्यानाऐवजी, ध्यानात एकतानता आली, तर त्यास ध्यान म्हटले जाते.

स्वभावतः चित्ताच्या पांच अवस्था आहेत. १) क्षिप्त २) विक्षिप्त ३) लय ४) एकाग्र ५) निरुद्ध, उधळलेले, विषयांमध्ये पसरलेले चित्त **क्षिप्त चित्त** असते. दोलायमान चित्त **विक्षिप्त चित्त** असते. निद्रा, आळस यातील चित्त **लय चित्त** आहे. एकाच विषयात स्थिर राहणाऱ्या चित्तास **एकाग्र चित्त** व चित्तात कोणतीही वृत्ति न उठणे **निरुद्ध चित्त** असते.

**स्नानं मनोमल त्यागः ध्यानं निर्विषयं मनः ।**

मनांतील मळ, दोष यांचा त्याग म्हणजे स्नान आहे आणि मनाला विषयरहित करणे ध्यान आहे.

आता वेदांताचे ध्यान कसे असते, ते सांगत आहेत. मी ब्रह्मच आहे या सत्-वृत्तीत आधाराशिवाय स्थिर होणे, हे खरे ध्यान आहे. जो आत्मा, द्रष्टा व चेतन असून तो देश, काल, वस्तुचा साक्षी आहे. त्याचे अधिष्ठान व्यापक,

अद्वितीय व महान आहे. यासच ब्रह्मविषयक वेदांताचे ध्यान म्हणावे. ध्यानाची निरालम्ब, आधाररहित स्थिति परमानंद देणारी आहे. हे शरीर, जीवभाव, अंत:करण मी नाही व ते माझे नाहीत, त्यामुळे सारी दु:खे नाहिशी होतील आणि परमानंद तर आपले स्वरुपच आहे. हा परमानंद म्हणजे पूर्ण परमब्रह्मच नव्हे का ?

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१२४) समाधी - वर्णन.

**श्लोक :-** **निर्विकारतया वृत्त्या ब्रह्माकारतया पुन: ।**
**वृत्तिविस्मरणं सम्यक् समाधीर्ज्ञान संज्ञक: ॥१२४॥**

**अर्थ :-** वृत्ति निर्विकार होऊन ब्रह्माकार होऊन जाणे, त्यामुळे वृत्तीचे संपूर्ण विस्मरण होऊन जाणे, ही समाधीच ज्ञान-समाधी म्हटली जाते. ॥१२४॥

**विवरण :-** योगशास्त्रावरील सर्वच ग्रंथातून समाधीची माहिती सांगितलेली आहे. विशेषत: पातंजल योम दर्शन, योग शिखोपनिषद, योगचूडामणि, हठयोग प्रदीपिका, योगवासिष्ठ या ग्रंथांमधून समाधी संबंधी उपयुक्त चर्चा केलेली आढळते. समाधीला पर्याय वाचक शब्द आहेत. उदा.- उन्मनी, मनोन्मनी, अमरत्व, लयतत्त्व, शून्याशून्य, परमपद, अमनस्क, निरालम्ब, सहजावस्था व तुर्यावस्था इत्यादी. योगशास्त्रांत समाधीचेही प्रकार आहेत - सविकल्प समाधी, निर्विकल्प समाधी, सबीज समाधी, निर्बिज समाधी, सम्प्रज्ञात व असम्प्रज्ञात इत्यादी समाधी ही अष्टांग योगाची शेवटची स्थिती आहे. समाधी नंतर योग साधन नाही. मीठाचा खडा पाण्यात टाकल्यानंतर तो जसा पाण्याशी एकरुप होऊन जातो, त्याप्रमाणे आत्मतत्त्वात मन संलग्न झाल्यानंतर, ते आत्मरुप होऊन जाते. यासच समाधी म्हटले जाते. समाधीत प्राणांचा प्रवाह, श्वास-प्रश्वास, रक्ताभिसरण यांच्या क्रिया बंद होऊन जातात. साधकाचा प्राण सुषुम्ना नाडीत, ब्रह्मरन्ध्रात विलीन होऊन जातो. जीवात्मा-परमात्मा एकरुप होतात व सर्व प्रकारच्या कामना, वासना, इच्छा, विचार समाप्त होऊन एक परमानंदाची अनुभूति साधकाला येत असते. सद्‌गुरु कृपाप्राप्त साधनेने, प्राप्त होणारी समाधी, ज्ञान-मुक्ति, स्थिति आणि सिद्धि देणारी असते.

**तदा द्रष्टु: स्वरुपेऽवस्थानम् ।** योगदर्शन

योग शास्त्र सांगते की, चित्तवृत्तिंचा निरोध झाल्यानंतर द्रष्टा (आत्मा) आपल्या स्वरुपांत स्थित होऊन जातो. ही योग-समाधी आहे. समाधी-स्थित योग्याला मरणाची भीति नसते. त्याला कुठलेही कर्म नाही, त्याला कुणीही

वश करु शकत नाही. तो इंद्रियांचे शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध इत्यादी विषयांना जाणत नाही. तो फक्त आपल्या आत्म्यास जाणत असून, त्याचा आनंद उपभोगित असतो. त्याला समाधीत स्वप्न, जागृति व निद्रा या अवस्था येत नाहीत. स्मृति-विस्मृति नाही. शीत-उष्ण, सुख-दु:ख, मान-अपमान काहीही नाही. समाधी अवस्थेत त्याचा देहही दिव्य भासतो. या योग-समाधीचे स्वरुप पाहिल्यानंतर आता भगवान श्री आद्य शंकराचार्यजी आपणांस वेदांताची समाधी कशी असते, ते सागत आहेत-

**निर्विकारतया वृत्या ब्रह्मकार तया पुन: ।**

चित्तांत वा मनात उत्पन्न होणाऱ्या वृत्तीं समाधी अवस्थेत निर्विकार होतात. त्यात काम क्रोधादि कोणतेही विकार रहात नाहीत. अशी शुद्ध-सात्त्विक वृत्ति पुन्हा ब्रह्माकार होऊन जाते. तेव्हां अशा वृत्तींचे विस्मरणही होऊन जाते. अशा स्थितीत प्राप्त होणारी समाधी 'ज्ञान-समाधी' म्हटली जाते. आत्म-चैतन्य अखंड आहे. आपण एखाद्या ठिकाणी बसून अनेक दृश्यें पाहात असतो. ती बदलणारी दृश्यें जरी बदलली, तरी आपली दृष्टि आहे, त्याच ठिकाणी असते. तसा या सर्व विश्वाचा द्रष्टा, तो आत्मराज आहे त्याच ठिकाणीं असतो. तो बदलत नाही, तो अविनाशी व अपरिवर्तनीय आहे. तो वाणीच्या पलिकडे असल्याने, त्याचे वर्णन होऊ शकत नाही. तो अनुभवाचा विषय नाही. तो आपल्या स्थितीत अवस्थित असतो. अशा स्थितीचा अनुभव साधकाला त्याच्या निर्विकार व ब्रह्माकार वृत्तीने ज्ञान समाधीत येत असतो.

**सत्त्वावबोध एवायं वासना तृण पावक: ।**

**प्रोक्त: समाधी शब्देन न तु तूष्णीमवस्थिति: ॥**- योग वासिष्ठ

सत् तत्त्वाच्या बोधाने म्हणजे ज्ञानाने, वासना रुपी शुष्क तृण (गवत) अग्नीमध्यें जसे जळून जाते, त्याप्रमाणे मनातील वृत्तींना जाळून टाकते. वृत्तीतील विकार जळतात व वृत्ती निर्विकार होऊन ब्रह्माकारच होते. अशी ही वेदांताची ज्ञान समाधी आहे. चूपचाप बसण्याचें नाव समाधी नाही. समाधी मध्ये विस्मरण होऊन वृत्तिशून्यता येते. हीच ज्ञान समाधी होय.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१२५) निदिध्यासन प्रकरण समाप्त

श्लोक :- इमं चाकृत्रिमानन्दं तावत्साधु समभ्यसेत् ।
वश्यो यावत्क्षणात्पुंसः प्रयुक्तः सम्भवेत्स्वयम् ॥१२५॥

**अर्थ :-** जो पर्यंत स्वरुपाकार-ब्रह्माकार वृत्ति उदित (निर्माण) होत नाही, तो पर्यंत, (निदिध्यासनाच्या पंधरा अंगाच्या अभ्यासाने निर्माण होणारा) अकृत्रिम आनंदाचा अभ्यास, साधकाने करावयास हवा. ॥१२५॥

**विवरण :-** यम-नियमा पासून शेवटी समाधी पर्यंत निदिध्यासनाची जी पंधरा अंगे सांगितलेली आहेत, साधकाने त्यांचा अभ्यास करुन स्वाभाविक, अकृत्रिम आनंद प्राप्त करुन त्याचा अनुभव घेत घेत, शेवटी साधनेच्या, शेवटच्या स्थितीपर्यंत, म्हणजे ज्ञान-समाधीपर्यंत अभ्यास चालू ठेवावा. ज्ञान-समाधीतून स्वरुपाकार, ब्रह्माकार वृत्ति उदय पावली की मग साधन करण्याची आवश्यकता नसते. साधनेतून मिळणारा आनंद अकृत्रिम म्हटला जातो. संसारात विषयांचाही आनंद मनुष्य घेत असतो. तथापि साधनेच्या या आनंदाशी विषयानंदाची तुलनाच होऊ शकत नाही. विषयानंद क्षणिक आहे. तो वस्तु, देश, काल, प्रयत्न यावर अवलंबून असतो. तसा अध्यात्म साधनेतील आनंदाचे नाही. साधनानंद हा साधकाच्या स्वभावावर अवलंबून असल्यामुळे, तो स्वभावजन्य वा स्वाभाविक असतो.

जर साधकाने ती स्वरुपाकार, ब्रह्माकार वृत्ति निर्माण होण्यापूर्वीच जर साधन सोडून दिले तर फार हानी आहे. समाधी प्राप्त होण्यापूर्वीच जर योगाभ्यास सोडून दिला किंवा अंतःकरण शुद्ध होण्यापूर्वीच साधना सोडून बसला, तर एखाद्याने फायदा होण्यापूर्वीच दुकान बंद करुन टाकले, तर जशी हानी होते, त्यापेक्षाही मोठी हानी साधना सोडून बसण्याने होते. दुकान बंद केल्यामुळे होणारे नुकसान, पुन्हा दुकान चालू केल्यानंतर भरुन काढता येईल. पण साधना न करता व्यर्थ गेलेले आयुष्य, पुन्हा कधीच प्राप्त होऊ शकत नसल्याने, ही हानी कधीच भरुन काढता येणार नाही. साधनेतून

मिळणारा आध्यात्मिक, अकृत्रिम आनंद साधना सोडून बसल्याने कसा प्राप्त करता येईल ? 'समाधी' ही साधनेच्या पंधरा पायऱ्यांपैकी शेवटची, पंधरावी पायरी आहे. ती या पूर्वीच्या चौदा पायऱ्यांचे एकत्रित फल देणारी आहे. समाधी परमानंदाची प्राप्ति करुन देणारी साधनेतील शेवटची पायरी आहे. जीवनात परमानंदाची प्राप्ति होणे हेच जीवन सार्थक झाल्याचे लक्षण आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१२६) प्रकरण समाप्तीचा विषय - (विषय पुढे चालू)

**श्लोक :- ततः साधननिर्मुक्तः सिद्धो भवति योगीराट् ।**
**तत्स्वरुपं न चैतस्य विषयो मनसो गिराम् ॥१२६॥**

**अर्थ :-** नंतर साधन निर्मुक्त, तो योगिराट् सिद्ध होऊन जातो. त्याचे हे स्वरुप, वाणी आणि मनाचा विषय राहत नाही. ॥१२६॥

**विवरण :-** साधनेची आवश्यकता, जोपर्यंत साध्य प्राप्त होत नाही तोपर्यंतच असते. साधनेने प्राप्त होणारे असे उच्यतम प्रातव्य म्हणजे आत्मस्थिती वा ब्रह्मस्थिती आहे. वेदांताचे कथन आहे **"ब्रह्मविद ब्रह्मैव भवति"** ब्रह्म जाणणारा स्वतः ब्रह्मच होतो. असा ब्रह्मस्वरुप झालेला महात्मा, सिद्ध सत्पुरुष, योगिराट्, सर्वज्ञ व त्रिकालदर्शी असतो. असा महात्मा नित्य संतुष्ट, स्वतंत्र, व अनंत शक्ति धारण करणारा होतो. राग-द्वेषादि कोणतेही विकार त्याला स्पर्शच करु शकत नाहीत. तो निर्द्वन्द्व, नियत व्रत संयमी व आत्मरमण असतो. तो तृष्णारहित, संगरहित, विकल्प शून्य आत्मसाक्षात्कारी असतो.

**मनुष्य चर्मणा बद्धः साक्षात्पर शिवः स्वयम् ।**
**स्व शिष्यानुग्रहार्थाय गूढं पर्यटति क्षितौ ॥** कुलार्णवतंत्र

मनुष्य रुपाने, साक्षात् परमशिवच स्वयं, आपल्या शिष्यांना व भक्तांना ज्ञान, प्रबोधन व अनुग्रह करण्यासाठी, गुप्त राहून पृथ्वीतलावर विचरण करीत असतात. ते ब्रह्मानुभवी सिद्ध सत्पुरुष, शिवस्वरुप असल्यामुळेच ते इतरांनाही मुक्त करु शकतात. अशा समर्थ सत्पुरुषाचे स्वरुप वर्णन करणे, वाणी व मनाच्या पलिकडे असते.

**तदेव मनसा शान्तिं प्राप्नोति परमं पदम् ॥-** प्राणतोषणी तंत्र

परम भाग्याने अशा सत्पुरुषाचा सत्संग घडला व त्याची कृपा झाली की त्या शिष्याला वा भक्ताला परमशांती व परमपदाची प्राप्ति होते. सद्गुरुंवर व साधन मार्गावर श्रद्धा ठेवून, जागृत व सावध राहून, अशा साधकाने उन्नतीचा मार्ग सतत चालत राहावा. व इतरांना प्रेरणा व स्फुर्ति देत, साधन

मार्गाकडे आकर्षित करीत असावे. सद्‌गुरुंच्या आशीर्वादाने, पूर्वजांच्या पुण्याईने, त्यांचेही दैव उघडते आणि प्रज्ञा जागृतीला संधी प्राप्त होते.

ज्या महात्म्याच्या कारुण्याने इतके सारे घडते, त्यांचे स्वरुप वाणी आणि मनाचा विषय राहत नाही.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१२७,१२८) साधनेत येणारी विघ्ने

श्लोक :- समाधौ क्रियमाणे तु विघ्ना आयान्ति वै बलात् ।
अनुसन्धानराहित्यमालस्यं भोग लालसम् ॥१२७॥
लयस्तमश्च विक्षेपो रसास्वादश्च शून्यता ।
एवं यद्विघ्न बाहुल्यं त्याज्यं ब्रह्मविदा शनैः ॥१२८॥

**अर्थ :-** समाधीचा अभ्यास करीत असताना, बलपूर्वक जी विघ्ने येतात, तीं अशी आहेत- १) अनुसन्धान राहित्य-(बुद्धिचे साहाय्य नसणे) मन भटकत असणे. २) आळस ३) भोग लालसा. ॥१२७॥ ४) लय ५) तम ६) विक्षेप ७) रसास्वाद ८) शून्यता इत्यादी । ब्रह्म जाणणाऱ्या साधकाने या विघ्नांचे बाहुल्य हळूहळू कमी करुन, त्यागणें ॥१२८॥

**विवरण :- १) अनुसंधान राहित्य :-** अनुसंधान नसणे - साधनेला बसल्यानंतर मनात व बुद्धींत, उत्साह नसतो. मन भलत्याच दिशांना धावत सुटते. ब्रह्म चिंतन करण्यात बुद्धीला स्वारस्य वाटत नाही. स्फूर्ति व उमेद निघून जाते.

**२) आळस :-** मनात, शरीरात उत्साह नसतो, आळस आल्याने साधना पुढे करु, आता नको, म्हणून पुढे ढकलतो.

**३) भोग लालसा :-** साधनेला बसल्यानंतर काही तरी खाण्याची, वास घेण्याची, स्पर्श करण्याची, विषय भोगण्याची इच्छा निर्माण होते. अशा विषयांची आसक्ती वाढते, वारंवार त्या विषयांचेच चिंतन सुरु होते. अशा वेळी मनाला आवरणे, भगवत् चिंतनाकडे लावणे आवश्यक असते.

**४) लय (झोप) :-** वृत्ती लीन होते. साधनेला बसल्यानंतर आपोआप गाढ झोप लागते. व साधना, मनन, चिंतन बंद होते.

**५) तम (मंदपणा, तमस) :-** श्रुति ग्रंथ वाचत असताना, हळूहळू मति मंद होते, त्यातील काही गूढ कल्पनांचा गर्भितार्थ समजण्यास व ग्रहण करण्यास असमर्थ होते. त्यामुळे मन गोंधळून जाते. तम म्हणजे अंधार, अंधारल्यासारखे वाटते.

**विक्षेप :-** चित्तात नाना प्रकारचे संकल्प - विकल्प उठतात, त्यामुळें चित्त चंचल होऊन जाते. साधकाचे लक्ष विचलित होते. चित्तातील सुप्त संस्कार - विकार जागृत होऊन साधकाच्या साधनेत मोठा अडथळा निर्माण केला जातो. विक्षेपाने साधनेचा स्तर ही खाली घसरतो.

**७) रस स्वादन (सुखाची इच्छा)** - साधन करता करता, मनाला अतिशय आनंद होत असताना, साधनेच्या उन्नतीपेक्षा या आनंदाचाच उपभोग घेण्याकडे, मन वळते. मन त्या सुखात रुतून बसते आणि त्यातून बाहेर पडण्यास नाकारते. अशा आनंदावर विसंबून राहाणारे मन, साधना उन्नत न झाल्याने शेवटी दु:खी होते.

**८) शुन्यत्व :-** साधनेत काही वेळा पोकळी निर्माण झाल्यासारखा भास होतो. तर काही वेळा समाधी लागल्याचा भास होतो. वास्तविक समाधी वगैरे काही नसते. हा शून्यपणाचा एक अनुभव असतो. त्या शून्यत्वाच्या अनुभवाने साधनाही खंडित होऊन जाते व निश्चित कोणत्याही स्थितीचा लाभ होत नाही.

भगवद् पूज्यपाद श्री आद्य शंकराचार्यांनी सांगितलेले साधनेतील विघ्नांचे प्रकार पाहिले. आता योगदर्शन ग्रंथातही कांही अंतराय, अडथळे वा विघ्नांचे प्रकार सांगितलेले आहेत. साधनेच्या दृष्टीने त्याचा विचार करणे अत्यावश्यकच आहे. ज्या विघ्नांचा उल्लेख वर दिलेल्या विघ्नांमध्यें आलेला नाही. ती विघ्ने खालील प्रमाणे आहेत.

**१) व्याधि :-** साधकाच्या खाण्यापिण्यात अनियमितपणा, कमी-अधिक आहार, ऋतुमानाप्रमाणे-शरीराकडे दुर्लक्ष झाल्यामुळे, ज्या पीडा, रोग उद्‌भवतात, त्यांना व्याधि उत्पन्न झाल्यामुळे साधनेत खंड पडतो. साधनेसाठी शरीर स्वस्थ असावे लागते.

**२) संशय :-** आपण करीत असलेली साधना आपणांस, तो आत्मलाभ देईल किंवा नाही. या करीत असलेल्या साधनेचे फल सत्य की मिथ्या, कल्पना मात्रच आहे. इत्यादी संदेह, संशय मनांत असतील, तर साधनेत मन

लागणारच नाही. अशी संशययुक्त साधना सर्वनाश घडवून आणते.

३) **अविरति** :- साधना करीत बसलेले असताना अनेक विषयांची स्मरणे होतात. एखाद्या विषयाच्या आसक्तीने, एखाद्या संकल्पाच्या आधीन होऊन साधना सोडून बसणे. अशा विषय तृष्णेस अविरति असे म्हणतात.

४) **भ्रांति दर्शन** :- साधनेत येणाऱ्या अनुभूति या आपले हित न करता नुकसानच करतात का ? अशी भ्रांति, भ्रम चित्तांत निर्माण होतो. यामुळे साधक विपर्यय उलट ज्ञानाच्या भ्रांतीत असतो. नको ते समजून भ्रमित होतो.

५) **अलब्ध भूमिकत्व** :- साधनेने आपल्या चित्ताची जी अवस्था झालेली आहे, ती वास्तविक योग्य व वास्तव आहे. तथापि त्या अवस्थेचे शास्त्रीय वा अनुभव युक्त ज्ञान नसेल तर, अजून आपल्याला ती स्थिती प्राप्त करावयाची आहे, अशा संशयास अलब्ध भूमिकत्व असे म्हटले जाते. त्यामुळे त्या स्थितीत तो साधक असंतुष्ट असतो.

६) **अनवस्थित्व** :- पूर्वी आपली साधनेत चांगली स्थिती होती, पण आता राहिलेली नाही. पूर्वी खूप आनंद व समाधान वाटत होते. परंतु आता तसे वाटत नाही. ही अनवस्थित्व स्थिती साधकाला साधनेपासून च्युत करते. त्यामुळे काही वेळा साधक साधना सोडून बसतो.

७) **दु:खाचा आघात** :- प्रपंचातील एखाद्या अचानक येणाऱ्या आपत्तीने, कुणाच्या मृत्युने, धन संपत्ति लुटून नेल्याने, साधकावर दु:खाचा आघात होतो. अशावेळीं त्याला त्या दु:खातून सावरण्याचा उपाय नसल्याने, त्याला साधना करण्याची इच्छाच होत नाही.

८) **दौर्मनस्य** :- साधकाच्या इच्छा, आकांक्षा फलद्रुप न झाल्याने मन:क्षोभ होतो. मनाची समतोल वृत्ति ढासळून जाते. अशा वेळी त्याला साधनाच करावीशी वाटत नाही.

वरील सर्व साधनेत येणाऱ्या विघ्नांचा प्रतिकार करुन, त्यांवर विजय प्राप्त केल्याशिवाय साधनेतील प्रगति, उन्नति, कशी साधणार ? कधीं कधी ही विघ्ने, अडथळे, वा अन्तराय सामान्य असतात. त्यांच्यावर मात करणे अवघड

नसते. उदाहरणार्थ-साधनेत खूप भूक लागणे, तहान लागणे, कामज्वर येणे, क्रोध येणे, स्तुति वा प्रशंसा अहंकार वाढविते, निंदा क्षुब्ध करते इत्यादी. अशा सामान्य गोष्टींना जिंकता जिंकता, मोठमोठ्या विघ्नांनाही जिंकण्याची खात्री वाटते.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

# (१२९) ब्रह्म वृत्तीत पूर्णत्व

श्लोक :- भाववृत्त्या हि भावत्वं शून्यवृत्त्या हि शून्यता ।
ब्रह्मवृत्त्या हि पूर्णत्वं तया पूर्णत्वमभ्यसेत् ॥१२९॥

**अर्थ** :- ज्या विषय वस्तूंचा भाव, वृत्तीत असेल तर ती वृत्ती त्या आकाराची बनते. शून्यवृत्ती असेल तर शून्यत्वाची प्राप्ति होते. त्याच प्रमाणे वृत्तीत ब्रह्म असेल, तर ती ब्रह्माकार वृत्ती होते व तीच पूर्णत्व प्राप्त करुन देते. अशा वृत्तीद्वारा पूर्णत्वाचा अभ्यास करावयास हवा. ॥१२९॥

**विवरण** :- आपल्या अंत:करणात कितीतरी वृत्तीं उत्पन्न होतात व विलय पावतात. अंत:करणात एखाद्या विषयाचे स्मरण, चिंतन सुरु झाले की त्या विषयानुरुप वृत्ती निर्माण होते. त्या विषय वृत्तीशी आम्ही तादाम्य पावतो. अशा प्रकारे साधनेत अडथळे निर्माण होतात. काही वेळा मन शून्याकार होते. त्यावेळी सर्व शरीरच शून्याकार होऊन चाललेली साधना बंद होते. शून्याकार वृत्तीने शून्यत्व लाभते. साधना करीत असताना मन, चित्त चंचल असेल तर अनेक कल्पना, अनेक विचार मनात गोंधळ घालतात. मनात वा चित्तात उठणाऱ्या वृत्ती. त्या त्या कल्पनेशी वा विचारांशी तादात्म्य पावतात. मग साधनेत त्या कल्पना वा विचारांचेच वादळ निर्माण होऊन साधन खंडित होऊन जाते.

भागवताच्या एकादश स्कंधात-अध्याय २८, भगवान श्रीकृष्णांनी साधनेतील विघ्ने दूर करण्यासाठी साधकास काही उपाय सांगितलेले आहेत. ते असे -

योगधारणया कांश्चिदासनैर्धारणान्वितै: ।
तपोमंत्रोषधै: कांश्चिदुपसर्गान विनिर्दहेत् ॥३९॥

योग साधन करीत असताना, जर शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक व्याधिरुप विघ्न आले तर त्याचा प्रतिकार योगधारणेनेच करावा. काही विघ्नांचा प्रतिकार आसन, प्राणायामाने करावा. काही विघ्नांचा प्रतिकार जप, तप, मंत्र

व औषध घेऊन करावा.

आता भगवान श्री आद्य शंकराचार्य सांगतात की, ब्रह्माशिवाय अन्य काहीही नाही. सर्व ब्रह्मच आहे. आपल्या मनातील सर्व विषय, सर्व नाम-रुपें जर ब्रह्माशिवाय काहीही नाही तर मनात ब्रह्माचा भाव धरा, जसा भाव तशी वृत्ती. मग ब्रह्माकार वृत्ती निर्माण झाली की, ती पूर्णत्वाची प्राप्ति करुन देते. मीच सर्व व्यापी, सर्व पूर्ण, सर्व परमानंदी, सच्चिदानंद परमात्माच आहे, या ब्रह्माकार वृत्तीने, सर्व अडथळे म्हणजे आत्म्याचा खेळ आहे, अशी प्रचीति आली तर हे अडथळे आपल्या साधनेत बाधा आणू शकणार नाही.

आपला ज्ञानस्वरुप आत्मा अखंड व नित्य आहे. त्याचे कुठें जाणे येणे नाही. त्याला कोठेही जाण्याचे कोणतेही प्रयोजन नाही. त्याला इतर कशाचाही आश्रय नाही. त्यात कोणताही विषय नाही. तो तर विषयातीत आहे. तो सर्वातीत आहे. अशा ज्ञानमय आत्म्यात द्वैत नाही. अनेकताही नाही. अशा आत्म्याच्या स्वरुपाशी श्रवण, मनन, निदिध्यासनाने, एकरुप होण्याचा प्रत्येक साधकाने अभ्यास करावयास हवा. आत्म्याचे स्वरुप वर्णन करताना श्रृति म्हणजे -

पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्ण मेवाव शिष्यते ।।

।। हरि ॐ तत् सत् ।।

## (१३०) ब्राह्मी वृत्तिची उपेक्षा

श्लोक :- ये हि वृत्तिं जहत्येनां ब्रह्माख्यां पावनीं पराम् ।
ते तु वृथैव जीवन्ति पशुभिश्च समा नराः ॥१३०॥

**अर्थ :-** जे लोक या श्रेष्ठ व पावन करणाऱ्या ब्रह्मवृत्तीचा त्याग करतात, ते या पृथ्वीवर पशुप्रमाणे व्यर्थ जीवन जगतात. ॥१३०॥

**विवरण :-** या सृष्टीत अनेक प्रकारचे देह आहेत. पशु, पक्षी, कीटक यांच्या देहापेक्षा मनुष्य देहांत अधिक समज व बुद्धि आहे. मन, बुद्धि, चित्त व अहं, अंत:करणातील या सूक्ष्म इंद्रियांनी व नाक, कान, जीभ, डोळे, हात-पाय या बाह्य इंद्रियांनी, मनुष्याने अनेक भौतिक व आध्यात्मिक शोध लावून, आपला विकास करुन घेतलेला आहे. तथापी बहुसंख्य लोक, मानवी जीवनाचे ऐश्वर्य, समृद्धि, भौतिक सुखे, उपभोगण्यातच आयुष्य व्यतीत करतात. खाणे, पिणे, झोपणे, प्रजोत्पादन करणे, धन, धान्य कमविणे, यातच त्यांच्या आयुष्याचा काळ खर्च करुन शेवटी सर्व संग्रह इथेच सोडून मरणाचा मार्ग धरतात.

वास्तविक मनुष्य देहांतच चार पुरुषार्थांची आदर्श योजना आद्य सत्पुरुषांनी तयार केलेली आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांनी मनुष्य जीवनाला इतर पशु प्राण्यांच्या जीवनाहून अलग केलेले आहे. मनुष्य जीवनाची सुरुवात धर्म या पुरुषार्थाने करुन, अर्थ व काम उपभोगून शेवटी मोक्षाची प्राप्ती करावी. मुक्ती, मोक्ष हे मनुष्य जीवनाचे शेवटचे प्राप्तव्य आहे. त्यासाठी समाज जीवनातील मनुष्याचे चार वर्ग, आयुष्यक्रमाने, उन्नत होण्यासाठी निर्माण केले गेले आहेत. त्यांना आश्रम अशी संज्ञा दिली आहे. १) ब्रह्मचर्याश्रम २) गृहस्थाश्रम ३) वानप्रस्थाश्रम ४) संन्यासाश्रम. आयुष्याची वाटणी या चार भागात करुन, प्रत्येक आश्रमाची कर्तव्यकर्मे वेगवेगळी सांगितलेली आहेत. किती आदर्श समाज रचनेचा पाया आपल्या पूर्वजांनी घालून दिलेला आहे. चौथा पुरुषार्थ मोक्ष व चौथा आश्रम संन्यास, यांचा समन्वय साधूनच मनुष्य जीवनाला इतर प्राण्यांपेक्षा अतिपवित्र, शुद्ध, पावन अशा अत्युच्य शिखरावर

नेणे सुलभ होते. मोक्ष कल्पनेतच, जीवन्मुक्ति, विदेहमुक्ति, आत्मानुभूति, ब्रह्मस्थिती व अपरोक्षानुभूति या अवस्था प्राप्त करुन, मनुष्य देहाचे सार्थक करावे असे शास्त्र सांगते.

मनुष्य जीवन, प्रवृत्ति व निवृत्ति या दोन भिन्न प्रवाहातून वाहत असते. प्रवृत्तीने प्रपंच व निवृत्तिने परमार्थ साधला जातो. केवळ प्रपंचातच सर्व आयुष्य खर्च करणे हे इतर पशु-प्राण्यांच्या जीवनासारखे आहे. केवळ खाणे, पिणे, भोग भोगणे हेच मनुष्य देहाचे सार्थक करणे नव्हे. तर निवृत्तीच्या मार्गाने परमार्थाचा, अध्यात्माचा प्रवास करुन शेवटी, मनुष्य देहाचे सार्थक करण्यासाठी- आत्मज्ञान, आत्मस्थिती, ब्रह्मानुभव प्राप्त करावयास हवा. यासाठी ब्रह्माकार वृत्ति होणे अत्यंत आवश्यक आहे. मनुष्य आपल्या कर्मानेच मानव, दानव व देव होतो. मानवाला दानव होण्यात, राक्षस बनण्यात, फारसे अवघड नाही. पण मानवाला देवत्व प्राप्त होण्यासाठीच, साधना, सद्गुरु, धर्म, न्याय, नीति, सदाचरण, सत्संग, सद्गुण इत्यादी गोष्टींची आवश्यकता आहे. ब्रह्माकार वृत्ति सोडून जगणे म्हणजे पशुवृत्तीने जगणे आहे. अशी माणसे - **पशुभिः समानाः, मनुष्य रुपेण मृगश्चरन्ति ।** पशुसारखी होऊन, माणसाच्या रुपाने पशु-मृगासारखी धावत असतात.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१३१) ब्रह्माकार वृत्ती प्राप्त पुरुष प्रशंसा

**श्लोक :-** **ये हि वृत्तिं विजानन्ति ज्ञात्वापि वर्धयन्ति ये ।**
**ते वै सत्पुरुषा धन्या वन्द्यास्ते भुवनत्रये ।।१३१।।**

**अर्थ :-** जे या ब्रह्माकार वृत्तीला जाणतात व जाणून तिला वाढवितात ते सत्पुरुष धन्य आहेत. तेच तिन्ही लोकांत वंदनीय असतात. ।।१३१।।

**विवरण :-** प्रत्येकाच्या अंत:करणांत अनेक वृत्तींचा उदय-अस्त सतत सुरुच असतो. प्रापंचिक जीवनात घटाकार, पटाकार, मठाकार इत्यादी वृत्तींचा अनुभव सामान्य माणसांना येत असतो. तथापि साधकाला साधनेने जेव्हा ब्रह्माकार वृत्ती निर्माण होऊन, त्याला परमानंदाची प्राप्ति होते, त्यावेळी त्याच्या अंत:करणात पूर्वी निर्माण होणाऱ्या घटाकार, पटाकार वृत्तीं बाधित होऊन, ब्रह्माकार वृत्तीचा उदय होतो. त्यावेळी त्या साधकाच्या जीवनात पुण्याची पहाट होते. त्याला ते अद्वितीय चैतन्यतत्त्व अनुभूत होऊन, सर्वत्र परमानंदाचीच अनुभूति येते. तो ब्रह्माकार वृत्तीत, अव्यय, अक्षय सुखाने भरुन जातो. ही परम पवित्र वृत्ती त्याच्या मन, बुद्धींत असलेले अज्ञान नाहिसे करुन त्याला त्या आत्मसूर्याचा प्रकाश दाखविते. साधनेने प्राप्त झालेली ही ब्रह्माकार वृत्ती सदैव वर्धिष्णु म्हणजे वाढत राहावी असेच त्याला वाटत असते. आपण त्या ब्रह्माकार वृत्तीने उत्पन्न होणाऱ्या सुख सागरात सदैव क्रीडारत असावे. निरंतर व अव्याहतपणे या परम आल्हाददायक ब्रह्मवृत्तीतून बाहेर पडूच नये, सर्वकाळ त्या ब्रह्माकार वृत्तीत राहुन, सर्वकाळ तिचेच चिंतन करुन, जास्तीत जास्त ती वाढत राहावी अशी त्या वृत्तीतील महात्म्याची खटपट असते. असे ब्रह्माकार वृत्तीत असणारे सत्पुरुष धन्य होत. तेच तिन्ही लोकांत व तिन्ही काळात वंदनीय ठरतात.

अशा सत्पुरुषांच्या दर्शनाने, उपदेशाने वा केवळ संकल्पाने अनेक भक्तांच्या जीवनात परिवर्तन घडून येते. त्यांनाही परमार्थाची गोडी लागते व तेही भगवंताच्या आराधनेत तल्लीन होतात. असे ब्रह्माकार वृत्तीत असणारे

सद्गुरु प्राप्त होणे परम भाग्याचे असते. शास्त्र अशा महात्म्याचे वर्णन करताना सांगते -

**अहं ब्रह्म न चान्योऽस्मि ब्रह्मैवाहं न शोकभाक् ।**
**सच्चिदानन्दरुपोऽहं नित्य मुक्त: स्वभाव वान् ॥४॥** घेरंड संहिता

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१३२) ब्रह्मज्ञानी व शब्दज्ञानी यातील फरक.

**श्लोक :-** **येषां वृत्तीः समावृद्धा परिपक्वा च सा पुनः ।**
**ते वै सद् ब्रह्मतां प्राप्ता नेतरे शब्दवादिनः ॥१३२॥**

**अर्थ :-** ज्याची ब्रह्माकार वृत्ती चांगल्या प्रकारे वाढून परिपक्व झालेली आहे, तेच सत्स्वरुप ब्रह्माला प्राप्त होऊन जातात. इतर जे केवळ शब्दज्ञानी वेदांचे विद्वान असतात, त्यांना ही स्थिति प्राप्त होत नाही. ॥१३२॥

**विवरण :-** ज्यांची वृत्ती ब्रह्माकार होऊन, सतत अभ्यासाने, ती विकसित होऊन परिपक्व झालेली आहे, त्यांनाच आत्मस्वरुपाचा, ब्रह्मस्वरुपाचा अनुभव येतो. मी म्हणजे दुसरे काहीही नसून ब्रह्मच आहे, हीच सतत येणारी अनुभूति त्या साधकाला ब्रह्मस्वरुपच करुन टाकते. मग असा ब्रह्मज्ञानी महात्मा त्या परब्रह्मानंदात अखंड रममाण होतो. आंतरबाह्य सर्वत्र ब्रह्मच भरुन राहिलेले आहे असे त्याच्या अनुभवास येते. या ब्रह्माकार वृत्तीचा उदय होण्यासाठी, त्या साधकाची पूर्वतयारीही तशीच अति उत्तम असते. त्याचे अंतःकरण विवेक-वैराग्याने अतिशुद्ध झालेले असते. सतत व निरंतर साधनेने व चिंतन, मनन व निदिध्यासनानें, एकदा का ही ब्रह्माकारवृत्ती निर्माण झाली की, मग तिला दृढ अभ्यासाने परिपक्व करणे आवश्यक असते. नंतर त्या वृत्तीने मी ब्रह्मच आहे हा अनुभव यावा लागतो. ही **ब्रह्मानुभूति** म्हणजेच **आत्मानुभूति** वा **अपरोक्षानुभूति** आहे. असा अनुभूति संपन्न महात्मा सिद्ध महात्मा बनतो.

जगात वेदांताचे अभ्यासू, विद्वान, पंडित प्रवचनकार आपण पाहातो. अभ्यासाने त्यांची वाणीही प्रगल्भ व प्रभावी असते. तथापि अंतःकरणात अनेक वासना, कामना, इच्छा भरलेल्या असल्यामुळे, ते जसे बोलतात तसे वागत नाहीत. धन, द्रव्य कामिनी लुब्ध अशा विद्वान पंडितांना, त्या ब्रह्माकार वृत्तीचा परिचय वा अनुभव नसतो. ब्रह्मानुभूति ही फारच अति उच्च अशी मानव जीवनातील प्राप्ति आहे. ती या शब्दज्ञानी पंडितांना प्राप्त नसल्याने त्यांचे वक्तृत्व ऐकणाऱ्याला मधुर व आकर्षित करु शकते तथापि ते श्रोत्यांना

परिवर्तित करु शकत नाही. त्यांच्या शाब्दिक ज्ञानाचा ठसा श्रोत्यांच्या अंत:करणात उमटत नाही. अशी केवळ बडबड युक्त कितीही व्याख्याने ऐकली तरी त्याचा परिणाम शून्यच असतो. याच्या उलट आत्मानुभव, ब्रह्मानुभवयुक्त सिद्ध महात्म्याचा एकच शब्द, जो परिणाम घडवितो तो अनुभव शुन्य भाराभर व्याख्यानांनी घडत नाही. अशा शब्दज्ञानी विद्वानांचे अनुभवशून्य जीवन अज्ञानाने व्याप्त असल्याने, ते मुक्तही होऊ शकत नाहीत.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१३३) शाब्दिक ज्ञानाची निन्दा

**श्लोक :-** **कुशला ब्रह्मवार्तायां वृत्तिहीनाः सुरागिणः ।**
**तेऽप्यज्ञानतया नूनं पुनरायान्ति यान्ति च ।।१३३।।**

**अर्थ :-** जे ब्रह्मचर्चा करण्यात अत्यंत निपुण व कुशल आहेत, परंतु ते वृत्तिहीन व अत्यंत आसक्त असल्याने, अज्ञानी असतात, त्यामुळे ते पुन्हा पुन्हा मरण्यासाठी जन्माला येतात. ।।१३३।।

**विवरण :-** जे वेदांताची चर्चा करण्यात अत्यंत निपुण व कुशल असतात, त्यांचा शास्त्राभ्यासही सखोल झालेला असतो. ब्रह्मचर्चाही ते प्रभावीपणें करीत असतात. भाषेवर प्रभुत्व असल्यामुळे, अचूक शब्दांनी, वाक्प्रचारांनी, व सुभाषितांनी विषयांची मांडणी उत्कृष्टपणे करतात. अनेक ग्रंथांतून संदर्भ, उदाहरणें घेऊन आपला मुद्दा सुस्पष्ट करुन श्रोत्यांच्या मनावर बिंबवतात. वाणी शुद्ध व स्पष्ट असल्याने उच्चारही स्पष्ट होत असतात. भाषेतील व्याकरण, लिंग, वचन, समास इत्यादी विषयांचे ज्ञानही यथा योग्य असल्यामुळे भाषिक प्रमाद व चुका सहसा होत नसतात. तथापि या शास्त्रज्ञानी, विद्वान पंडितांना ब्रह्माकार वृत्तीचा अनुभव नसल्यामुळे ते अहंकारी बनतात. त्यांच्या ठिकाणी या शाब्दिक ज्ञानाची घमेंड व गर्व बळावतो. मग ते मी, माझे, मलाच अशा वृत्तीने कर्मे करतात. त्यामुळे त्यांच्या चित्तात आसक्ति, ममत्व व अहंकार निर्माण होतो. त्यांचे वर्तन बऱ्याच वेळा उद्धट व उद्दाम होते. अशा प्रकारे त्यांच्या मन-बुद्धींत खऱ्या ज्ञानाचा खोटा भ्रम निर्माण होतो. ते काही वेळा ग्रंथ लेखनही करतात व आपल्या ग्रंथाची स्वतःच स्तुति व प्रशंसा करुन प्रचारी बनतात. मग लोक संग्रहाची व धन-द्रव्याची आवड लागते. काम, क्रोध, मोह इत्यादी विकार त्यांच्या अंतःकरणात निर्माण होतात. अशा या शास्त्री - पंडितांना ब्रह्माकार वृत्ति कशी अनुभवास येणार ? विषयसुखाकडे वळलेल्या या अज्ञानी जीवांना तो आत्मानुभव कसा येणार ? असे हे शाब्दिक ज्ञानी पुन्हा पुन्हा जन्माला येऊन पुन्हा पुन्हा मरत असतात.

**पुनरपि जननं पुनरपि मरणं ।**

**पुनरपि जननी जठरे शयनम् ॥**

असा त्यांच्या जन्म-मरणाचा क्रम सतत सुरु असतो.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१३४) ब्रह्ममयी वृत्तीत स्थित महात्मा

श्लोक :- **निमेषार्धं न तिष्ठन्ति वृत्तिं ब्रह्ममयीं विना ।**
**यथा तिष्ठन्ति ब्रह्माद्या: सनकाद्या: शुकादय: ॥१३४॥**

**अर्थ :-** ज्यांची वृत्ती ब्रह्ममयी झालेली असते, असे महात्मे, त्या वृत्तीशिवाय अर्धाक्षणही राहू शकत नाहीत. जसे ब्रह्मादि, सनकादि व शुकादि राहात असतात. ॥१३४॥

**विवरण :-** मागील श्लोकांत ब्रह्माकार वृत्तीचा अनुभव नसलेल्या जीवांची अवस्था कशी होते, ते सांगितल्यानंतर आता ज्यांना ही ब्रह्ममयी वृत्ती प्राप्त झालेली असते त्यांच्या स्थितिचे निरुपण या श्लोकांत भगवद् पूज्यपाद श्री आद्य शंकराचार्य करीत आहेत. ही ब्रह्ममयी वृत्ती परमानंद देणारी असल्यामुळे, ज्यांना ती लाभते, ते अर्ध निमेषसुद्धा तिच्याशिवाय राहू शकत नाहीत. मग काय असे सत्पुरुष समाधीत असतात ? नव्हे, ती त्यांची समाधीसारखी अवस्था तर असते, पण ती यौगिक समाधीसारखी नसते. वेदांताची ही स्थिती विलक्षण असते. ही सम्यक मनस्थिति अति आनंदाची तर असते पण त्या स्थितीत त्यांची इंद्रिये बंद नसतात. ती आपआपली कर्मे निष्काम पद्धतीने करीत राहून, तो महात्मा अकर्ता असतो. कर्तृत्व, भोक्तृत्व तेथे नसते. अशा ब्रह्ममयी वृत्तीत राहून कर्म कसे होते, ते ब्रह्मदेव, सनकादिक ऋषि, शुकादिक जीवन्मुक्त महात्म्यांची उदाहरणें आचार्य आपल्या पुढे अनुकरण करण्यासाठी ठेवत आहेत.

**ब्रह्मदेव -** ब्रह्मदेव तर सदैव या ब्रह्माकार वृत्तीत राहूनही जीव निर्मितीचे कार्य अखंड चालू असते. जीव कसा ? त्याचे अंत:करण कसे ? त्याचे संस्कार कसे ? त्याला कोणत्या योनीत टाकावे ? इत्यादी सर्व पाहिल्यानंतर तदनुरुप शरीर बनवून जन्माला घालणे, हे कार्य अखंड सुरु असते. **भगवान विष्णु -** ब्रह्माकार वृत्तीत राहूनच सर्वांचा सांभाळ व रक्षण करीत असतात. **भगवान शिव -** अशाच ब्रह्ममय स्थितीत राहून संहाराचे पवित्र कार्य

सुरु ठेवतात. सनकादि १) सनक २) सनन्दन ३) सनातन ४) सनत्कुमार हे चार ब्रह्मदेवाचे मानस पुत्र असून महान् ब्रह्मज्ञानी होते. तथापि वरुन त्यांना पाहिल्यानंतर ते कुणालाही कळू देत नसत. शुकादिक - शुकमुनि भगवान व्यासांचे पुत्र - ब्रह्मस्वरुपात, ब्रह्ममयी वृत्तीत राहूनही राजा परिक्षितीला भागवत वाचून समजावून सांगत असत. यावरुन योगसमाधी व वेदान्ताची ब्रह्माकारवृत्ती यातील फरक ओळखून, साधकांनी ब्रह्माकार वृत्तीत राहून आपले नित्याचे कर्तव्य कर्म करीत, परोपकारी आदर्श जीवन जगावे. आपले प्राचीन काळातील महात्मे-कश्यप, अत्रि, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नी, वसिष्ठ, मरिचि, अंगिरस, पुलस्त, पुलह, ऋतु हे जीवन्मुक्त ऋषी सर्वांना आदर्शभूत असे आहेत.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (१३५) कार्य - कारण - संबंध

**श्लोक :-** **कार्ये कारणतायाता कारणे नहि कार्यता ।**
**कारणत्वं ततो गच्छेत्कार्याभावे विचारत: ॥१३५॥**

**अर्थ :-** कार्यात कारण अंतर्भूत असते. कारणात कार्य नसते. तेव्हा विचाराच्याद्वारे कार्याचा अभाव असेल, तर कारण संभवत नाही. ॥१३५॥

**विवरण :-** कार्य-कारण यांच्या संबंधाचा शोध घेणे, हेच सर्व शास्त्रीय संशोधनाचे मूळ आहे. कार्य परिणाम स्वरुप असते. कार्यात कारण अनुगत असते. उदाहरणार्थ मातीची घागर म्हणजे घडा हे कार्य आहे. त्याचे कारण मूळ माती असते. घड्यात माती असते परंतु मातीत घडा नसतो. म्हणून कार्याच्या ज्ञानाने कारणाचे ज्ञान होत नाही, परंतु कारणाच्या ज्ञानाने कार्याचे ज्ञान होत असते. कार्य हे कारणाचा परिणाम असतो. तेव्हा परिणामाचा म्हणजे कार्याचा शोध घेत असताना कारणाचाच शोध घ्यावा लागतो. कार्यात कारण असते कार्य कारणाशिवाय असू शकत नाही. उदाहरणार्थ, सोन्याचा हार हा अलंकार आहे. सोन्याचा हार हे कार्य आहे. त्यांत सोने हे कारण असते. जेथे सोने नाही, तेथे तो हार, अलंकार असू शकत नाही. जोपर्यंत हार आहे, तो पर्यंत सोने असतेच. अलंकार परिणाम स्वरुप सोनेच असते. सोने हे कारण परिणामापासून दूर असूच शकत नाही. ते परिणामाशी जुळलेले व अंतर्स्थित असते.

ही सारी दिसणारी बाह्य सृष्टि कार्य आहे. तिचे मूळ कारण त्या सृष्टीतच अंतर्निहित आहे आणि ते म्हणजे चेतनत्व. ही सारी सृष्टि-प्रकृति-चेतनात भासमान आहे. हे सारे जग, हे सारे विश्व त्या मूळ सत्य स्वरुप ब्रह्माने व्यापून टाकलेले आहे. या सर्वांत ते मूळ कारण ब्रह्मच आहे. श्री भगवान गीतेत अर्जुनाला हेच सांगत आहेत -

**मया ततमिदं सर्वं जगदव्यक्त मूर्तिना ।**
**मत्स्थानि सर्व भूतानि न चाहं तेष्ववस्थित:** ॥अ-९-४॥

अव्यक्त रुपाने मीच हे सर्व व्यापलेले आहे. ही सर्व भूते-प्राणिमात्र, माझ्या ठिकाणी आहेत पण मी त्यांच्या ठिकाणी स्थित नाही. यातून भगवंताना हेच सांगावयाचे आहे की, हे जग, हा विस्तार म्हणजे कार्य व ब्रह्म हे कारण आहे. कार्यात तर अव्यक्त रुपाने ब्रह्मस्वरुप भगवान तर आहेत पण कारण रुप भगवद्स्वरुप ब्रह्मात हे जग नाही. असाच उपदेश ७ व्या अध्यायात श्री भगवान अर्जुनाला करीत आहेत -

**ये चैव सात्त्विका भावा राजसा स्तामसाश्च ये ।**

**मत्त एवेति तान् विद्धि न त्वहं तेषु ते मयि ॥१२॥** अध्याय-७

सात्त्विक, राजस आणि तामस म्हणून जे पदार्थ आहेत, ते सर्व माझ्यापासून उत्पन्न झालेले आहेत. ते माझ्या मध्ये आहेत पण मी त्यांच्या मध्ये नाही असे जाण. श्री भगवान ब्रह्मस्वरुपात आहेत. तेच या सर्व चराचर सृष्टीचे कारण आहेत. या सर्व कार्यात तेच आहेत पण त्यांच्यात हे सर्व पदार्थ नाहीत. जसे दूध विरजले की त्याचे दही होते. दही हे कार्य आहे व दूध त्याचे कारण आहे. दह्यात म्हणजे कार्यात दूध आहेच, पण दूध या कारणात दही हे कार्य नसते. जी वस्तु आपणांस जाणून घ्यावयाची आहे, प्रथम तिचे लक्षण जाणणे आवश्यक असते. नंतर तिला जाणण्यासाठी प्रमाण हवे असते. **'लक्षण प्रमाणाभ्यां वस्तु सिद्धिः ।'** ब्रह्म, आत्मा, यांना जाणण्यासाठी, आमचीं इंद्रियें, मन, बुद्धि ही प्रमाण नाहीत. कारण ब्रह्माला जाणण्यासाठी आमचीं इंद्रियें उपयुक्त नाहीत. मग श्रुति हेच प्रमाण घ्यावे लागेल. विचार करावा लागेल. **विचारतः** - वि + चार, वि म्हणजे विपरीत, उलट आणि चार म्हणजे चालणे. संसार प्रपंच जिकडे चालला आहे, त्याच्या उलट चालणे म्हणजे विचार करणे होय. संसार, अंतःकरण व इंद्रियें विषयांकडे जातात. विचाराने आपणास विषयांतून-इंद्रियातून-अंतःकरणातून, त्या साक्षी परमात्याकडे जावयाचे आहे. **कोऽहं कथमिदं जातः ।** मी कोण आहे ? हा संसार कसा उत्पन्न झाला ? हे काय आहे ? अशा प्रकारच्या चिंतनास विचार करणे म्हणावे. आत्म्यांत कार्य व कारण भाव नाही. आत्मा सर्वस्वी असंग, असंस्पृष्ट आहे.

जेव्हा 'मी' म्हणजे कुणी मनुष्य या स्वरुपांत, त्या अनंताकडे बघतो, त्यावेळी कार्यकारण भाव दिसत असतो. तथापि 'मी' बघणारा आत्माच आहे, तेव्हा मी त्या अनंत परिपूर्णाशी एकरुप होऊन पाहातो, त्यावेळीं तेथे कार्य-कारण भाव असत नाही. जर मी माझी परिच्छिन्नता, खंड-खंडपणा, तुकडे-तुकडेपणा सोडून दिला. उदाहरणार्थ-मी संन्यासी, मी ब्राह्मण, मी हिंदु, मी मनुष्य, मी जीव, इत्यादी लोक-लोकांतरात जाणारा, असा न समजता, आपल्या मूळ स्वरुपाकडे पाहिले, तर मग तिथे काही कार्यही नाही व कारणही नाही. मी माझे, कार्य-कारण, व इतर बाह्य आवरणें असताना, माझे स्वरुप-म्हणजे आत्मा कसा असेल ? तो कोणत्याही वस्तुसारखा नाही. तो इथे वा तिथे नाही. तो सदा सर्वत्र भरलेला आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१३६) शुद्ध वस्तु - आत्म्याचे स्वरुप

श्लोक :- अथ शुद्धं भवेद्वस्तु यद्वै वाचामगोचरम् ।
द्रष्टव्यं मृद्घटेनैव दृष्टान्तेन पुन: पुन: ॥१३६॥

**अर्थ :-** ती शुद्ध वस्तु-आत्मा वा ब्रह्म, वाणीच्याही पलीकडे आहे. म्हणून माती आणि मडके (घडा) या दृष्टान्ताने वारंवार त्याचे निरुपण केले जाते. ॥१३६॥

**विवरण :-** मागच्या श्लोकात आपण पाहिले की कारणच कार्यरुपात म्हणजे परिणाम रुपात अनुगत असते. कार्य हे कारणाने व्यापलेले असते. कार्याशिवाय कारण राहू शकते. याच गोष्टीचा आपण जसा जसा शोध घेऊ लागतो, त्यावेळी अनुभवास येते की, त्या शुद्ध स्वरुप आत्मतत्त्वाचे ठिकाणी कारण नाही. तर तेथे कार्य म्हणजे परिणामही नाही. दृष्टांताच्या आधारावर तेथे विचार करावा लागतो. माती आणि मडके, मातीत मडक्याचा आकार नाही. म्हणून मातीत कार्य केवळ मडक्याचा आकार पाहून आरोपित केलेला असतो. आकारच मातीत कार्य आहे. मडक्याचा जेवढा आकार आहे, तेवढे त्याचे स्थान आहे. मडक्याची पूर्वावस्था काल आहे. मातीत आकार नाही, स्थान नाही, काल नाही. याच दृष्टांताने ब्रह्माचा वा आत्म्याचा विचार करावयास हवा. आत्मा वा ब्रह्म हे कसे आहे ? हे सांगता येत नाही. ते आपल्या वाणीचा विषय होत नाही. ते वाणीच्याच नव्हे तर इतर सर्व इंद्रियांच्या पलिकडे आहे. तेथे मन, बुद्धि, चित्त या सूक्ष्म इंद्रियांचीही गति नाही. मग त्याला जाणणार कसे ? तर त्याला दृष्टांतानेच समजून घ्यावे लागते. माती आणि मातीचा घडा, सोने आणि अलंकार, तंतू आणि वस्त्र, या दृष्टांतांनी, आपण विचार केला तर कारण व कार्य यांच्या स्वरुपावरुन आत्मा वा ब्रह्म यांचे ठिकाणी कारण व कार्यही नाही. तर ते निर्भेळ, असंग, निरपेक्ष शुद्धतत्त्व आहे. वर्तमान, भूत व भविष्यकाळात न बदलणारे, आकाररहित, निराकार, नामरहित शुद्धतत्त्व आहे असे समजते. अशा सततच्या चिंतनाने, विचाराने आपली ब्रह्माकार वृत्ति विकसित करीत असावे. हाच मार्ग आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१३७) तत्त्वज्ञानाचा उदय -

श्लोक :- **अनेनैव प्रकारेण वृत्तीर्ब्रह्मात्मिका भवेत् ।**
**उदेति शुद्धचित्तानां वृत्तीज्ञानं ततः परम् ॥१३७॥**

**अर्थ :-** अशा प्रकारे वृत्ती ब्रह्मात्मिका होऊन जाते. त्यानंतर शुद्ध अंतःकरण असणाऱ्या जिज्ञासू साधकाची वृत्ती, तत्त्वज्ञानमयी होऊन जाते. ॥१३७॥

**विवरण :-** दृष्टान्ताच्या द्वारे विचाराच्या प्रक्रियेने वृत्ती ब्रह्मात्मिका होऊन जाते. हीच वृत्ती तत्त्वज्ञानमयी होण्यासाठी जिज्ञासू साधकाचे अंतःकरण अतिशुद्ध असण्याची नितांत आवश्यकता आहे. कार्यात कारण अनुगत असते. कारण असल्याशिवाय कार्य घडू शकत नाही. हे जरी खरे असले, तरी कार्यच नसेल तर कारणाला तरी कार्य कसे म्हणता येईल. उदाहरणार्थ मातीचे मडके वा घटच नसेल, तर मातीला कारण कसे म्हणता येईल ? अर्थात् नाही. जाणणारा होण्यासाठी तेथे काहीतरी असले पाहिजे. इंद्रियजन्य ज्ञानाच्या पलिकडे गेल्यानंतर तेथे जाणण्यासारखे काहीच उरत नाही. विषयवस्तु नाहीत, भावना, कल्पना, विचार नाहीत. जेव्हा विचार ही संपतो, मग मी जाणणारा म्हणूनही असत नाही. मग मी स्वतः ज्ञानच होतो. या अवस्थेत माझी वृत्ती ब्रह्मस्वरुप होते. जेव्हा सर्व विचार, भावना, कल्पना, संपतात, तेव्हा मन शुद्ध बनते अशा शुध्द अंतःकरणाच्या जिज्ञासू साधकाच्या मनात तत्त्वज्ञानमयी वृत्ती उदित होते. अशी वृत्ती उदय पावली म्हणजे आपणच ब्रह्म आहोत, ब्रह्म हेच आपले खरे स्वरुप आहे, हे अनुभवाला येते.

ब्रह्माकार वृत्ती निर्माण होण्यासाठी चित्ताची व अंतःकरणाची शुद्धि होणे अतिआवश्यक असते. अंतःकरणातून सर्व विकार व संस्कार बाहेर घालविणे व त्याजागी सद्गुणांची स्थापना करणे आवश्यक असते. संसार, प्रपंच गुण-दोषांनी भरलेला असल्याने, कर्म करताना कधी सात्त्विकता येते तर कधी रजोगुण, तर कधी तमोगुण वाढून मनोवृत्ती मलीन होऊन जाते. अशा वेळी सम चित्ताने, निष्काम भावनेने कर्मे केल्याने संस्कार-विकार चित्तात येत

नाहीत. निर्मळ, शुद्ध अंत:करणातच तत्त्वज्ञानमयी वृत्ती निर्माण होते. अशी वृत्ती निर्माण झाल्याशिवाय अज्ञान, अंध:कार नष्ट होत नाही. प्रथम कार्याचा शोध घेऊन, त्यात कारण पहावे. त्यानंतर त्या कारणाशीच एकरुप व्हावे. जेव्हा आपण कार्यापासून वेगळे, अलिप्त होतो. आणि कारणाशीच एकरुप होतो, तेव्हा आपण स्वत:च कारण होतो. तेव्हा त्या कारणालाही कार्य नसल्याने, कारण म्हणता येत नाही. कारण हे कार्याच्या संदर्भात कारण असते. तेव्हा ब्रह्माकार वृत्ती विकसित होते आणि ही वृत्तीच स्वत: ब्रह्मरुपात रुपांतरित होते.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (१३८) विचार करण्याची पद्धति

**श्लोक :-** **कारणं व्यतिरेकेण पुमानादौ विलोकयेत् ।**
**अन्वेयन पुनस्तद्धि कार्ये नित्यं प्रपश्यति ॥१३८॥**

**अर्थ :-** प्रथम पुरुषाने व्यतिरेकाच्या (निषेधाच्या) प्रक्रियेने कारणाकडे पाहावे. नंतर त्याने अन्वयाच्या (विधायक) पद्धतीने, तेच कार्यरुपात आहे असे नित्य पाहावे. ॥१३८॥

**विवरण :-** कोणतीही वस्तु जाणण्यासाठी, जिज्ञासूने, कार्याहून कारण विलक्षण आहे, याचा नीट विचार करावा. हा विचार करताना शरीर, मन, बुद्धि यांनी आपण त्या कारणाचा शोध घेतो. वास्तविक आपल्या मन-बुद्धीच्या मागे उभ्या असलेल्या त्या चेतन आत्मतत्त्वानेच खरोखर शोध घेत असतो. म्हणून मन-बुद्धि इत्यादी इंद्रियांचा निषेध म्हणजे व्यतिरेकाने - म्हणजे त्यांना सोडून, शोध घेणे. म्हणजे आत्म-चेतनेने जाणणे होते. विचार करता करता, असे ध्यानात येईल की, कार्यात कारण असतेच. कारणात कार्य नसते. जर कार्यच उरले नाही. कार्यच संपले असेल तर कारणत्व तरी कुठे असेल. मग त्यावेळी, पाहाणारा, विचार करणाराच शिल्लक उरतो.

जेव्हा मी एखादी वस्तु पाहात असतो, त्यावेळी मी डोळ्यांनी पाहात आहे असे म्हणतो, तथापि त्या डोळ्यांच्या वा दृष्टीच्याही मागे पाहाणारा दुसरा कुणी तरी असतो. तो डोळ्यांच्या मागे असल्याशिवाय दृष्टि, डोळे पाहू शकत नाहीत. मी कानांनी जेव्हा ऐकतो त्या वेळी, त्या कानांच्या आत ऐकणारा दुसरा कुणीतरी उभा असतो. तो जर नसला तर ऐकणे हे कार्य होऊच शकणार नाही. म्हणून डोळे, कान,जीभ इत्यादी इंद्रियांच्या व्यतिरेकाने म्हणजे त्यांच्या निषेधाने, त्यांना सोडून जो त्या इंद्रियांच्या मागे आहे, तो आत्मा, आत्म-चेतनच अन्वयाच्या म्हणजे विधायक पद्धतीने, खऱ्या अर्थाने विचार करुन जाणावा लागतो.

प्रथम पाहाणारा कार्य पाहातो, कार्याला सोडून नंतर कारण शोधतो, मग मी कारणाशी एकरुप होतो, कार्य आणि कारण एकाच स्थितीत आहेत याची अनुभूति घेतो. उदाहरणार्थ मातीचा घट पाहतो, त्याचे उपादान कारण माती जाणतो- घटाचा आकार, नाम, रुप नाकारल्या शिवाय माती हे कारण कसे जाणणार ?

त्याच प्रमाणे अध्यात्म शास्त्रांत, तुम्ही जे नाही, ते शरीर, इंद्रिये इत्यादी नाकारा, मग विधायक पद्धतीने जाणा की, हे बहुविध जग दुसरे काहीही नसून फक्त ब्रह्मच आहे. आणि तेच सत्य आहे.

॥ हरि ॐ तत् सत् ॥

## (१३९) विचार करण्याची पद्धति - (विषय पुढे चालू)

**श्लोक :-** **कार्ये हि कारणं पश्येत्पश्चात्कार्यं विसर्जयेत ।**
**कारणत्त्वं ततो गच्छेदवशिष्टं भवेन्मुनि: ॥१३९॥**

**अर्थ :-** प्रथम कार्यात कारण पहावे आणि नंतर कार्याला सोडून द्यावे. अशा प्रकारे कारणाचेही कारण धुंडाळून, ज शेवटी शिल्लक (अवशिष्ट) राहील, ते सर्वांचे मूल कारण, जे आपले स्वरुप आहे, त्यास प्राप्त करुन मुनिच व्हावे. ॥१३९॥

**विवरण :-** प्रपंचात मनुष्याला अनेक कर्मे करावी लागतात. ही कामे करीत असताना, त्याचे मन सारखे असत नाही. काही कामे चांगल्या भावनेने केलीं जातात; तर काही वाईट भावनेने केली जातात. जी कामे आपल्याला आवडतात, पसंत पडतात, ती ती कामे नीट व चांगली होतात, तथापी कुणीतरी लादलेले, नको असलेले काम करावयाचे असल्यास, ते काम वाईट भावनेने होते. मनाची, चित्ताची प्रसन्नता असेल तर कार्य चांगलेच होईल पण तेच मन अप्रसन्न आहे, चित्तांत उद्वेग आहे, तर कार्यात दोष, चुका निर्माण होतात. तेव्हा अशा कार्यांत जो चांगलेपणा वाईटपणा येतो, त्याचे कारण प्रथम शोधले पाहिजे. त्यात असलेला कमीपणा, कशाने आला ते शोधले पाहिजे. कार्यात आलेले कारण सापडले की मग कार्य सोडून द्यावे व कारणाचाच विचार करावा. आपल्या कर्मामध्ये, शरीर, मन, बुद्धि, चित्त या कारणांनी कार्य योग्य वा अयोग्य ठरते.

आता आचार्य सांगतात कारणाचा शोध घेतल्यानंतर, त्या कारणालाही सोडून द्या. शरीर, मन, बुद्धि सोडून, जे उरते, ते आपले सत्-तत्त्व, आत्म-तत्त्व. शेवटी सर्व कारणांचे कारण, ते आत्म-तत्त्वच आहे. तेच सर्वांचे मूळ कारण आहे. तेच आपले स्वरुप आहे.

संसारी मनुष्य जेव्हा कार्यात कारणाचा शोध घेतो, त्यावेळी, तो व्यवहारातील कल्पना, भावना, इच्छा यांचाच शोध घेतो. वेदांतात मूळ कारणाचा

म्हणजे उपादानाचा विचार करावा लागतो. उदाहरणार्थ - उष्णतेचे कारण अग्नि, बिंदुचे कारण पाणी, मडक्याचे कारण माती. त्याच प्रमाणे संसारातील सर्व वस्तूचे मूळ कारण, ते आत्मतत्त्व वा ब्रह्म आहे. सर्व कार्यांमध्ये तेच उपादान कारण पूर्णपणे भरलेले आहे. असा विचार आल्यानंतर सर्व कार्य व त्यांतील कारणही सुटते व जे उरते, शिल्लक असते. ते आपले मूळस्वरुप. मग हे दिसणारे जग, ही सारी सृष्टि, हा सारा संसार हे सर्व ते दृश्य आहे, कल्पना आहे. मूळ आहे ते ब्रह्मच आहे. त्या ब्रह्माचा, आपल्या आत्म्याचा शोध घेऊन, आपले आत्मस्वरुपच जाणून मुनि व्हावे. आपण स्वतःच सुंदर, आनंदमय, प्रकाशमय व पूर्ण आहोत.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (१४०) ब्रह्म भावनेने ब्रह्मत्व प्राप्ति -

**श्लोक :-** **भावितं तीव्रवेगेन यद्वस्तु निश्चयात्मना ।**
**पुमांस्तद्धि भवेच्छीघ्रं ज्ञेयं भ्रमरकीटवत् ॥१४०॥**

**अर्थ :-** निश्चय पूर्वक तीव्र वेगाने ज्या वस्तूची भावना कराल, विचार कराल, तो साधक, विचारांती, शीघ्र, तसाच होऊन जातो. ही गोष्ट कीटभृंग न्यायाने, स्पष्ट केली जाते. ॥१४०॥

**विवरण :-** तीव्र वेगाने, व निश्चयपूर्वक, ज्या वस्तूची भावना धराल, त्या भावनेप्रमाणे मनाची अवस्था होत जाते. योगशास्त्रांत या प्रकारास ध्यान असे म्हणतात. ज्ञान संकलिनी तंत्र या ग्रंथात ध्यानाचे स्वरुप सांगताना म्हटले आहे -

**ध्येये सक्तं मनोयस्य ध्येयं एवानुपश्यति ।**
**नान्यं पदार्थं जानाति ध्यानमेत्प्रकीत्तितम् ॥**

ध्यानासाठी अंत:करण शुद्धि अत्यावश्यक आहे. अशा शुद्ध व सात्त्विक अंत:करणात, मन ज्या ध्येयावर आसक्त होऊन एकाग्र होते, त्यावेळी त्या मनाला ध्येया व्यतिरिक्त कसलेही भान नसते. ध्येयाशी एकरुप होणारे मन अन्य कोणत्याही गोष्टीकडे धावत नाही. त्या ध्येयाचेच अनुसंधान करता करता मनाचा लय होऊन जातो. मग ध्येय, ध्याता व ध्यान ही त्रिपुटीही रहात नाही. संत तुकाराम महाराज आपला अनुभव सांगताना म्हणतात -

**सांडिली त्रिपुटी, दीप उजळला घटीं ।**

ध्येय, ध्याता व ध्यान ही त्रिपुटी संपली की आत्म-ज्योतिस्वरुप दीप या देहरुपी घटांत प्रकाशित होतो, या श्लोकात आचार्य सांगत आहेत की, चिंतनशील साधक, ज्या चिरंतन तत्त्वाचे चिंतन करीत असतो, तो तेच होतो. 'भ्रमर-कीटक' न्यायाने, तुम्ही जसा विचार कराल, चिंतन कराल, तसेच तुम्ही होता. भ्रमर (भुंगा) एखाद्या किड्याला, आळीला, आपल्या घरटयात, विवरात आणतो व त्याला जाता-येता डंख मारतो. किडा डंख मारण्याने

व्यथित होतो व सारखा त्या भुंग्याचेच चिंतन करीत असतो. अशा प्रकारे तो किडा त्या भुंग्याच्या चिंतनाने, ध्यानाने, भुंगाच होऊन जातो.

भगवंताचे ध्यान करणारा साधक, दैवीगुण संपन्न असल्यामुळे, या त्याच्या निरंतर ध्यानाने, त्याच्यातील दैवीतत्त्व विकसित होत होत, तो देवच होऊन जातो. ध्यानाने वा अखंड चिंतनाने साधकाला त्या ध्येयाची प्राप्ति होते. श्री रमण महर्षींनी - 'रमण गीतेत' या ध्यानाचे स्वरुप सांगताना म्हटलें आहे की, **'हृत्स्थले मन: स्वस्थता क्रिया। भक्तियोग बोधाश्च निश्चितम्।'** हृदयाचे ठिकाणी मन स्वस्थ करणे हेच श्रेष्ठ कर्म, हीच भक्ती, हाच योग व हेच ज्ञान हे निश्चितपणे समजावे.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**



(शा.म.मु.)एनए ४००४-२०(१,१०५—१२-२०१६)

## (१४१) सर्वं खलु इदं ब्रह्म ।

**श्लोक :-** **अदृश्यं भावरुपं च सर्वमेव चिदात्मकम् ।**
**सावधानतया नित्यं स्वात्मानं भावयेद् बुध: ॥१४१॥**

**अर्थ :-** बुद्धिमान साधकाने सावध होऊन संपूर्ण दृश्याला, चिदात्मक अदृश्य आत्मरुप भावनेने पाहावे ॥१४१॥

**विवरण :-** या जगाचे वा सृष्टीचे निरीक्षण करताना आपणांस अनेक दृश्ये दिसतात. आपणांस दृश्ये दिसतात असे म्हणत असताना, ही दृश्ये पाहाणारा 'मी' कोण ? असा प्रश्न विचारताच, मी शरीर, मी डोळे, मी मन आहे का ? तर नाही. मग मी दृश्ये पाहाणारा या मनाच्या मागे असलेला, 'अदृश्य' न दिसणारा, चैतन्यघन आत्मा आहे. तो अदृश्य असूनही दृश्ये पाहातो. हे सर्व दृश्यमान् जगत् त्यातूनच प्रकट झालेले असल्यामुळे, तेही चिदात्मक, चित्-स्वरुप, आत्मस्वरुप आहे. जगाची, सृष्टीची उत्पत्ति-स्थिति-लय -या ब्रह्मातच होत असल्यामुळे, आणि मीही (आत्मा) ब्रह्मच असल्यामुळे, माझ्यात ही सारी दृश्यमान सृष्टि निर्माण होते, राहते व माझ्यातच विलीन होते. अष्टावक्र गीतेतही भगवान अष्टावक्र म्हणतात -

**मत्तौ विनिर्गतं विश्वं मय्येव लयमेष्यति ।**
**मृदि कुम्भो जले वीचि: कनके कटकं यथा ॥** सूत्र १० प्र. २

माझ्यातून निर्माण झालेले हे विश्व, माझ्यातच विलय पावते. ज्या प्रमाणे मातीचा घट शेवटी मातीत, पाण्याचा तरंग पाण्यात व अलंकार सोन्यात विलय पावतात. त्याप्रमाणे माझ्यात जगाचा विलय होतो. वेदांतात आत्म्याचे वा ब्रह्माचे निरुपण करताना निषेधात्मक पद्धतीने म्हणजे 'नेति नेति' अशा शब्दांनी केले जाते. असे नाही, असे नाही - असा निषेध करता, करता शेवटी जे शेष, शिल्लक राहील, तेच ब्रह्म होय. आत्मा व ब्रह्म एकच असल्यामुळे, त्या आत्म्याचा वा ब्रह्माचा निषेध होऊच शकत नाही. कारण ते शेष, परमपद 'मी' च आहे.

दृश्य आणि अदृश्य, व्यक्त आणि अव्यक्त आहे. सर्व ब्रह्मस्वरुपच आहेत. आत्मा वा ब्रह्म मूळांत अव्यक्त, या अव्यक्तातूनच सत् आणि चित् यांची अभिव्यक्ति होते. बाहेर दिसणारे जग व माझ्या अंतरंगात ज्याचा बोध होतो, ज्याची भावना वा विचार उत्पन्न होतो, हे सर्व दुसरे काहीही नसून शुद्ध चित्-तत्त्वाची अभिव्यक्ति आहे. हीच चिंतनाची पद्धति अखंड, काळजीपूर्वक सुरु ठेवली तर दृश्य व अदृश्य, व्यक्त व अव्यक्त म्हणून अभिव्यक्त होणारे सत्-चित्-तत्त्वच आहे हे कळून येते. मग ज्ञानासारखे दुसरे काहीही नाही.

**न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।** भ. गीता.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**



एनए ४००४-२०अ

## (१४२) प्रपंच ही ब्रह्मरुप आहे

**श्लोक :-** **दृश्यं ह्यदृश्यतां नीत्वा ब्रह्माकारेण चिन्तयेत् ।**
**विद्वान्नित्यसुखे तिष्ठेद्धिया चिद्रसपूर्णया ॥१४२॥**

**अर्थ :-** दृश्य प्रपंचाला अदृश्य समजून, त्यास ब्रह्मरुप समजून चिंतन करावे. अशा प्रकारे सूज्ञ साधकाने, चिद्रसपूर्ण बुद्धीने नित्य सुखात राहावे. ॥१४२॥

**विवरण :-** प्रपंच, हे जग, दृश्य आहे. ते आपण आपल्या डोळ्यांनी पाहात असतो. डोळ्यांना दिसणारी वस्तु आपल्या बाहेर आहे म्हणून ती दृश्य आहे. अदृश्य जे बाहेर दिसत नाही, ते अंतर्यामी आपल्या आंत आहे. आचार्य या श्लोकात सांगत आहेत की, जे दृश्य, जे बाहेर आहे. ते आपल्या अंतर्यामी प्रकाशाने प्रकाशित होऊन दिसत आहे. आपला अंतर्यामीचा दिवा जर विझलेला असेल, तर हे बाहेरचे प्रपंचरुप दृश्य दिसणार नाही. म्हणून हा प्रपंचही त्या आत्म्याच्या चेतन प्रकाशाने प्रकाशित होतो.

अंतर-बाह्य सर्व जर ब्रह्मच आहे. तर दिसणारे दृश्यही त्या अदृश्यातूनच उत्पन्न झालेले असल्यामुळे, तेही अदृश्य स्वरुप म्हणजे ब्रह्मस्वरुप आहे असे भावरुपाने पाहावे. हा सारा प्रपंच, हे सारे जग, त्या ब्रह्मस्वरुपाची, आत्मतत्त्वाची अभिव्यक्ति आहे. सारी शक्ति त्याचाच खेळ आहे. एकच चैतन्य-ब्रह्म वेगवेगळ्या क्रियारुपात प्रगट होते. त्या रुपांना-महत् अहंकार, पंच तन्मात्रा, पंच महाभूतें अशी नावे आहेत. ही भिन्नता केवळ नाममात्रच असते. अन्यथा ही सर्व एकाच ब्रह्माची रुपें आहेत. त्यांना वेगवेगळीं नावे दिल्यामुळे भिन्नतेचा भास होतो. बाहेरुन भिन्न भिन्न भासूनही अंतर्यामी ते संयुक्त व एकच आहेत.

ब्रह्माकार होऊन चिंतन करणे, हे आत्मज्ञान प्राप्तीनेच घडू शकते. आत्मज्ञान प्राप्तीत मुख्यत: दोनच प्रमुख अडथळे आहेत. ते म्हणजे शरीर व मन ! अज्ञानी माणसाच्या सर्व क्रियांचे संचलन या दोघांद्वारे होत असते. पण या दोघांच्या पलिकडे तिसरी शक्ति आत्म्याची आहे. जो आत्मा सर्व जगाकडे व सर्व क्रिया कर्मांकडे साक्षीभावाने पाहातो. तो आत्माच सर्व क्रियांची आधारभूत

उर्जाशक्ति आहे. साधकाने सूज्ञपणे हे सर्व जाणून, त्या आत्म्याच्या चिद्रसपूर्ण म्हणजे आत्म्याच्या चेतन सत्तेत आश्रय घेऊन नित्य सुखात राहावे. ज्या बुद्धिमान साधकाने, मनाची ही काळनदी पार केली, तोच आत्मज्ञान प्राप्त करुन अक्षय सुखात राहू शकतो. असा आत्मज्ञानी पुरुष धन्य होय. **स एव धन्यः आत्मज्ञः सर्व भावेषु यः समः ।** अष्टावक्रगीता सूत्र -६५

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (१४३) प्रसंग समाप्त

श्लोक :- **एभिरङ्गैः समायुक्तो राजयोग उदाहृतः ।**
**किञ्चित्पक्व कषायाणां हठयोगेन संयुतः ॥१४३॥**

**अर्थ :-** या अंगानी युक्त असा राजयोग सांगितला गेला आहे. किंचित् मल - परिपाक, म्हणजे अशुद्धि, जर शिल्लक असेल, तर त्यांनी या राजयोगासह हठयोग अवश्य करुन पाहावा. ॥१४३॥

**विवरण :-** श्रीमद् भगवद् पूज्यपाद आद्य शंकराचार्य हे समन्वयवादी होते. त्यानी योगशास्त्र व वेदान्तशास्त्र, याचा ही सखोल अभ्यास केलेला होता हे त्यांच्या चरित्रांतून दिसून येते. या श्लोकांत आचार्यांनी राजयोग व हठयोग यातील अंगांनी साधकाने साधन करुन आत्मस्वरुपाची प्राप्ति करुन घ्यावी असे स्पष्टपणे सांगितलेले आहे.

वेदान्ताने सांगितलेला सिद्धान्त **'सर्व ब्रह्ममयं जगत्'** व योगाने सांगितलेली 'निर्विकल्प समाधीची पूर्णावस्था', या दोन्ही पूर्णांशाने एकरुपच आहेत. राजयोग व पातंजल योग व हठयोग यातील सर्व साधन मार्गांचा समन्वय साधून, वेदान्ताची निदिध्यासनाची पंधरा अंगे यात अद्वैतच दाखविलेले आहे. योगशास्त्राची तात्त्विक दृष्टि, वेदान्ताच्या विरोधी नाही. तसाच वेदान्त शास्त्राचा एक ही सिद्धांत, योगांतील विचार सरणीच्या विरुद्ध नाही. आत्मप्रचीति, ब्रह्मसाक्षात्कार हेच योगाचे व वेदान्ताचे अंतिम साध्य आहे.

**आदौ ब्रह्माहम् अस्मिन् इति अनुभव उदिते, खल्विदं ब्रह्म पश्चात् ।**
अध्यात्म साधनेत अंतःकरण शुद्धिनंतर वेदान्तशास्त्राप्रमाणे दोन प्रकारची प्रतीति - अनुभव येतात. प्रथम मी ब्रह्म आहे. व नंतर सर्व जग ब्रह्मच आहे. मी ब्रह्मच आहे, ही अनुभूति साधनेने प्राप्त झाली की, तिलाच स्वानुभूति वा अपरोक्षानुभूति असे म्हटले जाते. स्वतःच ब्रह्मानुभूति घेतलेला साधकच सिद्ध होतो व तो या सर्व जगाकडे पाहात असताना, सर्व ब्रह्ममयच पाहात असतो. वेदान्त शास्त्रानुसार साधकाला ब्रह्म चिंतनाने, निंदिध्यासनाने, सर्व अंगांनी

अभ्यास केल्यानंतर ब्रह्माकार वृत्ती उदित होते. ही ब्रह्माकार वृत्ति योगशास्त्रांतील अंगांचा अभ्यास, अनुष्ठान केल्यानेही उदित होण्यास सुलभ जाते. राजयोगातील अष्टांगानी हे ध्येय पूर्ण झाले नाही तर चित्तात काही मल-कषाय राहिल्याने, ती पूर्णता प्राप्त झाली नाही असे समजून चित्ताला शुद्ध करण्यासाठी हठयोगातील काही क्रियांचा अभ्यास करावा असे स्वतः आचार्यच सूचवित आहेत. आचार्यांनी योगशास्त्र व वेदान्तशास्त्र यात समन्वय साधलेला दिसून येतो.

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (१४४) राजयोगाचे अधिकारी

**श्लोक :-** **परिपक्वं मनो येषां केवलोऽयं च सिद्धिदः ।**
**गुरु दैवत भक्तानां सर्वेषां सुलभो जवात् ॥१४४॥**

**अर्थ :-** ज्यांची मने परिपक्व (पूर्ण शुद्ध) झालेली आहेत. त्यांना केवळ हेच सिद्धिदायक आहे. त्याच प्रमाणे जे सद्‌गुरु व इष्ट देवाचे भक्त आहेत, त्यांना हे सुलभ व शीघ्र प्राप्ति करुन देणारे आहे. ॥१४४॥

**विवरण :-** भगवद् पूज्यपाद श्री आद्य शंकराचार्य यांनी या श्लोकात अंतिम सिद्धि म्हणजे आत्मानुभूति वा अपरोक्षानुभूति प्राप्तीसाठी राजयोगाची साधना सांगितलेली आहे. त्यांच्या दृष्टीने राजयोग म्हणजे निदिध्यासनाची ही पंधरा अंगे होत. राजयोग म्हणजे योगाचा राजमार्गही आहे. त्या राजयोगाच्या आठ अंगाचा समावेश या पंधरा अंगात केलेला आहे. त्यामुळे अशा सर्व अंगांनी, ज्या साधकाने साधना करुन आपल्या मनाची, चित्ताची शुद्धि करुन घेतलेली असेल, त्याला ही अध्यात्मांतील शेवटची, अपरोक्षानुभूति अवश्य प्राप्त होईल. तथापी रजोगुणी, तमोगुणी साधकाच्या अंतःकरणात अनेक प्रकारचे विकार व संस्कार भरलेले असतात. राजयोग साधनेने ते सर्वच निघून गेले नाहीत, काही मलिनता शिल्लक राहिलेली असल्यास, त्याने हठयोगाच्या साधनेने, ती मलीनता, मळ, घाण, खरडून काढली पहिजे. तरच त्याचे अंतःकरण पूर्णपणे शुद्ध होईल. परिपूर्ण शुद्ध अंतःकरणाचे लक्षणही माहीत असावयास हवे.

शुद्ध अंतःकरण असलेल्या साधकाचा स्वभाव गोड व मधुर असतो. फळ जो पर्यंत पिकत नाही तो पर्यंत आंबट लागते, तेच परिपक्व झाले की गोड व मधुर लागते. अशा साधकाच्या अंतःकरणांत द्वेष, मत्सर, घृणा नसते. तो सर्वांशी सौजन्याने व नम्रपणे वागतो. त्याच्या वासना, कामना, इच्छा त्याने संयमित करुन जिंकलेल्या असतात. काम, क्रोध, लोभ इत्यादी विकार नसल्याने तो अनासक्त असतो, त्याची सर्व कर्मे निष्काम भावनेने होत असतात. अशी परिपक्वता आल्यानंतर मग त्याला हठयोगाचा अभ्यास अनावश्यक

असतो. तथापी आपल्या साधनेत उन्नति होत आहे. साधना योग्य दिशेने चाललेली आहे. साधनेत आणखी कोण कोणत्या गोष्टींवर अधिक भर द्यावयास हवा. साधनेत कोणत्या उणिवा, कमतरता आहेत, हे ज्याचे त्यास कळत नाही. म्हणून साधकांनी जाणकार, सूज्ञ, सिद्ध अशा सद्‌गुरुंचा सल्ला, मार्गदर्शन घ्यावयास हवे.

अध्यात्माच्या मार्गात सद्‌गुरुंची अत्यंत आवश्यकता असतेच. प्रपंच्याच्या मार्गातही जर गुरुची आवश्यकता आहे, तर अध्यात्माच्या अनोळखी, अज्ञान मार्गासाठी सद्‌गुरुंची आवश्यकता निश्चितच अत्यंत लाभदायक आहे. सद्‌गुरुंची कृपा व त्या कृपेने काय घडते हे साधकाला माहीत असणे अगत्याचे आहे.

सद्‌गुरु आपल्या अंतरात जागृत असलेली शक्ति शिष्याच्या देहात प्रेरित करतात. त्यामुळे शिष्याची कुंडलिनी शक्ति जागृत होऊन त्याला अनेकानेक क्रिया होऊन, शक्ति जागृतीच अनुभव येतो. हा **'शक्तिपात योग'** वा **'कुंडलिनी सिद्ध महायोग'** आहे. या मार्गाची माहिती आपल्या अनेक धर्मग्रंथांमधून दिलेली आहे. या मार्गात सद्‌गुरु शक्तिपाताची दीक्षा देतात. ही दीक्षा चार प्रकारांनी होते. १) दृष्टिपात २) मंत्रदीक्षा ३) स्पर्श दीक्षा ४) संकल्प दीक्षा. सद्‌गुरुंचा संकल्प या सर्व प्रकारात असतोच शक्तिपात दीक्षेने शिष्याला अनेक प्रकारचे उत्तमोत्तम अनुभव येतात. अनेक प्रकारच्या क्रियांनी त्याची चित्तशुद्धि होते व साधना करीत करीत तो समाधीची अवस्था प्राप्त करतो. त्यानंतर ज्ञान भूमिकाही त्याला प्राप्त होतात. उदाहरणा दाखल काही अवतरणे बघा.

१) जयाते अवलोकन करी । परम पुरुषु श्रीहरी ॥
तेथ स्वानुभूतीची भरोवरी । होय आपैसी ॥१॥
कृपा दृष्टि सरिसी । समाधी प्रवर्तली रामासी ॥
उमसु घेवो नेदी मनासी । ब्रह्मानंदु तो ॥२॥
मग समाधि विसर्जली । तुरयावस्था प्रगटली ॥
जियेचेनि सकळ सृष्टि देखिली । शिवात्मक ॥३॥

**मुकुंदराजांचा - विवेक सिंधु.**

२) तव बोलिला श्री गुरुराजा । बारे तूं शिणलासि कव्हणिये काजा ।
कैसे बंधन तोडिजैल वोजा । हे चोज पाही रोकडेंचि ॥१॥
यैसी प्रतिज्ञा स्वीकारौनि । शिष्यातें सन्मुख बैसवोनि ।
ज्ञान समावेश करौनि । गुरु संप्रदाये क्रमें ॥२॥
तेथ ज्ञान शक्तीचा प्रवेशु । अज्ञान शक्तीचा निरासु ।
बोध उठविला स्वयंप्रकाशु । शिष्य चैतन्यीं ॥३॥

**विवेक सिंधु**

३) ज्ञानदेव म्हणे मी चाडे । सद्गुरुंनी केले कोडें ॥
माथीं हात ठेविला ते फुडे । बीजचि वाइले ॥१॥
ऐसी श्रीमुखौनि अक्षरें । निघती ना जंव एकसरे ॥
तंव अविद्येचे आंधारे । जावो चि लागे ॥२॥
तीं अक्षरे नव्हती देखा । ब्रह्मसाम्राज्य दीपिका ॥
अर्जुना लागी चित्कळिका । उजळलिया श्रीकृष्णे ॥३॥

**ज्ञानेश्वरी - ११-१७७**

४) सहजें प्रेमळाची करितां गोठीं । संमुख उद्धव देखिला दृष्टि ।
धांवोनिया घातली मिठी । आवडी मोठी भक्ताची ॥६७३॥
आवडी पडले अलिंगन । विसरला कार्य कारण ।
विसरला स्वधाम गमन । मी तूं पण नाठवे ॥६७४॥
नाठवे देव-भक्तपण । नाठवे कथा निरुपण ।
नाठवे उद्धवा उद्धवपणा । कृष्णा कृष्णपण नाठवे ॥६७५॥

**एकनाथी भागवत**

श्री आद्य शंकराचार्य भगवान श्लोकांत सांगत आहेत की,

**गुरु दैवत भक्तानां सर्वेषां सुलभो जवात् ॥१४४॥**

गुरु म्हणजे सद्गुरु व दैवत म्हणजे इष्टदेव-देवता. यांच्या भक्तीने, कृपा प्रसादाने साधकाला शक्ति, बल व प्रेरणा मिळते. मग तो साधनेने शीघ्र

आपल्या इच्छित ध्येयाप्रत पोहचत असतो. त्याला आत्मानुभूति वा ही अपरोक्षानुभूति प्राप्त होते. श्रुति सांगते -

**यस्य देवे पराभक्तिः यथा देवे तथा गुरो।**

**तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ति महात्मनः** ।। श्वेता श्वेतरोपनिषद्।।

ज्या साधकाची आपल्या इष्ट देव-देवतेत पराभक्ति आहे आणि तशीच पराभक्ति आपल्या सद्गुरुंच्याही ठिकाणी आहे. त्यालाच महात्मे, या श्रुतीत सांगितलेला तत्त्वप्रकाश, वा आत्मप्रकाश प्रदान करतात. आपले इष्ट दैवत म्हणजेच भगवान व सद्गुरु हे भिन्न नाहीत. ते अद्वैतात असतात. तो इष्टदेव-देवता व सद्गुरु आत्मदृष्टीने एकच आहेत. **'गुरुरेव परब्रह्म'** असे श्री गुरुगीताही सांगते. त्या सर्वातीत, अनंत आत्म्याचा अनुभव म्हणजेच अपरोक्षानुभूति आहे. अपरोक्षस्य ब्रह्मणः अनुभूति, अपरोक्षस्यात्मनः अनुभूतिः अपरोक्ष यथास्यात् तथानुभूतिः अपरोक्षानुभूतिः । ही अपरोक्ष ब्रह्माची अनुभूति आहे. अपरोक्ष आत्म्याची अनुभूति आहे. जशी अपरोक्ष असेल तशी अनुभूति आहे. म्हणूनच हिचे नाव 'अपरोक्षानुभूति' आहे

**शक्तिपातावरील संपूर्ण माहिती देणारे ग्रंथ -**

१) श्री आद्य शंकराचार्यांची - स्फुट काव्यें

२) श्रीमत् विद्यारण्य स्वामी यांचा -जीवमुक्ति विवेक

३) श्री गोरखनाथाचा - सिद्धसिद्धान्त पद्धति

४) श्री शंकर पुरुषोत्तम तीर्थ महाराज यांचा - योगवाणी

५) श्री योगानंद महाराज यांचा महायोग विज्ञान.

६) श्री विष्णुतीर्थजी महाराज यांचे - देवात्मशक्ति व शक्तिपात सूत्रें

७) श्री शिवोम् तीर्थजी महाराज - यांचे शक्तिपात-पथ-प्रदर्शिका भाग १,२,३ व प्रश्नोत्तरी इतरही अनेक ग्रंथ आहेत.

८) श्री सद्गुरु गुळवणी महाराज - 'कल्याण साधना अंक'

**।।हरी ॐ तत् सत्।।**

**।।इति अपरोक्षानुभूति ग्रंथ समाप्त।।**

## (१४५) समर्पण

**श्रीमत् भगवद् पूज्यपाद आद्य शंकराचार्य यांचे श्रीचरणीं वंदन !!!**

शंकरं शंकराचार्य केशवं बादरायणम् ।
सूत्र भाष्यकृतौ वन्दे भगवन्तौ पुनः पुनः ॥
श्रुति-स्मृति पुराणानां आलयं करुणालयम् ।
नमामि भगवत्पादं शंकरं लोकशंकरम् ॥

खरा साधक कर्मे करुनही त्यांचे कर्तृत्व घेत नाही. ज्याचा अहंभाव विसर्जित झालेला असतो. भगवंत आणि गुरु जो एकरुप मानतो तो म्हणतो-

**कर्ता करविता भगवंत । मी केवळ निमित्त येथ ।**
**तत्पदीं अर्पिला हा ग्रंथ । माझें न काहीं ॥**

त्या नंतर प्रार्थना करतो की, -

**- नम्र प्रार्थना -**

हे आद्य गुरुवरा ! आचार्य शंकरा,
तुमचें चरणीं, नम्र प्रार्थना ।
सन्मति द्यावी, विवेक करण्या,
वैराग्याने, घडो साधना ॥१॥

काय करावें हें गुरुदेवा ।
अपरोक्षाचा अनुभव येण्या ।
कशी करावी आत्म साधना,
भक्तांची ही असे प्रार्थना ॥२॥

गुरु कृपेच्या आधीन व्हावें,
त्या विण दुसरा मार्ग नसे ।

गुरु कृपेचा एकचि शब्द,
आम्हां मिळतां सर्व कळें ॥३॥

आंतर बाह्य हि एकच भरलें,
ठायीं ठायीं ब्रह्म दिसे ।
द्वैताचे मग नांव न उरलें,
सर्वा ठायीं अद्वैत दिसे ॥४॥

माझ्या मध्यें मी च आहे,
दुसरा तेथें कोणी नसे ।
माझें मजला त्वरित लाभलें,
कोणाची मग आस नसे ॥५॥

सर्वा ठायीं सर्वच काळीं,
मी च सदा सर्वत्र वसे ।
अपरोक्षाचा अनुभव येता,
बाहेरी तो मुळी न दिसे ॥६॥

**इति शम्**

**॥ हरि ॐ तत् सत् ॥**

## (१४६) ऋण निर्देश

'श्री अपरोक्षानुभूति' - या ग्रंथाच्या निर्मितीत, श्रीमत् भगवद् पूज्यपाद आद्य शंकराचार्य भगवान यांचीच असीम कृपादृष्टिच कारणीभूत आहे. हाताशी कोणतेही साहित्य उपलब्ध नसतांना, या विषयावर काय नि कसे बोलावे ? हा प्रश्न होता.

१) आमचे शक्तिपात परंपरेचे सिद्ध सद्गुरु योगचूडामणि ब्रह्मलीन महात्मा - श्री १००८ वामनरावजी गुळवणी महाराज यांना - व

२) प.पू. श्री १००८ शक्तिपाताचार्य सद्गुरु स्वामी शिवोम् तीर्थजी महाराज या उभय गुरुदेवांना साष्टांग प्रणाम करुन मनोमय प्रार्थना केली आणि काय आश्चर्य, मज जवळ संग्रहांतून -

३) सत्साहित्य - प्रकाशन ट्रस्ट ने प्रकाशित केलेला, प.पू. श्री १००८ अनंतश्री स्वामी अखण्डानंद सरस्वती महाराज यांचा हिन्दी भाषेतील अपरोक्षानुभूति प्रवचन हा ग्रंथ हाती आला. या ग्रंथाचे वाचन १५-२० वर्षांपूर्वी केलेले होते. त्यामुळे फार धीर आला. पूजनीय अखण्डानंद सरस्वती महाराजांचे फार मोठे ऋण माझेवर आहे. त्यांची इतर ही ग्रंथ संपदा माझ्या वाचनात होती

४) सेंट्रल चिन्मय मिशन ट्रस्ट, मुंबई - ७२, या संस्थेने प्रकाशित केलेला 'अपरोक्षानुभूति' हा छोटासा पण फारच उपयुक्त ग्रंथ मुंबईचे आमचे साधक- श्री हेमन्तजी भोळे यांनी आणून दिला. ग्रंथ मराठी भाषेत असल्याने विषय समजण्यात मदत झाली. या ग्रंथ कर्त्याचाही मी ऋणी आहे.

या शिवाय अनेक संदर्भ ग्रंथ प्राप्त झाल्याने ग्रंथ निर्मितींत मोलाची भर पडली.

(संदर्भ ग्रंथ सूची पुढील पानावर दिलेली आहे.)

## -: संदर्भ ग्रंथ :-

१) श्री गुरुगीता

२) श्री भगवद्गीता

३) उपनिषदें -

    १) तैतरीय उपनिषद्

    २) कठोपनिषद्

    ३) श्वेताश्वेतरोपनिषद्

    ४) छांदोग्य उपनिषद्

    ५) ईशोपनिषद्

    ६) बृहदारण्यक उपनिषद्

    ७) मैत्रायणी उपनिषद्

    ८) मुंडकोपनिषद्

    ९) जाबालदर्शनोपनिषद्

४) अष्टावक्र गीता

५) मनाचे श्लोक - श्री समर्थ रामदास स्वामी

६) आत्मषटकम् - श्री आद्य शंकराचार्य

७) पातंजल योग दर्शन - श्री भगवान् पतंजलि

८) शिव मानस पूजा स्तोत्र - श्री आद्य शंकराचार्य

९) श्री ज्ञानेश्वरी - श्री संत ज्ञानेश्वर महाराज

१०) विश्वसार शारदा तिलक

११) वायवीय संहिता

१२) संत तुकाराम महाराज - गाथा

१३) योग वासिष्ठ

१४) कुलार्णव तंत्र

१५) सौंदर्य लहरी - टीका - प.पू. श्री स्वामी विष्णु तीर्थजी महाराज.

१६) प्राण तोषिणी तंत्र

१७) श्रीमत् भागवद् एकादश - स्कंध
१८) घेरंड संहिता
१९) ज्ञान संकलिनी तंत्र
२०) रमण गीता - श्री रमण महर्षी
२१) विवेक सिंधु - श्री मुकुंदराज
२२) श्री एकनाथी भागवत - श्री संत एकनाथ महाराज

॥ हरि ॐ तत् सत् ॥



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

।। श्री सद्‌गुरवे नमः ।।

प.पू. श्री स्वामी नित्यबोधानंद तीर्थ विरचित ग्रंथ संपदा

१. नित्यबोध भावगंगा
२. साधना कैवल्य प्राप्तीची
३. श्री चांगदेव पासष्टी
४. हरिपाठ
५. कुण्डलिनी सिध्द महायोग
अर्थात् शक्तिपात योग